TEXT PROBLEM
WITHIN THE
BOOK ONLY

UNIVERSAL LIBRARY
OU_192885
UNIVERSAL LIBRARY

अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख

अगदीं स्वतंत्रपणें लिहिलेलें सुरसग्रंथमालेचें **पन्नासावें पुष्प**

# वणव्यांतलें फूल !

लेखक

**श्रीयुत समाज सुधारक.**

प्रकाशक

**मोतीचंद गुलाबचंद व्होरा, बी. ए., एल्एल्. बी.,**

प्रोप्रा० सुरसग्रंथप्रसारक मंडळी, १२४८ शुक्रवार,

सिटी मॅजिस्ट्रेट कोर्टासमोर, पुणें शहर.

मुद्रक—दत्तात्रय गणेश खांडेकर

'लॉ-प्रिंटिंग' प्रेस, ५३० शनवार पेठ, पुणें.

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन. ]

प्रथमावृत्ति ] **किंमत ३॥ रुपये.** [ १९२५

# प्रेमाश्रम.

## ह्या उत्कृष्ट कादंबरीसंबंधानें कांहीं अभिप्राय:—

महाराष्ट्र-नागपूर:—"प्रसिद्ध हिंदी कादंबरीकार बाबू प्रेमचंद यांच्या 'प्रेमाश्रम' या उत्कृष्ट कादंबरीचें हें मराठी रूपांतर असून तें चांगलें साधलें आहे. शेतकऱ्यांच्या दुःस्थितीचें चित्र या कादंबरींत फार सुंदर रेखाटलें आहे. लाला प्रभाशंकर, ज्ञानशंकर व रावसाहेब कमलानंद हे या कादंबरींतील जमिनदार जुन्या व नव्या पिढींतील जमिनदारांच्या गुणावगुणांची उत्तम कल्पना आणून देतात. प्रेमशंकरचें चरित्र वाचतांना, टॉलस्टॉयच्या 'ॲना कॅरेनिना' या कादंबरींतील 'लेविन' या जमिनदाराची आठवण हटकून होते. गायत्री व ज्ञानशंकर यांचा स्वभावविकास फार उत्तम दाखविला आहे. या कादंबरींत रेखाटलेलें हिंदी समाजाचें चित्र पाहून, जमिनदार व रयत यांच्या अवनत स्थितीची पुष्कळ कल्पना येते. 'मुकुट' ही शेवटीं दिलेली रवींद्रांची लघु कथाही चांगली आहे."

मौज-मुंबई—"मालेनें आजवर प्रसिद्ध केलेल्या पुस्तकाप्रमाणेंच हेंहि पुष्प उठावदार व मजेचें आहे. शेतकऱ्यांची दैन्यावस्था यांत उत्तम रीतीनें वर्णन केली असून त्यांना भांडवलवाल्याकडून कसें गांजलें जातें, तसेंच खेड्यापाड्यांतील शेतकरी वर्गावर बिगारी कशी लादली जाते व सरकारी सात रुपड्याचा नोकर सातशें रुपयांची जमीन करणाराला सत्तेच्या सावलींत कसा सतावून सोडतो, यांचें सकरुण शब्दचित्र या पुस्तकांत गोवलें आहे. त्याचप्रमाणें कित्येक श्रीमंतांचीं पोरें खुशालचंद बनून आपल्या गरीब कुळांना नाहक कशीं छळतात व आपण आपलीं कृत्यें कशीं चेनीनें चालवितात व तीं दुष्ट कृत्यें कशीं असतात या सर्वांचें स्पष्टीकरण यांत केलें आहे. एकंदरींत पुस्तक अत्यंत उपयुक्त असें असून वाचनीय आहे."

ह्या पुस्तकावर नवा काळ, केसरी, शुभसूचक, स्वयंसेवक वगैरेंनीं उत्कृष्ट अभिप्राय दिले आहेत.

**भाग १ व २ मिळून किंमत रु. ७. परंतु १ रु. भरून मालेचे ग्राहक होणारांस हें व मालेचीं इतर सर्व पुस्तकें निम्म्या किंमतीस मिळतील.**

**सेक्रेटरी, सुरसग्रंथमाला, पुणें.**

# वणव्यांतलें फूल.

## प्रकरण १ लें.

### अंतःपुरांतील वादळ.

**वडगांवचे** जहागीरदार भाऊसाहेब याच्या वाड्याबाहेरील देवडीपुढे एक भिकारी खजीरीवर "हरिसे कोई नहिं बडा दिवाना, क्यों गफलतमें पडा" हे गाणें म्हणत होता. त्यावेळी एक विधवा वाड्याच्या गच्चीवर वडे घालीत बसली असून, हे काम करतां करतां ती ते गाणे ऐकत होती.

या विधवेचे वय ३५ वर्षांचे होते. तिचा चेहरा जरी मांसल नव्हता तरी अत्यंत सुंदर होता; आणि तिच्या मुखश्रीवर दुःख आणि निराशा यांची छाया पसरलेली होती, तरी तिच्या मुखावर कृष्ण पक्षाच्या चंद्राप्रमाणें तिच्या शीलाचें तेज सारखे झळकत असे.

ती शरदृतूची प्रातःकाल होती. न्हाऊन आणि सफेत वस्त्र परिधान करून ती गौरवर्णाची विधवा, एका चांदीच्या ताटांत उडदाच्या दाळीचें कालविलेलें पीठ घेऊन त्याचे वडे घालीत बसली होती. तिच्यासभोंवतालचें वातावरणही तिच्याप्रमाणेच शुचिर्भूत आणि पवित्र होतें.

विधवा आपल्या गौरवर्ण गोंडस हाताने मोठ्या जोराने ते पीठ फेनीत होती. ती जोजों ते पीठ फेनी, तोतों त्याचा वर्ण अधिकच पांढरा होई. पीठ तिच्या मनाप्रमाणे फेनणे झाल्यावर तिणे वडे घालावयास सुरुवात केली.

थोड्याच वेळानें तेथें सोन्यासारखी सुंदर, लोण्यासारखी कोमल आणि कमलाच्या देठाप्रमाणे गोंडस हातपाय असलेली एक तीन चार वर्षांची मुलगी आली. तिच्या अंगावर सोन्याचे अलंकारही बरेच होते. तिथे येताच ती पाय पसरून खाली बसली आणि एका बाहुलीला पोटाशी धरून तिच्याशी गमतीगमतीनें खेळूं व बोलूं लागली. तिचा हा खेळ पाहून ती जणू काय आपल्या भावी अपत्याच्या संगोपनाचा अभ्यासच करीत आहे असें वाटे!

काय असेल ते असो! त्या विधवेचें लक्ष आपणाकडे लागावें, म्हणून ती मुलगी म्हणू लागली, "काकी वडे घालील अन् मनी थाईल."

विधवेनें तिच्याकडे वत्सलपूर्ण दृष्टीनें पाहिलें आणि म्हटलें. "असं बोलू नये बर, बाळ! हे वडे देवासाठीं घालीत आहों. प्रथम देवाला याचा नैवेद्य जाईल आणि मग मनी खाईल. खरं ना?"

हें ऐकून मुलगी मान हालवून म्हणाली, "हो! पहिल्यानें देव थाईल, मग मनी थाईल. होय ना काकी?"

विधवेनें मान हालवून म्हटलें, "माझी मनु मोठी शहाणी आहे. मी आता वडे घालतें, नि तू गप्प बस. पुढें बोलायचं नाहीं बरं का!"

मनीनें मान हालवून तिच्या म्हणण्याला मान्यता दर्शविली. ती फेरून आपल्या बाहुलीच्या नादीं लागली. ती त्या बाहुलीला हातावर धरून "निज निज बाळा! झोंका देतां हात दुखला, पाळण्यांत बाळ निजलीला" असं कांहीं तरी अस्ताव्यस्तपणें पण वत्सलभावानें थबथबलेलें असें गाणें आपल्या बाल आवाजानें म्हणू लागली.

तिची ती क्रीडा आणि तिच्या ठिकाणचा तो अकृत्रिम मातृभाव पाहून त्या विधवेचें हृदय निष्फल मातृस्नेहानें उचंबळूं लागलें. विधवेचें

नाव गिरिजाबाई होते; पण तिला सर्व काकी म्हणत. तिचा तो अतृप्त वत्सलभाव कसल्या तरी आश्रयासाठी व्याकूळ झाला असून तो तिच्या नेत्रांच्या द्वारे अश्रूरूपाने क्षणोक्षणीं टपकत होता. ते अश्रू तिने हळूच आपल्या पदराने पुशिले.

यावेळीं खाली कसलासा गलबला झालेला तिच्या कानावर आला; आणि त्याच्यामागोमागच "चपे! चपे! अग चपे! कसली चिठ्ठी आहेग ती?" असे कोणी म्हणाल्याचेहि तिला ऐकावयाला आले.

जहागिरदाराच्या वाड्यातील जनानखान्यात, त्याजवरचे सात पाहारे ओलांडून, चिठ्ठी पोचती करण्याची कोणाचीही प्राज्ञा नव्हती. तसे साहस कोणी केले आणि अंतःपुरातील एखाद्या स्त्रीला चिठ्ठी पोचविली, तर त्याच्या दुर्दशेला पारावार राहात नसे. शिवाय इतक्या कडेकोट बंदोबस्तातून एखाद्या स्त्रीला तिच्या कोणा नातलगाचे पत्र मिळालेच, तर ते वाचावयाचीही पंचाईत. जोशीबुवाना बोलावून आणावे तेव्हा कुठे त्या चिठ्ठीत काय लिहिले आहे हे कळावयाचे! हा मजकूर ऐकण्याचीसुद्धां केवढी पंचाईत! जोशीबुवानी दाराबाहेर उभे राहावयाचे आणि चिठ्ठीच्या मालकिणीने दाराआड उभे राहिल्या राहिल्या ऐकावयाचे!

चपी त्या घरातली एक दासी होती. तिच्या हातातली चिठ्ठी पाहून अंतःपुरातील सगळ्या स्त्रियानी तिच्यावर वरील प्रश्नाचा सारखा मारा सुरू केला.

ती फटपण म्हणाली, "ही चिठ्ठी काकीची आहे."

तिचे हे उत्तर ऐकून एक स्त्री म्हणाली, 'काकीची चिठ्ठी! काकीचे तर दोघीकडेही कोणी उरले नाही. मग त्याना चिठ्ठी कोणी पाठविली?"

चपी मिचशा वर चढवून म्हणाली, "मला काय ठाऊक कोणी पाठविली ती? मी काही काकीची मैत्रीण नाही, की कोणी ज्योतिषीण पण नाही."

चपेच्या खमंग उत्तराने सगळ्या जणी गप्प बसल्या. नंतर तिला विचारण्याचे कोणाला साहस झाले नाही.

यावेळीं घरांतल्या मुलांबाळांनींही चंपीला वेढा दिला आणि तिच्या हातांतलें पत्र घेण्याचा तीं प्रयत्न करूं लागली. पण चपी त्यांना बिलकूल दाद न देतां काकी वडे घालीत होत्या तेथें गेली आणि त्यांच्या-पुढे ते पत्र टाकून म्हणाली, "काकी ! हे तुमचे पत्र आले आहे ते घ्या !" तिच्या मागोमाग, मुलांबाळांचा आणि बायकांचाही बराच मोठा घोळका तेथे आला. काकी आज त्यांना एक नवीनच चीज दिसू लागली. अतः-पुरांतल्या स्त्रियांना पत्र येणे ही गोष्ट आज कित्येक वर्षे तेथें अगदी अपरिचित होती.

छोटा बाबू बाळूला म्हणाला, "बायकांना का कधी कोठे पत्र येतात का रे !"

बाळूच्या आयुष्याची एकदम दहा वर्षे अतःपुरांत गेली होती. परतु त्याच्या तेथच्या इतक्या दिवसांच्या ज्ञानाला ही गोष्ट अगदी नवीनच होती. यामुळे या प्रश्नाचे उत्तर देण्याचे साहस त्याच्याने करवेना. तथापि थोड्या वेळाने तो खूब गंभीरभाव धारण करून म्हणाला, "बेशक ! ही मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे. बायकाना पत्रे !"

काकीने आपल्या हातांत ते पत्र घेऊन त्याजकडे एक वेळ सरासरी पाहिलें. त्याजवरचे अक्षर कांही त्यांच्या ओळखीचे दिसले नाही. नंतर त्या मोठ्या लाचारीच्या स्वराने म्हणाल्या, "कुणीं बर हे पत्र लिहिले असेल ? कोणाकडून वाचवावे ? बेटा बाळू ! तुला वाचतां येईल कां रे हे ?"

काकीला थोडेबहुत लिहितां वाचतां येत होते. त्यांचे पति एक चांगले सुशिक्षित आणि नव्या विचाराचे गृहस्थ होते. त्यांनीं आपल्या पत्नीला लिहिणेंवाचणे शिकविण्याचा प्रयत्न चालविला होता. पण एका-एकी त्यांच्यावर कालाचा घाला पडल्यामुळे काकीच्या लिहिण्यावाचण्याचीही त्याबरोबरच समाप्ति झाली. काकी ह्या भाऊसाहेब जहागीरदारांच्या नात्यानें भावजय लागत होत्या. काकीला मुलबाळ कांहीं झालें नव्हतें. पतीच्या मागे त्या सर्वस्वीं असहाय्य बनलेल्या पाहून भाऊसाहेबांनीं त्यांचें सहाय्यक होण्याचें ठरविले. परंतु ते त्यांचे सहाय्यक बनल्या-नंतर त्यांची सारी इष्टेट, जमीनदारी, एवढेंच नव्हें, तर त्यांचें वडिलार्जित

घरसुद्धां त्यांच्याच हातानें नाहींसें झालें ! इतकें झाल्यानंतर काकींना नाइ-लाजानें भाऊसाहेबांच्या घरीं येऊन राहावें लागलें. पण तेथे आल्यावर स्त्रीशिक्षणाच्या बाबतींत खुद्द भाऊसाहेबांचीं आणि त्यांच्या घरांतल्या बायकामाणसांचीं विलक्षण मते पाहून त्यांना आपली शिकलेली विद्याही विसरणे जरूर वाटूं लागले ! स्त्रिया लिहिणेंवाचणें शिकल्यामुळे विधवा होतात, दुराचारिणी होतात, गृहलक्ष्मी सरस्वती मातेची सेवा करूं लागली, कीं, लक्ष्मीमाता त्या घरातून रुसून गेलीच म्हणून समजावें, इत्यादि प्रकारची त्या घरांतील खुद्द स्त्रियांचीच मते होतीं ! अशा स्थितींत काकींना स्वतःचे लिहिण्यावाचण्याचे ज्ञान तेथच्या कोणाही व्यक्तीच्या नजरेस येऊ न देण्याची खबरदारी घेणे अत्यत आवश्यक वाटू लागले असल्यास त्यांत आश्चर्य काय ! पत्र हाती आल्यानतर ते वाचण्याविषयी काकीना अतीशय मोह झाला. पण त्यांना तो निरुपायानें आवरावा लागला. नतर ते वाचण्याच्या बाबतीत तेथे हजर असलेल्या पुरुषांपैकीं वयाने आणि ज्ञानाने सर्वात श्रेष्ठ अशा बाळूचा त्यानी आश्रय घेतला.

बाळूचे वय १० वर्षांचे होतें. जन्मताच हे पोर दुबळे जन्मले होतें. आईने पिंपळाचे पार झिजवून, आणि अनेक देवांना नवस करून, या पुत्ररत्नाची मोठ्या सायासाने प्राप्ति करून घेतली होती. पुढे पोरगा जन्म-ल्यावरही त्याचा दुबळा देह शाबूत राहण्यासाठीं आणि मधून मधून येणाऱ्या अनेक गडांतरांतून त्याची जीवितनौका सुरक्षितपणें पैलतीराला पोचावी म्हणून अनेक देवऋषींचा आणि गडादोऱ्यांचा आश्रय तिने केला होता. बाळू आतां चांगला दहा वर्षांचा झाला होता, तरी त्याचे मोठे पोट आणि हात-पायाच्या काड्या कायमच होत्या ! त्याच्या गळ्यांत आणि दंडांत बांध-लेल्या काळ्या दोऱ्यांतून अनेक तऱ्हेचे धातूचे चित्रविचित्र ताईत लटकत होते. गळ्यांतल्या तायतांच्या मध्यभागी तांब्याने मढविलेला एक सागर-गोटाही लटकत होता ! यांव्यतिरीज, बाळोबांच्या डोक्यावर नवसाची ठेव-लेली बटही भरभर उडत होती. इतक्यांतूनहि एका गोष्टीचा उल्लेख करा-वयाचा राहिलाच. ती म्हणजे बाळोबांच्या पायांतली "बेडी" होय. बाळोबांवर यमराजाचें वारंट बजावलें जाऊं नये म्हणून त्यांच्या मातो-

श्रीने त्यांच्या पायांत ही "बेडी" ठोकून त्यांना कोणत्या कीं देवाचें कांहीं कालपर्यंत बंदिवान् करून टाकले होते !

सर्वांना सोडून काकींनी आपल्याला पत्र वाचण्याची विनति केली, हे पाहून बाळोबाच्या अंगांतही गर्व चढला ! आणि ते मोठ्या आढ्यतेने म्हणाले, " हो हो, मी वाचतो. "

बाळोबाचे हे अद्‌भुत साहस पाहून सगळेजण त्याजकडे आश्चर्यचकित दृष्टीने पाहू लागले. पोरगा जगला वाचला तर मोठे नाव काढील, कोणी तरी मोठा साहेब होईल, असे तेथे जमलेल्या स्त्रियांपैकी प्रत्येक जणीस वाटले ! कारण त्या कागदावरच्या आडव्या उभ्या रेघातून लिहिणाऱ्याच्या मनातली गोष्ट सांगून द्यायची ही करामत "नाना शास्त्री"च्या ग्रहांचे फल सांगण्याच्या करामतीहून काही कमी नाही ! आपल्या मुलाकडे सर्वजण कौतुकपूर्ण दृष्टीने पाहू लागलेली पाहून, बाळोबाच्या मातोश्रींना त्यांना कुठे ठेवू आणि कुठे न ठेवू असे होऊन गेलें !

बाळोबांनी मोठ्या गंभीरपणाने ते पत्र हाती घेतले. पण त्यातून पत्र बाहेर कसे काढावे हे रहस्य त्याना अद्याप ठाऊक नव्हते. लिफाफ्याच्या तुरुंगात अडकलेला तो पत्ररूप कैदी बाहेर कसा काढता येईल, याची युक्ती शोधून काढण्यासाठी त्याने दोन चार वेळां तो लिफाफाच उलथा पालथा केला !

मुलावरचे संकट मातेने ओळखले आणि म्हटले, " बाळू ! इकडे आण तो लखोटा. मी तुला त्यातले पत्र काढून देते. "

मातेच्या सहाय्याने बाळोबाचे संकट टळून त्याना जरा हायसे वाटले ही गोष्ट खरी; पण इतक्या लोकांदेखत यासंबंधाचे आपले अज्ञान व्यक्त झाले याबद्दल त्यांना थोडी लाज वाटली, आणि त्याबरोबरच आईचा खूब रागही आला. ते आपल्या मनाशीं म्हणाले, " आईला एवढी गडबड करण्याचे काय कारण होते ? थोड्या वेळांत मला या लिफाफ्यांतून पत्र काढतां आले असतें. "

इतक्यांत त्याच्या आईने लिफाफ्यातले पत्र काढून त्यांच्या हातीं दिले. पण पुढें काय ? त्यांनीं शाळेंत जी वर्णमाला अवगत करून घेतली

होती तिच्याशीं त्या पत्रावरील अक्षरांचा बिलकूल मेळ जमेना. त्यांना तीं अक्षरें म्हणजे आडव्या उभ्या रेघांचे एक विलक्षण जाळे दिसू लागले ! त्यांनी अनेक वेळां त्या अक्षरांकडे डोळे फाडफाडून पाहिले, आणि थोड्याच वेळात त्यांची खात्री झाली की, हे कांही साधारण काम नव्हे ! त्याबरोबर त्यांनीं ते पत्र मोठ्या तिरस्काराने जमीनीवर फेकून दिले आणि म्हटले, " हे काय अक्षर आहे, कीं सोंग आहे ? ज्याला अक्षरेही नीट लिहिता येत नाहींत त्याने पत्र कशाला लिहावे ? "

हा प्रकार पाहून बायका मोठमोठ्याने खो खो करून हसू लागल्या. त्याबरोबर बाळोबांनीं तेथून यःपलायन केले !

सगळ्या बायका मनातल्या मनात म्हणाल्या, " बाप तसा बेटा आणि कुंभार तसा लोटा !"

मुलाला पत्र वाचता आले नाहीं, त्यामुळे बाळोबाची आई अगदी लज्जित होऊन गेली. तिला आपली मान वर करवेना.

काकी फिरून पंचायतींत पडल्या. इतक्यात चंपी त्यांना म्हणाली, " काकी ! जोशीबोवांना बोलावून आणू का ? " काकीनाच नव्हे तर सर्वांना ही सूचना पसंत पडली. जोशीबुवा हे भाऊसाहेबाचे कुलपुरोहीत होते. त्यांचे नाव " रामचंद्रपंत. " यांचे वय सध्या जवळ जवळ पन्नास वर्षांचे होते. तथापि यांचे शरीर सुदृढ आणि अंगकांति तेजःपुंज होती. त्यांचे कपाळ अत्यंत विस्तृत असून, त्यांच्या डोक्यावर एकही केस नसल्यामुळे ते अगदी गुळगुळीत बनलेले होते ! नाही म्हणावयाला कानांजवळ आणि मानेशी थोडी केसांची लकेर चमकत होती. ते जहागीरदारसाहेबाच्या घरच्या देवाची पूजा करीत. त्याशिवाय त्यांच्या इथची ' हव्यकव्ये '- हि तेच करीत; याबद्दल जहागीरदारसाहेबांकडून त्याना कायमचीच नेमणूक होती. जहागीरदारांच्या घरातल्या स्त्रिया त्यांच्या बाबतीत पडदा ठेवीत नसत. त्यांना त्यांच्या घरात कुठेही वावरण्याची परवानगी असे. जोशीबुवा अत्यंत सच्चरित असून जमीनदारांवर व त्यांच्या घरच्या मंडळीवर त्यांचे अतिशय वजन असे. काकीनीं त्यांना चंपेकडून बोलावून घेतलें.

ते घरीं आल्यावर काकींनीं त्यांचा योग्य प्रकारें सत्कार करून त्यांच्या-पुढें ती चिठ्ठी टाकली आणि म्हटले, " जोशीबुवा ! हें पहा बरं कोणाचें पत्र आलें आहे तें ! "

पत्रांत काय लिहिले आहे, यापेक्षां पत्र कोणी लिहिले आहे, हे समजून घेण्यासाठीं काकींचे मन अगदीं उत्सुक झाले होते !

जोशीबुवांनी पत्र उलगडून पाहिले, तों खालीं " आपली अभागिनी कुसुम " अशी सही होती !

ते ऐकून काकी म्हणाल्या, " अगबाई ! कुसुम क्का ! माझ्या बहिणीची मुलगी ! बिचारी जन्मापासून दुःखी आहे ! लग्न झाले नाही तोंच विधवा झाली ! सासरी एक दिवससुद्धां राहण्याचा प्रसंग आला नाही. मागून बापही गेला. आता आई आणि लेक दोघीही विधवा होऊन बसल्या आहेत ! माझ्या माहेरचे एवढेच गोत राहिले आहे ! "

मातृवात्सल्यानें भरलेले काकींचे हृदय यावेळी अगदी विरघळून गेले, आणि त्यांच्या नेत्रांतून दोन अश्रुबिंदूही ठिपकले.

जोशीबुवांनीं पत्र वाचण्यास सुरुवात केली. पत्रांत पुढील मजकूर होताः—

" परमपूज्य मावशीच्या चरणसेवेशीः—

" मावशी ! माझ्यावर कोसळलेला दुःखाचा डोंगर मी तुला कसा कळवूं ? ईश्वरानें अगोदरच मला सर्व प्रकारें अनाथ करून टाकले होते. नाहीं म्हणावयाला एक आईचा आधार राहिला होता. पण माझी ती अपत्यवत्सल माता—"

जोशीबुवांच्यानें ते पत्र पुढे वाचवेना. ते करुणदृष्टीने काकीकडे पाहून म्हणाले, " काकी ! हीं पुढचीं अक्षरें मला नीट दिसत नाहींत. माझी ' चाळशी ' घरीं राहिली आहे. संध्याकाळचे वेळीं इकडे आल्यानंतर पत्र वाचून दाखवीन. तोंपर्यंत पत्र मजजवळच राहू द्या ! "

काकी पदराने डोळे पुशीत पुशीत म्हणाल्या, " जोशीबुवा, मी समजलें ! "

त्यांचा कंठ दाटून आला. त्यांच्याने पुढे बोलवेना. तथापि आपलें दुःख तसेंच आंवरून धरून त्या म्हणाल्या, " मी समजले. जोशीबुवा ! माझ्या बहिणीचेही कांही बरेवाईट झाल्यासारखे दिसते. आपण वाचा! "

जोशीबुवांनीं सद्गदित झालेला आपला कंठ साफ करून पुनः पत्र वाचावयास सुरुवात केली.

" माझी अपत्यवत्सल माताही काळाला पाहवली नाही ! ती नुकतीच मला सोडून गेली ! मावशी ! तुझ्याशिवाय आतां मला कोणाचाही आश्रय राहिला नाहीं! कुठे उभे रहावयालासुद्धा जागा नाही! कसेही करून मला लवकर घेऊन जा ! येथे मला एकटीला अतीशय भय वाटत आहे आणि एकेक दिवस युगाप्रमाणे चालला आहे. मी तुझ्या पायां पडते, तुला पदर पसरते. मला लवकर घेऊन जा !

" आपली अभागिनी,

कुसुम "

काकी सद्गदित कंठाने म्हणाल्या, " मीच दुसऱ्याच्या दारांत पडले, तर हिला येथे कसं आणूं ? विवशी सगळ्याना गिळून बसली, आतां मला गिळायला पाहते. "

चंपी दासी सहानुभूतीच्या स्वरानें म्हणाली, " काकी, तुम्ही म्हणतां तेच खरें ! तुम्ही येथे दुसऱ्याच्या दारीं पडलात, आणि ही म्हणते, मी येऊ का ? "

चंपीचें हे भाषण काकीच्या मर्मस्थळाला जाऊन भिडले. तथापि त्या जहरी भाषणाचे दुःख कमी करण्याचे हेतूनें ती आपल्या मनाशीं म्हणाली, " तिचे म्हणणे तरी काय खोटें आहे ? मी दुसऱ्याच्या घरी काळ कंठते, मग तिला मी काय आश्रय देऊ ? तिच्या नशीबांत असेल तसें होईल ! कार्टीने पत्र पाठवून विनाकारण माझे दुःख मात्र वाढविलें ! "

चंपी पुन्हां म्हणाली, " काकी, तुमच्या कुसुमला खरोखरच कांहीं अक्कल नाहीं. ती आपल्या आईबापांच्या तरी घरीं आहे. पण तुम्हांला तसें देखील घर राहिलें नाहीं. तुम्ही दुसऱ्याच्या घरी राहतां आणि दुसऱ्याच्या अन्नावरच जगतां ! "

चंपीचें भाषण आतां जोशीबुवांना अगदीं असह्य होऊन ते तिला म्हणाले, " चंपे, चूप रहा ! तुला या पंचाइती करण्याची काय जरूर ? "

नतर ते काकीकडे वळून म्हणाले, "काकी ! तुम्ही माईसाहेबांकडे जाऊन त्यांना ही हकीकत कळवा. त्या फार दयाळू आहेत. ज्या घरांत बाहेरचीं आज इतकी माणसें पोसलीं जात आहेत, तेथें आणखी एखादें माणूस कांही जड होणार नाही. त्यांतून ही बिचारी एक अनाथ बालविधवा. हिला खचितच त्या नाहीं म्हणणार नाहीत. काकी, जरूर विचारा ! सकट-काली धैर्य धारण केले पाहिजे. ज्याला कोणी नाही त्याचा वाली नारायण. तुम्ही त्याच्यावर भरवसा ठेवा ! मीहि भाऊसाहेबांना सांगतो. "

माईसाहेब या भाऊसाहेबांच्या द्वितीय पत्नी होत. त्या किती दयाळू आहेत हे काकी चांगल्या जाणून होत्या. पण या गोष्टीसबधाने जोशी-बुवांजवळ कशाला तक्रार करीत बसा ! म्हणून त्या म्हणाल्या, " होय ! माईसाहेब खरोखरच दयाळू आहेत. मी त्याना विनति करून पाहातें; पण कुसुमला येथे कोण घेऊन येईल? ती कुठें पुण्याच्या पलीकडे गाव आहे तेथे आहे. शिवाय पोरगी आता तरुण असल्यामुळे भलतासलता माणूस पाठविणेही उपयोगी नाही. "

जोशबुवा म्हणाले, " त्याबद्दल तुम्ही फिकीर करू नका ! मी माझ्या मुलाला—मधुकराला——पत्र देऊन तिला येथे आणविण्याची व्यवस्था करतो. तुम्ही अगोदर माईसाहेबांना राजी करा. "

# प्रकरण २ रें.

## माईसाहेब !

माईसाहेब अंगानें इतक्या स्थूल होत्या कीं, त्यांची लांबी कोणती आणि रुंदी कोणती हें कळणें अशक्य होतें! त्यांचा वर्ण काळा नव्हता; पण त्या अगदी गोऱ्याही नव्हत्या. त्या नाकाडोळ्यांतही म्हणण्यासारख्या चित्ताकर्षक नव्हत्या. तरी पण थोर घराण्याला शोभेसा रुबाब त्यांच्या तोंडावर फार चांगल्या रीतीनें झळकत होता. त्या नखशिखांत सोन्यामोत्यांच्या दागिन्यांनीं मढलेल्या होत्या. त्यांना एकंदर तीन अपत्यें झालीं होतीं, दोन पुत्र आणि एक कन्या. त्यांपैकीं वडील मुलगा जन्मरोगीच होता. तो वयाच्या बाराव्या वर्षींच कालवश झाला! त्याच्या मरणानें माईसाहेबांच्या हृदयावर जबरदस्त घाव बसला. धाकटा मुलगा विलास आठनऊ वर्षांचा होता. मुलगी मनोरमा चार वर्षांची होती.

भाऊसाहेबांना पूर्वीच्या सवधापासून एक मुलगा झालेला असून, तो आतां अगदीं तारुण्यांत आला होता. त्याची आई त्याच्या बाळपणींच वारली होती. त्यानंतर भाऊसाहेबांचें माईसाहेबांशीं लग्न झालें. लग्नांत माईसाहेब चांगल्याच प्रौढ होत्या. यामुळें पतिगृहीं आल्याबरोबर त्यांनीं आपल्या सापत्न पुत्राच्या संगोपनाचा भार आपल्या शिरावर घेतला. त्यावेळीं पुष्कळांची अशी कल्पना झाली होती कीं, या नव्या जहागीरदारीणबाई कांहीं सवतीचा मुलगा जिवंत राहूं देणार नाहींत. पण ही कल्पना अगदी चुकीची असल्याचें त्यांनीं लवकरच सर्वांच्या प्रत्ययाला आणून दिलें. त्या विजयावर खरोखर आरंभापासून पोटच्या पोराप्रमाणें प्रेम करूं लागल्या. किंबहुना विजयानेंच मातृवात्सल्याचा प्रवाह त्यांच्या अंतःकरणांत प्रथम निर्माण केला. कारण माईसाहेबांना लग्न झाल्यानंतर बरींच वर्षें मूल झालें नाहीं. यामुळें या अवधींत त्यांच्या प्रेमाचा सर्व ओघ एकट्या विजयाकडे वाहत होता! विजयाचें लवकरच लग्न करून सुनमुख पाहावें, म्हणून माईसाहेबांना तर इतकी कांहीं

तळमळ लागून गेली होती, कीं, विचारायची सोय नाहीं. पण विजय म्हणजे पहिल्या प्रकारचा हट्टी आणि हेकड पोरगा ! ‘ एम्. ए. ’ चीं परीक्षा पास झाल्याशिवाय आपण लग्न करणार नाहीं, असे त्यानें साफ सांगून टाकलें होतें. येत्या वर्षी तो ‘ एम्. ए. ’च्या परीक्षेला बसणार होता; आणि त्याच्या पुढच्या वैशाखांत त्याचे लग्न करून टाकावयाचे माईसाहेबांनीं ठरविलें होतें. सून घरांत आणल्यानंतर आपण थाटमाट करणें किंवा डागडागिने घालून नटणे आपणाला शोभणार नाहीं, म्हणून माईसाहेबांनीं आतांच त्या दिशेने आपली हौस फेडून घेण्याचा उद्योग मोठ्या जारीने चालविला होता ! ह्यावेळीं त्या वेणी घालायला बसल्या होत्या. एक दासी त्याचे केंस विचरत होती. दुसरी त्याच्या दागिन्यांचा डबा उघडून त्यांतील एकेक अलंकार काढून ते आपल्या मालकीणीपुढे ठेवीत होती. ते ठेवतां ठेवता ती म्हणाली, “ काहीं म्हणा, बाईसाहेब ! आता हे जुने दागिने तुम्हाला शोभत नाहींत ! तुमच्यासारख्या जहागीरदारीणबाईनीं रोज एकेक नवे नवे डाग आणि नवा नवा कपडा घातला पाहिजे. तुम्हांला कोणत्या गोष्टीची उणीव आहे ? त्या पुण्यामुबईच्या वकिलाच्या बायका पहा बरं ! किती रोज नवा नवा नखरा करतात त्या ! ”

पण यावेळीं माईसाहेब काकींच्या पत्रासंबधीच्या विचारांत गढल्या असल्यामुळे त्या कांहीच बोलल्या नाहीत. तथापि त्या दासीची दागिन्यासंबधानें व कपड्यासंबधानें बडबड चाललेलीच होती. अखेर दासीच्या बोलण्याला कटाळूनच कीं काय माईसाहेब म्हणाल्या, “ विजयाची बायको आल्याबरोबर तिला मी हे सगळे दागिने देईन आणि मी आपल्याला नवे करून घेईन. ”

विजयाच्या लग्नाची गोष्ट निघतांच, “ माईसाहेब, कधी ठरले हो त्यांचें लग्न ! लग्नाच्यावेळीं आम्हांला चांगले इनाम मिळाले पाहिजे. अगोदरच सांगून ठेवतो ! ” अशा प्रकारचे उद्गार दासींच्या तोंडून निघाले.

माई०:—आमच्या तर मनानें त्याचे येत्या वैशाखांत लग्न करावयाचें आहे; पण तो घरीं आल्यावर काय म्हणतो ते पाहूं. मुलें शहाणीं झालीं म्हणजे त्यांच्या मताविरुद्ध कांहीं करतां येत नाहीं.

दासीः— ह्या अलीकडे एकेक मेल्या नवीनच गोष्टी निघूं लागल्या आहेत. बाळासाहेब तेथे पुण्यांत राहिले आहेत. तेथून ते काय काय नवीन ढंग शिकून येतात कोण जाणे ! ”

माई०:—छे छे ! माझा विजय तसा पोरगा नाहीं बरें ! हजार दोन हजार मुलांत त्याच्यासारखा पोरगा मिळायचा नाही. पुण्यांत राहतो आहे; पण त्याच्या चालचलणुकींत कांहींही फरक पडला नाहीं. त्याला आपला विद्याभ्यास संपवायाचा होता म्हणून त्याचे लग्नाकडे लक्ष गेले नाहीं. यदांच्या साली आतां त्याचे शिक्षण पूर्ण होईल. आतां कांहीं तो लग्नाला नाहीं म्हणावयाचा नाहीं.

इतक्यांत वेणी घालणारी दासी म्हणाली, “ आमच्या बाळासाहेबासारखा मुलगा पाहू गेल्यास मिळावयाचा नाहीं हो ! स्वारी रात्रंदिवस लिहिण्यावाचनांत मग्न. त्यांना इतके शिकून काय करावयाचे हे नाहीं मात्र बाई मला कळत ! जोशीबुवांच्या मुलाचे ठीक आहे. त्यांना नोकरी तरी करायची आहे ! त्यांचें पोट विद्येवर ! तसे आमच्या बाळासाहेबांचें थोडेंच आहे ! पण काय असेल तें असो ! स्वारी एकदां एका नादाला लागली की लागली. त्या घोडेगांवच्या जहागीरदारांच्या मुलाची गोष्टच पाहाना ! त्याचे वय आमच्या बाळासाहेबांपेक्षां दोन वर्षांनीं कमचि असेल. पण एवढ्यांत त्यांचीं तीन लग्नें झालीं आहेत. आणखी एक कोणशी नात्यांतली तरुण विधवा त्यांनीं घरांत आणून ठेवली आहे. तिच्याशी तो लग्न लावणार आहे म्हणे ! कांहो, माईसाहेब ! विधवेशीही कोणाचें लग्न होतें का ? पण अलिकडे काय एकेक नवेंच निघाले आहे. पण आमचे बाळासाहेब यांतले नाहींत हो ! ते कोणाकडे डोळा उघडून देखील कधी पाहावयाचे नाहींत. ”

तिचें हें भाषण ऐकून दुसरी दासी म्हणाली, “ आमच्या बाळासाहेबांना जोशीबुवांच्या पोराने बिघडविलें. तो जसे सांगेल तसें हे वागतात. तो म्हणतो, मुलांमुलींचीं लहानपणीं लग्नें करूं नयेत, विधवांचीं लग्नें लावावींत. असें काय, नाहीं नाहीं तें भकतो आणि आमचे बाळासाहेब तें खुशाल ऐकून घेतात ! माईसाहेब, राजाच्या पोराला अशा भिकाऱ्याची

संगत उपयोगाची नाहीं ! आतां तरी तुम्ही त्यांना त्या मधुकराच्या संगतींतून काढून घ्या !

माई०:—माझा बाळासाहेब कांहीं दुसऱ्याच्या बुद्धीनें चालणारा नाहीं. मधुकराला तो आपल्या सख्ख्या भावाप्रमाणेच समजतो; पण अखेर तो मोठा झाल्यावर आपल्या बुद्धीप्रमाणे वागेल. वाघाचा बच्चा वाघच राहावयाचा !

दासी:—तेही खर आहे, बाईसाहेब ! पण आतां बाळासाहेब घरीं कधीं येणार आहेत ?

माई०:—दिवाळीला येईल. तोपर्यंत त्याची परीक्षा आटपेल.

दासी:—दसऱ्याला नाही येणार ?

माई०:—नाही !

दासी:—मग हा मधुकर कसा येणार !

माई०:—तो तरी कसचा येतोय ? दोघेही बरोबरच येतील.

दासी:—नाही, माईसाहेब. तो लवकरच इकडे येणार आहे, असं मी मघांशी जोशीबुवाच्या तोंडून ऐकलं.

माई०:—म्हणजे !

दासी:— काकीची कोणी भाची विधवा झाली आहे. तिला घेऊन तो इकडे येणार आहे, असं मघा काकीबरोबर जोशीबुवांचे बोलणे झाले, त्यावरून मी म्हणते.

माई:—भाची म्हणजे तिच्या बहिणीची मुलगी काय ?

दासी:—होय !

माई:—मग कोण जाणे ! कदाचित् येणार असेल.

माईसाहेबाचें हे भाषण ऐकून एवढा वेळ स्तब्ध बसलेली दुसरी दासी म्हणाली, " तुम्हांला कळलं नाही का हे माईसाहेब ? काकीच्या सगळ्या गोताचा निकाल लागला ! आतां तेवढी ती पोरगी उरली आहे; आणि तीहि विधवा. तिने आपल्याला इकडे घेऊन जाण्याविषयीं काकीला विनति केली आहे. मघां काकीला जे पत्र आलं ते तिचेच पत्र होतें. काकींच्या सगळ्याच कांही गोष्टी निराळ्या आहेत. त्यांनीं सगळ्यांना ही

गोष्ट कळविली; पण ज्या घरांत त्या राहतात, आणि ज्यांच्या येथें त्या आपल्या भाचीलाहि आणून ठेवणार आहेत, त्यांना मात्र त्यांनीं अजून कांहीं कळविले नाहीं. ही बरी रीत आहे कीं ! माईसाहेबांना विचारल्याशिवाय त्यांनीं त्या मुलीला येथे आणून ठेवायचेहि ठरविलं असें मी ऐकतें. ”

दासीच्या भाषणाने माईसाहेब बऱ्याच खूष झाल्या. त्या मनांतल्या मनांत म्हणू लागल्या “ म्हणजे ही काकी मला कांहीं समजतच नाहीं की काय ! मला न विचारतांच ही त्या विधवेला आणून ठेवण्याची व्यवस्था करीत आहे ! ठीक. ”

माईसाहेब स्वस्थ बसलेल्या पाहून ती दासी पुन्हां म्हणाली, ‘ मघा चपी म्हणत होती तेंच खरें. ती अगदी काकीच्या तोंडावर म्हणाली, “ तुम्हींच लोकांच्या घरी पडलात आणखी दुसरीला कशाला आणायचे आहे ? चपी भांडखोर आहे खरी ! आणि तिचे व माझे नेहमीं भांडणहि होते. पण तिच्यात मार्मिकपणाचा गुण चांगला आहे. तशीच ती इमानीहि आहे; आणि आम्हां दासीत तिच्याइतकी शहाणी कोणीहि नाहीं. ”

माईसाहेब फार सरळ स्वभावाची बायको होती. त्यांच्या ठेकाणी कांहीं दोष असला तर तो आत्मस्तुतिप्रियता. आपण एका जहागीरदाराची बायको आहो आणि आपले घराणेहि मोठ्या खानदानीचें आहे याचा त्यांना फार अभिमान वाटत होता. याचमुळे त्यांच्या ठिकाणीं अधिकारलालसा आणि स्तुतिप्रियता हे दोष शिरले होते. त्या घरांतली या मालकीण असल्यामुळे घरांतल्या इतर स्त्रियांशी सलगीनें वागणे त्यांना शक्य नव्हतें. त्याचप्रमाणे गावातल्या सामान्य लोकांच्या बायकांशीं त्यांची मैत्री होणेहि अशक्य होते. अर्थात् त्यांचा सर्व वेळ वरीलसारख्या हीन मनाच्या दासींच्या संगतींत जात होता. त्यांच्या घरांत आश्रयाला येऊन राहिलेल्या नातलग स्त्रियांची संख्या बरीच मोठी होती. त्यांच्या नातलगांपैकीं, कोणीहि अनाथ स्त्रीनें आश्रय मागितला, की, त्या तिला आश्रय देत; आणि तशी कोणी स्त्री त्यांच्या घरांत येऊन राहिली, कीं,

तिची पुढें चंगळ चालू होई ! ह्याशिवाय ज्यांना आश्रयाची जरूर नाहीं पण केवळ प्रेमाखातर आणून ठेवलेल्या अशा सधवा व विधवा स्त्रियाहि त्यांच्या घरांत पुष्कळ होत्या. काकींच्या भाचीला आश्रय देण्याच्या बाबतींत त्यांच्या मनांत विरोधी भाव उत्पन्न झाला, याचे कारण दासीची चिथावणी होय. ह्याशिवाय काकीच्या प्रत्येक गोष्टीकडे त्यांनीं इतक्या बारकाईनें पाहण्याचे कारण त्या त्यांच्या भाऊबंदीण होत्या हे होय. काकींचा आपल्या घरांत कोणत्याहि प्रकारे वर पगडा होऊ न देण्याविषयीं खबरदारी घेणे माईसाहेबांना आपले कर्तव्य वाटत होते. इतर बायकांच्या वागणुकीकडे त्या फारसे लक्ष देत नव्हत्या; पण काकीची प्रत्येक गोष्ट त्या डोळ्यांत तेल घालून पाहात.

कुसुमचें पत्र हातांत घेऊन काकी माइसाहेबांकडे आल्या, त्यावेळी माईसाहेब अगदीं गाल फुगवून बसल्या होत्या. काय गम्मत होणार हें पाहण्यासाठी चपीही काकीबरोबर तेथ आली होती. याशिवाय, लहान लहान मुलेहि आपले खेळ सोडून तेथे गोळा झालीं होती. मालकीणीची रुष्टचर्या आणि घरांत माजलेली हालचाल हीं पाहून काकींचें मन अधिकच कष्टी झालें.

काकी एकदर प्रकार समजून चुकल्या. त्यांच्या हृदयाला भयकर धक्का बसला. त्यांच्या तोंडांतून एकहि शब्द निघाला नाहीं. मात्र डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. पण त्याच्या शोकापेक्षां आज त्यांच्या याचनेकडेच सर्वांचे लक्ष होतें, त्याचें काकींना मर्मांतिक दुःख झालें. एकेकाळीं त्याहि माईसाहेबांच्या बरोबरीच्या होत्या. त्यांच्याजवळहि दासदासींचें ऐश्वर्य होतें. त्याहि अनेक प्रकारच्या विलाससामग्रीचा उपभोग घेत होत्या; आणि त्यांच्या कृपेची याचना करण्यासाठीं अनेक माणसें त्यांची रात्रंदिवस खुशामतही करीत होतीं. पण तो भाग्यसमय नाहींसा होऊन आज त्यांच्यावर असा प्रसंग आला होता, याचे कारण भाऊसाहेबांची कुटिल नीति होय. त्यांच्या त्या कुटिल नीतिमुळेंच त्या पतीच्या पाठीमागें आपल्या सर्वस्वाला मुकल्या. भाऊसाहेब त्यांना लाटणें–पोळपाट घेऊनच फीर म्हणन सांगणार होते. पण मलापुढें त्यांचा नाइलाज झाला. बिज-

याने जोर धरल्यामुळे त्यांना आपल्या घरीं आश्रय देणें भाऊसाहेबांना भाग पडले. याचना करण्याचा त्यांच्यावर आज जो दुसऱ्यांदा प्रसंग आला, तो त्यांचे हृदय विदीर्ण करणारा होता. बरे, याचना करायला येऊन परत जाणेहि त्यांना बरे वाटेना. कारण, तसें करणे अहंकारद्योतक झाले असतें !

काकी कांहींच बोलत नाही हे पाहून चपीला राहवेना. ती म्हणाली, " काकी ! गप्प कां बसलात ! काय विचारावयाचे ते माईसाहेबांना विचारानात ! तुम्ही बोलल्याखेरीज ते माईसाहेबांना कसे कळावे ? "

नंतर ती माईसाहेबांना उद्देशून म्हणाली, " माईसाहेब ! काकी म्हणतात, की— "

चपीनें इतका अतिप्रसंग आणल्यावर काकांना स्तब्ध रहाणें अशक्य झाले. त्या म्हणाल्या, " माईसाहेब ! माझी बहीण नुकतीच वारली."

माईसाहेबांनीं ते ऐकून घेतले, पण त्यांच्या तोंडून सांत्वनपर एक शब्दहि निघाला नाही.

माईसाहेबांची एक दासी म्हणाली, " ही बातमी माईसाहेबांना अगोदरच कळून चुकली आहे. इतकेंच नव्हे, तर तुम्ही तिच्या मुलीला येथे आणविणार आहात हे देखील माईसाहेबांना कळले आहे. "

यानंतर काकी पुढे बोलल्या नाहीत. कारण त्यांना जी विनंति करावयाची होती ती अगोदरच माईसाहेबांच्या कानावर गेल्याचे त्यांना आढळून आले. शिवाय, माईसाहेबांचे निष्ठूर मौन आणि दासीचा उद्धटपणा यापुढे त्यांना बोलण्याचे धैर्यहि होईना. त्या नुसत्या माईसाहेबांच्या तोंडाकडे आशापूर्ण दृष्टीनें पाहू लागल्या.

थोड्या वेळानें माईसाहेब रुक्ष व निष्ठूर स्वरानें म्हणाल्या, " काकी ! तुमच्या भाचीची येथे सोय होणे शक्य नाही. "

काकी:—माई ! तुम्ही मला जसा आश्रय दिलांत तसा तिलाहि देण्याची कृपा करा ! तिला माझ्याशिवाय जगांत दुसरे कोणीच नाही.

माई०:—, आम्ही काय सगळ्यांनाच आश्रय देण्याचा मक्ता घेतला आहे ! आमचे घर धर्मशाळा आहे, की खानावळ आहे ? वाटेल त्याने येथे येऊन आपलें बिऱ्हाड खुशाल ठेवावे ?

काकी:— माईसाहेब ! तुम्ही कितीतरी अनाथ मनुष्यांचें पालनपोषण करीत आहांत. त्यांत आणखी एक माणूस तुम्हांला काय जड होणार ?

माई०:— लोकांचा हेवादेवा करण्यांत तुमचा जन्म गेला. कितीही माणसांचे पालनपोषण करीन. त्याचे तुम्हांला काय ! दुसऱ्या खाऊ घातले तर ते कांही तरी त्याबद्दल कृतज्ञ राहील; पण तुम्ह खाऊ घालणे म्हणजे—

यापुढे माईसाहेब काहीं बोलल्या नाहीत. पण त्या काय बोलणा होत्या हे काकींनी ओळखले. काकींना साह्य करणे म्हणजे त्यांच्यावर उपकार करणे नसून त्यांचे न्याय्य ऋण थोड्याबहुत प्रमाणानें फेडणे होय हे माईसाहेब पूर्णपणे जाणून होत्या. त्यांच्या मनाला तीच गोष्ट खात होती. याच कारणामुळे त्यांना आपल्या घरीं ठेवून घेण्यास किंवा त्यांना कोणत्याहि प्रकारचे साह्य देण्यात माईंना बिलकुल आनंद होत नव्हता उलटपक्षी काकींचा स्वभाव असा होता की, कोणास आपलें दैन्य दाखविणे किंवा कोणाची खोटी खुशामत करणे त्यांना बिलकुल आवडत नव्हते

काकी स्तब्ध राहिलेल्या पाहून चंपी पुन्हां म्हणाली, “ काकी तुमची भाची देखील मोठी हिकमती पोर दिसते. आईचें सत्तेचें घर असून पुन्हा लोकांच्या येथे राहण्याची एवढी हौस कशाला ? ”

काकींच्या तोंडून यावर काय उत्तर येतें हे पाहण्यासाठीं माईसाहेबांनीं त्यांच्या तोंडाकडे पाहिले.

काकी व्यथित स्वरानें म्हणाल्या, “ पोरगी आतां वयांत आलेली आहे. ती एकटीच कशी कोठें राहील ? ”

चंपी:— मग तिला इकडे आणविण्यापेक्षां तुम्हींच कां तिच्या ... जाऊन रहात नाही ?

चंपीचा हा उद्धटपणा काकीला बिलकूल सहन न होऊन त्या चंपीला म्हणाल्या, “ हे बघ, चंपे ! तूं किती [illegible] बटिक ! तूं आपल्या पायरीनें राहावें हें बरें ! मी तुला प्रार्थना करावयाला आलें नाहीं ! ”

पण माईसाहेब लागलींच चपीचा 'कड' घेऊन म्हणाल्या, " तुम्हांला इतकें वाईट लागायला चंपी काय वाईट बोलली ! तुम्ही खरोखरच तिच्या घरीं जाऊन राहानात ? "

माईसाहेबांच्या तोंडचे हे भाषण ऐकून काकी तिरस्काराने म्हणाल्या, " जे लोक अनाथ विधवांचे सर्वस्वीं वांटोळे करितात त्यांच्याच तोंडी अशा गोष्टी शोभतात. भाऊसाहेबानी जर माझ्या गोळाभर अन्नाची व्यवस्था कायम ठेवली असती, तर मला कशाला तुमच्या घरात काळ कंठण्याचा प्रसग येता ! "

काकीच्या सतत दृष्टीकडे यावेळी माईसाहेबाच्याने आपली नजर लाववेना. त्याची दृष्टी खाली वळली. या वेळीं त्याच्या मनात विजयासंबंधाचाहि विचार उभा राहिला. आपण जर या मुलीला आश्रय दिला नाहीं, तर तो आपल्यावर ग्वात्रीनें रागावेल, इतकेंच नव्हे, तर तो तिला येथे घेऊन येईल आणि मग आपल्यालाहि त्याच्या या कृत्यापुढे निमूटपणे आपली मान वांकवावी लागेल. त्यापेक्षा अगोदरच आपला मान ठेवून घेतलेला काय वाईट ? पण इतका विरोध केल्यानतर ही गोष्ट आपण तरी एकाएकी कबूल कशी करावी या विचाराने त्याचा निश्चय पुन्हा डळमळला.

माईसाहेब कांहींच उत्तर देत नाहीत हे पाहून काकीना वाटले की, त्याचे मन काही वळत नाही, आणि म्हणूनच त्या जावयालाहि निघाल्या. पण त्या जाऊ लागलेल्या पाहताच माईसाहेब त्यांना म्हणाल्या, " थाबा ! काकी, तुम्ही अगदी जराशा गोष्टीवरून नाराज होता. थाबा, मी एकवेळ त्याना विचारितें आणि मग तुम्हाला सागतें काय करावयाचे ते. "

काकी माईसाहेबाचा स्वभाव फार चागल्या तऱ्हेनं जाणत होत्या. माईसाहेब नरम पडलेल्या पाहून त्याहि नरम स्वरानेच म्हणाल्या, " पहा ! माईसाहेब, उगीच त्याची सबब तुम्ही मला कशाकरिता [illegible] सगळ्या कांहीं कर्त्यासवर्त्या तुम्ही आहात. तुम्ही जे ठरवाल [illegible] भाऊसाहेब ना म्हणावयाचे नाहींत. घरांत सर्वस्वी तुम्ही मालकीण

या भाषणानें माईसाहेब अगदी खूष होऊन म्हणाल्या, " तरी पण एक वेळ त्यांना विचारावयाला पाहिजेच. कसेंहि झालें तरी ते मालक आहेत. तुम्ही आतां जा ! तिसरे प्रहरी त्यांना मी विचारून ठेवतें. मग जें होईल तें खरें ! "

काकीः— मला असें नको ! तुम्ही त्या अनाथ पोरीला तुमच्या पायांजवळ आश्रय दिलाच पाहिजे. ती पोरगी आतां वयांत आली असून रूपानेंहि चांगली आहे. तिला जर आपण आपल्याजवळ ठेवून घेतलें नाहीं तर तिची काय अवस्था होईल हें कांहीं मला सांगवत नाहीं. कारण समाजांत कसे लोक भरले आहेत हें तुम्ही जाणतच आहांत.

एवढें बोलून काकींनीं माईसाहेबांचे पाय धरले. त्याबरोबर माई-साहेब एकदम विरघळल्या आणि सद्गदित कंठानें म्हणाल्या, " ह, ह, ह, काकी, हें तुम्ही काय करतां ? तुमच्या बहिणीची मुलगी आणि माझ्या बहिणीची मुलगी दोन का आहेत ? तुम्ही बिलकुल फिकीर करूं नका, जा ! "

त्यानंतर काकी तेथून निघून गेल्या. मात्र त्यांना कोणाच्याहि तोंडाकडे पाहण्याचें धैर्य होईना. आपल्या दैन्याचा जणू काय सर्वजण उपहासच करीत आहेत असें त्यांना वाटलें ! त्यामुळें त्यांना कुसुमचा अधिकच तिरस्कार वाटूं लागला. कारण तिच्याचमुळें त्यांना इतका अपमान सहन करावा लागला. त्या तिरस्कारभावनेनें वत्सलभावनेचें उल्लंघन करून त्यांच्या हृदयाचा ताबा घेतला !

# प्रकरण ३ रें.

## काकींची प्रतिज्ञा !

**संध्याकाळीं** नित्य नियमाप्रमाणे जोशीबुवा भाऊसाहेबांच्या येथील कुलदेवतेची आरती करावयाला आले होते. देवघरात वाजणाऱ्या घंटेचा ध्वनी ऐकून काकी तिकडे गेल्या. त्याना पाहून जोशीबुवा म्हणाले, " काय झाले, काकी ! माईसाहेबाना विचारिले ? "

काकीः— हो, विचारलं. पहिल्याने त्या कबूलच होत नव्हत्या. पण पुष्कळच विनंति केल्यानंतर मागून कबूल झाल्या. तिसरे प्रहरी भाऊसाहेबांना विचारून त्या काय ते निश्चित सांगणार आहेत.

जोशीबोवाः— मी भाऊसाहेबाना अगोदरच विचारून ठेवले आहे. ते अगदीं सहजासहजी कबूल झाले. ते चांगल्या कार्यांत कधींहि इतका उत्साह दाखवावयाचे नाहीत. असा उत्साह त्यानी आजच कसा दाखविला याचे मात्र मला मोठं गूढ पडले आहे. इतकेंच नव्हे, तर त्या मुलीचा या घरात टिकाव लागेल किंवा नाही याचीहि मला मोठी शंका आहे.

काकीः—या घरात माझासुद्धा फार दिवस टिकाव लागणे शक्य नाही. मला आजच यासंबंधाने चांगला अनुभव आला.

जोशी०ः—तुम्ही कांही घाबरू नका. आणखी दोन महिन्यानीं विजय घरी येईल. मग तुम्हांला त्रास देण्याची कोणाचीहि प्राज्ञा नाही.

काकीः—ते ठीक आहे. पण मालकिणीची तब्येत मोठी कठीण आहे. ती थोडक्याशा गोष्टीवरूनही बिघडते; आणि एकदां ती बिघडली की, पुन्हा ताळ्यावर येणे कठीण पडते.

बरोबर याच वेळीं बाहेरून माईसाहेबानीं क्रोधकंपित स्वराने म्हटलें, " काकी ! "

काकींची चर्या एकदम खाडकन् उतरली आणि त्यांचें हृदय धडधडूं लागले. आपले भाषण माईसाहेबांनीं आड उभे राहून ऐकिलें असावें

असें त्यांना वाटले. त्या भीत [illegible] म्हणाल्या, “ काय म्हणतां माईसाहेब ! ”

यावेळीं माईसाहेब देवघराकडे येत असल्यामुळें, [illegible] भाषण त्यांनीं ऐकलें असावें अशी जी भीति काकींना वाटत होती ती नाहींशी झाली. पण ही भीति जरी नाहींशी झाली, तरी दुसऱ्या एका अज्ञात भीतीनें त्यांचें हृदय कांपूं लागले. माईसाहेब देवघराजवळ येऊन गरजून म्हणाल्या, “ तुम्ही त्या मुलीची गोष्ट जर खुद्द मालकांजवळच काढली होती, तर मजजवळ येऊन इतके ढोंग करण्याची काय जरूर होती ? त्यांनीं तिला आणण्याची परवानगी दिली आहे. आतां ती सुंदर पोरगी येथे आली म्हणजे तुमचें सगळें दुःख दूर होईल. ”

या भाषणाच्या आंत जो एक मर्मभेदक बाण छपलेला होता तो नेमका काकींच्या मर्मस्थळाला जाऊन भिडला; आणि त्या सतापून म्हणाल्या, “ माईसाहेब ! ”

काकींचा तेजस्वी स्वभाव माईसाहेब पूर्णपणे जाणून होत्या. त्यांच्या त्या एका शब्दांत जें तेज भरलेले होते, ते पाहून माईसाहेबानीं तेथून पळ काढला.

माईसाहेब जाऊ लागलेल्या पाहून काकी सतप्त स्वराने म्हणाल्या, “ हें पहा ! माईसाहेब ! जर मी कुसुमला तुमच्या या घरांत येऊ देईन, तर या कुलभवानीचीच—”

पण इतक्यांत जोशीबुवा बाहेर येऊन म्हणाले, “ हं, काकीसाहेब, थांबा, थांबा, शपथ घेऊं नका ! तुमच्या या शपथेने एका अनाथ विधवेचा सर्वस्वीं सत्यनाश होईल. ”

या करुण आणि स्नेहमय शब्दानें काकींचा क्रोध पार नाहींसा होऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रुंधारा वाहू लागल्या. त्या रडत रडत म्हणाल्या, “ मी आतां त्या मुलीचें नांवहि घेणार नाहीं. जोशीबुवा ! तिच्या नशीबांत काय असेल तें होईल. देवा ! तूं मला असें किती दिवस दुःख भोगायला जिवंत ठेवणार ? ”

जोशी०:—काकीसाहेब ! मृत्यूची इच्छा करणें म्हणजे त्या न्यायी परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध वागणें होय. तुम्ही त्याच्यावर श्रद्धा ठेवा ! म्हणजे तुमचीं सर्व दुःखें दूर होतील. माईसाहेबांचा स्वभाव तुम्हांला पूर्णपणें ठाऊक आहे. मनुष्यामध्यें जे गुणदोष असूं शकतात तेच त्यांच्यामध्येंहि आहेत. तुम्ही आणखी एक वेळ त्यांच्याकडे जाऊन त्यांची समजूत काढाल, तर त्यांचा सगळा राग शांत होईल.

काकी अश्रू पुसून जरा दर्पपूर्ण स्वरानेच म्हणाल्या, " आतां कुसुमला बोलावण्याच्या भानगडीत मी पडूं इच्छित नाही. तोडानें बोलले नसले, तरी मनानें मी शपथ घेतली आहे. तिच्या नशिबांत जे असेल ते घडून येईल."

जोशीबुवांनी आपले डोळे झांकले आणि एक दीर्घ निःश्वास सोडून म्हटले, " भगवान्. "

काकींनींही भगवानाच्या मूर्तीला प्रणाम केल्यानतर अश्रूंना मोकळें-पणानें बाहेर पडूं देण्यासाठीं त्या आपल्या खोलीत गेल्या. ही सर्व हकीकत थोडयाच वेळानें तिला बराचसा मीठमसाला लागून माईसाहेबांच्या कानां-वर गेली.

---

# प्रकरण ४ थें.

## मित्रद्रूय !

**पुण्यांत** गांवाबाहेर फर्ग्युसन कॉलेजशेजारींच एक बंगला भाडयानें घेऊन, भाऊसाहेबांच्या प्रथम पत्नीचा मुलगा विजय आणि जोशीबुवांचा मुलगा मधुकर हे दोघेहि त्या ठिकाणीं एकत्र राहून अभ्यास करीत होते. मधुकर गत वर्षीच एम. ए. च्या परीक्षेंत पास झाला होता. आतां तो केवळ विजयाच्या सोबतीसाठीं तेथें राहिला होता.

जोशीबुवांनीं आपल्या मुलाला वेदाध्ययन करावयाला लावावयाचें सोडून त्याला जेव्हां म्लेच्छ भाषा शिकावयाला लावलें, तेव्हां त्यांच्यावर त्यांचा एकदर यजमानवर्ग आणि ज्ञातिबांधवहि अगदी खवळून गेले. पण आपल्याला जी गोष्ट योग्य दिसेल ती करावयाला जोशीबुवा कधींहि आणि कुणालाहि डरणारे नव्हते.

जोशीबुवा आपल्या मुलाला इंग्रजी शिकवीत आहेत हें जेव्हां भाऊसाहेबाना कळले, तेव्हा त्यांनी त्याना विचारले की, तुम्ही आपल्या मुलाला इंग्रजी का शिकवितां ! त्यावर जोशीबुवानी हसून उत्तर दिले, " आजकालची शास्त्रे जर इंग्रजीत होऊ लागली आहेत, तर पुरोहितांना आपल्या यजमानाच्या शंका निवारण करण्यासाठी संस्कृतप्रमाणेच इंग्रजी शिकण्याचीहि आवश्यकता उत्पन्न झाली आहे. " भाऊसाहेबाना वादविवाद करण्याची फारशी खोड नव्हती. जोशीबुवांनी अशा तऱ्हेचे उत्तर दिल्यावर ते चूप राहिले.

परंतु त्या गांवचे ब्रह्मवृंदांचे मोहरके बडूनाना धडपडे ही कांही निराळ्याच स्वभावाची व्यक्ती होती. जोशीबोवाची बुद्धि भ्रष्ट होत चाललेली पाहून बडूनानांनी त्यांच्याशीं एके दिवशी वादविवादाचा प्रसंग आणला. ते जोशीबोवाना म्हणाले, " तुमच्या मुलाप्रमाणे रामभाऊ देशपांड्याचाहि मुलगा इंग्रजी शिकू लागला आहे म्हणे ! "

जोशी०:—मग ?

बडू०:—मुसलमान किंवा ख्रिश्चन ह्याच्या मुलांप्रमाणे ब्राह्मणांच्या मुलांनी इंग्रजी शिकावयाचे म्हणजे—

जोशीबोवा हसून म्हणाले, अहो ! ज्ञानाला कसला आला आहे जातिभेद ?

बडू०:—ज्ञानाला नाहीं ? तुम्ही मुसलमानांना वेद शिकवाल ?

जोशीबोवा पुन्हां हंसत हंसत म्हणाले, " काय हरकत आहे ! अगदीं जरूर शिकवीन. एखाद्या मुसलमानाला वेदविद्या शिकण्याची जर

खरोखर इच्छा असेल, तर मला येत आहे तेवढी सगळी वेदविद्या मी त्याला शिकवीन. ”

बडुनानाच्या मस्तकावर वज्रपात झाल्यासारखे झाले. त्यांना यावर उत्तर देण्याचे काही सुचेना. तेव्हां ते सतापून म्हणाले, “ हे असे अनाचार बिलकूल उपयोगाचे नाहीत बरे ! सागून ठेवतो ! मुलाला भ्रष्ट करू नका ! म्लेच्छविद्या शिकून पुरोहीतपणा करतां यावयाचा नाहीं. तुम्हाला आपली परपरागत वृत्ति सोडून द्यावी लागेल. ”

जोशी० :—त्याची तुम्ही बिलकूल काळजी करू नका ! सर्व कांहीं ठीक जुळेल. म्लेच्छाचे उष्टे खाणारे यजमान जर पुरोहितांना चालतात, तर म्लेछ भाषा बोलणारे पुरोहीत यजमानाना कां चालू नयेत ! हा काही तितका भारी अनाचार नाही.

जोशबुवाच्या या भाषणात एक प्रच्छन्न मर्मभेद छपलेला होता. बडुनानांनी लहानपणी अनेक अनाचार करीत करीत तारुण्यात मिलटरी-खात्यांत नोकरी पत्करली होती. तेव्हापासून त्याच्यावर ते गोऱ्या शिपायाचे उच्छिष्ट भक्षण करतात असा लोकाचा आरोप होता. हा आरोप किंवा कलक धुवून टाकण्यासाठी त्यानी अलीकडे “ ब्राह्मण्य ” सरक्षणाची जबाबदारी आपणावर घेतली होती. जोशीबुवानी मर्मावर आघात केल्या-बरोबर बडुनानाच्या अगाची अगदी आग झाली. पण त्यानी मोठ्या मुष्की-लीने शातपणा धारण करून अत्यत नम्रतेने म्हटले, “ ठिक आहे ! तुमच्या मर्जीला येईल तसे करा ! एक तर तुम्ही अनेक शास्त्रें पढलेले आणि फिरून जहागीरदारांचे पुरोहित, आमच्यासारख्या गरिब किंवा मूर्ख लोकांचे तुम्ही थोडेच ऐकणार ? बाकी हे लक्ष्यात ठेवा ! एक वेळ असा येईल कीं, तुम्हांला माझ्या म्हणण्याची आठवण होईल. ”

ऐवढे बोलून बडुनाना मनांतल्या मनांत म्हणाले, “ अरे लेका ! एवढी मगरुरी ! या बडुनानाच्या शब्दाला किंमत देत नाहींस ! बरें आहे, बचाजी ! याचा पुरता सूड उगवीन तरच नांवाचा बडुनाना. ”

यानंतर कित्येक दिवसांनीं मधुकराची मॅट्रिक परीक्षा पास होऊन पुढील शिक्षणासाठीं कलकत्याला जावयाचा त्याचा विचार ठरला. त्यावेळीं

फिरून गांवांत खळबळ माजली. त्या गांवांत मनूनंतर आजतागायत विद्या शिकण्यासाठीं गांव सोडून बाहेर गांवीं जाण्याची गोष्ट कोणाच्याहि ऐकिवांत नव्हती. त्या गांवच्या इतिहासाने तर या सबधांत नितांत मौनच धारण केले होते! हा सनातन नियम तोडण्यास मधुकर जेव्हां प्रवृत्त झाला, तेव्हां अर्थातच गांवच्या सर्व लोकांना भयंकर चिंता लागून राहिली. हा एकदां पुण्याला विद्या शिकायला गेला म्हणजे "किरस्तान" बनून आल्याखेरीज राहणार नाही असे ज्याला त्याला वाटू लागले. स्पर्शास्पर्श, खाणेपिणे, वगैरेसबधाचे त्याचे आजचे विचार पुढे बिलकूल राहणार नाहीत अशी जणू काय सर्वांची खात्रीच होऊन चुकली! मधुकराच्या सर्व सहाध्यायी मित्रानांहि त्याच्यासबधाने मत्सर वाटू लागला! भाऊसाहेबांचा मुलगा विजय याची मात्र अवस्था अत्यत शोचनीय झाली. त्याला मधुकराचा वियोग पळभरहि सहन होत नव्हता. तो जहागीरदारांचा -थोरामोठ्याचा—मुलगा असल्यामुळे त्याला बाहेरच्या जगाचे यत्किंचितहि वारे लागू न देण्याची खबरदारी घेतली जात होती. पिंजऱ्यांतल्या पांखरात आणि त्याच्यात बिलकूल फरक नव्हता. बाहेरच्या जगाची माहिती त्याला मधुकराकडून काय ती व्हावयाची! त्याचा एकच एक मित्र तो होता. अर्थात तो निघून जात आहे हे समजल्यावर त्याला सर्व जग शून्य वाटावे यांत काय आश्चर्य?

मधुकर पुण्यात आल्यावर पुष्कळच पचायतीत पडला. गांवांत त्याला जे आचारविचार पाळतां येत होते ते पुण्यांत पाळणे अशक्य असल्याचे त्याला दिसून आले. वास्तवीक कोठहि काय, मनूच्या जमान्यांतले कायदे या कलियुगांत पाळतां येणे मुष्कीलच; आणि त्यात पुण्यामुंबईसारखीं शहरं तर जणू काय मनूच्या कायद्याला हद्दपार करण्यासाठींच अवतरलेलीं! जुन्या परपरेचे आचारविचार पाळण्याच्या बाबतीत पदोपदीं अडथळा येत असलेला पाहून त्यासबंधीं तो विचार करू लागला. तो आपल्या मनाशीं म्हणूं लागला, "हे आचारविचार न पाळतांहि मनुष्याला आपले आयुष्य चांगल्या रितीनें घालवितां येतें असें स्पष्ट दिसून येतें. तसेंच जगांतील निरनिराळ्या ठिकाणच्या माणसांचे निरनिराळे

आचारविचार आहेत." त्याचा कॉलेजचा संस्कृत शास्त्री अत्यंत कर्मठ ब्राह्मण होता. पण बाकीच्या प्रोफेसरांकडे पहावें, तर एकाच्या आचार-विचाराचा दुसऱ्याच्या आचाराविचारांशी मेळ नाही. मद्रासी प्रोफेसरांचे आचारविचार एक प्रकारचे, तर बंगाली प्रोफेसराचे दुसऱ्या प्रकारचे. महाराष्ट्रीयाचे त्या दोहोंहूनहि भिन्न. एक प्रोफेसर शुद्ध चारित्र्यवान होते, पण आचाराच्या बाबतींत पाहावे तर केवळ "म्लेच्छ." तथापि त्यांच्या साधुशील चारित्र्यावर मधुकर अगदीं मुग्ध होऊन गेला होता. त्यांच्या सहवासामुळे आणि संभाषणामुळे मधुकराचाहि आचाराच्या बाबतींतील कडकपणा शिथील होऊ लागला. तो जसजसा त्यासंबधाने जास्त विचार करू लागला आणि शिक्षणाच्या बाबतीतहि त्याची प्रगति जास्त होऊ लागली, तसतसे आचार ही केवळ धर्माची बाहेरची एक बाब आहे असे त्याला वाटू लागले. ते परिस्थितीप्रमाणे व जरूरीप्रमाणे सोडून देण्याचीहि आवश्यकता उत्पन्न होते. जो परिस्थितीप्रमाणे आपल्या आचारांत बदल करीत नाहीं, तो मनुष्य आपल्याच हातानें आपल्या पायात खोडा घालून घेतो. कर्मठपणा आणि मूर्खपणा या दोहोंचा जवळ जवळ एकच अर्थ आहे.

मधुकराच्या चारित्र्यांत एकप्रकारे तेजस्वी करारीपणा झळकत होता; आणि तो त्याच्या पाणीदार डोळ्यांवरूनही व्यक्त होता. ज्ञानाची शुद्धता, मनाची तेजस्विता, चारित्र्याची दृढता, निष्ठेची एकाग्रता आणि हृदयाची सरलता, इत्यादि गुणांचा त्याच्या ठिकाणी मोठा सुंदरप्रकारे मिलाफ झालेला दिसत होता. त्याच्या निर्मल हास्यांत त्याच्या हृदयाची उद[redacted]ा आणि निर्व्याजता व्यक्त होत होती. तो जे कांहीं बोले किंवा करी, त्याच्याअगोदर तो त्यासंबधाचा पुष्कळ विचार करीत असे. तथापि त्याने एकदां एक गोष्ट हातीं घेतल्यावर त्याला मध्यंतरी थांबणें ठाऊक नव्हते. त्यामुळे त्याच्या स्वभावाची ज्यांना विशेष माहिती नसे, अशा मनुष्यांना तो मोठा हट्टी असावासा वाटे. कोणत्याही गोष्टीसंबंधीं साधकबाधक प्रमाणें पाहून तिच्या बाबतींत निर्णय करावयाला त्याच्या प्रखरबुद्धीला बिलकूल वेळ लागत नसे. पण याचमुळें लोक त्याला उतावीळ प्रकृतीचा समजत.

अशा स्वभावाच्या माणसाविषयीं सर्वांना आदर वाटतो, ते त्याला मान देतात त्याचे म्हणणे कबूलहि करितात. इतकेच नव्हें, तर त्याच्याविषयीं त्यांना भितीहि वाटत असते. तथापि त्याच्याशीं सहकारिता करावयाला मात्र कोणाचीही तयारी नसते. यामुळे, मधुकराला पुण्यात खरा मित्र कोणीच नव्हता. पुण्यांत आल्यावर मधुकराच्या आचाराविचारांत बदल झाला. तथापि त्याच्या कपड्यांत आणि राहणीत मात्र फारसा फरक पडला नाही. त्याचे कपडे त्याच्या गावात होते तसेच अगदीं साधे असत. या बाबतीत त्याचे त्याच्या सस्कृत शास्त्र्याशीं सादृश्य असे. एवढ्यावरून काहीं कर्मठविचाराचे विद्यार्थी त्याचा स्नेह सपादन करण्यासाठी त्याच्याकडे मोठ्या उत्सुकतेने येत, पण त्याचे विचार ऐकल्या-बरोबर घाबरून ते पळून जात.

याप्रमाणे मधुकर त्रिशंकूप्रमाणे असहाय स्थितीत लटकत असताना त्याला ‘ तमण्णा ’ नावाचा एक दोस्त मिळाला. हा त्याचा सहाध्यायीच होता. हा तमण्णा सुधारक आणि दुर्धारक यांच्यामधल्या रगणावर नाचत होता. त्याचा चेहरा अतिशय क्षीण म्हणजे हाडावर कातडे गुडाळल्या-प्रमाणे होता; पण त्याचा पोषाख मात्र अगदी फ्यॅशनेबल होता. त्याने डोक्याला केस ठेवले असून पाठीमागे शेंडीही लटकत होती. तसेच त्याच्या हातात एक अष्टधातूची आगठीहि चमकत होती. त्याने अगात अगदीं इंग्लिश पद्धतीचा ‘ ओपन कॉलर ’चा कोट आणि गळ्यात ‘नेक-टॉय ’ अडकविला होता, तरी त्याच्यावरून उपरणे घ्यायला स्वारी कच-रत नव्हती. सारांश, तमण्णा ही व्यक्ति म्हणजे नव्याजुन्याचा एक अद्वि-तीय मिलाफच होती ! हा नव्याजुन्याचा मिलाफ जसा त्याच्या बाह्यांगांत, तसाच त्याच्या अतरगांतही खचून भरला होता. बोलावयाचें वेळेस शास्त्रे आणि ऋषिवचनें यांशिवाय तो शब्द काढीत नसे. पण प्रत्यक्ष आचाराच्या वेळी मात्र तो वेळ पडेल त्याप्रमाणे वागत असे. वाद-विवादाच्या प्रसंगीं प्राण गेला तरी आपल्या प्राचीन सस्कृतीचा अभिमान तो सोडत नसे. मधुकराचा जुन्या पद्धतीचा बाह्य वेष पाहून हाहि आपल्यासारखाच एक धूर्त प्राणी असावा, असें तमण्णाला वाटले, आणि

याच कारणानें त्याच्याशीं दोस्ती जुळविण्याची त्याला इच्छा झाली. पण अनुभवांतीं आपली समजूत चुकीची असल्याचे त्याला समजून आले. मधुकर हा आपल्यासारखा धूर्त नसून त्याची जीं मते आहेत तीं सर्व प्रामाणिक आहेत अशी त्याची खात्री झाली. वादविवाद करून त्याला त्यानें आपल्या बाजूला वळविण्याचाही प्रयत्न केला. पण मधुकरासारख्या प्रखर बुद्धिच्या माणसाशीं त्याचा काय टिकाव लागावयाचा ! तो तमण्णाला आपल्या कोटिक्रमाने पदोपदीं चीत करीत होता. अखेर याही बाबतींत त्याला हताश व्हावें लागले. दुसरा कुणीच स्नेही नसल्यामुळे असल्या माणसाशीहि मित्रत्व ठेवणे मधुकरला अपरिहार्य झाले.

मधुकर जेव्हा एम्. ए. आणि वेदांततीर्थ या पदव्या घेऊन बाहेर पडला, त्यावेळी शास्त्राचे वचन म्हटले की, ते डोळे झाकून मान्य करावयाचे, या अवस्थेपासून तो फार दूर गेला होता, तथापि अशा स्थितीतहि ऋषीवाक्याच्या बाबतीत त्याला निष्ठावान् बनविण्याची वेडी आशा तमण्णाच्या डोक्यांत घोळत होती. त्याच्यासारख्या एका जुन्या पद्धतीच्या घराण्यातील ब्राह्मण मुलाने इतके सुधारक बनावे ही गोष्ट त्याला बिलकूल आवडली नाही. त्याला त्याबद्दल फार वाईट वाटत होते आणि म्हणून एके दिवशी बोलतां बोलतां तो त्याला किरस्तान म्हणून म्हणाला. पण त्याच्या या कुत्सित शब्दप्रयोगानें मधुकर बिलकूल न चिडतां उलट हसून म्हणाला, " यांत तू मला अधिक काय म्हणालास कळत नाहीं ! प्रत्येक देशांत आजपर्यंत जे जे म्हणून थोर पुरुष होऊन गेले त्याचे विचार देश किंवा काल यांनी मर्यादित झाले नव्हते. त्याच्या वाणींतला कांहीं भाग त्यांच्या कालाला आणि देशाला अनुसरून असे. बाकी त्यांची वाणी म्हणजे केवळ शास्वत सत्य होय; ती साऱ्या विश्वाची संपत्ति आहे. या दृष्टीने " येशू खिस्त " आणि " महमद पैगंबरा " इतकेच कृष्ण, महावीर, बुद्ध, नानक, कबीर, वगैरे महा विभूतीहि मुसलमान आणि खिस्ती लोक यांना पूज्य असावयाला पाहिजेत. ह्या निरनिराळ्या विभूतींनीं निरनिराळ्या अवस्थांत ज्या महान् सत्याचा प्रकाश पाडला त्याचे मूळ उगमस्थान एकच आहे. उपनिषदें, बायबल, कुराण, गिता वगैरे सर्व शास्त्रे म्हणजे एका

नदीचेच निरनिराळे प्रवाह होत. ते निरनिराळ्या देशांमध्यें प्रगट झाल्या मुळें निरनिराळ्या प्रकारचे कर्मकांड आणि संस्कार यांच्या बाह्य आवरणांनीं झांकले गेले आहेत. परंतु सत्यजिज्ञासू आत्म्यांची दृष्टि ह्या बाह्या वरणाच्या पलीकडे असते. त्यांचा धर्म म्हणजे सर्व धर्मांच्या हृदयांशं असलेला धर्म होय. मी आपल्याला हिंदू म्हणवितो, याचे कारण मं हिंदुस्थानच्या विशेष परिस्थितींत जन्म घेतला आणि तशाच प्रकारचे शिक्षणही मला मिळाले आहे."

मधुकराचे हे भाषण ऐकून तमण्णा अगदी चिडला आणि तो माथे फिरूप्रमाणे कांहो तरी बरळू लागला.

हा वादविवाद अगदीं मर्यादा सोडून जाऊ लागलेला पाहून विजयाने तो मध्येच थांबविला. त्याने त्या दोघानाही त्या वादयुद्धापासून परावृत्त केले.

विजय स्वभावाने अगदी शांत असून त्याला विशेष बोलणे बिलकूल आवडत नसे. अपरिचित माणसापुढे भाषण करावयाचे तर त्याला बिलकूल धैर्य होत नसे. तो एकटा कुठे जातही नसे. तसेच कोणतेही काम स्वतन्त्रपणे करण्याची त्याला छाती होत नव्हती. या कारणाने मधुकराशिवाय त्याला एक घडीभरसुद्धा चैन पडत नव्हते. परिस्थितीभिन्नत्वामुळे विजय असा परावलंबी आणि मुखदुर्बल बनला होता. तो एका जहागिरदाराचा मुलगा होता. त्यामुळे त्याला लहानपणापासून सगळे निषेधपर धडे शिकविले होते. उदाहरणार्थः—कोणाच्याकडे जाऊ नये, कोणाच्या गांठीभेठी घेऊ नयेत, आपले घर सोडून कोठे पाऊलही टाकू नये, वगैरे वगैरे. अशा प्रकारच्या परिस्थितींत तो वाढला असल्यामुळे कोणत्याही बाबींत त्याला आपले मत कायम करावयाला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची सवय स्वाभाविकपणेच लागून गेली होती. मधुकर त्याच्या पुरोहिताचा मुलगा असूनही त्याला इंग्रजी शिकण्याचा लाभ झाला. पण त्या लाभापासून खुद्द हा जहागिरदाराचा मुलगा मात्र वंचित राहिला. त्याचें कारण परंपरागत चालत आलेल्या समजुती. आपल्यासारख्या जहागीरदाराच्या मुलाला जास्त शिकून काय करावयाचें आहे ? त्यांतून म्लेंछ विद्या

तर मुळींच नको ! ज्यांना विद्येवर पोट भरावयाचें आहे अशांनीं, किंवा कारकुनी पेशाच्या लोकांनीं पाहिजे तर ती विद्या खुशाल शिकावी. लक्ष्मी ज्यांची दासी बनली आहे त्यांनीं आराम भोगण्यांतच त्यांच्या आयुष्याचें खरे चीज आहे. विद्या शिकण्याचे वृथा कष्ट घेण्याचे प्रयोजन तरी काय ? खाऊन पिऊन यथेच्छ झोंप घेतल्यानतर त्याचा वेळ गेला नाहीं तर, त्यांना दुसरें करमणुकीचे प्रकार काय कमी आहेत ? परतु मधुकर हायस्कुलांत गेल्याबरोबर विजयानेंही इग्रजी शिकण्याचा हट्ट धरला. भाऊसाहेबांचा त्याच्या हट्टापुढे नाइलाज होऊन त्याच्या म्हणण्याप्रमाणें त्यांना मुकाट्याने रुकार द्यावा लागला. पुढे हाच प्रकार कॉलेजच्या बाबतीतही घडून आला.

मधुकर पुण्यास निघून गेल्यावर विजयानेंही मोठ्या शर्थीनें बापाची संमति मिळवून पुण्याची वाट धरली.

भाऊसाहेबांना नाच, रग, तमाशा यांची मौज उडविणे आणि भांग अथवा गुडगुडी यांच्यांत दिवस घालविणे यांतच आयुष्याची खरी खरी मजा वाटत होती. जहागिरदारीची देखरेख किंवा हिशेबठिशेब पाहणे त्याना बिलकूल आवडत नव्हते. तो सर्व कारभार त्यांनी दिवाणजीवर सोपविला होता. घरची सर्व व्यवस्था माईसाहेब पाहात असून त्यांच्या स्वतःच्या ऐषआरामाची सगळीं सोय त्यांचा “ काळू ” नांवाचा एक जिवलग दोस्त पाहात होता. ते सर्व बाबतींत निश्चित असत. त्यांनीं विजयाला दोन चार वेळां मनाई करून पाहिले; पण तो ऐकत नाहीं असे दिसून आल्यावर तुझ्या मर्जीला येर्थल तसे कर, असे म्हणून त्यांनीं त्याचा नादच सोडून दिला.

तथापि माईसाहेबांचे अश्रू मात्र थांबतां थांबेनात. विजयाची सख्खी आई मरण पावली त्या दिवशी तिनें त्याला माईसाहेबांच्या ओटींत घालून आपला प्राण सोडला. माईसाहेबानाही त्याच दिवशीं सतानवात्सल्याचा खरा अनुभव आला. तेव्हापासून आतापर्यंत सारखी अठरा वर्षें त्यांनीं ज्याला आपल्यापासून दूर होऊ दिले नाहीं, त्याला इतक्या दूर पाठाविणें त्यांना अगदीं दुःसह व्हावें हे स्वाभाविक आहे. त्यांचें हृदय त्या

विचारानेंच विदीर्ण झाले; आणि नाना प्रकारच्या तर्कवितर्कांनीं त्यांच छाती धडधडूं लागली. विजयाला देखील त्यांना सोडून दूर जाणें मो दुःखदायक वाटूं लागले. पण बदीखान्यांतून मुक्त होण्याचा आनंद त्यां तें दुःख तितकें असह्य होऊं देत नव्हता.

विजय पुण्याला आला त्यावेळीं त्याची ात एखाद्या न परिणत वधूप्रमाणें झाली. बाहेरचें जग पाहून त्याला आनद झाला. त्याच्याकडे निःसकोच भावाने त्याच्याने पाहवेना, किंवा त्याशी त होण्याचेहि त्याला धैर्य होईना. तथापि ही गोष्ट एकप्रकारे त्याच्या हिता लाच कारणीभूत झाली.

विजय पुण्याला आल्यावर मधुकराला जणू काय नव जीवन लाभल्या प्रमाणें झाले. तमण्णाबरोबर वादविवाद करता करता जेव्हां त्य कंटाळा येई, त्यावेळीं तो विजयाच्या मधुर, स्नेहपूर्ण आणि शांतिरस सभाषणानें स्वतःच्या मनाला विश्रांती देई. विजय मधुकराप्रमाणे तार्कि नव्हता; त्याचें मत दुसऱ्याच्या मतावर अवलबून असे; आणि मधुकर ह त्याचा एकमात्र मित्र असल्यामुळे, त्याचें मतग्रहण करण्यास त्याला बिल कूल संकोच वाटत नव्हता. मधुकराचीं पूर्वीची मते आणि आताचीं मते यांत दिसणारे विलक्षण अतर एखादे वेळी विजयाला अगदीच असह्य हेऊन तो त्याशी त्यासबधाने कधी कधी वादविवाद करी. पण मधुकर त्याला आपल्या नव्या मताची सत्यता पटवून त्याचें हां हां म्हणतां समाधान करी. ह्याप्रमाणें मधुकराच्या सहवासामुळे वियजाचेहि बाल्यकाळचे गुलामगिरीचे संस्कार हळूहळू नष्ट होऊन त्याच्याहि मतांत बदल होत चालला. मत मतांतराच्या व तर्कवादाच्या आगीचा खेळ खेळण्यांत त्या दोघांनाहि मोठी मौज वाटत होती. या आगीनें आपल्याहि घराला आग लागण्याचा संभ आहे अशी भीति कधीं कधीं त्यांच्या मनाला वाटे. पण तिजमुळें माग वर जो प्रकाश पडत होता त्यानें त्यांचे मन अगदीं वेडावून जाऊन त्यांना इतर गोष्टींची विस्मृति पडे. यावेळीं त्यांचे भावप्रवण तरुण हृद एखाद्या भाजल्या जात असलेल्या चपातीप्रमाणें फुगत असे

# प्रकरण ५ वें.

## भाऊसाहेबांचें पत्र !

भाऊसाहेब जहागीरदारांच्या घरांत कुसुमला आश्रय देण्याच्या बाबतींत अगदीं घनघोर संग्राम माजून राहिला होता. अगदी बरोबर त्याचवेळीं इकडे पुण्यांत मधुकर आणि विजय या दोघांत रस्त्याच्या धुळीपासून तो ईश्वराचे अस्तित्व, पुनर्जन्म वगैरे अनेक विषयांवर चर्चा आणि वादविवाद चालला होता. तमण्णाहि या वादविवादांत मधून मधून भाग घेत होता. आपले कोटिक्रम काय किंमतीचे आहेत आणि त्याकडे कुणी लक्ष देतो कीं नाही, याची तो कधींच फिकीर करीत नसे.

सकाळची वेळ होती. शरद् ऋतूतील सूर्याचीं सोनेरीं किरणे उघड्या खिडकींतून खोलींतल्या गालीचावर खेळत होतीं. यावेळी विजय एका आरामखुर्चीवर पडून शेक्सपीअरचें "मर्चंट ऑफ् दि व्हेनिस" हें नाटक वाचीत होता. एम. ए. च्या परीक्षेला आतां फक्त दोन महिन्यांचा अवधी उरला होता. मधुकर त्याच्याजवळच तक्क्याला टेकून बसला असून सकाळीच आलेलीं ताजीं वृत्तपत्रें वाचण्यात गढला होता. नाटकावरची टीका वाचून वाचून जीव त्रासल्यामुळे विजय मधुकराला म्हणाला, "मधुकर, त्यांतलें एक पत्र इकडे दे बरें ! जरा दुनियेची तरी हालहवाल पाहूं दे !"

मधुकर जरा गंभीर भावानें म्हणाला, "नको, नको, यावेळी परीक्षेचीच हालहवाल पहा ! जेवणखाण झाल्यावर मग दुनियेची खबर घे !"

विजय आपल्या मित्राला पुरा ओळखीत होता. मधुकर त्याचा नुसता लंगोटीयार नसून त्याचा हितचिंतकहि होता. यामुळें मधुकर त्याच्यावर प्रसंगानुसार हुकमतहि चालवी. मधुकरानें वरीलप्रमाणें गंभीर भावानें दिलेलें उत्तर ऐकून फिरून वर्तमानपत्र मागण्याचें विजयाला साहस झालें नाहीं. परंतु पुढें पुस्तक वाचावयालाहि त्याचें मन राजी नव्हतें. यामुळे तो हंसत

हंसत पुनः मधुकराला म्हणाला, "पोरीयेची खबरदारी घेण्याची दुसऱ्या कोणाला जरूरी नाहीं. ती स्वतःच स्वतःची किंबहुना दुसऱ्याहि पुष्कळांची खबरदारी घ्यावयाला खबीर आहे. याच कारणामुळे तर ती मला विशेष आवडत नाहीं."

मग काय! विजय एवढे बोलावयाचाच अवकाश होता. मधुकर आपल्या बुद्धीचीं हत्यारे पाजळून वादविवादाच्या सग्रमांत उतरला. तो विजयाला म्हणाला, "कां बरे!"

विजयः— तिच्यात मला पुरुषी गुण दिसतात. ह्यामुळे स्त्रीहृदयाची मनोहारीता तिच्या ठिकाणी तितकी राहिली नाही.

मधु०:— स्त्रिहृदयाची मनोहारिता म्हणजे काय? बुरखा घेणे, लाजून लाजून हैराण होणे, कोणतेही आणि कसलेही सकट आले तर मुळूं मुळूं रडत बसणे हेंच ना? ते तुमच्या इंडियन स्त्रियानाच लखलाभ असो!

यावर विजय हसून म्हणाला, "तरी पण ग्रहदेवतांनी कमर बांधून कोर्टात मुकदमा लढणे चागले का?"

मधु०:— प्रसग पडला तर असेही करायला काय हरकत आहे? राणी दुर्गावती, झाशीची राणी, 'जेन ऑफ् यॉर्क' इत्यादि स्त्रिया खुद्द रणभूमीवर जाऊन युद्ध खेळल्या नाहींत काय? या कारणामुळे आमची त्यांच्याविषयींची पूज्यबुद्धी कमी झाली का? त्यांनीं आपल्या सकटांचा प्रतिकार करावयचा प्रयत्न केला म्हणून त्याच्याविषयीं आम्हांला आदर वाटत नाहीं? याच्याउलट आमच्या बायका, वहिणी, काक्या, मावश्या पहा! त्यांचा कोणीं केसाने गळा कापला तरी, त्याच्या विरुद्ध उभे राहून त्याचा प्रतिकार करावयाची त्यांची तयारी नाहीं. उलट मूठभर अन्नासाठीं त्यांच्याच दारांत वाटेल तो अपमान गिळीत राहण्याची त्यांची तयारी. ह्याच्यापेक्षां त्यांच्या अधःपतनाची सीमा आणखी कोणती असावयाची? सारा देश नामर्द बनला आहे आणि अशा स्थितींत तो जो अपमान सहन करीत आहे त्याला लोक क्षमा समजतात! अशा स्त्रियाच्या दुर्गतीला गृहलक्ष्मीची आदर्श म्हणतात! असल्या बड्या बड्या पण अर्थशून्य शब्दांचा धिःकार असो. हे निर्जीव मनाचे चाळे होत.

मधुकराचे ते मेघगंभीरतुल्य शब्द त्या खोलीत निनादित झाले. विजयाच्या डोळ्यांपुढे आपल्या पित्याच्या अन्याय्य व्यवहाराचा प्रसंग उभा राहून तो अगदी लाजला व निरुत्तरही झाला. आवेशाच्या भरांत मधुकराचे वक्तृत्व निरर्गलपणे चाल्रूच होते. पण इतक्यात त्यांच्या एका नोकराने ताजी डाक त्यांच्यापुढे आणून ठेवल्यामुळे त्याचे ते वक्तृत्व तेथेंच थांबले; त्यामुळे विजयाला समाधान वाटलें.

आलेल्या डाकेत दोघाच्याही बापाची दोन पत्रे होती. मधुकराने आपले पत्र वाचून, ते विजयाच्या अंगावर फेकले आणि सतापून म्हटले, "ही पाहा आमच्या आदर्श आर्य गृहलक्ष्मीची दुर्दशा!"

विजयाने ते पत्र घेऊन वाचले. त्यात जोशीबुवानीं कुसुमच्या आश्रयासबधांत घडलेल्या एकदर झगड्याची हकीकत कळविली होती. ते वाचून विजयाला आपल्या आईच्या वर्तनाची जशी लाज वाटली, तसेच पदोपदीं अपमान भोगत राहिलेल्या काकी आणि अनाथ बनलेली कुसुम याच्याविषयींच्या सहानुभूतीने त्याचे हृदय भरून आले. तथापि तो आपल्या आईबापाच्या त्या अत्याचारी वागणुकीला थोडासा सौम्यपणा आणावयाच्या हेतूने म्हणाला, "मला बाबांनी हे जे पत्र पाठविले आहे त्यात तुझ्याबरोबर कुसुमला इकडे पाठवून द्यावे म्हणून लिहिले आहे."

पण त्याच्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष्य न देता मधुकर म्हणाला, "पहा तर खरे आमच्या लोकाची ही कर्तबगारी! आम्हाला आर्य म्हणविण्यात मोठा अभिमान वाटतो. पण आमची कृत्ये पहावीत तर राक्षसाच्यावर! ही कुसुमच घ्याना! आज ती दुसऱ्याच्या घरी पोटासाठी एखाद्या मोलकरणीप्रमाणे, किंबहुना त्याहूनही हीन स्थितीत, सर्व मानापमान गिळून राहावयास तयार झाली आहे. पण याच कुसुमने जर पुनर्विवाह लावला, तर ते याहून हजारो पटींनी बरे नाही का होणार? का विधवाविवाह अत्यत अनुचित होय असे अजूनही तुझे म्हणणे आहे?"

मधुकराच्या डोळ्यांतून जणू काय आगीच्या ठिणग्या उडत होत्या. त्याच्या त्या आवेशापुढे विजय अगदीं हतप्रभ होऊन कोमलस्वराने म्हणाला, "मी विधवाविवाह सर्वस्वीं त्याज्य समजत नाहीं. फक्त तें एक

अगतिक स्थितींतलें कार्य आहे, एवढेच मी म्हणतों. माझ्या समजुतीनें ब्रह्मचर्यपालन हाच विधवांचा श्रेष्ठ आदर्श होय. ”

मधु०:—तुझा हा आदर्श मीहि कबूल करितों. त्याच्याबरोबर मी हें देखील म्हणायला तयार आहे कीं, विधुर पुरुषांनी असाच आदर्श आपल्या डोळ्यांपुढे ठेवावा! माझें म्हणणे इतकेच आहे की, कोणतीहि गोष्ट करावयाची ती अंतःप्रेरणेने झाली पाहिजे. सक्तीने घडवून आणलेलें धर्मसाधन केवळ कवडीमोल होय. मग तूंच सांग! सध्या आमच्या धर्मसाधनांत स्फूर्तीचा भाग किती आहे! उलट आमचे सर्व धर्मविधी अधपरंपरेच्या न्यायानेंच चालू नाहींत काय? याचे कारण आमच्या वडिलांनीं जे केलें नाहीं ते आम्हीं कसे करावे ही मनाला चिकटलेली मूर्खपणाची गुलामगिरी होय. अरे! पण जरा विचार करा! परमेश्वराने आमच्या डोक्यांत “मेंदू” नांवाची जी चीज घातली आहे ती काय असल्या गुलामगिरीचा बोजा वाहण्यासाठी? तिच्याकडून कांही विचाराचे काम करून घेण्यासाठी नव्हे? आम्ही आपली बुद्धि खर्च करीत गेलो, तर पुढे मागे न जाणो कदाचित दिवाळे निघेल अशा समजुतीने तर या बाबतीत वडिलांच्या पुजीवर भरवसा ठेवून आम्ही बसून राहिलो नाहीत ना? अर्धपोटीं राहण्याचा प्रसग येवो, की, उपाशी मरण्याचा प्रसग येवो! पण स्वतत्र बुद्धी चालविण्याची जर कोणाला हिंमत होईल तर शपथ.

विजय:—समाजांतील प्रत्येक मनुष्य विचार करण्याला समर्थ आहे अशी तुझी समजूत आहे? शिक्षण मिळून ज्यांची बुद्धी विकासित झाली नाहीं अशीं माणसे जर आपली बुद्धी चालवू लागतील, तर त्यांची पदोपदीं चूक होईल.

मधु०:—‘अशा चुका झालेल्याच बऱ्या! चुकीशिवाय सत्य सांपडणार तरी कसे? आम्ही हिंदुलोक मोठे ज्ञानी आणि सावध आहोंत, कधीं चुका करीत नाही. पण सत्याचाहि आम्हांला कधीं पत्ता लागत नाहीं! अशिक्षित लोकांची गोष्ट एका बाजूला राहू द्या! पण तुम्ही शिक्षित काय करीत आहांत? आणि शिक्षित लोक जर आपलें कर्तव्य बजावीत नाहींत, तर मग चुका झाल्या तरी अशिक्षितानें आपली बुद्धी कां चालवू

नये ! तुमच्या या मृताच्या शांततेपेक्षां त्यांची चुकांनीं भरलेली हालचाल बरी ! त्यामुळे त्यांच्या चुका सुधारण्यासाठीं तरी निदान आम्हा बुद्धिमान् लोकांत चैतन्य उत्पन्न होईल. भगवान् सर्वांतर्यामीं आहे हे आमच्यांतला अडाण्यांतला अडाणीहि मनुष्य जाणतो. पण त्यांच्या या जाणिवींत जागृतता नसल्यामुळे विश्वमदीर किंवा मनोमदीर ह्यांच्याऐवजी दगडांधोंड्यांनीं बांधलेल्या मंदिरांत जो तो त्याचा शोध करीत फिरतो ! त्याचा प्रकाश त्याला ईश्वरस्वरूप विश्वरूपांत न दिसतां मूर्तींत तो ते पाहू इच्छितो. याप्रमाणे आमच्या खाण्यापिण्यांतही अंधभाव आणि भोळेपणा भरलेला स्पष्टपणे दिसत आहे.

विजयः—पण इतके तत्त्वसंशोधन करण्याचे सामर्थ्य असलेले लोक कितीसे आहेत ?

मधु०ः—तुम्ही आणि मी बस्स झालो. आम्हांला जें ज्ञान प्राप्त झाले ते आम्हीं सर्वांना पोंचते केले पाहिजे.

विजयः—स्त्रिया आणि पुरुष याना एकाच प्रकारचे शिक्षण देणें उचित आहे काय ?

मधु०ः—कांही मर्यादेपर्यंत ते एक असणे अगदीं अवश्य आहे. नाहींतर काय होते हे कधीं पाहिलेस का ? मध्यम वयाचा मनुष्य विधुर झाल्याबरोबर ताबडतोब बायको करण्याची घाई करतो. कारण काय, तर स्वयंपाक करावयाला आणि गृहव्यवस्था ठेवावयाला कुणी तरी पाहिजे. बरें, स्त्रिया विधवा झाल्या तर त्याच्या हातीं पोळपाटलाटणें येते. कारण काय, तर स्वतंत्रपणे कोणताही धंदा करण्याचे शिक्षण त्याना मिळालेले नसतें. समज, कुसुमसारख्या अगतिक बालिकेला सांभाळावयाला कोणी नाहीं. अशा स्थितींत त्या बिचारीला नुसते गृहशिक्षणच मिळवून काय उपयोग ? त्यावर तिचे पोट कसे भरेल ? तिच्या सध्यांच्या स्थितींत एक तर तिनें जीवनकलहांत टिकण्याचे सामर्थ्य ज्यामुळे अंगांत येईल असे कांही शिक्षण तरी मिळविले पाहिजे, किंवा दुसऱ्याच्या घरांत मोलकरीण तरी होऊन राहिलें पाहिजे. अशा स्त्रियांना दुसऱ्याच्या घरांत दोन तऱ्हांनीं आश्रय मिळूं शकतो. एक तर त्या गृहाची गृहस्वामिनी बनून, किंवा दुसरी दासी बनून. पण दासी होण्यापेक्षां गृहस्वामिनी बनण्यांत अधिक मान आहे हें

तुलाहि कबूल करावे लागेल. एक काल असा होता, कीं, त्यावेळीं घरां-तल्या विधवेची सर्वांवर हुकमत चालत होती. पण तो जमाना आतां राहिला नाहीं. समाजास्थिति बदलली. आज विधवांनीं स्वतंत्र राहून आपला स्वाभिमान राखावा, किंवा दुसऱ्याचे घरीं मोलकरीण बनून आपले जीवन कंठावे, हा त्यांच्यापुढे प्रश्न आहे. या गोष्टीचा विचार केला म्हणजे विध-वांचे पुनर्विवाह होणे अगदी जरूर आहे, इतकेच नव्हे, तर पुरुषांप्रमाणे त्यांना स्वतंत्रपणाने उदरनिर्वाह करतां येईल अशा प्रकारचे शिक्षणसुद्धां देणे अगदीं जरूर आहे, असाच निष्कर्ष निघतो. कुसुमसारख्या विध-वांच्या बाबतीत तर ही गोष्ट अगदी जरूर आहे.

विजयः—मला हे ठाऊक आहे, मधुकर! काकींच्या मनाला सुख देण्यासाठी मी कितीतरी प्रयत्न करितो. आपण दुसऱ्यावर बोजा घालीत आहो, असे कुसुमला देखील मी वाटू देणार नाही. तू तिला आणायला कधी जाणार?

मधु०:—आजच चारच्या गाडीने!

विजयः—पण काकीनें यासबंधात कुसुमला कांहीं लिहिले नाही. यामुळे तुझ्याबरोबर ती येईल की नाही याची शका वाटते. याकरितां तू हीं दोन्ही पत्रे बरोबर घेऊन जा! जरूर पडलीच तर ही पत्रे तिला दाखीव. म्हणजे मग तिला काही शका वाटणार नाहीं.

मधु०:—ठीक आहे! चला आतां, आपण स्नान करून थोडेसे कांहीं खाऊन घेऊ. आपणाला इथून लवकर निघाले पाहिजे. नाही तर कुसुमच्या घरी जावयाला रात्र होईल.

विजयः—मी नाहीं येणार बोवा! तू एकटा जा आणि तिला घेऊन ये. माझी व तिची कांहीं ओळखहि नाहीं.

यावर मधुकर हसून म्हणाला, "अरे! तूं असा किती दिवस लाजत राहणार? तू जिच्याशी लग्न करणार ती तुझी वधू देखील अशीच बिन-ओळखीची असणार! मग तिच्यापुढेहि जावयाला तू असाच लाजणार काय?"

विजयः—नाहीं; मी मुळींच यावयाचा नाहीं. तूंच जा!

# प्रकरण ६ वें.

## दुर्दैवी बालिका !

**कुसुमच्या** आईचें घर पुण्यापासून जवळच होतें. ती लग्न होऊन एक महिना लोटला नाहीं तोच विधवा होऊन बसली होती. तेव्हांपासून तिच्या सासूसासऱ्याना ती डोळ्यापुढे सुद्धां नकोशी झाली. लग्न होऊन महिना लोटला नाही तोच ही पांढऱ्या पायाची अवदसा नवऱ्याला गिळून बसली, असें नाहीं नाहीं तें तिला बोलूं लागलीं. बिचारीच्या मस्तकावर अगोदरच आकाशाची कुऱ्हाड कोसळली, आणि त्यात वर ही अशी बोलणी ! तिला नको जीव होऊन गेला. पण तिच्या सासूसासऱ्याचे एवढे बोलूनच समाधान झाले नाही. त्यांना ती घरांतच नकोशी झाली. तिच्या पायगुणानें एक महिन्याच्या आंतच मुलगा गेला, तर पुढे आणखी काय होईल आणि काय काय नाहीं, असें ती तिच्या तोंडावर म्हणू लागली. यावेळी तिचे वय केवळ पधरा वर्षांचे होते. आपल्याला घरात राहू देण्याचा सासूसासऱ्यांचा विचार नाही हे पाहून कुसुम सासूचे पाय धरून म्हणाली, " सासूबाई ! असे नको हो करू. मी तुमच्या घरात मोलकरणीसारखे काबाडकष्ट करीत राहीन आणि पोटाला तुकडा खाईन. पण मला दूर ढकलू नका ." पण प्रस्तरहृदयी सासूला तिची दया आली नाही. कुसुमचे हे रडणे केवळ ढोंग आहे असे ती म्हणू लागली. अखेर दुसरी गतीच न राहिल्यामुळे कुसुमला आईच्या घरचा आश्रय करावा लागला. ज्यावेळी सुखाचे आणि मधुरभावनेचे मनोहर कल्होळ हृदयांत उसळत असतात, अशाच वेळीं बिचाऱ्या कुसुमच्या सुखदायक संसारोद्यानाचा नाश झाला. तिच्या मनाने रचलेल्या आतांपर्यंतच्या सर्व आशांची कायमची राखरांगोळी होऊन गेली.

कुसुम आपल्या आईबापाची एकुलती एकच मुलगी होती. त्यामुळे तिच्या दुःखाने तिच्या हृदयावर जबर आघात झाला. तिचा बाप नव्या विचाराचा मनुष्य होता. त्याने तिचा पुनर्विवाह करावयाचें मनांत योजिलें

होतें आणि हळूं हळू त्याने तिला शिक्षण द्यावयासहि सुरुवात केली होती. परतु पुढें एक वर्ष लोटते न लोटते, तोंच तिच्या दुर्दैवाने तिचा पिताही काळाच्या भक्षस्थानीं पडला. यामुळे तिच्या पुनर्विवाहाची गोष्ट जागच्या-जागींच राहिली.

आतां केवळ कुसुम आणि तिची आई एवढी दोनच प्राणी त्या घरांत राहिले. घरांतले काम किती असावयाचें ? ते त्या हां हां म्हणतां आटोपीत; पण त्यामुळे त्यांना उरलेला दिवस जाता जात नसे. या निरुद्योगीपणाच्या वेळीं त्यांच्या दुःखाची खपली उचकटे आणि त्या सारख्या अश्रुमोचन करीत बसत. त्यातल्या त्यात कुसुम पुस्तकाच्या वाचनाने आपले दुःख घालविण्याचा प्रयत्न करी. तिने आपल्या वाचनलेखनाच्या व्यवसायांत मात्र आतांपर्यंत बिलकूल खड पडू दिला नव्हता.

कुसुमचे दुर्दैव अजून सपले नव्हते. वडील वारून दोन वर्षे लोटलीं नाहींत, तोंच तिच्या आईलाहि सर्वभक्षक काळाने गिळिले. यावेळी केवळ पुस्तकाच्या किंवा विद्येच्याच जोरावर मनुष्य जीवत राहू शकत नाहीं हें कुसुमला आढळून आले. विद्येइतकीच मायाममतेचीहि मनुष्याला जिवत रहावयाला आवश्कता आहे. यापुढे आपण आता कसे करावयाचे, कुठें रहावयाचें, याचा ती विचार करू लागली. अखेर तिच्या आईपासून तिच्या घरांत जी एक म्हातारी मोलकरीण होती तिच्या सल्ल्याने तिने मावशीच्या येथे जावयाचे ठरविले. पण मावशीने तिला किंवा तिने मावशीला जन्मातहि कधीं पाहिले नव्हतें. त्यामुळे आपण एकदम तिच्या घरी जाऊन रहावे कसे, असा विचार तिला पडला; पण माय आणि मावशी कांही दोन नाहीत, म्हण आहे " माय मरो पण मावशी उरो " अशा प्रकारे तिच्या वृद्ध मोलकरिणीने दोन समजुतीच्या गोष्टी सांगून तिच्या मनांतला संकोच दूर केला. त्याच दिवशी कुसुमने आपल्याला घेऊन जाण्याविषयीं मावशीला पत्र लिहिले. त्या गोष्टीला आज आठ दिवस होऊन गेले. पण मावशीकडून तिला त्या पत्राचे कांहीच उत्तर आले नव्हते. यामुळे ती अतिशय निराश होऊन गेली. तिला सर्वत्र अंधकार दिसू लागला.

तिसरे प्रहरची वेळ होती. कुसुम जमिनीवर लुगडे अंथरून पडली होती. तिच्याजवळ तिची वृद्ध मोलकरीण बसली होती. समोरच्याच कोना-

ठ्यांत ठेवलेलें टाइमपिस् टिक् टिक् आवाज करून तेथे पसरलेली भीषण शांतता किंचित् कमी करीत होतें.

कुसुम निजल्यानिजल्याच आपल्या मावशीसबंधाने विचार करीत होती. मावशीचे रंगरूप आपल्या आईप्रमाणेच असावे, अशी ती आपल्या मनाची कल्पना करीत होती. मावशीला मुलबाळ कांहीं नव्हते. आपण तिची जिवाभावाने सेवा करून तिच्या हृदयातले प्रेम संपादन करू आणि आईबद्दलचे दुःख विसरून जाऊ अशी ती बालिका मनांतल्यामनांत विचार करीत होती. याच वेळी आपली मावशी एका मोठ्या जमीनदाराची बायको असताना तिने आपल्याला किंवा आपल्या आईला एकदां देखील आपल्या घरी नेले नाही, किंवा तीही इकडे आली नाहीं, हा विचार तिच्या मनांत उभा राहिला. मावशी विधवा झाल्यानंतर तिच्या सर्व इष्टेटीची धुळधाण होऊन आज ती दुसऱ्याच्या दारी तुकडे खात आहे, ही गोष्ट देखील कुसुमला कळली होती. पण दुसऱ्याच्या येथे राहिले म्हणून काय झाले ? आपल्या भाचीला बोलावून घेण्याइतकीहि तिची सत्ता नसेल का ! पण तिलाच कोणाची जरूर नसल्याचे दिसते. अशा स्थितीत तिज-जवळ राहण्यात आपल्याला सुख तरी काय लाभणार ! असे नानाप्रकारचे विचार तिच्या मनात घोळू लागले.

कुसुम अशा विचारात मग्न आहे, तोंच बाहेरून कोणी तिच्या बापाचे नांव घेऊन त्यांचेच का हें घर, असा कोणालासा प्रश्न केल्याचे तिला ऐकूं आले. तिने खिडकी उघडून पाहिले, तर रस्त्यावर एक सुंदर आणि सशक्त ब्राह्मण तरुण उभा. तिला वाटले, आपल्या मावशीनेच या तरुणाला आपल्याकडे पाठविले असावे. तिचे हृदय आनंदाने खालीवर होऊ लागले.

तिने जलदीनें त्या वृद्ध मोलकरणीला दार उघडायला सांगितले. कुसुमच्या घराचा दरवाजा रस्त्याच्या एका बाजूला होता. दरवाजाच्या आंत प्रशस्त अंगण असून पलीकडे ओसरी होती. अंगणात पोफळीची व कांहीं फुलझाडे लाविलीं होतीं. मोलकरणीने दार उघडल्यावर तो ब्राह्मण तरुण ओसरीवर येऊन दाखल झाला. तेथें तो येण्यापूर्वीच कुसुमनें सतरंजी अंथरून ठेवली होती. तिच्यावर कुसुमने त्याला बसावयाला सांगि-

तलें. घरांतली स्वच्छता आणि टापटीप पाहून तरुण अगदीं खूष झाला. हा तरूण म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून मधुकरच होय, हें यापूर्वीच वाचकांनी ओळखले असेल.

तो खाली बसल्यावर कुसुमने त्याला मधुर स्वराने विचारिले," आपण माझ्या मावशीकडून आलात ! "

मधु०:—होय.

त्याचे हे उत्तर ऐकून कुसुमच्या आनंदाला पारावार उरला नाही. कुसुम एकुलती एक असल्यामुळे आईबापांची अतिशय लाडकी होती. यामुळे तिला मनमोकळेपणाने वागण्याची त्यांच्याकडून मुभा मिळत होती. शिवाय सासरी राहणेहि तिचे फार थोडे, म्हणजे सरासरी एक महिन्यापेक्षांहि कमीच झाले होते. त्यामुळे तिच्या वयाच्या मुलीच्या ठिकाणी फाजील लाजाळूपणा यावयाचा तो तिच्यांत मुळीच आलेला नव्हता. स्त्रीजनाच्या ठिकाणीं स्वाभाविकपणे जेवढी लज्जा असावयाला पाहिजे, तेवढी तिच्या ठिकाणीं होती. परकीय पुरुष पाहिल्याबरोबर बुजऱ्या जनावराप्रमाणे सामान्यतः हिंदुस्त्रियांच्या मनाची जी स्थिति होते, तशी तिची मनःस्थिति होत नसे. याचे कारण लहानपणापासून घरी येणाऱ्या पाहुण्याची व्यवस्था आणि आदरसत्कार करण्याचे काम तिचा बाप तिच्याकडेच सोपवीत असे हे होय. साराश, लज्जाशीलता आणि निःसकोचवृत्ति या दोन्ही भावनाचे तिच्या ठिकाणी मोठ मधुर मीलन झाले होते. यामुळे तिचे हृदय बरेच सामर्थ्यशालीहि बनले होते.

तिच्या या निःसकोच आणि सरळ व्यवहाराने मधुकर अगदी मुग्ध होऊन गेला. थोड्या वेळाने तो तिला म्हणाला, " मी पुण्याला राहत असतो. पण वडगांवचे पत्र आल्यामुळे तुम्हांला न्यावयाला आलो आहे. "

कुसुम अशा अर्धवट भाषणाने समाधान पावणारी मुलगी नव्हती. ती म्हणाली, " मावशीने जर तुम्हांला मला घेऊन येण्याविषयीं पत्र दिले, तर मग मला खुद्द तिने कसे कांहीं लिहिले नाही ? "

तिचा हा मार्मिक प्रश्न ऐकून मधुकर जरा गांगरून म्हणाला, " खुद्द तुमच्या मावशीचेच कांही मला पत्र आले नाहीं; आणि ती पाठ-

विणार तरी कशी ? ती बिचारी बोलूनचालून परस्वाधीन. आपल्या इच्छे-प्रमाणे सर्व कांहीं गोष्टी करतां येणे तिला शक्य नाहीं. भाऊसाहेब जहा-गीदारांनी आपल्या मुलाला पत्र पाठविले आणि त्यावरून त्यांनी मला तुमच्याकडे रवाना केले. ''

कुसुमः—तर मग आपण भाऊसाहेबाचे चिरजीव बाळासाहेब नव्हेत तर ? मी त्याचे नाव ऐकले होते. मावशी जेव्हां विधवा झाली, तेव्हां तिला आणण्यासाठी तेच तिच्याकडे गेले होते असे माझ्या कानावर आले होते. मला वाटले, आपणच ते बाळासाहेब असावे. आपण त्याचे कुणी नातलग आहां वाटते ?

मधु०:— मी त्याचा नातलग नाही. तथापि मी त्याच्या पुरोहि-ताचा मुलगा आहे. या नात्याने तुमची मावशी माझीही काकी आहे. भाऊसाहेबाच्या घरातले नोकरचाकर सर्वच माणसे त्याना काकी म्हणतात

कुसुम जरा हसून म्हणाली, '' आपल्या जवळचे ते पत्र मला जरा दाखवाल काय ? ''

कुसुमची ही हुषारी आणि तिच्या शहाणपणाच्या शकाकुशका ऐकून मधुकर मनातल्यामनात अगदी खूप झाला.

नतर तोही हसून म्हणाला, '' मजसारख्या अपरिचित माणसाला या पत्राची जरूर पडेल **असे** मला वाटले होतेच. म्हणून मी ते बरोबर आणले आहे. हे घ्या. ''

एवढे बोलून, भाऊसाहेबांनी विजयाला जे पत्र पाठविले होते ते तिच्या स्वाधीन करावे म्हणून त्याने आपल्याजवळची दोन्ही पत्रे बाहेर काढली आणि आपले पत्र खिशांत ठेवून विजयाचे पत्र तिच्या स्वाधीन केले.

परतु जी चूक होऊ नये म्हणून त्यानें एवढी यातायात केली, ती चूक पूर्वीच्या गैरसावधपणामुळे त्याच्या हातून यावेळीं घडली. कारण तिच्या हाती विजयाचे म्हणून जे पत्र त्याने ठेवले. ते त्याचे स्वतःचें पत्र होतें.

त्रकाळीं पत्रें लिफाफ्यांत घालतांना त्यांची अदलाबदल झाल्यामुळें त्याच्या हातून ही चूक घडली. कुसुम जोशीबुवांचे ते पत्र सगळें लक्षपूर्वक वाचू लागली.

विधवा झाल्यानंतर थोडे दिवस कुसुमला सासरचे नरकयातनेचे दुःख भोगावे लागले. पण पुढें आईबापांच्या प्रेमाने तिचे ते सर्व दुःख शांत झाले होते. परतु आईबापाच्या मृत्यूनतर मावशीच्या उदासीन वृत्तीने तिचे ते दुःख पुनः जागृत झाले आणि त्यामुळे तिने आपल्या अतःकरणचक्षूपुढे उभी केलेली मावशीची वात्सल्यमय मूर्ति क्षणात जमीनदोस्त होऊन गेली आणि तिच्या डोळ्यांतून दुःख आणि अभिमान अश्रूरूपानें झिरपूं लागला.

आईसाहेबाचे स्मरण होऊनच ती अश्रू गाळीत असावी असे मधुकराला वाटले आणि तिचे शांतवन करावे म्हणून तो तिला म्हणाला, ‘ आतां उगीच दुःख करून काय उपयोग ? गेले ते प्राणी काही पुनः परत येत नाहीत. शिवाय तुमच्या मावशी फार मायाळू बाई आहेत. त्यांच्याजवळ गेल्यावर तुम्ही आपले सर्व दुःख विसराल ! ” पण या वचनाने कुसुमचे समाधान न होता ती अधिकच स्फुंदून म्हणाली, “ या पत्रावरून मावशीच्या प्रेमाची मला जी कांही कल्पना होत आहे, त्यावरून तिच्या त्या प्रेमाचा आस्वाद घ्यावयाची फारशी इच्छा मला राहात नाहीं. मी आता तिच्याकडे मुळींच जाणार नाही. ”

तिचे हे भाषण ऐकून मधुकर अगदीं आश्चर्यचकित होऊन आपल्या मनांतल्या मनांत म्हणाला, “ ही काय भानगड झाली.” इतक्यात एकाएकी आपल्या हातून पत्रे देण्याच्या बाबतीत तर कांही चुक झाली नाहींना, हा विचार त्याच्या मनांत आला, आणि त्याने आपल्या खिशांतले पत्र काढून पाहिले, तो होऊं नये ती चूक घडल्याचे त्याला आढळून आले. त्याला या कृत्याची अतिशय लाज वाटली आणि त्याचबरोबर कुसुमच्या अभिमानपूर्ण भाषणाने त्याला अतिशय आनंद वाटला. एका अनाथ बालिकेच्या तोंडून असे तेजस्वी उद्गार बाहेर पडावे, यापेक्षां त्याच्या जिवाला समाधान देणारी दुसरी कोणती गोष्ट होती ? नंतर तो किंचित स्मित

करून तिला म्हणाला, " तुम्ही मावशीकडे जाणार नाहीं, तर तुमचा येथें निर्वाह कसा व्हावा ? "

कुसुमः—मी एखाद्या मुलींच्या शाळेंत शिक्षकिणीची नोकरी पत्करीन. माझ्या एकटीच्या पोटाला काय लागावयाचें ! देव कसाहि पोटाला देईल.

बऱ्याचशा पुरुषांच्या ठिकाणीं न दिसणारें स्वावलंबनाचें साहस एका हिंदुबालिकेचे ठिकाणी असावे याचें मधुकराला मोठें नवल वाटलें आणि त्यामुळे कुसुमविषयीचा त्याचा आदर अधिकच वाढला. तिच्या स्वभावाची आणखीही परीक्षा करावी या हेतूनें तो तिला म्हणाला, " पण येथे तुमचे संरक्षण करणारें कोण आहे ? "

कुसुमः—प्रत्यक्ष परमात्मा !

मधुकरः—( हंसून ) असे जर होतें तर तुम्ही इतके घाबरून मावशीला पत्र कां लिहिलेंत ?

त्याचा हा मार्मिक प्रश्न ऐकून कुसुम जरा शरमली व लागलीच म्हणाली, " जगाशी माझा परिचय फारच थोडा आहे. म्हणून मला त्याची भीति वाटते. "

मधुकरः—पण ते भयाचें कारण अद्यापिहि कांहीं दूर झालेलें दिसत नाही.

कुसुमः—नाही झालें तरी काय करावयाचें आहे ? नाइलाज झाल्यावर असल्या भीतीला टक्कर ही दिलीच पाहिजे.

यावेळी मधुकराचें तिच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतें. तो मनांतल्या मनात त्याच्या परिचयाच्या बालिकांशी तिची तुलना करीत होता. कुसुमपुढे त्याला सर्वांचीं चरित्रचित्रें केवळ हास्यास्पद दिसू लागलीं; आणि त्याचा अगदीं निश्चय झाला कीं, या मुलीला काय पाहिजे ते झालें तरी भाऊसाहेबांच्या कुटुंबांत नेऊन पोंचतें केलेंच पाहिजे. हिच्या सत्संगतीमुळें त्या कुटुंबांतल्या मूर्ख आणि परनिंदाप्रिय स्त्रियांची थोडीबहुत तरी सुधारणा झाल्यावांचून खात्रीनें राहणार नाहीं.

तो थोडा वेळ स्तब्ध राहून तिला म्हणाला, " तुमच्या मावशीच्या चमत्कारिक वर्तनामुळें तुम्हांला दुःख होणें स्वाभाविक आहे; पण तुम्ही

तिच्या सध्यांच्या मनःस्थितीकडे थोडे लक्ष पोचवायला पाहिजे. एक वेळ तिची योग्यता काय होती आणि आज तिची अवस्था काय आहे ! आणि ही अवस्था तिला कोणामुळे प्राप्त झाली आहे ? ज्यांच्यामुळे तिला अशी अवस्था प्राप्त झाली, त्यांच्यापुढे तोंड वेंगाडायला तिला मरणप्राय दुःख वाटूं लागलें तर त्यात आश्चर्य काय ? तुम्ही आपल्या मावशींना नीट ओळखीत नसला, तरी आम्ही काकीना चांगल्या ओळखतो."

कुसुम जरा विचार करून म्हणाली, "हे शक्य आहे. पण जेथे एक बाजूस भिक्षा व दुसऱ्या बाजूस उपेक्षा आहे, तेथे भिक्षेच्या झोळीचा पदर आणखी वाढवून मावशीला अधिक लज्जित करावें हे मला योग्य नाही. मावशीचा निर्वाह भिक्षेवरच चालला आहे हे मला जर अगोदर ठाऊक असतें, तर मीं तिला कधीहि पत्र लिहिलें नसतें."

मधुकरः—या बाबतींत तुमच्यापेक्षां आम्हांला अधिक माहिती आहे. बाळासाहेबांची आई ही अशिक्षित हलक्या कानाची आणि मोठी गर्विष्ठ बायको आहे; तथापि तशी ती थोडीबहुत साळीभोळी आणि प्रेमळहि आहे. तिला रागवायाला जसा वेळ लागत नाही, तसा तिचा रागहि फार वेळ टिकत नाही. तिच्या मर्जीप्रमाणे घेतलें तर तिच्याकडून वाटेल ते काम करून घ्यायला अडचण पडणार नाही. काकी या गोष्टीकडे नीट लक्ष पुरवीत नसल्यामुळें थोडासा गोंधळ होतो. तथापि विजय या दोघींनाही मोठ्या युक्तीनें सांभाळून नेतो. त्याची आता लवकरच परीक्षा होऊन तो घरीं जाणार आहे. मग कांहीं अशा भानगडी फारशा उपस्थित व्हावयाच्या नाहीत. मला भाऊसाहेबानी तुम्हांला आणावयासाठी पाठविलें आहे. विजयाचीहि तशीच इच्छा आहे. तेव्हा तुम्हाला मजबरोबर आलेच पाहिजे. मी तुमचा कोणताहि सबब ऐकून घ्यायला तयार नाही. तुम्ही त्या कुटुंबांत जाऊन राहण्याची फार जरूर आहे. आम्ही दोघा मित्रानी कांही योजना ठरवून ठेवली आहे, तिला तुमचे सहाय्य पाहिजे. स्पष्ट सांगायला कांही हरकत नाही. पहिल्याने तुमच्यासबंधांत थोडीबहुत कुरबूर होईल. पण तुम्ही ते सहन करून तसेंच राहिलें पाहिजे. या दिव्यांतून एकदां तुम्ही पार पडला, म्हणजे मग पुढें तुम्हांला फारसा त्रास होणार नाहीं.

मधुकराची सरळ, शुद्ध आणि नम्र वागणूक पाहून कुसुम अगदीं स्तब्ध झाली. तिच्याने कांहीं बोलवेना.

ती गप्प बसलेली पाहून मधुकर अगदीं खूष होऊन म्हणाला, " आपण उद्यां सकाळीं येथून निघू ! कीं निघावयाला काहीं मुहुर्त वगैरे पाहायला पाहिजे ? "

कुसुमः—( हसून ) मला कांही मुहूर्त लागत नाहीं.

मधुकरः—मग आम्ही तुम्हाला वडगांवला नेऊन पोचविल्याखेरीज राहात नाहीं. आम्हां दोघा मित्रांनाहि कांहीं मुहूर्त लागत नाहीं. पण यामुळे सगळे लोक आम्हांला नास्तिक म्हणून आमच्या र टीका करितात. तुमच्या आगमनानें आमच्या बाजूच्या सख्येत आणखी. एकाची भर पडेल. बरें, मी आता पुण्यास परत जातों. उद्या येऊन तुम्हाला घेऊन जाईन.

एवढे बोलून मधुकरानें आपली छत्री उचलली. त्याबरोबर कुसुम कोमल स्वरानें म्हणाली, " हं ! तोंड गोंड केल्याखेरीज जावयाचे नाही. "

मधुकर मोठ्याने हसून म्हणाला, " सस्कृत नाटकातल्या विदुषका-प्रमाणे मी देखील पक्वानाचा कट्टा भक्त आहे ! चला, आणा पाहू ! "

मोलकरणीनें पाट ठेवला. त्याच्यावर मधुकर जाऊन बसला. थोड्या वेळानें कुसुम लाजत, पण किंचित स्मित करीत एका ताटात दोन लाडू आणि थोडासा चिवडा घेऊन तेथे आली, आणि तिनें ते ताट मधुकरापुढे ठेवले. जवळच एक पाण्याचा तांब्या आणि भांडेही तिने ठेवले. एवढा वेळपर्यंत मधुकराने तिला नीट पाहिले नव्हते. पण आता त्याला तिचे नखशि-खान्त दर्शन झाले. त्याबरोबर आपल्यापुढे एक स्वर्गीय देवता उभी आहे असे त्याला वाटले. तिनें त्यावेळीं एक रेशमी साडी परिधान केली होती. तिच्या अंगावर दागिने मात्र कांही नव्हते. तथापि तेवढी एक साडीच तिला अतुल वैभवशाली रमणीची शोभा आणीत होती. ती ताट घेऊन बाहेर आली, त्यावेळीं तिच्या सन्मानार्थ मधुकर उठून उभा राहिला. कुसुमनें त्याच्या पाटापुढें ताट ठेवल्यावर आदरभावानें त्याच्या पायाजवळ डोकें ठेवून तिने त्याला नमस्कार केला.

# प्रकरण ७ वें.

## आगींतून फुपाट्यांत !

काकीनें स्वाभिमानाला बळी पडून कुसुमला आपल्याजवळ घेऊन येण्याचा विचार जरी रहित केला होता, तथापि त्यांचे मन तिच्या बाबतींत निश्चित नव्हते. " बिचारी पोर एकटी इतक्या दूर राहिली, रूपानें सुंदर, वयांत आलेली, मायेचें माणूस कोणी जवळ नाहीं, अशा स्थितींत तिची अवस्था काय होईल ! कांहीं भलता प्रसंग तिच्यावर कोसळला तर त्यांतून तिचें रक्षण कोण करील ? तिला जर कांहीं कलंक लागला तर तिचा सगळा जन्म फुकट जाईल, आणि त्याचें खापर माझ्या माथ्यावर फुटेल. आग लागो या रागाला आणि अभिमानाला ! ती शपथ घेतांना माझी जीभ तुटली कां नाहीं ? मला अशी बुद्धी कशी झाली ? वैऱ्यापुढें तोंड वेंगाडावयाचें तें वेंगाडलें, मग माघून अभिमान धरण्यांत काय फायदा ? आग लागो माझ्या या जिण्याला ! आणि ती पोरगी तरी कशी पांढऱ्या पायाची जन्मली कोण जाणे ? जेथें जाईल तेथें वांटोळें करील. अपमानाची आग इतक्या दिवसांच्या सवयीनें मी कशी तरी विसरून गेलें होतें; पण हिच्यामुळें फिरून मला त्याचे चटके बसू लागले ! किती बेशरमपणाचें जिणें हें ! ह्यापेक्षां ती पोरगी इकडे न आणलेली बरी ! तेथें तिचें जे व्हावयाचें तें होईल. पण नकोग बाई ! तेथें ती एकटी पोर काय करील ? अजून तिच्या वयाला पुरतीं पंधरा वर्षें देखील झालीं नाहींत ! " अशा प्रकारचीं काकींच्या मनांत विचारांचीं आंदोलनें सारखीं चालू होतीं. कुसुमचें प्रेम एकीकडून त्यांच्या अंतःकरणाला द्रवीत होतें, तर दुसरीकडून त्यांचा स्वाभिमान त्यांना निष्ठुर बनवीत होता. याप्रमाणें प्रेम आणि स्वाभिमान या दोहोंच्या तडाक्यांत त्यांचें मन सांपडून कुसुमला येथें आणावें, कीं न आणावें यासंबंधाचा निश्चित निर्णय त्यांना कांहींच करतां येईना. अशा स्थितींत तिच्यासंबंधाचे विचार मनांत आणून त्या रोज एकांतांत रडून रडून डोळे सुजवीत होत्या.

भाऊसाहेबांनीं विजयाला आणि जोशीबुवांनीं आपल्या मुलाला यासबंधांत जीं पत्रें लिहिलीं होतीं त्यांची त्यांना बिलकूल माहिती नव्हती. भाऊसाहेब अगदीं कमी बोलणारे गृहस्थ होते. यामुळे त्यांच्याकडून ही गोष्ट कोणाला समजली गेली नाहीं; आणि कुसुम येण्याच्याअगोदरच तिच्या येण्यासबंधाची बातमी जर जाहीर झाली तर, न जाणों, मध्यतरींच कांहीं विघ्न उपस्थित होईल, या भीतीने जोशीबुवांनींहि आपल्या पत्राची दाद कोणाला लागूं दिली नाहीं. ते काकींना फक्त इतकेंच म्हणत, " काकी, तुम्ही बिलकूल चिंता करूं नका! परमेश्वराला सगळ्याची काळजी आहे. तो सर्व कांहीं ठीक करील. "

पण याने काकीचे अश्रू थांबले नाहींत किंवा परमेश्वराचा धांवाहि बद पडला नाहीं.

एके दिवशी सकाळी काकी देवघरांत बसून कुसुमच्या चिंतेनेंच अश्रू गाळीत होत्या. इतक्यांत दाराबाहेर टांग्याचा खडखडाट ऐकावयल आला. त्यामुळे घरात एकच गोंधळ उडाला. आगाऊ काहीं खबर नसतांना हा अनपेक्षितपणे कोण पाहुणा आला, याबद्दल घरांतील प्रत्येक माणसाला मोठे आश्चर्य वाटू लागले. मोलकरीण आणि मुले तर एकदम दाराकडे धांवली.

काकींना या गोष्टीची गधवार्ताहि नव्हती. त्या देवाकडे एकाग्रचित्ताने दृष्टि लावून त्याला म्हणत होत्या, " देवा! माझ्या कुसुमची आणि माझी लवकर भेट कर रे ! "

सगळ्यांच्यापुढे चंपी धांवली. तिनें पाहिले, तो टांग्यांत मधुकराशेजारीं एक सुंदर सजीव मूर्ति बसलेली. चपी आश्चर्याने थक्क होऊन आपल्या मनाशी म्हणाली, " इतकी सुदर मुलगी काय माणूस असेल ? "

मधुकर तिच्याकडे पाहून हसून म्हणाला, " चपे, काय बघतेस ? ही आपल्या काकींची भाची कुसुम ! "

आतां चपीच्या जिवांत जीव आला. नाही तर तिला वाटत होतें कीं, ही कुणी राणी आहे, कीं कोणी मडम आहे! पण ही तर आपल्या काकींची भाची एक साधारण पोरगी. जिच्याकरितां एवढीं घरांत भांडणे चालली होतीं ती!

नतर ती मधुकराकडे किंचित नखऱ्याने बघत हांसून म्हणाली, " मधुदादा, ही आपल्या काकींची भाची का ? मला वाटले, आपल्या बाळासाहेबांनीं कोणी झगेवाली मडमच लग्न करून आणली कीं काय ! "

कुसुमचा चेहरा लज्जेनें आरक्त झाला. तिनें चपीकडे एक वेळ तिरप्या दृष्टीनें पाहिले. तिला तिचे रगढग आणि नखरे बिलकुल आवडले नाहींत. यानतर मधुकरानेंच चपीकडे अशा तीव्र दृष्टीनें पाहिलें, की, तिची जीभ वर उचलायची छाती झाली नाही. ती तत्काळ घरात पळून गेली. मधुकराला ती फार चागल्या रीतीनें ओळखीत होती.

चंपी आत गेल्यावर " कोण आलें आहे ग, चपे !" अशा प्रश्नांचा तिजवर सारखा मारा सुरू झाला.

चपी काकीला ही बातमी कळविण्यासाठी त्याच्याकडे लगबगीनें जात होती. तिनें धांवतां धावतांच उत्तर दिलें, " दुसरी कोण असायची! अगांत मडमेसारखा झगा घातलेली काकीची भाची कुसुम. "

तिच्या पाठोपाठ मधुकर आणि त्याच्यामागे कुसुम हीं दोघेहि घरांतल्या अगणांत येऊन पोचली. तीं अगणांत आल्याबरोबर त्यांना मुलानीं चारी बाजूनीं घेरलें.

विलास म्हणाला, " मधुदादा ! तू आलास; पण थोरला दादा कां रे नाही आला ? आतां मात्र दररोज आम्हांला एक गोष्ट सागितली पाहिजेस बर ? "

पडितवर्य बाळोबा म्हणाले, " तीच तीन राक्षसांची गोष्ट बर का ! " विलास त्याला थांबवून म्हणाला, " छट्, ती नको, एखाद्या राजकन्येची गोष्ट सांगितली पाहिजे, दादा ! "

मधुकर दोघांचींही डोकी हलवून हसत हसत म्हणाला, " बरं, सांगेन. तुम्हां दोघांनाहि आवडेल अशीच गोष्ट सांगेन. पण आतां जरा हा गोंधळ बद करा ! तुम्हांला दिसत नाही का, ही तुमच्याकरितां नवी आक्का आणली आहे. हिची ओळख करून घ्या ! हिला फार गोष्टी येतात. "

मुलें तिच्या तोंडाकडे विस्मयानें पहात स्तब्ध राहिलीं.

घरांतल्या स्त्रिया मधुकराला पाहून किंचित लाजल्या आणि पदर सरसावून एकीकडे उभ्या राहिल्या. त्या जणू काय एक प्रकारची मौजच पहातच असल्यासारख्या दिसल्या ! त्याच्यापैकी कोणीहि पुढे होऊन कुसुमचे स्वागत केले नाहीं.

चर्पीच्या थट्टेने कुसुम अगोदरच रुष्ट झाली होती. त्यांतच घरांतल्या स्त्रियाची अशी शिष्टाचारशून्य वागणूक पाहून तर तिला आपले अश्रू थांबविणे अशक्य झाले. ती आपल्या मनांत विचार करू लागली, " मी येथे कशाला आले ? असा अनादर सहन करून मला आपले आयुष्य कसे कंठता येईल ? पदोपदी येथे मला मानहानि सोसावी लागेल ! माझ्याशी मोकळ्या मनाने येथे कोणीहि वागणार नाही. अरे ! पण मावशी कुठे आहे ? "

कुसुमची अवस्था मधुकरापासून छपून राहिली नाहीं. त्याने तिजकडे सात्वनपर दृष्टीने पाहिले. त्या दृष्टीने कुसुमलाहि समाधान झाले. या वेळी तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. पण ते तिने कोणाला दिसू दिले नाहीत. या सर्व सहानुभूतिशून्य वातावरणात एकटा मधुकरच आपला वाली आहे हे पाहून तर तिचे दुःख फारच वाढले. कारण मधुकर झाला तरी परक्याच्या घरांत किती वेळ राहणार ? दिवसभर त्याला कांही राहतां येणे शक्य नाही; आपल्याला अर्थातच दिवसभर अशा प्रकारच्या वातावरणात काळ कंठावा लागेल. या विचाराने कुसुम इतकी गुग होऊन गेली होती, कीं, आपण कोणकिडे जात आहो, काय करीत आहोत याचे तिला बिलकूल भान राहिले नाहीं. इतक्यात एवढा वेळपर्यंत दूर उभी राहून तिजकडे पाहात राहणारी छोटी मनी तिच्याजवळ आली आणि तिचा हात धरून मोठ्या गभीर भावाने म्हणाली, " तू माझी आक्का आहेस बल का ? तू मला गोत्त सागितली पाहिजेस. "

त्या पोरीचे हे गोड भाषण ऐकून कुसुमला महासागरांत बेटच आढळल्यासारखे झाले आणि आनदानें तिच्या डोळ्यांतून प्रभातवायूच्या स्पर्शानें एखाद्या वेलविरून खालीं गळणाऱ्या दवबिंदूप्रमाणे अश्रुबिंदू गळूं लागले. तिच्या साऱ्या विशादपूर्ण विचारांना त्या पोरीनें अगदीं साफ धुवून टाकले.

कुसुमनें पदरानें झटकन् आपले अश्रू पुसले आणि फिरून एक वेळ मधुकराकडे करुणापूर्ण मधुर दृष्टीने पाहिले. आतां मधुकराच्याहि जिवांत जीव आला. तो तिजकडे पाहून त्या पोरीला उद्देशून म्हणाला, " ही आमची मनुताई आहे बर का ! "

कुसुम मनूला घेईल या भीतीने माईसाहेब तेथे घाईने आल्या. पण त्यांच्यापूर्वीच कुसुमने तिला उचलून आपल्या कडेवर घेतले होते. हा प्रकार पाहून माईसाहेब जागच्या जागीच मुकाट्याने उभ्या राहिल्या. कुसुम तिला नमस्कार करण्यासाठीं पुढे सरसावली; तोंच एखाद्या कृष्ण सर्पास पाहून जसे दूर व्हावे, त्याप्रमाणें माईसाहेब दूर झाल्या आणि मनूला उद्देशून म्हणाल्या, " मनू ! उतर खाली. नाचत नाचत जाऊन कोणाच्या कडेवर बसलीस ? जा तिकडे. चपीकडे जा आणि परकर सोडून तिजजवळ धुवायला दे ! उतरतेस की नाही खालीं ? "

हा प्रकार पाहून मधुकर चकित झाला; तथापि तिला काकीच्या स्वाधीन केले म्हणजे गंगेत घोडे न्हाले असा विचार करून तो माईसाहेबांना म्हणाला, " माईसाहेब ! काकी कोठे दिसत नाहींत ? "

कुसुमला येथे आणण्यांत काकीचीच कारवाई आहे असे माईसाहेबांना पक्के वाटत होते; आणि म्हणून त्या मनातल्या मनांत तिजविरुद्ध जळत होत्या. मधुकराचा वरील प्रश्न ऐकून त्या अगदी कठोर स्वराने म्हणाल्या, " कोणाला ठाऊक तुझी काकी कोठे आहे ती ! "

तथापि मधुकराने तिच्या कोपाकडे दुर्लक्ष करून विनम्रपणे म्हटले, " देवघरात असतील का ? "

इतक्यांत त्यांच्याजवळ उभी असलेली दासी म्हणाली, " हो असतील तेथे "

तिचे भाषण ऐकून मधुकर तिलाच उद्देशून म्हणाला, " मग तूंच त्यांना इकडे पाठवून दे ! मी तोपर्यंत माईसाहेबांशीं थोडेसे बोलतो. बाळासाहेबांनीं त्यांना कांहीं निरोप सांगितला आहे. "

दासीने एक वेळ कुसुमकडे पाहिले. या मडमेसारखा अंगांत पोलकें घातलेल्या पोरीशीं कशा रीतीनें बोलावें याची तिला नीटशी कल्पना

होईना. त्या वेळीं तिनें तिला मानेनेंच आपल्याबरोबर चल म्हणून इशारा केला.

तो प्रकार पाहून माईसाहेब अगदीं सतापून म्हणाल्या, " चल सटवे, तिला का देवघरांत घेऊन जातेस ? "

दासी किंकर्तव्यमूढ होऊन कुसुम आणि मधुकर याजकडे पाहात राहिली. मधुकर हसून म्हणाला, " ती जर देवघरांत गेली तर काय होईल ? "

माई०:—( विस्मयानें ) देवघरांत गेली तर काय होईल ? वाटेल त्या जातीच्या माणसाने देवघरांत जावे ?

मधु०:—ती कांहीं दुसऱ्या जातीची नाहीं. तुमच्याच जावेच्या बहिणीची मुलगी आहे.

माई०:—माझ्या जावेच्या बहिणीची मुलगी असली म्हणून काय झालें ? किरिस्ताव बनल्यासारखी तर दिसते. ब्राह्मणांच्या पोरी का असे अगांत झगे घालतात ?

कुसुमची चर्या लज्जा आणि अपमान यांनीं अगदी आरक्त होऊन गेली.

मधुः—माईसाहेब, हा झगा नव्हे. ह्याला पोलके म्हणतात. आपल्या इकडे मोगलाईंत नाहीं, पण तिकडे इंग्रजी हद्दींत आणि विशेषतः शहरांतून तर दरोबस्त ब्राह्मण मुली असे पोलके घालतात. पुण्यांत-तर बायकांचा हा नित्याचा पोषाखच होऊन बसला आहे. शिवाय अशा पोषाखाच्या हवेनें उडून जावयाला जात म्हणजे कांही कापराची वडी नव्हे. आणि जर पोषाखाने जात जात असेल, तर पोषाख घालणाऱ्या आपल्या मनूची जात कधींच गेली आहे असे म्हटले पाहिजे.

माई०:—एकादें कुकुले बाळ आणि वयांत आलेली पोर हीं सारखींच का ?

मधु०:—( हंसून ) तुमचे जातिभेदाचे विचार फार तीव्र आहेत हें मला ठाऊक आहे. पण तुमच्या घरचे देवही जातीचा विचार करतात हें ऐकून मला जरा आश्चर्य वाटतें. ते काय तुमच्यासारख्या सोवळ्या लोकांचेच देव आहेत, आणि इतरांचे नाहींत ? मग तुम्ही देवाला पतित-पावन कसें म्हणतां ?

मधुकराच्या या निरुत्तर कोटिक्रमाने माईसाहेब अगदीं चिडून म्हणाल्या, " देव पतितपावन झाला म्हणून काय मुसलमान, किरिस्तांवहि देवघरात घुसून त्याची पूजा करील ? तुम्ही खुशाल एखाद्या माहराबरोबर जेवा ! पण आम्ही आपली जातपात सोडायला कांहीं तयार नाहीं, बाबा ! तू कॉलेजात जाऊन हेंच शिकलास कारे ? ओवळ्यांतल्या एखाद्या ब्राह्मणानेसुद्धां देवाला शिवू नये म्हणतात ते काय म्हणून ? "

मधु०:—हे शास्त्र मला काही ठाऊक नाही बोवा. पण मथुरा, काशी, वगैरे ठिकाणीं पाहिले, तर तेथच्या देवाचा पुजारी कोऱ्या कपड्यानेही देवाची पूजा करीत असल्याचे सर्वांना ठाऊक आहे.

माई०:—( चिडून )–क्षेत्रांवरच्या पुजाऱ्यांची गोष्ट निराळी आहे. त्यांची आमची बरोबरी नाही. तू इतका शहाणा कधीपासून झालास, मधुकर ? जोशीबुवांच्या घराण्याचे नाव चांगले राखशील बाबा " !

मधुकराने पाहिले कीं, आता अधिक वादविवाद करण्यात कांही हशील नाही. तो हसून म्हणाला, " पण माझ्यापेक्षाही बाळासाहेब अधिक शहाणा झाला असेल नाहीं, माईसाहेब ! पण हे जाऊ द्या. कुसुम अजून बालिका आहे. तुमच्या दृष्टीनें ती जर पतित झाली असली, तर तिला शेण, गोमूत्र वगैरे पाजून शुद्ध करा ! यामुळे तुमचे नावही होईल व तुम्हाला पुण्यहि लागेल. आता तिची सर्व जबाबदारी तुम्ही आपल्या शिरावर घेतली पाहिजे. काकी तिला आणायला अगदी नाखूष होत्या. पण ती तुमची कीर्ति ऐकून इकडे आली. "

आतां मात्र मधुकराचा नेम बरोबर लागला. त्याच्या भाषणाने माईसाहेब अगदीं खुष होऊन म्हणाल्या, " मग तुला काय वाटते, मी तिला दूर ढकलून देईन ? ती माझ्या घरीं आलीच आहे, तर मला तिचा साभाळ केलाच पाहिजे. "

नंतर खुद्द कुसुमला उद्देशून माईसाहेब म्हणाल्या, " हे बघ मुली! तुझा पहिला सगळा अनाचार तुला सोडून द्यायला पाहिजे. छे ! हा काय पेहेराव ? विधवा बायकोला काय कोठें असा पोषाख आणि असला नट्टापट्टा शोभतो काय ? अरे ! बिचारी केव्हांची येऊन उभी राहिली आहे, अजून काकींचा पत्ता नाहीं, याला काय म्हणावें ? काकी ! अहो काकी !"

कुसुमाच्या आगमनाची वार्ता काकींना नुकतीच कळली होती आणि त्या उठावयाच्या विचारांत होत्याच. इतक्यांत चपी तेथे धांवत धांवत येऊन कर्कशस्वराने म्हणाली, " काकी ! ती तुमची मडम बनलेली भाची आली ना. चलां, चलां. "

काकी तिच्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष न देतां फिरून ईश्वराचें ध्यान करीत राहिल्या.

चपी तेथून सतापाने परत फिरली. इतक्यांत माईसाहेबांनीं तिला विचारले, " अग, काकी कुठे आहेत ? "

चपीः—देवघरांत डोळे झांकून बसल्या आहेत. त्याची भाची आली म्हणून सांगितले; पण त्या बोलल्या देखील नाहीत. "

माईसाहेब देवघराजवळ जाऊन म्हणाल्या, " काकी ! "

काकी देवाला प्रणाम करून अश्रुभरित लोचनांनीं माईसाहेबांजवळ येऊन उभ्या राहिल्या.

त्यांची ती करुण मूर्ति पाहून माईसाहेबांचे मन द्रवले, आणि त्या कोमल स्वराने म्हणाल्या, " काकी, उगीच का रडता ? बिचाऱ्या पोरीची आई वगैरे सगळे काही गोत नाहीसे होऊन ही अनाथ झाली आहे. तिला आपण आश्रय द्यायचा नाही तर कोणी द्यायचा ? या ! तिला पोटाशी धरा. "

मोठ्या कष्टाने आपला शोकावेग आवरून काकी म्हणाल्या, " माईसाहेब, मी या देवाकडे तोंड करून सांगते की, मी कांही तिला इकडे बोलाविले नाही. तिच्या येण्याची मला नुसती बातमी देखील नव्हती. ती तुमच्याच आश्रयाच्या आशेने आली आहे आणि तिची माय, मावशी सगळे कांहीं तुम्ही आहांत ! तुम्हीच तिचा आतां सांभाळ करा ! "

या भाषणाने माईसाहेब अगदीं संतुष्ट होऊन म्हणाल्या, " अहो, मी तर सांभाळीनच; पण तुम्ही जरा तिच्याजवळ तरी या. पण हें मात्र मी तुम्हांला बजावून सांगतें, काकी ! तिच्या सोंवळ्याओंवळ्याचा अनाचार माझ्या घरांत चालावयाचा नाहीं ! "

काकी थोड्याशा पुढें सरकल्या, तों मधुकराच्या पाठीमागें एक रूपवती बालिका उभी असलेली त्यांना दिसली. काकीची आणि भाचीची साऱ्या जन्मांत ही प्रथमच भेट. किती सुदर पोरगी ! काय तो सोनचांफ्या-सारख्या अगाचा वर्ण, गुलाबासारखे टवटवीत गाल, आणि ललाटावर विहरणारे काळ्या रेशमासारखे मऊ आणि चमकदार कुरळ केस. इतक्या सौंदर्याला ती नेसलेली गुलाबी रेशमी साडी आणि अस्मानी पोलके किती तरी खुलून दिसत होते.

पण तिच्या सौंदर्याने काकीच्या मनाला आनद न होतां उलट त्यांचे मन असतुष्ट झाले. त्या आपल्या मनाशी म्हणाल्या, " अनाथ गरीब विधवेला इतके रूप काय कामाचें ? आणि हा पोषाकाचा तरी इतका नखरा कशाला ? "

आपल्या रूपाबद्दल कुसुम बिलकूल जबाबदार नव्हती किंवा तिच्या पोषखाबद्दलचीही जबाबदारी तिच्याकडे येत नव्हती. पण या गोष्टीचा काकींनीं लवमात्रही विचार केला नाहीं. तिच्या अगांतली साडी आणि पोलकें हे तिच्या वडिलानींच आपल्या एकुलत्या एका मुलीसाठीं घेतले होतें; आणि ती हिंदुसमाजांतील विधवा बनणार आहे हे जाणून देखील विधात्यानें तिला सौंदर्यदान करण्याच्या बाबतींत बिलकूल कृपणपणा केला नव्हता. आपल्या सौंदर्यानें आणि वेषानें कोणाला हर्षविषाद होत असेल याची तर बिचाऱ्या कुसुमला कल्पनाहि नव्हती.

मधुकराने प्रथम काकीला प्रणाम केला. नतर कुसुमने तिच्या पायां-वर डोकें ठेवले. पण ही क्रिया तिने लांबूनच केली; तिने तिच्या पायाला स्पर्श केला नाहीं. कारण आपण त्यांच्या पायाला स्पर्श करायला गेलो, तर मघां माईसाहेबांच्या वेळीं झाला तसाच अपमान आतां व्हावयाचा असे तिला वाटलें. पण तिच्या या वेळच्या वर्तनाचा काकींच्या मनावर निराळाच परि-णाम झाला. त्यांना ती मोठी आढ्यताखोर दिसली आणि त्या तिला मोठ्या रुक्षस्वरानें म्हणाल्या, " चल इकडे ये, ! "

# प्रकरण ८ वें.

## माईसाहेबांच्या घरीं आगमन !

कुसुम काकींच्या खोलीत गेल्यावर त्यांना म्हणाली, " मावशी, मला एखादे 'अडवण' देग ! "

काकीः—ते कशाला ? न्हातेस काय ?

कुसुमः—होय. न्हायाची जागा कुठे आहे ?

काकीः—हे का पुणे आहे का ? कीं, खोलीत नळ आणि मोऱ्या असावयाच्या ! पाठीमागच्या बाजूला न्हाणीघर आहे, तेथे सगळी व्यवस्था आहे. मात्र पाणी तापवावे लागेल.

कुसुमः—मला ते न्हाणीघर दाखीव, म्हणजे मी पाणी तापविते.

काकी मोठ्या जोराने मान हालवून म्हणाली, " छे,छे, असे चालावयाचें नाहीं. हे जहागिरदाराचे घर आहे. त्याच्या येथे पाहुण्याने निदान पहिल्या दिवशीं तरी अशी हलकीसलकी कामे हाताने करून चालावयाचे नाही. उगीच तुझ्यामुळे पोरी, मला खालीं मा■ घालावयाचा प्रसग आणू नकोस ?

त्यांच्या बोलण्याने कुसुमला अनावर हसे कोसळले; पण तिने ते मोठ्या शर्थीने दाबले. ती म्हणाली, " बरं तर, तू कोणाकडूनही पाणी तापवून घे ! पण एकदा माझ्या न्हाण्याची व्यवस्था कर ! "

काकीः—बर, मी सांगते कोणाला तरी पाणी तापवायला.

कुसुमः—णप मावशी, न्हाणे झाल्यावर नेसायचें कायग ?

काकीः—तुझ्या पेटीमध्ये तुझीं लुगडी असतील ना ?

कुसुमः—आहेत. पण तीं मोठमोठ्या रेशमी काठाचीं आहेत. तीं आतां मला नेसावयाचीं नाहींत.

तिचें हे भाषण ऐकून काकी अगदीं खूष झाल्या. त्या म्हणाल्या, " बरें तर, मी तुला साधे लुगडें किंवा पांढरें पातळ नेसावला देईन. "

कुसुमनें आपल्या अंगांतले रेशमी पोलके आणि नेसलेली रेशमी साडी हीं दोन्हीं आपल्या पेटींत व्यवस्थेनें ठेवन दिलीं.

थोड्याच वेळांत तिचे न्हाणे आटोपले आणि हिंदु विधवेच्या पद्ध-तीस अनुसरून तिने अगदी साधा वेष परिधान केला. पण त्या वेषांत देखील ती कितीतरी सुंदर दिसू लागली. 'जातीच्या सुंदरांना कांहींही शोभतें,' हीच गोष्ट खरी.

तिचे हे सर्व विधी आटोपल्यावर काकी तिला म्हणाल्या, "जा आता, माईसाहेबांजवळ जाऊन बैस जा! नेहमीं त्यांच्याजवळच राहून त्यांचे मन खूष होण्याचा प्रयत्न करीत जा."

माईसाहेब नुकतेच भोजन आटोपून पलंगावर पडल्या होत्या. चंपी आणि दुसरी एक दासी त्यांचे पाय दाबीत होत्या. खोलीच्या एक बाजूस विलास आणि मनू 'अचकन् मचकन्' चा खेळ खेळत होती. माई-साहेब हसतमुखानें त्यांच्या त्या अर्थहीन खेळाकडे निजल्या निजल्या पाहात होत्या. इतक्यात कुसुम तेथे आली. तिच्याकडे पाहून माईसाहेबांनी जरा नाक मुरडले. कुसुम हतप्रभ होऊन खालीं जमिनीकडे पाहात जागच्या जागी उभी राहिली. तथापि थोड्या वेळाने तो अपमान गिळून पलंगावर दासी बसल्या होत्या त्या बाजूकडे जाऊन त्यांचे पाय दाबण्याचा ती प्रयत्न करू लागली. त्याबरोबर ह, हि, ह म्हणत माईसाहेब पलंगावर उठून बसल्या. कुसुम अगदीं शरमिंधी होऊन गेली!

माईसाहेब म्हणाल्या, "तुझ्या अंगावरच्या कपड्यांनीं घरांत कोणाला शिवावयाचे नाही बरं!"

कुसुम विनम्रपणे म्हणाली, "माझ्या अंगावरले कपडे माझे नाहींत. मावशींचे आहेत. मी न्हाऊन तिचे हे पातळ नेसले आहे."

माई०:—मावशीचे पातळ नेसलीस म्हणून काय झाले? ही अंगांतली चोळी नाहीं का तुझी? आगगाडीतली चोळी अशी न धुतां घालावयाची नाहीं.

कुसुमची फार विलक्षणच अवस्था होऊन गेली. तिच्याने तेथें बसवेना व जाववेनाही. तथापि ती थोडा वेळ तेथे गुपचूप उभी राहिली आणि नंतर जशी आली होती तशीच हळूहळू निघून गेली.

माईसाहेब निजल्या होत्या त्याच्यापलीकडच्याच खोलींत बाळो-बाची आई रमा, मनिकार्णिका वगैरे जहागीरदारसाहेबांच्या आश्रयाला

असलेल्या स्त्रिया सोंगट्या खेळत बसल्या होत्या. या सर्व स्त्रिया त्यांच्या नातलगांपैकीच होत्या. कोणी जवळच्या, तर कोणी लांबच्या. त्यापैकीं तिघी सधवा होत्या; चवथी यमुना मात्र विधवा होती. या अनाथ विधवेला भाऊसाहेबानी ती त्यांची फारशी जवळची नातलग नसतांनाही मोठ्या कनवाळूपणें आपल्या घरांत आश्रय दिला होता. पण ही गोष्ट माईसाहेबांना फारशी पसंत पडली नाहीं. त्यानी अश्रूचे पाट वाहविले; पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. पुढे हळूहळू संवयीनें म्हणा, की, नाइलाजानें म्हणा, त्याचा तो विरोधी भावही कमी होत गेला. पण विजयाच्या डोळ्यांत मात्र ती विधवा अगदीं खड्यासारखी सलत होती !

भाऊसाहेबाच्या आश्रयाला असलेल्या स्त्रियापैकी कोणी माईसाहेबाच्या, तर कोणी त्याच्या मृत सवतीच्या नात्यातल्या होत्या. त्यांपैकी कोणाचे पतिराज जहागीरदाराच्या येथे गुमास्ते होते, तर कोणी कोठल्या गांवचे उत्पन्नशून्य देशपाडे, तर कोणी कुठल्या भिकार गावचे कुलकर्णी होते. ते तिकडे एकएकटे राहून मजा उडवीत होते, तर इकडे जहागीरदाराच्या घरात त्याच्या बायकाही रग उडवीत होत्या. त्याचा सर्व दिवस चकाट्या पिटण्यात, सोंगट्या खेळण्यात किंवा दुसऱ्या बायकाची निंदा करण्यात जात होता. कुसुम त्याच्या खोलीजवळून जाऊ लागली, तेव्हा रमा म्हणाली, " अग ए यमुने ! त्या पोरीला जरा इकडे बोलीव बरे ! "

यमुना मोठ्याने ओरडली, " अग ए कुसुम ! जरा आम्हां गरिबांचाही समाचार घे की ? "

सोज्वल चंद्रकिरणांप्रमाणे आपल्या सौंदर्याची छटा फेकीत फेकीत कुसुम हुसगतीन त्यांच्या खोलीत आली. ती आत येतांच त्यांनी आपला डाव क्षणभर थांबविला, आणि सर्वजणी तिच्या तोंडाकडे एकसारख्या टक लावून पाहू लागल्या.

खुळ्यासारख्या सगळ्या जणी आपल्या तोंडाकडेच पाहात असलेल्या पाहून कुसुमला हसें आले. ती म्हणाली, चालू द्या. तुम्ही खेळणें कां बंद ठेवले ? मला लाजलांत काय ! मी तुमच्यापैकींच एक आहे. "

पण यावर कोणी कांहीं बोललें नाहीं. फक्त यमुना तिला बर म्हणून म्हणाली.

कुसुम तेथें जमिनीवरच बसूं लागली. यमुना म्हणाली, " खालीं कां बसतेस ? गालीच्यावर बैस ! "

कुसुमः—( हसत ) नको, मी आपली लांबच बरी ! किरिस्ताविनि तुमच्याजवळ आल्याने तुम्हांला विटाळ नाहीं का व्हायचा !

कुसुमच्या या उपरोधिक भाषणानें यमुना जरा लाजून म्हणाली, " नाही, नाहीं, तू गालीच्यावर बसण्याने आम्हांला विटाळ व्हायचा नाही. शास्त्रांत लिहिलें आहे की, बाजारांत, नावेत, हत्तीच्या पाठीवर, त्याचप्रमाणे मोठ्या आसनावरहि बसण्यांत विटाळाचा दोष नाही. "

कुसुमः—आपल्याला शास्त्राची चर्चा कशाला पाहिजे ? मी आपली लांब बसलेलीच बरी ! लांबूनहि मला तुमचा खेळ पाहता येईल.

रमाः—आणि तू खेळत नाहींस काय ?

कुसुमः—मला खेळतां येत नाही.

रमाः—फक्त लिहायला आणि वाचायलाच तेवढे येतें ?

कुसुमः— हो. मी तेवढेच शिकले आहे. तुम्ही मला खेळायचें शिकवाल तर तेही मी शिकेन.

इतक्यांत बाळोबाची आई मनकर्णिकेच्या कानांत पण कुसुमला ऐकायला जाईल इतक्या स्पष्ट आवाजाने म्हणाली, " केवढा बेशरमपणा हा ! बायको असून लिहावाचायला शिकली आणि ही गोष्ट सगळ्यांच्यापुढें एवढ्या तोऱ्याने सांगत आहे. यामुळेच तर अशी अवदसा बनून बसली; आणि अन्नासाठींही दारोदार फिरायला लागली. इतका अनाचार भगवानाला तरी कसा सहन व्हावा ! तिला गाणे गायला येतें का विचारा. "

कुसुम हंसून म्हणाली, " तुम्हीच कां विचारीत नाहीं ? माझ्या व तुमच्या वयांत फारसा फरक नाहीं. माझ्याशीं बोलावययाला तुम्हांला इतकी शरम वाटण्याची जरूर काय ? "

बाळोबाची आई म्हणाली, " मी इतकी निलाजरी आहे काय ? "

हा अप्रिय प्रसग पुढें न चालावा म्हणून मनकर्णिका म्हणाली, " खरोखरच तुला गाणें येतें काय ? "

बाळोबाच्या आईच्या हलकट भाषणाने कुसुमच्या मुखावरील मधुर हास्य पार नाहीसे झाले होतें. ती म्हणाली, " मी गाणे तर कांही जाणत नाही, पण थोडेबहुत गुणगुणते मात्र. "

रमा गालांवर हात ठेवून व भिवया किंचित् वर चढवून म्हणाली, " अगबाई, पक्की किरिस्तावीण दिसते ग ! "

कुसुमः— मी किरिस्तावीण कशी ? तुम्ही नाही का गाणे गात ?

रमाः—( गाल फुगवून ) एखाद्या मंगल प्रसंगी किंवा एखाद्या समारंभाचे वेळीं पुष्कळ बायका जमल्या म्हणजे सगळ्या जणींनी मिळून गाणे म्हणणे निराळे आणि तुजसारखे एकटे गात बसणे निराळे. खरं सांग, तुम्ही शिकलेल्या बायका पुरुषांच्या गळ्यांत हात घालून नाचतां का ग ?

हा हलकटपणा कुसुमला अगदी असह्य झाला. संतापानें तिची चर्या लाल झाली, आणि यानंतर एक क्षणभरहि तेथे न थांबतां ती निघून गेली.

पण ती खोलीच्याबाहेर पडते न पडते तोंच सगळ्या जणी खो खो करून हसूं लागल्या. जणू काय साऱ्या जन्मांत त्यांना अशी गंमत पाहावयाला मिळाली नव्हती.

बाळोबाची आई म्हणाली, " फार लायक पोरगी आहे. घमेंड तर केवढी ? "

रमाः—रूपाची मात्र घमेंड आहे बाई ! दंडाचा रंग दिसावा म्हणून चोळी तरी किती आंखूड घालते ?

यमुनाः—रूपामुळें तर येथे यायला सांपडले ! अशा बायकांची किंमत रूपावरच असते.

सुंदर रमणीच्या मुखाची जादू आपल्या सभोंवतालच्या जगाला छडी मारून जागृत करीत असते. कुसुमच्या अनुपम रूपाने या सामान्य स्त्रियांची मत्सराने अगदीं आग झाली होती. त्या सौंदर्यवतीने रूपाच्या बाबतींत केलेला त्यांचा पराजय त्यांना खाली मान घालावयाला लावीत होता. यामुळे तिला कोणत्याही रीतीनें वाईट ठरविण्याचा प्रयत्न चालला होता. रमा मात्र त्या स्त्रियांत चांगली सुंदर असल्यामुळे कुसुमच्या सौंदर्याचा

तिला मत्सर वाटला नाही. ती म्हणाली, " तुम्ही काहीं म्हणा, परतु ती अप्रतिम रुपवती आहे यांत बिलकूल शका नाहीं. इतका गोरेपणा आणि इतके नीटनेटके अवयव माझ्या पहाण्यांत नाहीत. कठांत पीक दिसल इतकी तर नाजूक आहे."

पण तिची ही यथार्थ प्रशसा बाळोबाच्या आईला अगदी असह्य होऊन ती म्हणाली, " चल जा! मोठी आली आहे तारीफ करणारी. तोडाला पावडर लाविली असेल. मी मागे भाऊसाहेबांबरोबर मुबईला गेल होते आणि तेथ एक नाटक पाहिले. त्यावेळी बायकाची सोंग घेतलेली तीं पोरे अशी कांही एकाहून एक खुपसुरत दिसत होती, की, ज्याचे नांव ते. पण एरव्हीं तीच पोरे कोळशाच्या राशीत टाकली तरी ओळखू यावयाची नाहीत. कुणाला असे वाटणार नाही, की, रात्री सोंग घेतलेली पोरें हींच असावीत. हाच प्रकार हिचा."

पण रमेनें तिचे बोलणे थांबवून म्हटले, "हिचे काय तसे आहे? ही भरादिवसां तुमच्यासमोर आलेली आहे. बरं, समजा, अगाचा गोरेपणा बनावट असेल; पण नाकाडोळ्यांची घडण तर तशी नाही? तिचा प्रत्येक अवयव किती डौलदार आणि रेखीव आहे?"

बाळोबाची आई नाक फेदारून म्हणाली, "कसला मातीचा रेखीव? एखाद्या कलावतिणीसारखा नट्टापट्टा केल्यावर कोणीहि असे दिसेल. आम्ही नाहीं का दिसणार?"

यमुनाः—रमा! तिच्या अगी एवढा रेखीवपणा तुला कोठें दिसला? ते मेले डोळे काय मारक्या बैलासारखे, सदा वांसलेले.

मनिक०:— आणि ते मेलं नाक काय? एखाद्या वाश्यासारख भल लांबच लांब.

बाळोबाची आई हंसून म्हणाली, "खोटे नाहीं. शिवाय गोरा रग सगळे आयब झांकून टाकतो म्हणतात.

या वादविवादाचा बहुमताने अखेर असा निकाल लागला, कीं, कुसुमचा गोरेपणा बनावट आहे. तिच्या अवयवांतही रेखीवपणा किंवा डौलदारपणा बिलकूल नाहीं.

हा प्रसंग टाळावा म्हणून रमा म्हणाली, "हे जाऊ द्या मेल ! पण एक दिवस तिचें आपण गाणें ऐकलें पाहिजे. कशी गाते हे तर पाहू."

बाळोबाची आई म्हणाली, "अ! त्यांत काय मेल एवढ मोठ आहे. ती त्यासाठीं एका पायावर तयार आहे. आत्तां तिला म्हटलं तर ती गाणे म्हणेल. जा, कुणी तिला बोलावून आणा !"

रमाः— आतां यावेळी ती यायची नाही. आपल्याला आजच आणि अत्तांच तिचे गाणे ऐकायचे असेल तर आपण तिच्याकडे गेलेले बरे !

बाळोबाची आई म्हणाली, "आणि तेथ काकी असल्या तर ?"

रमाः— या वेळेला काकी तेथ कोठून असणार? या वेळी त्या देवाची पूजा करीत बसल्या असतील किंवा स्वतःच्या फराळाचे तयार करीत असतील.

रमेची सूचना सर्वानुमते पास होऊन त्या सगळ्या जणी तिचा शोध करीत निघाल्या. कुसुम आपल्या खोलीत जाऊन निजली होती. तिच्या मनांत निजल्या निजल्या त्या हलकट स्त्रियांच्या घोळक्याविषयींचेच विचार घोळत होते; पण त्याच सगळ्या जणी समोर येऊन उभ्या राहिल्याबरोबर ती चटकन् उठून बसली. त्यांच्याशी बोलणेच काय, पण त्यांना पहाणे देखील तिला पाप वाटू लागले.

रमाः—कुसुम! तू आमच्यावर रागावून आलीस म्हणून आम्ही सगळ्या जणी तुझी माफी मागण्याकरितां आल्या आहोत.

कुसुमः—हे काय बोलतां असे! माफी काय मागावयाची? आणि मी तुमच्यावर रागावलेही नाही.

रमाः—तू आमच्यावर रागावली नाहीस, तर मग एक गाणे म्हण पाहू! म्हणजे मग आम्हांला कळून येईल, की, आमच्यावर तूं खरोखरीच रागावली नाहींस.

कुसुम मोठ्या पचाइतींत पडली. त्या बायकांपुढें गाणे म्हणायला तिचें मन बिलकूल राजी नव्हते; पण जर न म्हणावे तर आपण त्यांच्या-वर रागावलो आहोत हे त्यांना दिसून येईल. मग थोडासा विचार करून ती त्यांना म्हणाली, "माझं गाण तुम्हांला आवडायचं नाहीं आणि उगीच तुम्ही सगळ्या जणी मला हंसाल."

रमाः——नाहीं नाहीं; आम्ही बिलकूल हंसणार नाहीं. तुला गाणें म्हटलेंच पाहिजे.

कुसुम जराशी लाजून आणि चिडून म्हणाली, "नका बाई! यावेळीं असा मला भलता आग्रह करूं नका. पलीकडच्या खोलींत माईसाहेब आहेत. शिवाय मावशीही इतक्यांत येथें येतील. त्यांनीं ऐकलें तर त्या काय म्हणतील ? "

रमाः——ही अशी लटपटपची नाहीं चालायची ? तू कांहीं तरी सबब सांगून निसटावयाला पहातेस ! पण आम्ही अशानें ऐकणार नाहीं. मावशी येथें तीन वाजेपर्यंत मुळींच येणार नाहींत. त्यांचा तोपर्यंत फराळच आटपावयाचा नाहीं; आणि माईसाहेब तर या वेळेस स्वस्थ घोरत पडल्या आहेत. तुला पाहिजे तर आम्ही खोलीचें दारहि लावून घेतों; आणि हळूं गाणें म्हटलेस तर दाराच्याबाहेर देखील ते ऐकायला जाणार नाहीं.

कुसुमचा त्या घरांत पाऊल ठेवलेला आज पहिलाच दिवस, आणि त्या स्त्रिया म्हणजे जुन्या वतनदार. कुसुम घरांत आली त्यावेळीं त्यांच्यापैकीं कोणी तिची वास्तपुस्त केली नाही नाही, कीं, ती कोण आहे, काय आहे याची चौकशीहि केली नाहीं. पण अशा स्थितींत थोडा वेळ लोटला नाहीं तोंच तिच्याजवळ त्या एकदम येऊन तिला गाणें गा म्हणून आग्रह करूं लागल्या. यांत आपली चेष्टाच करण्याचा त्यांचा हेतु असला पाहिजे, असें कुसुमला वाटलें आणि काय वाटेल तें झालें तरी गाणें म्हणूच नये, असें तिचें मन तिला सांगूं लागलें. परतु त्यांचा आग्रहहि तिच्यानें मोडवेना. अखेर थोडा वेळ विचार करून ती म्हणाली, " तुम्ही म्हणतां, तर एक गाणें गातें; पण फिरून तुम्ही मला असा आग्रह करूं नये. "

यमुनाः——सध्यां एक तरी म्हणून दाखीव. मग आम्ही आग्रह करण्याची किंवा न करण्याची गोष्ट पुढची आहे.

यातंतर कुसुमने पुढील गाणें म्हणावयास सुरुवात केलीः——

" अजि हौस जिजीची पुरवा "

या तिच्या गाण्याने त्या सगळ्या जणी अगदी मुग्ध झाल्या. तिच्या कंपमय आणि मधुर आवाजाने खोलीतले सर्व वातावरण निनादित झाले.

त्या बायकांना भानावर यावयाला बराच वेळ लागला. कांहीं वेळाने मणिकर्णिका म्हणाली, " किती तरी सुदर गाणें ! "

नतर एकेकीचे तोंड उघडू लागले. रमा म्हणाली, " गाणे ठीक आहे. आवाजही उत्कृष्ट आहे; पण यापेक्षां दुसरे एखादे म्हटले असते, तर बरे झाले असते. बालगधर्वाच्या तोंडचे " नाहीं मी बोलत नाथा " असें असे एखादे गाणे म्हण. "

बाळोबाची आई म्हणाली, " पण त्यापेक्षा मी म्हणतें, सौभद्र नाटकांतले ते कृष्णाच्या तोंडचे पद म्हटले तर बरे होईल. मी हैद्राबादला ते नाटक पाहिले. "

मनीः—कोणचे ग ? ' नच सुदरि करुं कोपा । मजवरी धरी अनुकंपा ' हेच ना !

बाळोबाची आई म्हणाली, " हो, हेच ! "

यमूः—किंवा कुठवरी वाट पाहूं माथ्यावर चद्र किरे ढळला । सखे बाई येण्याचा वखत की हो टळला ॥ ' हे म्हटले तर विशेष बहार होईल.

बाळोबाची आईः—हे गाणे कोठे ग तूं ऐकले होतेस ?

यमुनाः—अग, गेल्या वर्षी भाऊसाहेबांच्या भाचीचे लग्न: झालें नाहीं का ? त्यावेळीं पुण्याची एक गाणारीण आणली होती, तिनेंच हें म्हटले होतें.

मणि०ः—आणि त्या वेळीं आम्ही कोठें गेलो होतो ?

यमुनाः—तुम्ही मिरवण्याआरवण्यांत दग झालां होतां. आमच्या-सारख्यांला थोडेच कोठे मिरवायला जायचे आहे !

बाळोबाची आईः—हेच हेच म्हण गडे.

कुसुम अगदीं संतापून म्हणाली, " मला असलीं हलकट गाणीं मुळींच येत नाहींत. "

रमाः—बरें, तुला जे येत असेल तें म्हण !

कुसुमः—(निश्चयी स्वराने) मी एकच गाणें म्हणेन म्हणून तुम्हांला अगोदरच बजावून ठेवले होते.

यमुनाः—भिष्मासारखी प्रतिज्ञा केलीस काय ?

मणि०:—एखाद्या माणसाच्या अगी एखादा गुण असला म्हणजे ते भारीस चढून जाते.

बाळोबाची आईः—पण एवढा मोठा बालगधर्व, त्याला कितीही वेळां वन्समोअर झाले, तरी तो पुनः म्हणतोच.

यमुनाः—आणखी पुण्याच्या नायकिणी तरी काय ! तिला जे गाणें म्हणायला लावावे ते ती म्हणत होती. बिचारीकडून त्या दिवशी किती तरी गाणी म्हणवून घेतली !

बाळोबाची आईः—मी तिला पाहिले होते खरे ! अगदीं थेट या कुसुमसारखी दिसत होती, नाही ? अगदी हिच्यासारखेच गुलाबी गाल, गालावरचा तीळ देखील हिच्यासारखाच. खरं की नाहीग, यमुने ?

या हलकटपणाने कुसुमच्या तळपायाची आग मस्तकाला गेली आणि त्या भरांत ती ताबडतोब तेथून उठून खोलीच्या बाहेर निघून गेली.

त्या बायकानी तिला पुष्कळ हाका मारल्या. पण तिने मागे वळून देखील पाहिले नाही. तिचा हा निश्चय पाहून बाळोबाची आई म्हणाली, "केवढा तरी मेलीचा दिमाख ! ही एखाद्या जहागीरदाराची बायको असती, तर धरणिला पाय लागला नसता !

यमुनाः—म्हण आहेना, 'चंचल नार छिपे न छिपाये !' देशपांड्यांची तारा तुला माहित आहेना ? अशीच नखरेबाज होती. पण पुण्यांत शिकायला म्हणून गेली आणि चिकटली तेथल्या वकीलाला. आतां त्यांच्या घरांत मोठ्या थाटांत असते. जरा नाकावर माशीसुद्धां बसूं देत नव्हतीं. जणूं काय सीता, दमयतीच !

बाळोबाची आईः—मी परवां काणाच्या कीं तोंडून ऐकले आहे, तिला कांहीं महिने लोटले आहेत म्हणन. केवढा बेशरमपणा !

यमुनाः—आणि त्याचा आंतल्याआंतच बंदोबस्त करावा म्हणून तिच्या बापाने वकीलाच्या सल्ल्याने बरीच खटपट केली. पण ती त्या गोष्टीला राजी झाली नाहीं म्हणतात. आतां कोठे तिला पंढरपुरला नेऊन सोडणार आहेत म्हणे !

रमाः—बर बाई ते ! तुजवर असा आई होण्याचा प्रसंग आला नाही म्हणून तू इतक्या बेफिकीरपणाने बोलतेस. पण प्रत्यक्ष प्रसग आल्यावर हृदयाला कसा जिव्हाळा फुटतो हे तुलाही कळेल.

या भाषणाने त्या सगळ्या जणींच्या हृदयांतील कोमल मातृवत्सलभाव जागृत झाला आणि त्याच्या डोळ्याला पाणी आले. क्षणापुरतीच का होईना, पण त्याच्यात माणुसकी उत्पन्न झाली. थोड्या वेळाने बाळोबाची आई म्हणाली, " हे सगळे खरे झाले. पण त्या इज्जतदार वकिलाने आपली इज्जत वाचविण्याचा काय प्रयत्न चालविला आहे ? "

यमुनाः—ती जर त्याच्या म्हणण्याप्रमाणे वागायला कबूल झाली नाही, तर तो तिला घराबाहेर हांकून देणार आहे म्हणतात.

रमाः—( व्यथित चित्ताने ) झाले. अखेर या सगळ्या पापाचें प्रायश्चित्त बिचाऱ्या त्या एकटीलाच भोगावयाचा प्रसग आला ना ? धड आईची, ना बापाची ! आता तिला दारांत तरी कोणी उभे राहू देईल ? मुलीच्या शिक्षणाचा आणि खाण्यापिण्याचा खर्च अगावर पडू नये आणि वकीलसाहेबाच्या कृपेनें मुलाला कुठे नोकरी मिळावी म्हणून बापाने डोळेझाक केली व आणि विचारीचा सगळा जन्म मातीमोल करून टाकला. विधवा झाल्यापासून बाप तिच्या वागणुकीकडे असाच दुर्लक्ष करीत होता. सध्याकाळीं देवाला म्हणून जायची, तर फिरत फिरत रात्रीला परत घरी यायची; आणि बापापुढे फराळाचे ताट ठेवले, की, बाप आपला गप्प. आईला अमक्या मैत्रिणीने आणि तमक्या मैत्रीणीने दिले म्हणून सांगावयाचे ! तिचीच तर सगळी फूस होती.

यमुनाः—कर्माप्रमाणे फळे मिळावयाचीं !

रमाः—असे काय इतक्या निष्ठूरपणाने बोलतेस ? 'त्या वकिलानें सर्वस्वीं तिचा गळा कापला. पुण्यांत ते कोणी सुधारक म्हणून आहेत ना ?

त्यांच्या मताप्रमाणें मी तुझ्याशीं पाट लावतो असे त्या मेल्यानें तिला कबूल केले होते म्हणून; ती त्याच्या घरीं जाऊन राहिली, आणि शेवटीं त्याने तिचा असा केसाने गळा कांपला. तशी ती कांही इतकी बिघडली नव्हती. पण पाहिले नाहींस का, आपले बाळासाहेब आजारी होते त्यावेळेस ती या घरांतच होती. तिने केवढ्या तरी कळकळीने त्याची शुश्रूषा केली. कांहीं म्हण! तिचे मन कोवळे खरे! त्या वकीलाने जर तिच्याशी पाट लावून घेतला असता, तर ती त्याचे जवळ लग्नाच्या बायकोपेक्षांहि चांगली राहिली असती. तिचे त्याच्यावर खरोखरच प्रेम दिसत होते. त्याच्याकरितां जीव द्यायला देखील ती तयार होती म्हणतात.

यमुनाः—अगबाई! हे सगळे ढोंग! अशा बायकांचे काग कुठे खरे प्रेम असतं? प्रेम वगैरे सगळे बाहेर दाखवायला त्या असे जर न करतलि तर त्यांची चगळ चालावी कशी?

तिच्या या भाषणाने रमा जरा चिडली आणि खोचून म्हणाली, "खर बाई! अशा बायकांचा स्वभाव कसा असतो हे आम्हाला काय ठाऊक?"

तिच्या या खोंचदार भाषणाने यमुनेच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. ती म्हणाली, "अग मेले! मला अशी घालूनपाडून बोलत्येस का? चल, दाखवितें तुला माईसाहेबांकडून मजा! बत्तीशीच पाडून टाकावयाला लावतें!"

एवढे बोलून एखाद्या फणफणणाऱ्या नागिणीप्रमाणे ती तेथून निघून गेली. चपी ही नवी मजा पहायला तिच्या मागून धांवून गेली.

याप्रकाराने रमा खरोखरच घाबरली आणि म्हणाली, "अगबाई! माईसाहेबांकडे खरेंच कींग गेली ती? मणिकर्णिके, जा बाई, तिला समजावून घेऊन ये."

बाळोबाची आईः—अग, इतकी भितेस कां? तिला तोंड आहे कां माईसाहेबांकडे जायला आणि त्यांना कांही सांगायला? मोठी पतिव्रता लागून गेली आहे कीं नाहीं त्यांना माहित नाहीं का तिची वर्तणूक?

रमाः—तरी पण तिची आपली समजूत केलेली बरी!

यानतर तेथून सगळ्या जणी तिची समजूत करण्याकरतां निघून गेल्या.

# प्रकरण ९ वें.

## वादळाचीं पूर्वचिन्हें!

त्या बायकांच्या हलकटपणाला कटाळून कुसुम त्यांच्याजवळून उठून आली होती. पण मागून घडलेला सर्व प्रकार तिला चपीच्या तोंडून कळला. तारेची हकीकत ऐकून तिला तिची अतिशय कीव आली. पण त्याचबरोबर जहागीरदारांच्या घरांतील दुःश्चरित स्त्री-पुरुषांबद्दल तिला पराकाष्ठेचा तिटकारा आला आणि अशा संसर्गापासून स्वतःस शक्य तेवढे दूर ठेवण्याची ती खबरदारी घेऊ लागली.

ती सर्वांपासून अशी दूर दूर रहात असलेली पाहून काकीला तिचा अतिशय राग येऊ लागला. जहागीरदारांच्या घरांतल्या स्त्रीपुरुषांहून अगदीं भिन्न असा कुसुमच्या वागणुकीचा ध्वनी निघू लागला; यामुळे तिची आणि तिजबरोबर काकीचीहि चर्चा माईसाहेबाजवळ सगळ्या जणींकडून होऊ लागली. यामुळे काकीचें मन कुसुमाविषयी विरक्त झाले. उलट पक्षीं मावशीनें आपल्याला जितक्या प्रेमाने वागावायला पाहिजे, तितक्या प्रेमाने वागविलें नाही म्हणून कुसुमचेही मन खिन्न असे. त्या घरांत होणाऱ्या अपमानाबद्दल ती सर्वस्वीं आपल्या मावशीला जबाबदार धरीत होती. कारण तिच्यामुळेच आपले या घरांत येणे झाले आणि या घाणेरड्या कैदखान्यांत बंदीवान आपणांस होऊन पडावे लागले, असे तिला वाटे.

प्रत्येकाकडून आणि पदोपदीं अपमान होत गेल्यामुळें तेजस्वी कुसुमच्या मनांत सुडाची भावना जाज्वल्यतेनें संचरू लागली. कोणाकडे पहा-वयाचाही तिला तिरस्कार वाटू लागला; आणि आपल्या इच्छेप्रमाणे ती आपले सर्व व्यवहार करू लागली. पण या तिच्या बेमुरवतखोरपणाच्या वर्तनामुळे घरांतली मंडळी तिचा जास्त जास्तच तिरस्कार करूं लागली; आणि त्यामुळें तीहि जास्तच बेमुरवतखोर बनत चालली. युद्धांत सज्ज होऊन उभें राहिल्यानें शत्रुपक्षास जागच्याजागींच थांबवितां येतें. पण त्याबरोबर

स्वतःचा निश्चिंतपणाही नाहींसा होतो. जहागीरदारांच्या घरांतल्या कोणत्याच कामाला कुसुम हात लावत नव्हती. पण या रिकामपणामुळे तिचे मन जास्तच क्षुब्ध व अप्रसन्न होऊं लागले. ती आपल्या आईबापांचे घरी होती, त्यावेळीं आईबापांची शुश्रूषा करणें, गल्लींतल्या लहान मुलामुलींना जवळ घेऊन शिकविणे, तरुण मुलींना शिवणकला, कशिदा वगैरेची माहिती देणे, इत्यादि कामांत ती दिवसभर गढलेली असे. त्यामुळे तिला स्वतःच्या गोष्टीकडे लक्ष द्यावयाला फुरसत नसे. पण येथे आल्यावर अशा प्रकारचा उद्योग तिला कांहींच राहिला नव्हता. यामुळे तिचा तो पहिला आनद आणि निःसकोचवृत्ति हीं तिच्या ठिकाणी राहिली नव्हती. या गोष्टीचा ती विचार करू लागली म्हणजे तिला आपल्या त्या घराची एकदम स्मृति होई. तेथे तिच्या सोबतीला कोणी नव्हते; तथापि पुस्तके तिला आनद देत. त्या आनदापासून तिला तेथे कोणीहि परावृत्त करूं शकत नसे. अखेर पुष्कळ विचार करून रिकामे बसण्यापेक्षा पुस्तकें वाचणे शतपट बरें, असे ठरवून तिने आपला वेळ वाचनात घालविण्याचे निश्चित केले.

तिचा हा निश्चय कायम झाला खरा. पण तो आचरणांत आणावयास तिला पराकाष्ठेचा त्रास पडू लागला. विजयाच्या कपाटांत पुष्कळ पुस्तकें होती; पण खुद्द तो येथे नव्हता. यामुळे तिला पुस्तके मिळ-ण्याची पचाईत पडली. ही सोय मधुकराकडून होईल काय, असा ती विचार करू लागली. विजयाचीं कपाटे उघडून त्याचीं पुस्तके जरी त्याला तिला देतां आलीं नाहींत, तरी निदान त्याचीं स्वतःची पुस्तकें तरी तो तिला देऊ शकेल हे विचार मनात येऊन त्याची भेट घेण्याची तिची उत्सु-कता फारच वाढली.

कुसुम आल्यानंतर मधुकराने जहागीरदारांच्या वाड्यांत वरचेवर येण्याचें बद केलें होतें; आणि यदाकदाचित् तो एखादे वेळी आलाच तर तो तिची भेट घेत नसे.

कुसुमाचा जहागिरदारांच्या घरांत पदोपदीं जो अपमान होत होता तो घरांत बसल्या बसल्या मधुकराच्या कानांवर येत होता. त्या अप-मानांतून तिला मुक्त करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं सांप्रत नव्हतें; आणि

कदाचित् तसा प्रयत्न त्यानें केला तर त्यापासून कुसुमचा फायदा न होतां उलट नुकसान होऊन त्यामुळे तिला कलंक लागण्याचा संभव होता. अशा पकारे चोहोंबाजूंनी लाचारीची परिस्थिति पाहून त्याचें हृदय ज्वालामुखीप्रमाणे आतल्याआंत जळत होतें. त्याचा स्फोट व्हावयाला विजयाच्या आगमनाचीच काय ती आवश्यकता होती. विजयाला तिची काळजी घेणे अगदी सुलभ होतें. त्यांत त्याच्या चारित्र्याला दुर्जनाकडून डाग लागण्याचा संभव होता. पण हे कार्य इतक्या सहजासहजी करण्याची कोणाची छाती नव्हती, हेही तितकेंच खरें होतें.

कुसमला विजयाची ओळख बिलकुल नव्हती; तथापि तो आल्यावर त्याची पुस्तकें मिळायला अडचण पडणार नाही अशी आशा तिला होती. पण या कार्याला देखील मधुकरासारख्या मध्यस्थाची जरूरी आहे, असें तिला वाटत होतें.

एके दिवशी ती आपल्या मावशीला म्हणाली, " मावशी, तुम्ही मला येथें कांहीच काम सांगत नाही, यामुळे एखाद्या बंदीवानाप्रमाणे येथल्या जीविताचा मला अगदी कंटाळा आला आहे ! येथे मी आपलें आयुष्य घालवूं तरी कसें ? "

काकी संतापून म्हणाल्या, " हे मला काय विचारतेस ! तू माझें सांगणे थोडेंच ऐकायला बसलीस ? तुला इतकी घमेंड आहे की, तू कोणाशी बोलत नाहींस, की कोणाजवळ जात नाहीस !

कुसुमः---मावशी ! या घरातली माणसें अशी आहेत कीं, कोणीहि भले माणूस त्यांच्या वाऱ्याला देखील उभे राहणार नाही.

काकीः---पण तुझ्यामुळे माझी फजिती होते ना ! जे ते म्हणतें, कुसुमची मावशी, कुसुमची मावशी ! आणि जेव्हा तुझ्यासंबंधानें कांही चर्चा निघते तेव्हा तुझ्याअगोदर माझें नांव घेतात.

कुसुम व्यथित हृदयाने म्हणाली, " याचा सगळा दोष काय माझ्याकडेच आहे, मावशी ? असें जर तुला वाटत असेल, तर तू मला आपल्या गांवाकडे परत पाठवून दे कशी ? येथे आल्यापासून माझ्याहि जीवाला सुख नाहीं आणि तुझ्याहि नाही.

काकी गंभीरपणानें म्हणाल्या, "मीं कांहीं तुला बोलावणें पाठविलें नव्हतें. तू जशी आपल्या पायानें चालत आलीस तशीच, तुझी मर्जी असली तर, आपल्या पायानें निघून जा. तू आपल्या मनाची मुखत्यारीण आहेस!"

काकीच्या हृदयस्थ वेदनांची कुसुमला कल्पना न होऊन ती थोड्या संतापानेच म्हणाली, "तू जसें मला बोलावणे पाठविले नाहीस, तशी मीहि आपल्या पायानें या नरकांत आले नाही. मला मधुकरदादा घेऊन आले. त्यांना बोलावून आण, म्हणजे त्याना विचारून मी निघून जाते."

या तिच्या भाषणाने काकीच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. आणि त्या म्हणाल्या, "मसणांत जा, कार्टे! चागल्या आईबापाच्या पोटीं जन्मलीस! मधुकराला बोलावून आण म्हणायला तुला लाज वाटत नाहीं?"

यावर कुसुमहि तितक्याच तीव्रपणाने उत्तर देणार होती. पण तिने आपले मन आवरले. तिला आपले अश्रू आवरावयास मात्र बरेच कष्ट पडले. ती एखाद्या पाषाणमूर्तीप्रमाणे जागच्याजागीं निश्चळ उभी राहून जमिनीकडे पाहत राहिली. तिचा तेजस्वी आत्मा अगदी क्षुब्ध झाला होता. यामुळे त्याला अश्रू गाळणे पसत पडले नाही. तिची अगदी ग्वात्री झाली की, या जगांत आपले कोणी नाही व आपणही कोणाचे नव्हे! आपल्याला जे काय करावयाचे असेल ते आपले आपणच केले पाहिजे. या विचाराने स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागण्याची तिची भावना अधिकच दृढ झाली.

काकी जरा थ॒ डोके ठेवून चांगल्यावाईट गोष्टीचा विचार करण्याची जबाबदारी कुसुमवरच टेवत्या, तर तिच्या हातून कोणालाही अप्रसन्न करण्यासारखे वर्तन कधीहि घडते ना. पण काकी लहानपणापासून बड्या घराण्यांत वाढल्या असून नवऱ्याच्या अगदी लाडक्या होत्या. सासुरवासाचा लगाम तर त्याना ठाऊकच नव्हता. त्यांना हुकूम करण्याची सवय होती, ऐकण्याची नव्हती. कालचक्रामुळं दुसऱ्याच्या घरीं येऊन त्यांना पडावें लागलें, तरी अधिकारलालसेची आग त्यांच्या अंतःकरणांतल्या अंतःकरणांत तशीच धुमसत राहिली होती; आणि कुसुम ही तिच्या बहिणीची मुलगीच नव्हें, तर सर्वस्वीं अनाथ असल्यामुळें तिच्यावर हुकूम चालविण्याचा

मोह आवरणे त्यांना अशक्यच झाले. पुष्कळ दिवसांनी मिळालेले हे खाद्य सोडावयास त्यांचा अधिकारप्रिय आत्मा राजी नव्हता.

इकडे कुसुमहि कोणाचा अधिकार मानणारी मुलगी नव्हती. तिचे आजपर्यंतचे आयुष्य वत्सलहृदय आईबापांच्या शीतल छायेखाली पूर्ण स्वातंत्र्यांत गेले होते. गुलामगिरी तिच्या मनाला शिवली नव्हती. अधिकाराला मान वाकविणे हे तिला ठाऊक नव्हते. पण आज तिच्या दुर्दैवाने तशी परिस्थिति अचानक उत्पन्न झाली होती, आणि तिचा तेजस्वी आत्मा तिजपुढे नमते घ्यावयास तयार नव्हता.

याप्रमाणे दोहो बाजूंनी भयकर वादळ उत्पन्न होऊन भावी प्रलयाची चिन्हे दिसू लागली !

---

# प्रकरण १० वें.

## किटाळ !

मधुकराने आपल्याला येथे आणून या अंधार कोठडींत ढकलून दिले, पण नंतर आपण जिवंत आहो की मेलो आहोत याची चौकशी देखील केली नाही, कीं त्यानंतर या घरांत पाऊल देखील टाकले नाहीं, हा त्याचा मोठा अक्षम्य अपराध आहे असे कुसुमला वाटलें. अखेर त्याची ही अढळ शांती भग करण्याचा तिचा निश्चय झाला.

पण त्याच्याकडे निरोप पाठवायला तिला दासीशिवाय दुसरा कांहीं मार्ग दिसेना. मुख्य दासी चपी हिच्याशी तर कोणत्याही प्रकारचा सबंध ठेवण्याची तिची इच्छा नव्हती. दुसरी एक सगुणा नांवाची दासी होती. तिचा स्वभाव तिला जरा बरा वाटला म्हणून तिने तिला हांक मारून म्हटलें, " सगुणे ! माझें एक काम ऐकशील का ? "

सगुणा मोठ्या उत्सुकतेनें म्हणाली, " काय आहे, सांगा ! "

कुसुमः—तू मधुकरदादाला बोलावून आणशील, तर माझ्यावर तुझे फार उपकार होतील.

सगुणाः—यांत हो काय मोठं अवघड आहे ? मी त्यांना इतक्यात घेऊन येते.

एवढे बोलून सगुणा निघून गेली. रस्त्यातच तिला चपी भेटली. तिने तिची घाई पाहून म्हटले, " कुठं चाललीसग एवढ्या घाईनं ? "

सगुणाः—जोशीबुवांच्या घरी.

चपीः—कशाला ?

सगुणाः—कुसुमबाईने मधुदादाला बोलावून आणावयास सांगितले आहे.

चपीः—समजलं ! तिची कुटण बनलीस वाटतं ?

चपीचे हे भाषण ऐकून सगुणा संतापून म्हणाली, " कोणाला ग कुटण म्हणतेस, अवदसे ! तू कुटण असशील ! दम, माईसाहेबाला सागून तुझी चांगली खोड मोडते."

पण चपी सगुणेच्या भाषणाने बिलकुल न डगमगता उलट हसून म्हणाली, " जा साग जा खुशाल माईसाहेबाना. त्यानी तुझी जर चांगली पूजा नाही केली, तर मला विचार."

त्या तरूण विजलीचा निरोप त्या तरण्या पठ्याला पोचवायला चालली होतीस हे ऐकून माईसाहेब तुला क्षणभर देखील घरांत राहू देणार नाहीत, याची कांहीं खबर आहे का तुला ? "

सगुणा थोडा वेळ विचार करून म्हणाली, " खरच गडे ! बरे झाले तू रस्त्यांत भेटलीस. मी अशीच परत जाऊन त्या पोरीला सांगते कीं, माझ्याच्यानें नाही हें काम होत म्हणून. "

चपीः—अगदीं गधडी आहेस ! तुला कवडीची अक्कल नाहीं ! अशानें कांहीं तुझा बचाव होणार नाहीं. माईसाहेबांना जर ही हकीकत कोणाकडून परभारे कळली तर मग ?

सगुणाः—( घाबरून ) मग काय करूं ?

चपीः—ही सगळी हकीकत जशी घडली तशी माईसाहेबांना जाऊन साग ! मग तुझ्याकडे कांहीं जोखीम राहिली नाहीं.

चपीच्या शहाणपणाबद्दल सगुणेला तिचा मोठा आदर वाटू लागला. तिने आज आपल्याला मोठ्या सकटांतून वाचविले याबद्दल ती तिचे मनातल्या मनात आभारही मानू लागली. नतर ती चंपीला म्हणाली, " ठीक आहे गडे! मी आतां असेच करते. "

याप्रमाणे सगुणेला तिकडे माईसाहेबांकडे पाठवून चपी धांवत धांवत कुसुमकडे गेली आणि तिच्याविषयी सहानुभूति दाखवून तिला म्हणाली, "कुसुमबाई, हे हो काय केले ? तुमच्यात इतकीहि अक्कल नाहीं ? "

कुसुम आश्चर्याने म्हणाली, " काय झाले? "

चपी कपाळावर हात मारून म्हणाली, " माझे कपाळ! मधुदादाला जर तुम्हाला भेटावयाचे होते, तर मला सागावयाचे होते! मीं त्याना गुपचूप बोलावून आणले असते. पण तुमचा माझ्यावर विश्वास नाही. आतां घ्या तुमच्या विश्वासाच्या सगुणीने काय केले ते. तिंने तुमचे काम तर केले नाहींच, पण उलट माईसाहेबांना जाऊन सगळी हकीकत सांगितली. "

कुसुमः—मग? सांगितली म्हणून काय झाले ? मला कांही थोडीच त्याची चोरून भेट घ्यायची होती ?

चपीः—अहो, परपुरुषाला बोलावून आणायचे ते काय अशी दवंडी पिटवून आणावे लागते का ? लोक काय म्हणतील ? आम्हीही तरण्या होतो; पण आमची अशी छाती कधी झाली नाहीं.

तिचे हे भाषण ऐकून कुसुमचा चेहरा सतापाने लाल झाला आणि ती तिला म्हणाली, " चल, चालती हो येथून. "

पण निर्लज्ज चपी तेथून पाऊलभरहि न हटतां उलट हसून म्हणाली, " अगबाई ! मला तर आतां एखादे चिमणीचे बिळच पाहावे लागेल ! पाहूं आतां माईसाहेब आल्यावर काय होतय ते.

तिच्या हलकटपणानें क्षुब्ध झालेली कुसुम तेथून तात्काळ निघून गेली आणि आपल्या खोलींत बिछान्यावर एखाद्या मतासारखी पडली.

यावेळीं काकी तेथेंच माळ ओवीत बसल्या होत्या. त्या कुसुमला म्हणाल्या, " ही कांहीं निजण्याची वेळ आहे कांग ? कां ? बर वाटत नाहीं का ? "

पण या प्रश्नाला कुसुम काय उत्तर देणार ?

काकी पुटपुटू लागल्या, की, " सगळीं लक्षणें अगांत भरली आहेत. वडीलधाऱ्या माणसाचा कांही दाबच नाहीं. "

कुसुम क्षणोक्षणीं माईसाहेबांच्या आगमनाची मार्गप्रतीक्षा करीत होती. कोणाची चाहूल लागल्याबरोबर ती मनांतल्या मनांत दचके ! तिला वाटे, माईसाहेब आल्या आहेत. दुरून कोणाची भाषणे चाललेली तिला ऐकावयाला आलीं, तर जणु काय आपलीच निंदा चालली आहे असे तिला वाटे.

कुसुम त्या घरांत आल्यापासून तिची निंदा करण्याचा त्या निरुद्योगी घरांतल्या बायकांचा एक उद्योगच होऊन बसला होता. सगुणेसारख्या मोलकरणीनेंही आपल्याविरुद्ध जावे, यावरून आपले नशीबच खोटे असे कुसुमला वाटले.

इतक्यांत दणदण पाऊले वाजवीत माईसाहेब तेथे आल्या आणि चोहोंकडे तीक्ष्ण दृष्टीनें पाहून म्हणाल्या, " काकी, पाहिले का आपल्या लाडक्या मैनेने कसा खेळ मांडला आहे तो. "

काकी आश्चर्यचकित होऊन कुसुमच्या तोंडाकडे पाहू लागल्या.

माईसाहेब अशा प्रकारचे भाषण करीत असतांना कुसुमने ते मुकाट्याने ऐकून घ्यावें ही गोष्ट तिला भयकर वाटू लागली. आपल्यावर हा निष्कारण गहजब केला जात आहे, असें कुसुमचे हृदय आंतल्या आत सारखें सांगत होतें; पण तिच्या तोंडातून मात्र एक शब्दही बाहेर पडला नाहीं.

माईसाहेब तेथून जातां जातां म्हणाल्या, " असल्या कार्टीला माझ्या घरांत जागा नाहीं हें मी साफ सांगतें ! काकी, तुमच्या ह्या लाडकीला दुसरीकडे कोठे नेऊन ठेवा आणि तुम्हांला जर तिचा मोह सुटत नसेल तर तुम्हीहि आपलें बिऱ्हाड उचला ! "

यावेळी घरांत सर्वत्र गाढ शांतता पसरलेली होती. हृदयावर शेकडो जणांचे ओझे ठेवल्याप्रमाणे काकीचा जीव गुदमरू लागला! त्यांना वाटत होते की, हे सगळे खोटे आहे असे कुसुमने आपल्याला सांगावें. उलट पक्षी मावशीने खरा प्रकार काय आहे असे आपल्याला विचारावे असे कुसुमला वाटत होते. तिने गुपचूप राहणे म्हणजे आपल्यावर घेतलेला खोटा आळ खरा आहे असे मानणे होय; आणि हीच गोष्ट तिला विशेष असह्य झाली.

अखेर मावशी कांहीच बोलत नाही हे पाहून कुसुम उठून बसली आणि तिला म्हणाली, " मावशी, मला आपल्या गांवाकडे पाठवून दे. यापुढे या घरांत एक क्षणभरहि राहण्याची माझी इच्छा नाही. "

इतके झाले तरी या कार्टीच्या तोंडावर जराशीहि लज्जेची छाया पसरली नाही, हे पाहून काकींचे मस्तक अधिकच फिरून गेले. त्या म्हणाल्या, " चल निघ काळतोंडे मला तोंड दाखवू नकोस ! "

कुसुम हतबुद्ध होऊन एखाद्या दगडी पुतळ्याप्रमाणें जागच्याजागीं निश्चल राहिली.

---

# प्रकरण ११ वें.

## मधुकराची मानहानि !

**कुसुमवर** झालेल्या या गहजबाची हकीकत मधुकराला कळून त्याच्या देहाची लाही लाही झाली; पण त्याचा हा संताप पिंजऱ्यांत कोंडलेल्या वाघाच्या संतापाप्रमाणे निष्फळ होता. कुसुमचें सरक्षण या वेळीं कसें करावें याचा त्याला कांहीच उपाय दिसेना.

तो अशा मनःस्थितींत आहे, तोंच त्याचा बाप तेथे आला आणि अगदीं वत्सलपूर्ण स्वरानें म्हणाला, "बाळ, तू जरा भाऊसाहेबांच्या घरीं

जा बरे ! कुसुमने तुला भेटीसाठीं बोलावणे पाठविले होते, असें मीं ऐकले आहे. ”

मधुकरः— इतकी भानगड झाल्यावर आतां तेथे जाण्यांत काय अर्थ ?

जोशी०—इतकी भानगड झाली म्हणूनच तुझे तेथे जाणे जरूर आहे. नाही तर ती आणखी जास्त व्हायची. एक तर त्या मुलीला कांहीं जरूर पडली असेल म्हणूनच तिने तुला बोलाविणे पाठविले असावे; दुसरे, तिच्यावर हे जे तुफान घेतले गेले आहे, त्यामुळे तर तू तिला भेटून तिचे सांत्वन करणे अधिकच जरूर आहे.

मधुकरः—पण मी गेल्यामुळे तिला जास्त वाईट तर वाटणार नाही ना?

जोशी०—छे, छे, उलट तिला धैर्य येईल. ज्याला कर नाही त्याला डर कशाची ?

मधुकरः—ठीक आहे, मी जातो.

जोशी०—हं, जा.

मधुकराचा स्वाभिमान त्याच्या प्रत्येक अवयवातून स्फुरण पावत होता. आज तर हा त्याचा स्वाभिमान अधिकच स्फुरू लागला होता. निंदा, नीचपणा, असूया आणि अन्याय ह्याच्याविरुद्ध युद्ध करण्याकरितांच तो आज भाऊसाहेबाच्या घराकडे जावयास निघाला. तो भाऊसाहेबांच्या घरी पोचून दिवाणखान्यांत शिरल्याबरोबर तेथल्या स्त्रियांची गालांतल्या गालात हसावयाला आणि परस्परांस खुणा करावयाला सुरुवात झाली. काही काही जणी तर आपसांत कुजबुजूं लागल्या, “ पाहिले, प्रियकरणीने बोलाविणे पाठविल्याबरोबर कसा वाऱ्यासारखा धांवत आला ! ” वरील टीका आणि कुत्सित इषारे मधुकराच्या तीक्ष्ण दृष्टीपासून छपून राहिले नाहींत.

नेहमीप्रमाणे आज माईसाहेब हसत हसत स्वागत करावयाला त्याच्यापुढे आल्या नाहीत. त्यांच्या आज्ञेवरूनच चपी दाराशीं येऊन म्हणाली, “ मधुदादा, माईसाहेब वरती आहेत. ”

मधुकर नेहमीप्रमाणेंच हसत हसत माडीवर चढला आणि माई-साहेब बसल्या होत्या तेथें त्यांच्या पायाजवळ जाऊन बसला आणि त्यांना म्हणाला, "विजय येथे नाहीं म्हणून आईलाही मुलाची आठवण होईना. म्हणून मुलालाच अखेर तिच्याकडे धांवत धांवत यावे लागले. विजयाच्या परीक्षेला आतां फार दिवसांचा अवधि राहिला नाहीं, माईसाहेब."

आपले हे प्रेमळपणाचें भाषण अगदी अप्रस्तुत झाले हे मधुकराला लागलेच कळून आले. कारण माईसाहेबांच्या हृदयांत आज तो पहिला प्रेमभाव राहिला नाही हे त्याला स्पष्ट दिसले. त्यानी वरून जरी कितीहि शांतभाव धारण केला असला, तरी त्याच्या अंतःकरणात खळबल माजली आहे याबद्दल त्याला शंका राहिली नाही.

माईसाहेब कांहींच बोलत नाहीत हे पाहून मधुकर उठला आणि त्यांना म्हणाला, "माईसाहेब, मी जातो. सध्याकाळ होत आली. जातां जातां काकींना आणि कुसुमला भेटून जातो."

मधुकर कुसुमकडे जातो असे म्हणाल्याबरोबर माईसाहेब घाबरल्या. पण त्याला मनाई करण्याचे त्यांना धैर्य झाले नाही.

तो निघून गेल्यावर माईसाहेब चंपीला म्हणाल्या, "जा चंपे! त्यांचे काय काय बोलणे होतें हे आड उभी राहून ऐक बरे!"

असल्या कामगिरीची चंपी वाटच पाहात होती. ती तेथून धावत धांवतच निघाली.

मधुकराच्या पायांची चाहूल काकींच्या परिचयाची होती. त्यानीं ती ऐकल्याबरोबर त्या अगदीं गांगरून गेल्या आणि खुटीची माळ काढून तिच्या जपांत निमग्न झाल्या.

त्यांच्या खोलीच्या दाराजवळ गेल्यावर मधुकर म्हणाला, "काकी!"

पण काकी उलट जोराजोराने माळ फिरवू लागल्या! काकी कांहींच बोलत नाहींत हे पाहून मधुकराने कुसुमला हांक मारिली. कुसुमने त्याला "आंत या" म्हणून म्हटले. आपणाकडून उत्तर न मिळाल्यामुळे मधुकर बाहेरच्या बाहेरच निघून गेला असता; पण या कारटीनें त्याला "आंत या"

म्हणून म्हटले, आतां तो जाणार नाही, हा विचार काकीच्या मनांत येऊन त्यांना कुसुमचा पराकाष्ठेचा सताप आला.

रात्रीची वेळ आणि काकी कांहीं बोलत नाहींत, तेव्हां केवळ कुसुमच्या बोलण्यावरून आंत जावयाला मधुकराच्या मनाला किंचित सकोच वाटला. पण काकी आंत आहेत या विचाराने त्याचा सकोच नाहींसा झाला आणि तो आंत शिरला. त्याला कुसुमची चर्या आज कांहीं निराळीच दिसली. तिच्यांत स्वाभिमान पूर्णपणे चमकत होता आणि त्यामुळे तिचे सौंदर्यहि अधिकच वाढलेले त्याला दिसले. काकी आज रोजच्यापेक्षां जास्त जोराने माळ फिरवीत असल्याचे त्याच्या दृष्टोपत्तीस आले.

मधुकर मुग्ध दृष्टीने कुसुमकडे पाहात असल्याचे काकीना दिसले. अशा स्थितींत ती कारटी त्याच्या नजरेला नजर भिडवीत उभी राहिली आहे हे पाहून तर काकीना तिचा अतिशय संताप आला. नतर काकींनी माळ मस्तकाला लावून जप पुरे झाल्याचे सोंग केले आणि कुसुमला म्हटले, “ अग! तिथे अशी उभी का राहिलीस ? ती तिकडे पांघुरणे अस्ताव्यस्त पडलीं आहेत ती गोळा कर! ”

कुसुम तिला ‘होय’ म्हणून मधुकराला उद्देशून अगदीं स्पष्ट शब्दाने म्हणाली, “ मी आज किती दिवसांपासून आपल्याला भेटीला बोलवावे म्हणून म्हणते; पण हे घर असे आहे कीं, येथें कोणी एवढाही माझ्यावर उपकार करायला तयार नाही ! आज तुम्ही होऊनच आलांत हे ठीक झालें. आतां आपण कृपा करून मला माझ्या गांवीं पोचते करा, एवढीच आपल्याला माझी विनति आहे. ”

कुसुमचें ते धाडस पाहून काकी तिजकडे टकमका पाहातच राहिल्या. हा बंडखोरपणा चांगला नाहीं, कदाचित तो आपला सर्वस्वीं नाशही करील, हें कुसुम जाणून होती. पण पदोपदी अपमानाच्या लाथा सहन करण्यापेक्षां एकदांचा आपला नाश झालेला परवडला. असें तिला वाटलें.

तिचें हे भाषण ऐकून मधुकर अगदीं शांत स्वरानें म्हणाला, तुझ्या मनांत हें आज काय आले आहे, कुसुम ! चांगली मावशीजवळ आहेस ! तुला येथें काय दुःख आहे ? ”

कुसुम तिरस्काराने म्हणाली, " मावशींच्या अधिक प्रेमामुळेच तर मला राहूं नयेसे वाटूं लागले आहे. माझ्यावर सगळे घरच इतके प्रेम करीत आहे की, कोणी मला कोणत्या कामाला हात लावूं देत नाहीं, कीं, जवळ येऊसुद्धां देत नाहीं. गोड शब्दाची तर कानावर एवढी कांहीं वृष्टि होते, कीं, कांही विचारायलाच नको ! मी मडम का ? तर अगांत पोलके घालते ! मी बदचालीची कां ? तर हलकटपणाचीं भाषणे व दुसऱ्याची निंदा करीत नाही ! मी बेशरम कां ? तर हातात जपमाळा घेऊन दुनियेची पचाईत करीत नाही. मी किरस्तावीण कां? तर हातात पुस्तक घेऊन वाचीत बसतें ! माझ्यासारख्या अशा किरस्तावणीचे आणि वाईट मुलीचे या घरां-तल्या पवित्र, सत्वशील आणि पतिव्रता बायकाशीं कसे जमावे ? तेव्हां कृपा करून आपण मला माझ्या गावी पोचते करा ! मी येथे जर यापुढें एक दिवसही राहिले, तर मी वेडी बनून जाईन. "

तिचे हे भाषण ऐकून काकी अगदी सतापून म्हणाल्या, " अग, पण काळतोंडे, जाणार कोठे ? चुलीत, कां मसणात ! आणि तुला नेऊन पोचते करायला इथे कोण तुझ्या बापाचे नोकर आहेत ? "

पण मावशीच्या भाषणाकडे बिलकूल लक्ष न देतां कुसुम म्हणाली, " पाहिलेत! हा तुमच्यामुळे माझा अपमान होत आहे ! असाच अपमान घडोघडी सगळ्याकडून होत आहे. मी येत नव्हते; पण तुम्हीं मला आणलेत! आतां आणले तसे तुम्ही मला परत घेऊन चलां ! "

मधुकर हंसत म्हणाला, " मी ज्या हेतूने तुला येथे आणले तो हेतु तर अजून तसाच राहिला आहे. आतांशी त्याचा केवळ आरंभ मात्र झाला आहे. बाळासाहेब येईपर्यंत तू वाट पहा. तो आल्यावर सर्व कांहीं व्यव-स्थित होईल. तोपर्यंत तुला हा अपमान सहन करीत राहिल्याशिवाय गत्यतर नाहीं. "

कुसुमः—पण या घरांतल्या माणसांचीं मने इतकी घाणेरडीं आहेत कीं, कोणाहि सज्जन माणसाला येथें पाव घटका देखील राहावेसे वाटणार नाहीं.

मधुकर हंसून म्हणाला, " असे होणें स्वाभाविकच आहे. ज्यांना स्त्रीपुरुषांत पवित्र सबध किंवा निर्मलभाव राहाणें शक्यच नाहीं असें

वाटतें, त्यांचीं हृदयें इतकीं घाणेरडींच असावयाची. त्यांच्या मनांतली घाण आम्हीं आपल्या सद्वर्तनानें दूर केली पाहिजे. स्त्रीपुरुषांत पवित्र भाव राहू शकतो, हे या लोकांना पटवून दिल्याशिवाय यांच्या मनांतली घाण दूर व्हायची नाहीं ! ”

कुसुमः—पण तोपर्यंत माझा मेंदू ठिकाणावर राहिल, की नाहीं याची मला शकाच आहे ! यांना सुधारतां सुधारतां मीच कदाचित वेडी बनेन !

मधुकरः– ( हसून ) नाही, घाबरू नकोस ! तू वेडी होणार नाहीस. तुझ्या हातून एक चांगले सत्कृत्य घडवून आणावे म्हणूनच ईश्वराने तुला येथें पाठविले आहे.

थोडा वेळ कुसुम स्तब्ध राहून म्हणाली, “ मग कृपा करून एवढें तरी करा ! मला कांहीं पुस्तकें तरी पाठवून द्या. म्हणजे माझा जीव त्यांत तरी रमेल. ”

मधुकरः—इथे पुस्तकांची जरूर नाही. चातुर्मास्यांत जसा कांदा तशीं या घरांत पुस्तकें वर्ज आहेत. तसेच या घरांत उठणारीं तुफानें सहन करायला शकि. नुसत्या पुस्तक वाचनानें हं सामर्थ्य तुझ्या ठिकाणीं येणार नाही. बाळासाहेब आल्यावर ते सर्व व्यवस्था करतील.

कुसुम खालीं मान घालून विचार करू लागली, “ बाळासाहेब आल्या-वर ठीक काय व्हायचे ? या दुष्टांचा दुष्ट स्वभाव बदलेल ? बाळासाहेबां-मुळें थोडीशी शांति येथे उत्पन्न होईल. पण मजविरुद्ध हीं जीं तुफानें उठलीं जात आहेत, त्यामुळे माझे संरक्षण करण्याची त्यांना बुद्धि होईल, की नाहीं कोण जाणें ! आणि झाली तरी ते काय करू शकणार ? ”

विचारांती स्वतः सबंधाची सगळी चिंता तिने मनांतून दूर करण्याचें ठरविलें. कुसुमच्या स्तब्धतेवरून तिची समति आहे असें समजून मधुकर एकीकडे पाहात, किंचित हंसून . म्हणाला, “ काकी, तुमच्या या वेड्या पोरीला शांत केले बरें; संध्याकाळ झाली आहे. आतां मी घरीं जातों. ”

काकी गाल फुगवून बसल्या होत्या. त्या कांहींच बोलल्या नाहीत. मधुकर त्यांच्या पायांवर डोके ठेवून निघून गेला.

काकी, बाळासाहेब आणि मधुकर या दोघांवरही पुत्राप्रमाणे प्रेम करति होत्या. पण कुसुममुळें त्यांच्या मनाला अलीकडे जो त्रास होऊं लागला होता, त्याचा सगळा दोष त्या मधुकरावरच टाकीत होत्या; आणि आज तर कुसुमशी त्याचें जें भाषण झाले त्यावरून तो, बाळासाहेब आणि कुसुम या तिघानीं मिळून कांही तरी गूढ व्यूह रचला असावा असें त्याना वाटलें. त्यामुळे तर मधुकर आणि बाळासाहेब यांच्याविषयीं त्याचें मन अधिकच नाराज होऊन, त्या दोघांच्याहि ससर्गापासून कुसुमला दूर ठेवण्याचे त्याना आपले कर्तव्य वाटू लागले.

---

## प्रकरण १२ वें.

### जिवंत नरकवास !

मधुकर गेल्यावर त्याचे आणि कुसुमचें काय खलबत ठरले, हे समजून घेण्याविषयी घरांतल्या माणसांना मोठी जिज्ञासा लागली होती. पण काकीच्या भीतीने तिच्याजवळ जाण्याची कोणालाही छाती झाली नाहीं.

चपी माईसाहेबांजवळ येऊन म्हणाली, " माईसाहेब, तुम्हांला काय सांगू; तुम्हांला माझे बोलणे खरे देखील वाटणार नाहीं. पण मी खरे सांगते. मधुदादाचा आवाज ऐकल्याबरोबर कुसुमबाई बाहेर आली आणि तिनें त्याचा हात पकडून किहो त्याला आंत नेले ! जराशी लाजली किंवा शरमली सुद्धां नाहीं. माझे तर काळीज हा प्रकार पाहून कसे धडकलेच. वाई ! बाई ! अशी बायको मीं जन्मांत पाहिली नाही ! "

यावेळीं या सोंगाला साजेसाच आविर्भाव तिनें आणला होता.

माई०:—मग पुढे काय झाले ? त्यांची काय सल्लामसलत झाली ? काकी काय म्हणाल्या ?

चपी:—काकी माळ जपीत होत्या. त्या कांहीं बोलल्या नाहीत ! कुसुम मधुदादाला म्हणाली, " मी या घरांत आता राहात नाही. तुम्ही माझे दर्शनच घेत नाहीं. " यानतर मधुदादांनी तिची समजूत काढली. मग त्यांचे बरेच बोलणे झाले. पण ते मला समजले नाही. मला इग्रजी कोठे येते ? शेवटी मधुदादा म्हणाले, " तू काही काळजी करू नकोस ! बाळासाहेब घरी आले म्हणजे तुला कसलाही त्रास मुळीच होणार नाहीं. "

माईसाहेब:—माझा विजय काहीं तसा नाही हो ! मी त्याला लहानपणापासून ओळखते. मधुकरसुध्दां असा नव्हता. पण या कलियुगांत कोणाचे मन कधी फिरेल, सागवत नाही. जा बर, काकीला बोलावून घेऊन ये.

माईसाहेबानी बोलावणे पाठविले हे पाहून काकीची चर्या जरा उतरली. त्या म्हणाल्या, " कशाला ग मला बोलाविले, चपे ? "

चपी खूप भोळेपणाचा आंव आणून म्हणाली, " हे मला काय ठाऊक बर, काकी ? मोठ्या माणसांच्या कामाची आम्ही गरिबांनी कशाला चौकशी करावी ? "

यावेळीं चपीचे डोळे सैतानी आनंदानें चमकूं लागले.

काकी एकवेळ कुसुमकडे उग्र दृष्टीने पाहून, माईसाहेबांकडे गेल्या आणि म्हणाल्या, " तुम्ही मला बोलाविले होते, माईसाहेब ? "

माईसाहेब गभीर स्वराने म्हणाल्या, " होय, मधुकराशीं तुमचें काय खलबत झालें ? "

काकी:— खलबत कसलें ? आपल्या गांवीं मला पोंचते करा, असें कुसुम त्यांना म्हणत होती.

माईसाहेबांचे गांभीर्य अजूनही कायमच होतें. त्या म्हणाल्या, " मग कधीं जावयाचें ठरलें ? "

काकी:–तिने येथून जाऊ नये असे मधुकराचे म्हणणें पडले.

इतक्यांत चंपी मध्येच म्हणाली, "मधुदादाला कां दोष देतां? तुम्हींच तर त्यांच्या जाण्याला अडथळा केला. त्या वेळी तुम्ही किती तरी बडबडलांत!"

त्या वेळची आपली सर्व भाषणे चंपीनें आडून ऐकलीं आणि इकडे मालकिणीकडे येऊन तिनेंच आगही पेटवली, अशी आतां काकींची पक्की खातरी होऊन चुकली. आतां लपवाछपवी करण्यात कांहीं अर्थ नाहीं, असा विचार करून व चंपीचे भाषण आपण जसे कांही ऐकलेच नाहीं अशा झोकाने त्या म्हणाल्या, "मीहि कुसुमला जाण्याचा विरोध केला. तिला म्हटले की, 'आम्ही येथे तुझ्यावर देखरेख ठेवायला असतांना तू जर इतक्या उच्छृंखल रीतीनें वागतेस, तर तेथे एकटी राहिल्यावर कस करशील? पुढे वाढून ठेवलेल्या ताटाला लाथ मारून जातेस?'"

माई०— काकी! माझ्या घरांत असल्या चचल बायकोला जागा नाही. तुमच्याच्याने तिला कांही दाबांत ठेववणार नाही. मग काय तुमच्यासाठी मी खालीं पाहू? आतांच तुमच्या बहिणीच्या पोरीचे गुण सगळ्या गांवात जाहीर होत चालले आहेत. सगळ्या गांवांत तिच्यासबंधाने छीः थूः उडाली आहे. आतां रात्र झाली. उद्यां मीच मधुकराला बोलावून तिला तिच्या गांवी पोचती करून दे म्हणून सांगते. ही दुसऱ्याची पीडा मी कशाला घरांत ठेवू? आपल्या डोळ्यांने कांही हा अनाचार पहावत नाहीं, बाई!

काकी नम्र स्वराने म्हणाल्या, "असे करू नकाहो! मोठ्या झाडाच्या आश्रयाला भलेबुरे सगळ्या प्रकारचे प्राणी येऊन राहतात, म्हणून त्या झाडाने कधीं कोणाचा त्याग केला आहे का, कीं, त्याला कोणीं दोष तरी दिला आहे? तिला आतां तुम्ही दूर ढकलू नका! नाहीं तर तिचा सगळा जन्म वायां जाईल."

काकींच्या या नम्र भाषणाने माईसाहेबांचा राग किंचित् शांत झाला. त्यांच्या स्वभावाची हीच मौज होती. त्या लागलींच प्रसन्न होऊन

म्हणाल्या, "हें काय मला समजत नाही, काकी? त्या पोरीच्या सुधारणेची आशा मला बिलकूल दिसत नाहीं. कोणालाच ती भीत नाहीं, आपल्या मनाला येईल तसे वागते. तिच्यामुळें घरांतल्या दुसऱ्या पोरीसुद्धां बिघडतील कीं काय याची मला भीति वाटते."

काकींनीं अश्रु पुसून म्हटले, "माईसाहेब, तुम्ही साक्षात् लक्ष्मी आहांत! तुमच्या आशीर्वादानें तरी तिची बुद्धि ठिकाणावर येईल. येथे आल्याबरोबर तिने रेशमी साडी नेसायचे सोडून दिले. हळू हळू तिच्या असल्याच इतर सवयीहि नाहींशा होतील."

माई०—तिचे ते पोलके काढून टाकायला सांगा! तेच सगळ्या अनर्थाचे मूळ आहे.

काकींचे आणि माईसाहेबांचें बोलणे इकडे चालले आहे. तोंच तिकडे रमा, मणिकर्णिका, यमुना, बाळोबाची आई वगैरे कपूने कुसुमकडे जाऊन तिच्यावर हल्ला करावयास सुरवात केली.

रमाः—कसं काय कुसुमबाई, काय चालले आहे?

आज या बायका आपल्याकडे कां आल्या हे कुसुमने ओळखलें. आणि म्हणूनच तिने वरील प्रश्नाला कांहीं उत्तर दिले नाही. हे पाहून यमुना जरा पुढे येऊन म्हणाली, "ओहो! केवढा तरी दिमाख! अग बोलत कां नाहींस? की त्यालाहि पैसे पडतात? आमच्यावर नाखूष तर नाहीस?"

बाळोबाची आई यमुनेच्या कानांजवळ तोंड नेऊन पण कुसुमला ऐकू जाईल अशा स्वरानें म्हणाली, "अग, ही नाखुषी नाहीं. ही खुषीची उसळी आहे."

तरीहि कुसुम कांही बोलेना. त्यामुळे तर यमू फारच चिडली. तरी पण तोंडावर खोटेच हसे धारण करून नाटकी थाटानें ती तिला म्हणाली "नच सुदरि करुं कोपा, मजवरि धरि अनुकंपा ॥ रागाने तव तनुही पावत काशी कपा ॥ असे म्हणून तिच्या हनुवटीला हात लावूं लागली त्याबरोबर कुसुम कठोर स्वराने म्हणाली, "अग! तुम्ही सगळ्या सोंवळ्य पातिव्रता, आणि माझ्यासारख्या किरस्तांविणीला कशा शिवतां?"

तिच्या तोंडून एकदांचें बोलणें बाहेर पडल्याबरोबर सगळ्याजणी तिच्यापुढें आसनमांडी ठोकून बसल्या.

नंतर यमुना म्हणाली, "बरे, राहिली ही थट्टा! पण खरे सांग, तुला येथचे कांहीच कां पसत नाहीं ?"

बाळोबाची आई हळूच म्हणाली, "फक्त मधुकर सोडून–" कुसुमने अत्यत तिरस्कारपूर्ण दृष्टीने तिच्याकडे पाहिले. बाळोबाची आई बेशरम खरी. पण त्यावेळच्या कुसुमच्या दृष्टीला तिला आपली दृष्टि भिडवेना. तिची मान झट्कन् खाली झाली.

रमा म्हणाली, "तू येथून जाणार आहेस होय कुसुम ? मधुदादा काय म्हणाले ?"

कुसुम सतापून म्हणाली, "मधुदादा म्हणाले, जन्मभर या नरकांतल्या कीटकाच्या सगतींत राहा?"

रमाः— अग, अशी रागावतेस का ?

बाळोबाची आईः—अग, राग नाहीं येणार तर काय होईल ? आपण होऊन गोष्ट काढली, तरी मनातला हेतू पूर्ण झाला नाही ! मधुदादाची अक्कल काय पाहावी ! एवढीशी गोष्ट त्याने ऐकलीसुद्धां नाही. असे झाल्यावर कोणाला राग येणार नाहीं ? आम्ही तर जाऊन जीव दिला असता !

ही कुत्सितपणाचीं बोलणीं कुसुमला इतकीं असह्य झालीं की, त्यांना लाथा मारून येथून हाकून द्यावे असे तिला वाटले. पण तिने मोठ्या विवेकाने आपला हा राग आंवरला. अखेर त्यांना काहींच न बोलता ती-तेथून आपण होऊनच निघून गेली. ती गेल्यावर बाळोबाची आई म्हणाली, "मेलीचा केवढा दिमाख ! जशी काय कोणी जहागीरदारीणच ! तरी बसायला घर देखील नाहीं म्हणून बरे आहे. नाहीं तर आमच्यासारख्या एकेकीला ती रोज तरवारीने छाटती."

यमुनाः—चला ! ही अवदसा कोठे गेली आहे ती पाहूं ! तिची पुरती खोड मोडल्याशिवाय सोडावयाचे नाहीं.

यानतर तिजवर कोणकोणते वाग्बाण सोडावयाचे यासबधाने आपसांत त्यांची बरीच चर्चा झाली. कुसुम त्यांच्या वाऱ्यालाहि उभी राहात नव्हती, यामुळे तर त्या सर्वजणी तिजवर फारच चिडल्या होत्या.

तिच्या हृदयावर आघात करण्यांत त्या सगळ्या जणींना मोठी मौज वाटत होती; आणि म्हणून एखादा शिकारी जसा सावजाचा पाठलाग करतो, तसा त्यानीं तिचा पिच्छा पुरविला होता. त्याच्या या अत्याचारामुळें कुसुमला पुरत्या दोन घटकाही शांत मनानें विचार करायला शांती मिळेनाशी झाली. ती जरा कोठे बसलेली पाहिली, की, त्या तिजजवळ जमून तिच्या कोमल हृदयावर आघात करीत. यामुळे ते घर म्हणजे तिला केवळ जिवत नरकवासच वाटत होते.

---

## प्रकरण १३ वें.

### उदार पितापुत्र !

मधुकराला जहागीरदाराच्या वाड्यात पाठविल्यानतर, जोशीबुवा अगाभावती एक शाल लपेटून महिम्नस्तोत्राचा पाठ म्हणत इकडून तिकडे येरझारा करीत होते. वास्तविक ते मधुकराच्या येण्याचीच वाट पाहात होते. ती आरतीची वेळ होती आणि त्यासाठी त्यांना या वेळी जहागीरदारांच्या वाड्यांत जाणे जरूर होते. पण मधुकराच्या तोंडून सगळी हकीकत ऐकून घेतल्यानतरच तिकडे जावयाचे असे त्यांनीं अगोदरच ठरविले होते. दिवे लागायची वेळ होऊन गेली, तरी मधुकर आला नाहीं; यामुळे जोशीबुवांची उत्सुकता जास्तच वाढली. ते वरच्यावर रस्त्याकडे पाहू लागले. इतक्यांत मधुकर तेथे येऊन दाखल झाला. त्याला पाहून ते म्हणाले, “ मधुकर ! ”

मधुः—काय म्हणतां, बाबा ?

जोशीः—कशाला कुसुमने बोलावले होते ?

मधुः—तिला त्या घरात फार त्रास होतो म्हणून तिला तिच्या गांवीं पोचते करा, असे ती म्हणाली. तिच्याशी कोणी चांगले बोलत नाही, सगळे तिची निंदा करतात आणि काय नाही नाही ते तिला बोलतात.

जोशीः—मग काकी काय करतात ? आपल्या बहिणीच्या मुलीचे या त्रासातून त्याना सरक्षण करता येत नाही ?

मधु०:—सरक्षण करायचे तर लांबच राहो, पण इतरांबरोबर त्याहि तिला छळतात !

जोशीः—मग तिला सांगून काय आलास ? तिला तिच्या गांवीं पोचते करण्याचे कबूल करून आलास ?

मधुः—छट् ! तेथे कोण आहे म्हणून तिला पोचते करू ? विजय आल्यावर सर्व काहीं ठिक होईल, म्हणून तिला सांगून आलो.

जोशीः—ते कसे ?

मधुः—तो रात्रंदिवस घरात राहणारा असल्यामुळे तिजवर कोणीहि जुलूम करूं शकणार नाहीं. शिवाय त्याच्या संगतीमुळे तिला आताच्या सारखे एकलकोंडेपणाचे वाटणार नाही.

जोशीः— ही कांही रोगावरची खरी दवा नव्हे ! यानें रोग फार तर थोडा वेळ थांबेल, पण तो नामशेष होणार नाहीं. कारण विजय जरासा घराबाहेर गेल्याबरोबर दबून राहिलेला सूड सगळी कसर काढून घेईल. असे नाहीं झाले, तरी निदान तिच्याविषयी घरांतल्या माणसांच्या मनात सहानुभूति उत्पन्न होणे कधी शक्य नाही. सगळ्यांच्या डोळ्यांत सलत असतांना तसेच त्याच्यात राहणे ही गोष्ट काही सुलभ नव्हे. याचा प्रतिकार करण्याचा तू काय उपाय काढला आहेस ?

मधुः—याचा प्रतिकार करणे म्हणजे कांहीं सोपे काम नव्हे. जोंपर्यंत शिक्षणाने स्त्रियांचीं मनें उदार आणि उन्नत बनली नाहीत, जोंपर्यंत त्यांच्यापुढें उच्च ध्येयें मांडलीं गेलीं नाहींत, तोंपर्यंत त्यांच्यांतली क्षुद्रता किंवा नीचपणा निघून जाणें अशक्य आहे.

जोशीः—मग प्रथम स्त्रीशिक्षणाचेंच कार्य हातीं घेणें ठीक होईल. तुम्हांला रोगाचें मूळ समजूनहि तुम्ही जर त्यांवर उपाय योजीत नाहीं, तर तुमचे शिक्षण व्यर्थ आहे, असेंच मी म्हणेन. हे तुमच्यासारख्या उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांचे कर्तव्य आहे.

मधुः—पण हें कार्य एवढें मोठें आहे की, तें माझ्यासारख्या एकट्या दुकट्याच्या हातून सिद्धीस जाणे शक्य नाही. शक्य असेल तेथे तेथें जाऊन शाळा स्थापन करावयाच्या आणि अशा रीतीनें खेड्यांपाड्यांत शिक्षणाचा प्रसार करावयाचा, हे ध्येय मी आपल्या डोळ्यांपुढे ठेवले आहे. पण जहागीरदारांच्या जनानखान्यांत राहून विलासांत व चैनीत वाढलेल्या आणि ढोंगानें भरलेल्या स्त्रियांत शिक्षणप्रसार करण्याचे कार्य मात्र आपल्याकडून होणें शक्य नाहीं.

जोशीः—ठीक आहे ! हे काम विजयालाच हातीं घेणे सोपे जाईल. कदाचित् कुसुमला त्यानें याच उद्देशानें इकडे आणलें असावें.

मधुः—पण विजयबरोबर कुसुमला हे काम करतां येणे शक्य आहे ? मला ही गोष्ट शक्य दिसत नाही. शिकल्यावर त्या बायकांना कुसुमची योग्यता कळेल. तथापि तोंपर्यंत त्या तिला इतका त्रास देतील की, तिला हे काम मध्यतरीच सोडून देणें अपरिहार्य होईल. कारण कितीही झाले तरी कुसुम ही मनुष्यच आहे !

जोशीबुवा किंचित् काळ स्तब्ध राहून म्हणाले, " बरें, या कुसुमचें चारित्र्य कसें काय आहे ? "

मधुः—अगदीं उत्कृष्ट, जशी रूपानें, तशीच गुणानें आणि तशीच आचारानेंहि ती एक आदर्शभूत आर्यकन्या आहे; आणि लिहिण्यावाचण्याप्रमाणेंच गृहकार्यांत देखील ती कुशल आहे.

जोशीः—तिच्या संरक्षणाचा मला एकच उपाय दिसतो; आणि तो तिचा विवाह लावून देणे हा होय. यासंबंधानें तुला कसें काय वाटतें ?

मधुः—हो, मलाहि हाच उपाय योग्य दिसतो. पण लोक कसें काय म्हणतील ?

जोशीः—विधवाविवाह हा आदर्श विवाह नसला, तरी तो शास्त्र-विरुद्ध खचित नाही. ब्रह्मचर्य पालन करावयास असमर्थ असलेल्या बाल-विधवांना संसारांत पतनापासून दूर ठेवावयास हाच एक मार्ग आहे. पूर्व-काळांतहि विधवाविवाह होत होते; पण कांहीं काळाने तो प्रघात लोपला. कालीला आणि सद्‌बुद्धीला पटणारी गोष्ट स्वतः आचरावयास किंवा लोकां-पुढे ठेवावयास बिलकुल हरकत नाही.

मधुः—पण तिच्या योग्य वर कोण आहे ?

जोशीबुवा त्याच्या तोंडाकडे पाहून म्हणाले, " मी तिला सून करावयाचे ठरविले आहे. "

मधुकर थोडा वेळ विचार करून म्हणाला, " छे, बाबा, यामुळे माझ्या व्रताला मोठे विघ्न येईल. मीं देशसेवेचे व्रत घेतले आहे. "

जोशी०:—कुसुम जर तुझी पत्नी झाली, तर ती तुझ्या मार्गात आड येईल असे तुला वाटते ?

मधु०:—तसे नाहीं. कुसुम माझी पत्नी झाली, तर मी स्वतःला अगदी धन्य समजेन. पण देशकार्यात पडलेल्या माणसाच्या पायात विवा-हाची बेडी अगदी घातुक होते, अशी माझी समजूत आहे. त्यामुळे जें सामर्थ्य देशकार्याला लावावयाचे त्याला अडथळा येतो. यापेक्षां ती विज याची पत्नी झाली, तर एकदर सगळ्या दृष्टीने फार चागले होईल. कारण तो दुर्बळ प्रकृतीचा मनुष्य आहे. ती त्याचे सामर्थ्य वाढवील.

जोशी०:—पण त्याचे आईबाप या गोष्टीला राजी होणार नाहीत. ही गोष्ट करावयास लागणारे सात्विक बल त्यांच्या ठिकाणीं नाही.

मधु०:—यामुळेच त्या उभयतांचा विवाह होणें अधिक महत्वाचे आहे. त्याची परीक्षा आतां लवकरच संपेल. मी अगोदरच पुण्याला जाऊन या विरोधाला टक्कर देण्यास त्याचे मन समर्थ बनवितो.

जोशी०:—पण कुसुमला ही गोष्ट आतांचा सांगू नकोस. त्या दोघांची भेट झाल्यावर पुढे काय निष्पन्न होते ते पाहून मग हा बेत निश्चित करतां येईल. कोणतीहि गोष्ट घाईघाईनें केल्याने हितापेक्षां अहित होण्याचाच

अधिक संभव असतो. ठीक आहे; मी आतां जहागिरदाराच्या घरी जाऊन देवाची आरती करून येतो. त्यानंतर आपण या विषयाची पुन्हां चर्चा करूं.

वडिलांनींच आपण होऊन कुसुमबरोबर विवाह करण्याची गोष्ट काढल्यामुळे मधुकराला पराकाष्ठेचा आनंद झाला. त्याला स्वर्गच आज आपल्यापुढे उभा राहिला आहे, असे वाटूं लागले. कुसुमसारखी रूप-गुणसंपन्न पत्नी मिळत असल्यावर त्याला आणखी काय पाहिजे होते? पण आपल्या कर्तव्याच्या आड हें सौख्य येईल, असा विचार त्याच्या मनांत लागलींच येऊन, त्यानें त्या विचारापासून आपलें मन परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. आपल्या कर्तव्याच्या आणि मित्राच्या कल्याणाच्याही दृष्टीनें, तिचा विजयाशीच विवाह होणें अवश्य आहे, असें तो आपल्या मनाशीं म्हणूं लागला. पण तिच्या सौंदर्याचे विचार त्याच्या मनात आले, कीं, त्याची ही वृत्ति पुन्हां द्विधा होई आणि तो मनाशी म्हणे, "अहाहा! काय तिचें अनुपम सौंदर्य!" तथापि अशा विचारात क्षणैक मग्न होतो, तोंच तो पुन्हा विचार करूं लागे, "छट् हें सौंदर्य आपल्या क्षुद्र लालसेचा विषय न बनविता त्याची मित्रकल्याणाकडेच योजना केली पाहिजे. माझ्या स्वार्थ-त्यागाच्या निश्चयावर हा घाला येऊं पाहात आहे. हा परीक्षेचा पहिलाच प्रसंग आहे; पण या परीक्षेत आपण उत्तीर्ण झालेच पाहिजे."

अशा प्रकारचा विचार करून कुसुमची मनोहर मूर्ति आपल्या डोळ्यांपुढून दूर करण्याचा तो प्रयत्न करूं लागे. यात तो क्षणैक यशस्वी होई. पण पुनश्च जलनिमग्न कमलपुष्पाप्रमाणें तिची मुखश्री त्याच्या हृदयावर तरंगूं लागे. तिला जलांत कायमची बुडविणें त्याला अशक्य झाले.

# प्रकरण १४ वें.

## नव्या जुन्यांचा झगडा !

विजयाच्या परीक्षेचा शेंवटचा दिवस होता. त्याच दिवशी मधुकर पुण्यात त्याच्या बिऱ्हाडी येऊन पोंचला. त्यावेळीं विजय परीक्षा द्यावयाला गेला होता. नोकराने मधुकराच्या स्नानाची वगैरे व्यवस्था केली. भोजन झाल्यावर मधुकराने किंचित् झोप घेतली. नंतर जागा झाल्यावर तो त्या नोकराला म्हणाला, " कोंडीबा, विजय येथून गांवाला कधीं निघणार आहे ? "

नोकराचें नांव कोंडीबा होतें. तो म्हणाला, " ते काही मला कळलें नाहीं, दादा ! बाळासाहेब दिवसरात्र अभ्यासांतच गढलेले असतात. घरादाराची त्याना काहिच फिकीर नाहीं. आता तुम्ही अनायासे आलां आहांत, तर त्याना बरोबर घेऊन चलां. सारा जन्म लिहीतच राहावयाचे काय ? मग जहागीरदारीचे सुख कधीं उपभोगावयाचें ! "

मधु०:––( हसून ) कोंडीबा, ज्या कामांत मनुष्याला सुख लागणार नाहीं, तो ते कशाला करीत राहील ? आम्हांला लिहिण्यावाचण्यांतच सुख वाटतें.

कोंडीबा जरा कातवून रुक्ष स्वराने म्हणाला," तुम्हीच तर महाराज त्यांचे गुरू आहांत ! तुम्हीच त्यांना हा नाद लावलेला आहे ! जहागीरदारांचा मुलगा, पण खाणे पिणे, ऐषआराम, सगळे सोडून रात्रदिवस कष्ट करीत आहे ! त्यांना का नोकरी करायची आहे, कीं, तुमच्यासारखी कुठें शाळा काढावयाची आहे ? त्यांनी विद्येकरतां इतके कष्ट घ्यायचे, म्हणजे आपल्या हाताने आपल्या सुखावर पाणी सोडण्यासारखे आहे ! पण सुख भोगायला तरी कर्मात पाहिजे म्हणतात तेंच खरे ! "

कोंडीबा जमीनदारांचा जुना नोकर असल्यामुळें त्याचा सगळ्यांवर वचक असे. त्याचे भाषण ऐकून मधुकर हसून म्हणाला, " कोंडीबा,

तुमच्या बाळासाहेबाचा कर्मयोग जरा अधिक वाढविण्याचा मी प्रयत्न करीत आहें!"

चिलमीचे दम घेत असलेला कोंडीबा डोळे जरा विस्तृत करून म्हणाला, " म्हणजे ? "

मधु०:—मी त्याला बायको धुंडाळीत आहे.

आपल्या छोट्या मालकाच्या विवाहाच्या बातमीने कोंडीबा अगदी खूप झाला आणि म्हणाला, "काय, त्यांच्या लग्नाचे ठरले, मधुदादा ? कधीं होणार ? बायको कुठली आहे ? दिसायला कशी आहे ? तिचे वय काय ?"

कोंडीबाच्या या प्रश्नाच्या माऱ्याने मधुकर अगदी घाबरून गेला. पण लागलीच म्हणाला, " थोरल्या जहागीरदारसाहेबाचे वय त्याच्या लग्नाच्या वेळी बारा वर्षांचे होते, आणि थोरल्या जहागिरदारीण बाईसाहेबांचे वय ५ वर्षांचे होते. बिचारी खरोखर साक्षात् लक्ष्मी होती. पण आमचे छोटे जहागीरदारसाहेब जन्मल्यानंतर थोड्याच दिवसांनी तिला देवाचे बोलावणे आले. "

कोंडीबा धोतराच्या पदराने अश्रु पुशीत पुशीत मध्येच म्हणाला, " होय. त्याच सालीं माझा मुलगा गमावला. त्या सालाइतका मरी-आईचा तडाखा पुढे माझ्या कधीं पाहाण्यांत आला नाही. त्याला चांगली पंचवीस वर्षे होत आली असतील. तेव्हांपासून बाळासाहेबांना अंगावर खांद्यावर वागवून मीच लहानाचे मोठें केले. आता मी म्हातारा झालों असल्यामुळे, माझ्या बोलण्याची त्यांना किंमत वाटत नाहीं. मीं जर कधीं त्यांच्याजवळ लग्नाची गोष्ट काढली, तर ते मला म्हणतात, ' अरे कोंडीबा, होईल लग्न. मी काय म्हातारा झालों आहे काय ' त्यांच्या एकेक गोष्टी तर ऐका! ते लग्न न करतां असेच जर स्वस्थ राहिले, तर म्हातारे न होतां काय असेच तरुण राहतील ? पण मी असे काही बोललो तर हसून ते ही गोष्टच सोडून देतात. धाकट्या जहागीरदारीणबाईहि किती चांगल्या आहेत म्हणून सांगू ! अशी सावत्रआई माझ्या पाहाण्यात नाहीं. बाळा-साहेबांना मोठ्या नशिबाने अशी आई मिळाली. ती बिचारी आई आणि बापहि लग्न कर म्हणून यांना किती आग्रह करतात. पण हे ऐकतील तर

कीं नाहीं ! तुमच्या दोघांचीहि एक तऱ्हा ! चोरांची पावलें चोराला माहित ! तुम्ही तर त्यांना लग्नाच्या बाबतींत कांहीं सांगतच नाहीं. आता तुम्हांलाच कशी सद्‌बुद्धि झाली कोणाला ठाऊक ? मुलगी पसत केली ? तुम्ही बघितली किती मोठी आहे ? ”

आपल्या मित्राच्या त्या जुन्या नोकराचा तो वत्सलभाव पाहून मधुकर हसून म्हणाला, “ कोंडीबा, लग्नाचे बहुतेक ठरल्यासारखेच आहे. मुलगी अगदीं फक्कड, परीसारखी आहे. वयहि चांगले सोळा सतरा वर्षांचे आहे. ”

कोंडीबा दांत काढून म्हणाला, “ माझ्या म्हाताऱ्याची थट्टा चालविली आहे काय, मधुदादा ? ”

मधु०?—( गभीर भावाने ) थट्टा नाहीं, खरेच सागतो, कोंडीबा ! बाळासाहेब आतां चांगले प्रौढ झाले आहेत. त्यांच्या गळ्यात आतां एखादी सात आठ वर्षांची पोरगी बांधण्यांत काय शहाणपणा ?

कोंडीबा विस्मयानें म्हणाला, “ मग काय त्यांच्या गळ्यांत पोक्त बायको बांधतां काय ? मोठ्या बायकोशीं लग्न करणें पाप आहे, असे तुम्हीच लोक आम्हांला सांगतां ! ”

मधुकरः—हें पहा कोंडीबा ! आम्ही नव्या जमान्याचे लोक जुन्या लोकांच्या शास्त्राकडे बिलकूल लक्ष देत नाही. आम्हां नव्या लोकांचीं शास्त्रेहि नवींच. जुन्या लोकांचे शास्त्र मोठ्या बायकोशी लग्न केल्याने सात पिढ्यांतील पूर्वज नरकांत जातात म्हणून सांगते; तर आम्हां नव्या लोकांचें शास्त्र लहान बायकोशीं लग्न केल्याने ५६ पिढ्यांतील पूर्वज नरकांत जातात असे सांगतें !

कोंडीबाः—असे किरस्तांवासारखे बोलू नका, मधुदादा. तुमचे बाप कसे आणि तुम्ही कसे ? छे, तुम्हांला हे बोलणें शोभत नाहीं.

मधुकरः—हें बघ, कोंडीबा, ते पूर्वीचे शास्त्रकारहि आमच्यासारखींच माणसें होतीं ! अर्थात् त्यांच्या चुका होणे स्वाभाविक होते. त्या चुका किंवा त्यांच्या गोष्टी आज आम्हांला नकोशा झाल्या आहेत, आणि म्हणून त्या आम्ही सुधारणार आहोत.

कोंडीबा दांतांखालीं जीभ चावून म्हणाला, " छे, छे, असें बोले नका, मधुदादा ! तुम्ही तरुण आणि तुमचे रक्त गरम म्हणून तुम्ही असें बोलतां ! पण शास्त्राला आणि देवाधर्माला न मानणें हे पाप आहे शास्त्र तुमच्या आमच्यासारख्या माणसांनीं केले नसून, ते देवांनींच केले आहे ! "

मधुकरः---देव कांहीं दौत, लेखणी घेऊन शास्त्र लिहावयाला बसला नव्हता ! त्याचे शास्त्र ज्ञानाच्या अक्षरांनीं मनुष्याच्या बुद्धीवर लिहिलेले आहे. इतके मात्र खरें आहे की, हे शास्त्र ज्यांना समजतें, त्यांनांच ऋषि म्हणतात. हे ऋषि आमच्यासारखीच माणसें होतीं, म्हणूनच त्यांच्या हातून भूल होण्याची शक्यता आहे. " मुनिना च मतिभ्रमः "अशी म्हण देखील आहे. घरांतले मांजरच अरण्यात जाऊन रानमांजर बनते. आम्ही लोक हजारो वर्षांपूर्वी जन्मलो असलो, तर तुम्हां लोकानी व्यास वसिष्ठाप्रमाणे आमचीहि पूजा केली असती ! म्हणजे एखाद्या मंदिरात आमची स्थापना करून आमच्या अंगावर शेंदूर, गंध वगैरे चढविले असते !

कोंडीबाः—राम ! राम ! तुम्हां लोकांबरोबर बोलायला कोण टिकणार आहे ! मनुष्य इंग्रजी शिकला, म्हणजे तो जात व धर्म सोडतो म्हणतात तेंच खरें आहे. किरस्तांवांची विद्या शिकला म्हणजे मनुष्य किरस्तांवच व्हावयाचा !

मधुकर मोठ्याने हंसून म्हणाला, " कोंडीबा, तुम्हीसुद्धां किरस्तांवांच्या कचाट्यांत कांहीं कमी सांपडला नाहींत. टेबल, मोटार स्टेशन, वगैरे शेंकडो त्यांचे शब्द रोज तुमच्या जिभेवर नाचत आहेत. यांशिवाय सोडावॉटर, लेमोनेड, बिस्किटें हींहि तुम्हांला त्यांच्या हातचीं चालतात, आणि आम्हांला नांवे ठेवतां काय ? तुम्ही गांवाला गेल्यावर तुमच्या जातीच्या लोकांना जर मीं ही हकीकत कळविली, तर तुमची काय अवस्था होईल याचा विचार करा ! "

मधुकराच्या तोंडची ही तंबी ऐकतांच वृद्ध कोंडीबा घाबरला आणि म्हणाला, " मधुकरदादा, जाऊ द्या बोवा ही भानगड ! आम्हां

अज्ञानी लोकांना हे काय कळतें? सगळा जन्म खेड्यांत गेला. तुम्हाला जें बरे दिसेल ते करा ! ”

एवढें बोलून कोंडीबा तेथून निघून गेला. मधुकर हसत हंसत बिछान्यावर पडला आणि मनांतल्यामनांत नव्याजुन्याची तुलना करू लागला. सध्याकाळच्या वेळीं विजय घरीं आला. त्याच्याबरोबर तमण्णाहि होता. घरांत मधुकराला पाहून विजय आश्चर्यानें म्हणाला, “ अरे वा ! कधीं आलास ? अगदीं अनपेक्षित भेट ! ”

तमण्णाहि लागलीच म्हणाला, “ का मधुकर ! सर्व कांहीं ठीक आहेना ? ”

मधुकराने हसून म्हटले, “ आपल्यासारख्या दोस्तांच्या कृपेने सर्व कांही ठीक आहे. ”

नतर तो विजयाकडे वळून म्हणाला, “ काय बुवा, पेपर बरे गेलेना ? ”

विजयः——ठीक गेले. पास होण्याची आशा आहे. फर्स्ट क्लासमध्यें येईन की नाही, हे निश्चित सांगवत नाही. ॲंग्लो सॅक्सन् फॉयलालॉजीचा पेपर जरा बरा गेला नाहीं, आणि प्रोजचा पेपरहि मनासारखा वठला नाही !

मधुकरः——बाकीचे पेपर तर ठीक आहेत ना ? मग काहीं हरकत नाहीं. तू फर्स्ट क्लासमध्ये येशील, याबद्दल मला बिलकूल शका नाहीं. बरें, आतां गांवाकडे कधी चलावयाचे ?

विजयः——म्हणशील तेव्हां !

मधुकरः——बरं, एका महत्वाच्या गोष्टीसबधानें तुझ्याशीं बोलावयाचें आहे.

विजयः——काय ?

मधुकरः——प्रकरण जरा महत्वाचे आहे. रात्रीच्या वेळेला त्याची चर्चा करू. तुला काहीं फराळबिराळ करावयाचा असला तर करायला जा. तोपर्यंत मी या सैतानाशीं थोडेंसे वाग्युद्ध करतो.

मधुकराचें हें भाषण ऐकून तमण्णा दांत बाहेर काढून म्हणाला, " माझी या गोष्टीला तयारी आहे. बोल ! कोणत्या विषयांवर वाग्युद्ध करावयाचे ? विधवाविवाह, जातिभेद, कां परदेशगमन ? "

मधुकर हंसून म्हणाला, " छट्, ह्या गोष्टी आतां अगदीं शिळ्या झाल्या आहेत. त्या संबंधाची चर्चा व्हायची तितकी होऊन चुकली. नव्या काळांतल्या नव्या लोकांनी कांहीं नवेच प्रश्न उपस्थित केले पाहिजेत. "

तमण्णाः—( गंभीर स्वराने ) अलबत् !

मधुकरः—तुझ्या दृष्टीने नव्या गोष्टी म्हणजे ह्या. द्रौपदीसारखे सांप्रतच्या स्त्रियांनींहि पांच पांच नवरे करावेत, म्हणजे सतीत्व कायम आणि त्यांतला एक नवरा टिकेपर्यंत वैधव्याचीहि भीति नाहीं ! अर्थात् विधवाविवाहाचा प्रश्नच उपस्थित व्हावयाचा नाहीं. किंवा दुसरी सुधारणा म्हणजे मुलगी जन्मल्याबरोबर तिचे डोळे फोडावे आणि जिभ कांपावी. त्याच्या योगाने स्त्रीशिक्षणाचें कोणी नावही काढणार नाहीं ! तिसरी सुधारणा, प्रत्येक माणसानें आपले अन्न आपण तयार करून खावे. म्हणजे पूर्वजहि नरकांत जाणार नाहीत आणि आपला जातिधर्महि कायम राहील. अशा प्रकारें तुमच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेल्या सुधारणा तुम्ही समाजापुढे ठेवल्या पाहिजेत !

मधुकराची गंभीरपणे वादविवाद करावयाची इच्छा नाहीं, हे तमण्णानें ओळखलें. तसेंच त्याच्या उपरोधांत किती जहरी खोचदारपणा भरला आहे, हेंहि त्यानें ओळखलें.

तो लागलींच उठून म्हणाला, " मधुकर, थांब. मी इतक्यांत आलोच. एक जरा महत्वाचे काम आहे. "

मधु०:—जरूरीचे काम आहे ?

तमण्णाः—होय.

मधु०:—तूं युद्धाला घाबरला असशील, तर तह कर !

तमण्णाः—मी युद्धाला डरणारा नव्हे. थोडा थांब ! इतक्यांत जाऊन येतांच !

एवढें बोलून तो निघून गेला. थोड्या वेळानें विजय तेथें आला आणि मधुकराला म्हणाला, " तमण्णा गेला कां ? "

मधु०:--( हंसून ) माझीं नवीं शस्त्रास्त्रे पाहिल्याबरोबर तो पळाला ! परत येतो म्हणाला, पण मला आशा वाटत नाहीं.

विजयः—ठीक आहे. आपण आतां गच्चीवर जाऊन बसू.

नतर ते दोघेहि बरोबर दोन खुर्च्या घेऊन वर जाऊन बसले. नतर मधुकर म्हणाला, " काय बुवा ! आतां पुढे काय करावयाचे ठरविले आहेस ? कृतविद्य तर झालास ! "

विजयः--(हंसून) कांहीं नाहीं, अगदीं नुसत्या साहित्यचर्चेत आयुष्य घालवायचे ! मला काव्यचर्चा म्हणजे प्रियेच्या प्रथम चुबनासारखी बहारीची वाटते.

मधुकरः—वाहवा कविराज ! बाकी तुम्हांला खऱ्याखऱ्या प्रियेचे प्रथम चुबन मिळविण्याची मीं व्यवस्था चालविली आहे. मात्र तुझी ही सशरीर कविता तुझ्या पुस्तकांतल्या कवितेची आणि तुझी ताटातूट करण्यास कारणीभूत होते की काय, याची मला भीति वाटते !

विजयः--छे, छे ! तसे होणे शक्य नाहीं. माझ्या खऱ्याखुऱ्या प्रियेला माझ्या पुस्तकांतल्या प्रियेचीहि आवश्यकता वाटल्याखेरीज राहणार नाहीं.

इतक्यांत तमण्गा तेथे येऊन दाखल झाला. त्याला विजय म्हणाला, " हे बघ तमण्गा, हा मधुकर मला प्रियेची जोड मिळवून देण्यासाठीं अगदीं वेडावला आहे. पण मी इतका स्वार्थी कसा होईन ? याला जोंपर्यंत तशी जोड मिळत नाहीं, तोंपर्यंत मीहि याच्याप्रमाणेच एकलकोंडे जीवित कां कठू नये ? कारण, आम्हां दोघांचे आतांपर्यंतचें जीवित जर बहुतेक एकरूप असेंच आहे, तर पुढेंहि ते भिन्न का दिसावे ? ते नाहीं. मधुकर माझ्यापेक्षां तुलाच स्त्रीची फार जरूर आहे. तू लोककल्याणाच्या विचारांत रात्रदिवस इतका गढलेला असतोस, कीं, तुला आपल्या खाण्यापिण्याचेंहि भान राहात नाहीं. दर्शनशास्त्राच्या विचारांत गढलास म्हणजे स्वतःच्या स्थितीचें दर्शन करावयाला तुला सवड मिळत नाहीं. आणि "घृताधार पात्र कीं, पात्राधार घृत "

यासंबंधाचा विचार करीत राहणाऱ्या तुजसारख्या पंडिताला घरांत खरोखर दुपारच्या जेवणाला घृत आहे की नाहीं, याचीहि शुद्धि नसते. तेव्हां यासर्व गोष्टी पाहणारी 'अशी एखादी अर्धांगी तुला अगदीं अवश्य पाहिजे आहे."

मधुः—( हसून ) हें बघ, विजय ! काव्याप्रमाणेच प्रियकरणीच्या सुखाचाहि आस्वाद तुम्हां बड्या लोकांनींच लुटीत जावा, हेंच बरें. आम्हा गरीबांच्या ठिकाणीं तो आनंद उपभोगण्याइतकी नाजुकताच नाहीं. जगांतल्या खडतर परिस्थितीची खडी फोडण्यासाठींच आमचा जन्म झालेला. मात्र यावरून तूं असें समजूं नकोस, कीं, मी तुला निरंतर प्रियकरणीच्या रंगमहालांतच रंग उडवीत राहूं देईन. कधीं कधीं तुला या खडी फोडण्याच्या कर्तव्याकडे देखील खेंचून आणीन.

तमण्णाः—( गंभीरभावानें ) मग तूं काय संसारत्याग करणार, मधुकर !

मधुः—संसार काय मला खातो म्हणून मी त्याचा त्याग करीन ?

तमण्णाः—संसारत्याग करणार नाहीस, तर मग लग्न कां करीत नाहींस ? धड गृहस्थ ना संन्याशी !

मधुः—संन्याशी व्हावयाला संसारत्याग केलाच पाहिजे, असा कांहीं नियम आहे ? उलट मी तर असें म्हणतो, कीं, जो संसारांत राहून लोककल्याण साधतो तोच खरा संन्याशी होय. त्याचप्रमाणें आपल्याजवळची ज्ञानाची पुंजी सगळ्या जगाला देतो तोच खरा ब्राह्मण. विद्या शिकून जो स्वतःचा स्वार्थ साधीत रहातो, तो संन्याशीहि नव्हे आणि ब्राह्मणहि नव्हे. या महत्वाच्या गोष्टीकडे आजच्या ब्राह्मणाचें लक्ष्य जात नाहीं, म्हणूनच आज त्याची अवहेलना होऊं लागली आहे. शिक्षित लोकांवर राष्ट्रदृष्ट्या फार जबाबदारी आहे. शिक्षित धनिकांवर तर त्याहूनहि फार मोटी जबाबदारी आहे.

विजयः—बरोबर आहे. ही जबाबदारी पार पडावी म्हणून मीं आपणाकडून थोडे प्रयत्न करण्याचें योजिलें आहे. मात्र मी जरा थंड प्रकृतीचा माणूस असल्यामुळें तूं हें कार्य माझ्याकडून करून घेतलें पाहिजेस.

मधुः—मीं आपल्या आयुष्याचे ध्येय तर निश्चित ठरविले आहे. खेड्यापाड्यांत शिक्षणप्रसार करणे हे माझे पहिले कार्य आहे. त्यासाठीं प्रत्येक गावांत एकेक शाळा उघडावयाचे मी ठरविले आहे. त्यात मुले आणि मुली या दोहोंनाहि शिक्षण देण्याची व्यवस्था होईल. या शाळेची फी केवळ नांवाची असावयाची. आमच्या या शाळेला टेबल, खुर्च्या वगैरेची काहीं जरूर असणार नाहीं. शाळेला इमारत मिळाली नाही, तर झाडांखाली आमच्या शाळा भरतील; आणि प्राचीन काळच्या शाळाप्रमाणे प्रत्यक्ष पाऊस पडू लागला, म्हणजेच त्यांना सुटी मिळेल. आमच्या शाळेतील शिक्षकाना गांवांच्या बाहेर एखाद्या झोपडीत राहिले पाहिजे. मी स्वतः या शाळांवर देखरेख करीत फिरत राहीन. प्रथम प्राथमिक शिक्षणापुरतीच व्यवस्था करावयाची ! लोकात पुढील शिक्षणाची उत्सुकता दिसूं लागल्यावर दुय्यम प्रतीचे आणि उच्च शिक्षण हाती घ्यावयाचे.

एवढे बोलून मधुकर पुढे म्हणाला, " याप्रमाणे माझी योजना आहे, आणि या कामी तुजकडून मला पैशाचे सहाय्य झाले पाहिजे. "

तमण्णाः—ठीक ! कल्पना तर बहारीची आहे. पण ' थिअरी ' आणि ' प्रॅक्टिस् ' यांमध्ये फार मोठे अंतर असते, हे लक्ष्यांत ठेवले पाहिजे. काव्यमय स्वप्नांत लीन होणे व मनोरथाचे घोडे दवडविणे, हे फारसे कठीण नाही. पण प्रत्यक्ष व्यवहार तितका सुलभ नाहीं इतकेच.

मधुः- तुझे म्हणणे बरोबर आहे. पण म्हणूनच या कामाचे महत्व आहे.

विजयः—पण सध्यां या कामाला जी रक्कम लागेल ती कोठून आणावयाची ? वडिलांची तर काही या कार्याला संमति मिळेल असे मला वाटत नाहीं. आणि समजा, संमति मिळाली, तरी ते प्रत्यक्ष पैशाचे सहाय्य करायला तयार होणार नाहीत.

मधुः—तुझ्या वडिलांनीं तुझ्या खाजगी खर्चासाठी म्हणून जे स्वतंत्र उत्पन्न तुला तोडून दिले आहे, ते तू इकडे खर्च कर !

विजयः—बरे ! पण या संस्थेशी आपण सरकारचा कोणत्याहि प्रकारचा संबंध ठेवणार नसल्यामुळे सरकार तिजकडे सहानुभूतीने पहाणार नाहीं.

मधुः—होय. तसे होण्याचा संभव आहे. पण त्याबद्दल आपल्याला भीति बाळगण्याचें कारण काय ? आपल्याला कांहीं कोणत्याहि चळवळीत पडावयाचे नाहीं. केवळ पवित्र विद्यादानाचे कार्य करावयाचे आहे. वास्तविक हे काम सरकारचे; पण ते आपल्या कर्तव्याकडे नीट लक्ष्य देत नाही. खरोखर शिक्षणप्रसारामुळे प्रजेप्रमाणे सरकारचेहि हित होईल. कारण अज्ञान हे प्रजेप्रमाणेच राजालाहि घातुक आहे. ज्ञानांत केवढे सामर्थ्य ठेवले आहे, याची कुसुमने तर तुझ्या कुटुंबाला चांगलीच खात्री पटवून दिली. तेथे अगदी खळबळ माजून राहिली आहे.

विजयः—ती कशी काय बोवा ?

मधुः—तिचे शिक्षण, तिचे नव्या पद्धतीचे रहाणे आणि तिची ती पुरुषाबरोबर बोलण्याची विनम्र पण निर्भय पद्धति तुझ्या कुटुंबातल्या स्त्री समाजाला बिलकूल आवडत नाही. आणि त्यामुळे त्या तिचा नाना-प्रकारचा छळ करू लागल्या आहेत; तिचा अपमान तर पदोपदी होत आहे. घरांत कुणीहि तिला बरे बघत नाही, की तिच्याशी गोड शब्दहि बोलत नाहीं. तिला कोणते कामहि करू देत नाहीत. यामुळे ती बिचारी एखाद्या कैद्याप्रमाणें तेथ दुःख भोगीत राहिली आहे. घरी गेल्यावर तिच्यावर होत असलेला जुलूम दूर करणे हे तुझे पहिले कर्तव्य आहे. त्याच-प्रमाणे तुझ्या घरांतल्या स्त्रियांची मने शिक्षणाच्या द्वारे तू उन्नत बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजेस. या कामीं तुला कुसुमचेहि चांगले सहाय्य होईल. तिला तू आपली साथीदारीण बनवून घे !

तमण्णाः—ह खबरदार, असें कांहीं करशील तर ! ही अनार्य संस्कृति आम्हा पुरुषांत पसरली आहे तेवढीच पुरे आहे. ती आमच्या अंतः-पुरांत नेऊन तेथे आग लावू नकोस. आमच्या गृहदेवता आहेत त्या स्थितींतच राहू द्या ! त्यांची शांतता नष्ट केल्यानें तुमचे आणि समाजाचेहि कल्याण होणार नाहीं.

तमण्णाचें हे भाषण ऐकून, विजय खवळून म्हणाला, " आमच्या गृहदेवतांवर होत असलेला अन्याय दूर करण्यासाठींच जर आग लावण्याची जरूर असेल, तर ती लावण्यास मी बिलकूल मागें पुढें पाहाणार नाहीं;

आणि इतकें करूनही अन्याय जर दूर होणार नाहीं, तर मी स्वतः त्या आगींत उडी घेऊन जळून मरेन. "

विजयाच्या ठिकाणची ती अन्यायाची चीड पाहून, मधुकराच्या मनाला अतिशय समाधान वाटले. स्त्रीजातीवरलि अन्याय दूर करण्यासाठीं आईबापांचा संबध सोडण्याचा प्रसग आला, तरी तसे करावयास मी मागे पुढे पाहाणार नाहीं, असेहि विजय आपल्या भाषणांत म्हणाला होता. त्याला उद्देशून मधुकर म्हणाला, " सबध सोडण्याची कांहीं आवश्यकता नाहीं; आणि आईबापाचा सबध असा आहे कीं, तो सोडल्याने सुटत नाहीं. हा सबध कायम ठेवूनच तुला आपले कुटुब उन्नत बनविलें पाहिजे. "

विजय थोड्या वेळाने म्हणाला, "मला वाटते, कुसुमचा पुनर्विवाह लावून द्यावा. "

मधु०:—पण तिला योग्य वर कोण आहे ?

विजयः—स्वतः तूंच !

मधु०:—एकदां तिचे स्वतःचे विचार काय आहेत ते तर पहा ! मग पुढें काय करावयाचे ते पाहू !

त्यांचे हें भाषण ऐकून तमण्णा म्हणाला, " काय हा तुम्हां लोकांचा अधःपात झाला आहे. विधवेला ब्रह्मचर्याचा उपदेश करायचा सोडून तिला पाट लावायला प्रवृत्त करतां ? पण लक्ष्यांत ठेवा, हिंदुसमाज अजून मेला नाहीं. त्याची एक दांडगी शक्ति अजूनहि छपलेली आहे. तिला तुम्ही चिडवूं नका ! तसे जर कराल, तर तुमचा सत्यानाश होईल. ध्यानांत ठेवा."

इतके बोलून, तमण्णा पाय आपटीत आपटीतच निघून गेला. विजय आणि मधुकर पोट धरधरून हसू लागले.

# प्रकरण १५ वें.

## प्रमसभव !

आज किती तरी दिवसांनीं विजय घरीं आल्यामुळे जहागीरदारांच्या कुटुंबांत अगदी आनदीआनद माजून राहिला होता. आतां लवकर सूनमुख पहावयाला मिळेल या विचाराने तर जहागीरदारीणबाईच्या आनदाला पारावार उरला नव्हता. चपीहि आज इकडे तिकडे धांवून आपली कार्यदक्षता खूपच दाखवीत होती. काकी आणि कुसुम मात्र या आनदांत सामील झाल्याचे दिसत नव्हते. कुसुमला घेऊन त्या आनदात सामील होणें काकींना अशक्य होतें. बरें, तिला सोडून जाणेंहि त्यांना बरें दिसेना. कुसुमचे मन विजयाला पाहण्यासाठीं अति उतावीळ झालें होतें. पण आपण जर या आनदसमारभांत घुसलों, तर न जाणो, आपणांवर कोणी आणखी कांही भलतेच किटाळ घ्यायचे, म्हणून किंकर्तव्य होऊन ती मूढ बसली होती.

बराच वेळ विचार केल्यानतर कुसुमला बरोबर घेऊन या समारंभांत मिसळणेंच अवश्य आहे, असें काकीला वाटून ती कुसुमला म्हणाली, "कुसुम! चल मजबरोबर. बाळासाहेबाच्या स्वागतासाठी खालीं सगळी माणसें गोळा झालीं आहेत. त्यांच्यात आपणहि जाऊन मिसळू. न गेलों तर ते दिसायला बरें दिसणार नाही. पण तू तेथे सगळ्याच्या मागे उभी रहा. हे असे डोळे फाडून काय पहातेस ? बायकाची नजर जरा खालीं असावी. नाहीं तर तेथेंहि अशी पाहात राहशील. मी परत बोलावल्याबरोबर माझ्या मागे निघून ये ! बोलत कां नाहीस ? दांतखिळी बसली आहे काय ? "

कुसुमः—काय बोलू ? मला असे लाजेचे खोटे ढोंग करण्याची संवय नाहीं.

काकीः—अग अवदसे ! बायकांनीं खालच्या नजरेने पाहणें म्हणजे लाजेचें ढोंग होय ? तुला बोलायला शरम तरी कशी वाटत नाहीं? अग ! इतकी

लाजलज्जा सोडलीस ? खुशाल पुरुषाकडे टकमकां बघत रहातेस ? तुझ्या मर्जीला येईल तसे कर ! पण ऊठ ! एकदा तिकडे जाऊन मर !

एवढे बोलून काकी उठल्या आणि खाली निघून गेल्या. कुसुमहि तिच्या मागून तिकडे गेली.

त्या समारभात काकी दिसल्या नाहीत हे पाहून माईसाहेब यमुनेला म्हणाल्या, " पाहिलस, यमुने ! माझा विजय आला, तर त्याचे स्वागत करावयाला काकी काही खाली आल्या नाहीत. तिची ती काळतोंडी भाची आणि ती खुशाल खोलीत पडून राहिली आहेत. "

यमुना ही फार धूर्त बायको होती. दुबळ्या मनाच्या माईसाहेबांची खुशामत करून तिने त्यांची मर्जी संपादन केली होती. तिच्या या खुशामत-खोरपणामुळे तिच्या शेकडा अन्यायाकडे आणि अनाचारांकडे माईसाहेब दुर्लक्ष करीत होत्या. माईसाहेबाच्या रोषाचे धोरण यावेळेला तिला निश्चितपणे कळले नाही, यामुळे ती थोडा वेळ स्तब्ध होती. कारण त्याचे निश्चित धोरण न कळता आपण जर काकींच्या अंगावर धूळ फेकली, तर ती आपल्याच डोळ्यांत परत जावयाची अशी तिला भीति वाटत होती. म्हणून ती मोठ्या सावधपणाने माईसाहेबाना म्हणाली, " काकीनी केव्हाच खाली यावयाला पाहिजे होते, पण त्या अजून आल्या नाहीत. "

पण ती याप्रमाणे बोलत आहे, तोच काकी येथे येऊन दाखल झाल्या. त्यांच्यामागे कुसुमहि होती. त्याना पाहून माईसाहेब यमुनेच्या कानांत हळूच म्हणाल्या, " अग माझेच चुकले ती आज गोषांत बसून राहावयाची नाही. विजय आल्यावर ती गोषांत राहील ? आपल्या लाडक्या काळतोंडीला ही बरोबर घेऊन आलीच. पण सटव्यानो, विजय कोणापासून झाला ? माझ्यापासूनच ना ? "

यमुनाः—( मान हालवून ) खरेच, माईसाहेब ! तुम्ही होतां म्हणूनच विजय आम्हाला दिसला. भगवान् आमच्या विजयाला शतायू करो ! पण तें पाहिलत का, माईसाहेब ! ती मडमहि खालीं आली की ! कशी बाळासाहेबांच्या नजरेला नजर भिडविते. त्यांना आपल्या जाळ्यांत ओढण्याचा तर या कवटाळणिचा विचार नाही ?

माईसाहेबांनीं कुसुमकडे पाहिले, तों तिच्या नेत्रांतच काय, पण रोमरोमांत विनम्रता भरलेली त्यांना दिसली. म्हणून त्या यमुनेला जरा खोंचून म्हणाल्या, " माझा बाळ कांही तसा नाहीं हो. त्याच्या ठिकाणीं बापाचे ढग बिलकूल नाहींत. "

या शब्दांनीं यमुनेच्या उरांत सुरी खुपसल्याप्रमाणें झाले. तोंडावर पसरलेली बेशरमपणाची काळिमा कशी छपवावी, याचा यावेळीं ती विचार करूं लागली. इतक्यांत विजय तेथे येऊन दाखल झाला. त्याला पाहिल्याबरोबर 'दादा आला' 'दादा आला' म्हणून विलास आणि मनू ओरडत त्याच्याजवळ गेलीं. बाळासाहेबानी त्या दोघाच्याहि तोंडावर हात फिरवून त्यांचे मुके घेतले. मनूला तर त्याने मुका घेतल्यावर उचलून कडेवर घेतले. नतर तो आपल्या सापत्न मातेजवळ गेला आणि तिच्या पायांवर अत्यंत आदरपूर्वक त्याने आपले डोके ठेवले.

त्यावेळीं माईसाहेब त्याला हसत हसत म्हणाल्या, " अरे, अगोदर देवाच्या पायां पडून ये ! मग माझ्या पायांवर डोकें ठेव ! "

विजयः—( हसून ) आई. तुझ्यापेक्षां मोठा देव कोण आहे ? मी तुला देव समजतो.

माई०:—तुम्ही इंग्रजी शिकलेलीं पोरें देवदेवतांना मानीत नाहीं पण आम्ही आहोत तोंपर्यंत तुला तरी देवदेवता मानल्याच पाहिजेत.

नमस्काराची क्रिया सपविल्यावर विजय उभा राहून म्हणाला, " काय करूं म्हणतेस, बोल ! "

माई०:—देवघरांतल्या देवांच्या पायां पडून ये.

विजयः—त्या धातूच्या तुकड्यापुढें मी आपले डोके लववीत नाहीं. माझा खरा देव तूंच; आणि हे बघ मी फिरून तुझ्या पायांवर डोकें ठेवतों. आणि ऐवढें बोलून तो तिच्या पायांवर पुन्हां विनम्र झाला.

यानतर माईसाहेबांनी त्याला आपल्या हातानें उठवून म्हटलें, " खरोखर कारे, तुला आईपेक्षां कोणीच मोठा देव दिसत नाहीं ? " नंतर ती त्याच्या पाठीवर हात फिरवीत फिरवीत म्हणाली, " तूं

इग्रजी शिकून इतका मोठा शहाणा झालास, तरी तुला मी मोठी वाटतें ! पण तुझी बायको आल्यावर तुझी आजच्यासारखी बुद्धी रहाते कीं नाहीं तें मी पाहीन.

विजयः—(हसून) एवढ्यासाठींच तर मी बायको करीत नाहीं!

बायकोचें नांव काढतांच विजयाला कुसुमचे स्मरण झालें आणि चोहींकडे नजर फेकून तो माईसाहेबांना म्हणाला, " माई, काकी कोठें आहेत ? दिसत नाहींत त्या ! "

माई०:—अरे, येथेच होती इतका वेळ! गेली असेल कोठें भाचीला घेऊन. चपे, ती आपल्या खोलींत असली तर तिला घेऊन ये बरे !

चंपी तिला बोलवावयाला धांवणार, इतक्यांत विजय तिला थांबवून म्हणाला, " थांब ! त्याना बोलावून आणण्याची कांहीं जरूरी नाही. मीच तिकडे जातो. "

त्याला नको म्हणण्याची कांही माईसाहेबांची प्राज्ञा नव्हती. पण काकीवर त्याचे एवढे प्रेम पाहून ती मनांतल्या मनांत अगदीं नाखूष झाली !

यमुनेला वाटत होते की, विजय आपल्यालाहि नमस्कार करील. पण तो असे कांहीं न करतां काकीकडे गेला, हे पाहून तिचे मन फारच संतप्त झालें.

विजय काकीजवळ गेल्यावर म्हणाला, " काकी ? "

काकी झटकन् खोलीच्या बाहेर येऊन म्हणाल्या, " ये बाळ! विजया. "

विजयाने चटकन् तिच्या पायांवर डोकें ठेवले. काकीने सद्गदित कंठाने त्याला आशीर्वाद दिला.

विजय कुसुमला पाहण्यासाठीं अगदीं उतावीळ झाला होता. तो काकींना म्हणाला, "काकी आंत चल, मला बाहेरच्या बाहेरच वाटे लावतेस काय ? "

काकी जरा शरमून म्हणाल्या, "नाहींरे बाळ! आंतच चल. तुझी आई तुझ्यावर रागावेल म्हणून मी तुला आंत चल म्हणावयाला भीत होतें. "

विजयः—ती नाखूष तर होईलच; पण तिची नाखुषी नाहींशी करावयाला मला किती वेळ लागेल? ”

यानतर तीं उभयता आंत गेलीं. विजयाने आंत पाऊल ठेवताच एक अप्रतिम लावण्यवती षोडशवर्षीय बालिका सगमरवरी पुतळ्याप्रमाणे तेथें निश्चिल उभी असलेली त्याला दिसली. विजयाला पाहिल्याबरोबर तिच्या चर्येवर लज्जेची छटा मोठ्या बहारीनें तळपू लागली. विजयहि तिला पाहून अगदी मुग्ध होऊन गेला. त्याला ती साक्षात् उषेचीच मूर्ति आहे असे वाटले.

विजयाला पाहून कुसुमचेहि हृदय अगदीं उल्हसित झाले. कारण तोहि कांही कमी सुदर नव्हता. शिवाय त्याच्या मुखावर त्याच्या बुद्धिमत्तेची आणि त्याच्या हृदयस्थ सद्गुणाचीहि छटा तळपत होती. उभयतांचे दृष्टिमीलन होताच कुसुम अतिशय लाजली आणि त्याबरोबरच तिची मान खालीं झाली. यावेळी तिच्या ओष्ठावर अप्रतिम हास्यरेषा विलसत होती.

दोघाचेहि दृष्टिमीलन काकीच्या काकदृष्टीपासून छपून राहिले नाहीं. विजयाचा मुखचद्र अवलोकन करण्यासाठी कुसुमने आपली मान दोन वेळां वर केली, हेहि काकीने पाहिले.

तिसऱ्या खेपेला मात्र त्यांनीं कुसुमकडे तीक्ष्ण दृष्टि फेकली. ती कुसुमच्या, त्याचप्रमाणे विजयाच्याहि नजरेपुढे छपली नाही.

यानतर कुसुम चटकन् मागच्या दरवाजाने बाहेर पडली. त्याबरोबर विजयहि काकीचा निरोप घेऊन समोरच्या दरवाजाने बाहेर पडला. पण बाहेर आल्यावर दोघाचेहि पुनः दृष्टिमीलन झाले. कुसुमच्या विशाल नेत्रांत केवढी स्निग्धता आणि आत्मीयता भरून राहिली आहे, हे आतां विजयला स्पष्टपणे दिसून आले. तिच्या डोळ्यांतच नव्हे, तर तिच्या सर्व अगांत तारुण्य नुसतें मुसमुसत होते. यानतर कुसुम तेथे क्षणभरहि न थांबतां पलीकडे असलेल्या स्त्रीसमाजांत जाऊन मिसळली. ह्या लावण्यदेवतेनें विजयाचे हृदयच नव्हे, तर त्याचीं सर्व इंद्रियेही बदीवान करून टाकलीं. तो जिकडे जिकडे पाही तिकडे तिकडे त्याला कुसुमच दिसे. खरी कुसुम

त्याच्या नजरेपुढून निघून गेल्यानतर तो एक दीर्घ निश्वास सोडून तेथून गेला. नतर तिच्याशी आपल्याला नियमित बोलणे चालणे कसे ठेवतां येईल आणि तिच्या आपल्या दररोज भेटी कशा होत जातील, यासबधी तो आपल्या मनाशी विचार करू लागला. तिला सगळ्याकडून त्रास होतो हे त्याला ठाऊक होते. अशा स्थितीत तिला त्याच्या भेटीची अत्यत आवश्यकता होती, व त्यालाहि तिच्या भेटीची अगदी जरूर होती. पण हा योग जुळावा कसा? याचाच त्याला विचार पडला.

त्याने पुष्कळ कल्पना काढल्या. पण त्यांतली एकहि त्याला पटेना. तिच्या गावींच जर आपण तिला अगोदर भेटलो असतो, तर आज अशी अडचण पडली नसती असे त्याला वाटले. पण आतां त्याचा काय उपयोग होता? या वेळी मधुकराने आपल्याला मुद्दामच टाळले असावे असा विचार क्षणैक त्याच्या मनात येऊन त्याला त्याच्याविषयीं असूया वाटू लागली. ही असूया मनातून दूर करण्याचा त्याने बराच प्रयत्न केला. पण त्याचा काहीं उपयोग झाला नाही. याच कारणामुळे वरील गहन प्रश्न सोडविण्याच्या बाबतींत मधुकाराचे सहाय्य घेणेहि त्याला बरे वाटलें नाही.

काकीचे दर्शन घेऊन परत आल्यानतर विजयाच्या चर्येत झालेला फरक सर्वांना स्पष्ट दिसून आला. त्यामुळे अनेकजणी अनेक प्रकारचें तर्क करू लागल्या. माईसाहेबांना वाटले, काकीने त्याला कांहीं तरी एकाचे दोन सागितल असावे, म्हणून याची चर्या अशी अप्रसन्न झाली. कुसुमनेच कांही तरी ह्याच्यावर मोहिनीमत्र टाकला असावा, असे बाकी सगळ्या जणांना वाटले.

यानतर काकीची आणि माईसाहेबाची ज्या वेळेस भेट झाली, त्यावेळी माईसाहेब, माझ्या पोराला तू काही तरी एकाचे दोन सांगितलेस असे म्हणून, त्यांना त्या नाही नाही ते बोलल्या. काकींनी आपल्याकडून पुष्कळ निर्वाळा दिला. आणाशपथाहि वाहिल्या, पण त्याचा कांही उपयोग झाला नाही. माईसाहेबांच्या मनातला सशय तसाच कायम राहिला. इकडे बाकीच्याहि सगळयाजणी या सबधात उठता बसता कुसुमला

कुत्सितपणाचे टोमणे मारूं लागल्या. बिचारी कुसुम हे सर्व मुकाट्यानें सहन करीत होती.

यानंतर तीन चार दिवस झाले, तरी विजयाला कुसुमचें पुनः दर्शन झाले नाहीं. यामुळे त्याचें मन अगदीं असंतुष्ट झालें. भगवान् कामदेवाने आपणाप्रमाणेच तिलाहि शरविद्ध केलें असेल, अर्थात् तीहि आपल्या भेटीसाठी उतावीळ झाली असेल, आणि त्यामुळें सधी साधून कोणत्या तरी उपायाने ती पुनः आपली भेट घेईल, असें त्याला वाटले. पण ही समजूत चुकीची असल्याचे त्याला लगेच कळून आलें. कारण यापुढे ती त्याच्या वाऱ्यालाहि उभी राहिनाशी झाली. इतकेंच नव्हें, तर तो असेल तेथें ती फिरकत सुद्धां नव्हती. लांबून तो येतो आहे असे पाहिलें कीं, ती मावशीच्या खोलीत पळून जाई. उलटपक्षीं, त्यालाहि काकींच्या खोलीकडे वरचेवर जाणे लज्जास्पद वाटूं लागले. कारण आपण वरचेवर तिकडे जात गेलो, तर घरांतल्या बायका आपल्याविषयीं भलताच संशय घेतील अशी भीति त्याला वाटूं लागली. बरें ही भीति, दूर करूनहि तो एखाद्या वेळेस त्यांच्या खोलींत जाई, तोंच त्याला पाहिल्याबरोबर कुसुम तेथून बाहेर पळे. काकीची खोली म्हणजे पूर्वीं त्याचें आश्रयस्थान असे. पण त्याच खोलींत आतां अधिक वेळ थांबण्याची त्याला पचाईत वाटूं लागली. काकीला तो वरचेवर आपल्या खोलींत आलेला बरें वाटत नव्हते. ती त्याला त्रासल्यासारखी करी आणि म्हणे, " विजय, मी तुला हात जोडून सांगते तूं बाबा वरचेवर माझ्या खोलींत येत जाऊं नकोस. तुला माझ्याशिवाय करमत नाही हे खरे आहे. पण तुझी आई नाहीं नाही तीं कुभांडें रचते, बाबा ! " आपली आवडती काकी इतकी निष्ठुर बनायला आपली आई कारणीभूत झाली हें जरी विजय जाणून होता, तरी काकीचा देखील त्याला कमी राग आला नाहीं.

# प्रकरण १६ वें.

## भारत वाचन !

कुसुमची भेट व्हावयाला जो जो अडथळे उत्पन्न होऊं लागले, तो तो भावनाप्रधान विजयाचे हृदय तिच्या भेटीसाठीं अधिकच वेडावत चाललें. कुसुमच्या दूरदर्शी वर्तनामुळेच केवळ त्याच्या उथ्ळूपणाला थांबून धरलें होतें. अगोदर ती त्याच्या समोरच येत नव्हती; आणि एखाद्या वेळी चुकून भेट झालीच. तर ती तत्काळ त्याच्या समोरून अदृश्य होत होती. यामुळे विजयाचा उत्साहहि दिवसानुदिवस बराच कमी होऊं लागला; आणि त्यानंतर आपल्या घरात राहणारी ती एक निराश्रित विधवा आहे या गोष्टीची जाणीव त्याच्या मनाला हळूहळू होत गेली. विधवाविवाहासंबधानें स्वतःचीं मतें काय पाहिजे तीं असोत, पण या बाबतींत खुद्द कुसुमचे मत काय आहे हे कळल्याखेरीज तिच्याकडे प्रेमदृष्टीनें पाहणे म्हणजे तिचा भयंकर अपमान करणे होय, हा शहाणपणाचा विचार देखील आतांच त्याच्या मनाला पटला. तिच्या मनांत आपल्याविषयीं खरोखर प्रेम असले आणि पुनर्विवाहाला ती अनुकूलहि असली, तथापि त्यासंबंधीं आपला मनोभाव व्यक्त करण्याचा समय आणि स्थळ हें नव्हें; कारण ती आज आपली आश्रित असल्यामुळे तिच्याविषयी स्वतंत्र विचाराला येथे वाव नाही; तेव्हा आपण तिच्याशी जी वागणूक सध्यां चालविली आहे, ती या दृष्टीनें अत्यंत चुकीची आहे हे सुद्धां सूक्ष्म विचारांतीं त्याला कळून आलें. याखेरीज ती आपल्याशीं मोकळेपणानें वागत नाहीं, इतकेंच नव्हे, तर विशेष सावधगिरीनेच वागते, याचे कारण देखील आपल्या घरांतली परिस्थितीच होय; ती जर अशी सावधगिरी घेणार नाहीं तर तिच्यावर आपल्या घरांतल्या अशिक्षित बायकांकडून केवढा गहजब होईल, इत्यादि गोष्टी त्याच्या मनांत येऊन तो तिला दोष देईनासा झाला. यानंतर तो आपलें मन आंवरण्याचा मोठ्या चिकाटीनें प्रयत्न

करू लागला. एवढेच नव्हे, तर आपल्या या रिकाम्या मनाला कोणत्या तरी उद्योगांत गुतवावे, असेहि त्याला वाटू लागले.

आपल्या कुटुबातल्या स्त्रियाची मने उन्नत करावी यासबधीं पुण्यांत मधुकराने आणि त्याने बरीच चर्चा केली होती. तोच विषय आतां प्रथम हातीं घ्यावा असे त्याने ठरविले.

एके दिवशीं त्याच्या आईसभोवती घरातल्या सर्व बायका घोळका घालून बसल्या असताना, आपल्या कार्याच्या उपक्रमाला ही सधि फार चांगली आहे, असा विचार त्याच्या मनांत येऊन तो आईला म्हणाला, " माई दुपारचे वेळी तुम्ही सगळ्या जणी रिकाम्याच असतां; त्यावेळीं कांही तरी एखादे चागले पुस्तक तुम्हाला वाचून दाखवावे असे मी ठरविले आहे. उगीच काहीं तरी रिकाम्या गप्पागोष्टी करण्यापेक्षां पुस्तकातल्या चांगल्या गोष्टी ऐकण्यात तुमचा वेळ गेला, तर ते बरे नाही का होणार ? "

पण त्याच्या या सूचनेने कोणालाहि आनद वाटला नाही. खुद्द माईसाहेबांना देखील त्यासबधाची मोठीशी उत्सुकता दिसली नाहीं. पण मुलाचे मन नाराज होऊ नये, म्हणून त्याच्या म्हणण्याला कशी तरी आळेबळें समति देऊन त्या म्हणाल्या, " बरे आहे. उद्यांपासून तू या दिवाणखान्यांतच बसून वाचीत जा ! आम्ही सगळ्या जणी ऐकत जाऊ. "

त्याला खूष करावे म्हणून यमुनाहि म्हणाली, " हो आम्ही सगळ्या जणीं ऐकू, बाळासाहेब ? मात्र तुमचे ते इग्रजी फिंग्रजी नसावे. त्यांत काय असते माती ! बाळू इग्रजी पुस्तक वाचतो ते मी ऐकते. त्यांत सगळ्या घोड्याच्या नी गाढवाच्या गोष्टी ! "

एवढे बोलून बाळोबाच्या आईकडे पाहून यमुना हसली.

रमाः—खरेच इंग्रजी बुकांतल्या गोष्टी कांहीं चांगल्या नसतात. मंजुघोषा, मदनमजरी, गुलजार चद्री अशीं पुस्तकें वाचून दाखवीत जा.

मणिक०:—या सगळ्या गोष्टी महाभारतातल्या आहेत नाहीं ग ?

इतक्यात माईसाहेब मध्येच मोठ्या उत्सुकतेने म्हणाल्या, " हो हो, विजय, तूं महाभारतच वाचून दाखवीत जा, म्हणजे झाले. करमणूकच्या

करमणूक होऊन शिवाय देवाधर्माची नांवें कानीं पडल्यामुळें पुण्यही लागेल.

विजयः---( हंसून ) ठीक आहे. महाभारतच सुरू करितों. पण तुम्हीं सगळ्यांनीं लक्षपूर्वक ऐकलें पाहिजे.

यमुनाः---हो, हो, आम्ही ऐकूं.

बोलतां बोलतां सगळया जणीं माईसाहेबांना येऊन अगदीं चिकटल्या.

बाळोबाची आई म्हणाली, "हें एक मध्येंच नवे लचांड उत्पन्न झाले !"

रमा---खरेंच बाई ! दुपारच्या वेळेला जरा आराम घ्यायचा. त्याच्यांत हें विघ्न उपस्थित झाले. खेळावयाचे तर बंद पडलेंच; पण बोलायचेंहि त्याबरोबर बंद पडलें. आपल्याला तर बाई झोप येणार ! बाळासाहेबांनीं हें काय काढले कोण जाणे ?

यमुनाः---अग, इतकी कां घाबरत्येस ? बाळासाहेब लहरी आहेत. त्यांची ही लहर दोन दिवसात नाहींशी होईल.

ठरल्याप्रमाणे महाभारताच्या वाचनाला सुरवात झाली. स्त्रीश्रोतृवर्ग बाळासाहेबांच्या समोर बसला होता. आसनमांडी ठोकून, महाभारताची पोथी पुढे घेऊन बसलेल्या बाळासाहेबांनीं एकवेळ चोहोंकडे नजर फेकली. सगळ्या जणीं त्याला दिवाणखाण्यांत बसलेल्या दिसल्या. एकटी काकी मात्र दिवाणखाण्याच्या दाराच्या बाहेर बसली होती. तिच्यामागें आणखी एक श्रोता बसलेला दिसला. ती कुसुम असावी हें बाळासाहेबांनीं ओळखलें. हळूंच त्याने एक श्वास सोडला आणि वाचावयास सुरुवात केली.

वाचतां वाचतां त्याच्या भावना अगदीं प्रज्वलित झाल्या आणि तो महाभारताच्या वेळची भौगोलिक स्थिति, त्या इतिहासापासून घ्यावयाचा बोध, त्यांत ग्रथित केलेलीं समाजशास्त्राचीं तत्त्वें आणि त्यांतील व्यक्तींचीं चरित्रें इत्यादि गोष्टी आपल्या श्रोतृवर्गांना समजावून सांगूं लागला. तसेंच त्यावेळीं समाजांत जातिभेद, स्पर्शास्पर्श, बालविवाह, इत्यादि वाईट गोष्टी

नव्हत्या, विधवाविवाहाला पण मनाई नव्हती, वगैरे वगैरे प्रकारचीं आपल्या सामाजिक सुधारणेसबंधाचीं आवडतीं मतें त्या ग्रथांतलि उदाहरणें त्यांच्या डोळ्यांपुढें ठेऊन त्यांना पटवू लागला.

वरील गोष्टी समाजांत मागून प्रचलित झाल्या, त्यामुळें समाजाची कशी भयंकर हानी झाली हे सांगतांना तर त्याचें वक्तृत्व इतकें बहारीचे झालें कीं, तें ऐकून त्या अशिक्षित बायका देखील अगदीं चकित झाल्या. ग्रथ वाचन संपवून जेव्हां तो उठला, त्या वेळीं दाराच्या फटींतून एक कमल सदृश नेत्रयुग्म आपल्याकडे लागलेले आहे हे त्यानें पाहिले. ते नेत्रयुग्म कुसुमचेच होते. बाळासाहेबांची नजर तिच्या नजरेला भिडतांच तिची मान चटकन् खालीं झाली. त्यांच्या वक्तृत्वाने बाकीच्या स्त्रिया इतक्या गुग होऊन गेल्या होत्या की, सर्व जणी त्याच्याकडे टकमक पहातच राहिल्या.

वाचन सपल्यावर, " बस, आज इतकेच पुरें." असे म्हणून तो जों उठून उभा राहिला, तों तसाच दिवाणखान्याच्या बाहेर पडला. कोणाच्या उत्तराचीहि त्याने पर्वा केली नाही.

जातेवेळीं कुसुमच्या सलज्ज नजरेला त्याची नजर पुन्हां भिडली. यमुनेनें चुटक्या वाजवीत वाजवीत जांभई दिली. रमा मणिकर्णिकेला जोरानें ढकलून हंसत हसत म्हणाली, " अग, तू तर एवढा वेळ डुक-ल्याचें घेत होतीस !"

बाळोबाची आई म्हणाली, " सुटलों बाई एकदांचे !"

माई०:—यमुने, जरा यो पत्त्याचा डाव आण पाहूं ! सोंगट्या खेळा-बयाला आतां वेळ नाहीं.

काकी हळूं हळूं तेथून निघून गेल्या. कुसुम त्यांच्या अगोदरच गेली होती.

# प्रकरण १७ वें.

## मधुकराची पाठशाळा !

विजयानें इकडे घरांत वाचनद्वारां स्त्रियांना शिक्षण सुरू केले असतां, तिकडे मधुकरहि स्वस्थ बसला नव्हता. त्याच्या बापाची संस्कृत पाठशाळा होती. तिलाच त्याने आपल्या शिक्षण-प्रसाराचें केंद्र बनविलें. या पाठशाळेचीं सूत्रे मधुकराने हातीं घेतल्या-पासून तिच्या शिक्षणाची पद्धति त्याने सर्वस्वीं बदलली. विद्यार्थ्याला कोणत्या तरी एकाच विषयाचे शिक्षण द्यावयाचें ही पूर्वीची पद्धत होती, तिच्या जागी आवश्यक अशा बहुविध विषयांचें शिक्षण देण्याचे मधुकराने ठरविले. तो म्हणे,\ ' मनुष्याचें ज्ञान बहुमुखी असल्यावांचून त्याच्यांत विचारशक्ति उत्पन्न होत नाहीं आणि जगाच्या परिस्थितीचे आकलनहि त्याला होत नाहीं. संस्कृत आणि मातृभाषा यांचें अध्ययन तर या पाठशाळेंत उत्कृष्ट झालेच पाहिजे, आणि त्याबरोबर गणीत, भूगोल, इतिहास, पदार्थविज्ञान आणि इंग्रजी भाषा इत्यादि विषयांचेंहि शिक्षण या पाठशाळेंत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्याला घेतले पाहिजे. या गोष्टीला जी कबूल नसेल, अशा विद्यार्थ्यांना मी या पाठशाळेंत दाखल करून घेणार नाहीं.'

त्याचे हे विचार ऐकून गणपति नावाचा एक विद्यार्थी म्हणाला, "मग हें तर हायस्कुल झाले! संस्कृत पाठशाळा कसली ? म्लेच्छभाषा शिकावयाची, तर या शाळेत येण्याची जरूर काय ? "

त्याचें हें भाषण ऐकून मधुकर म्हणाला, "होय! आमच्या या शाळेत यापुढे म्लेंच्छ भाषेचे शिक्षण राहणार! ज्यांना पसत नसेल, त्यांनीं येऊं नये. "

गणपती यावर कांहीं बोलला नाहीं. मधुकर पुढें म्हणाला, "तसेंच या शाळेंत शिक्षण जरी फुकट मिळत असले, तरी शिक्षण समाप्त झाल्या-

नंतर प्रत्येक विद्यार्थ्याला गुरुदक्षिणा द्यावी लागेल. इतकेंच नव्हे, तर अशा प्रकारचा त्याला आरंभींच करार लिहून द्यावा लागेल."

त्याचे हे भाषण ऐकून गणपती डोळे फाडून म्हणाला, "हा तर फार कडक नियम आहे बोवा! तुम्ही मागितलेली दक्षिणा आमच्या ताकदीच्या बाहेर असली आणि आम्हीं ती दिली नाहीं, तर तुम्ही आमच्यावर फिर्याद कराल! कारण आमच्याकडून तुम्ही आजच करारनामा लिहून घेत आहांत."

मधु०:–(हंसून) भिऊ नकोस, गणपती! मी कांही प्राचीन ऋषीं-प्रमाणें भलतीच गुरुदक्षिणा मागणार नाही, कीं, त्यासाठीं वरततूचा शिष्य कौत्साप्रमाणे तुला राजा रघूचा आश्रय घ्यावा लागेल! माझी गुरुदक्षिणा फार थोडी आहे. जे विद्यार्थी माझ्या शाळेत सर्व शिक्षणक्रम संपवून बाहेर पडतील त्यांना, मी खेड्यापाड्यांतून ज्या शाळा स्थापन करणार आहें त्यांतून मोफत शिक्षकाचे काम करावे लागेल. त्याला तेथे फक्त अन्नवस्त्र मिळेल. विवाहित विद्यार्थ्यांना मी आपल्या शाळेत मुळीच घेणार नाही. आमच्या संस्थेत शिक्षण घेत आहेत तोपर्यंत विद्यार्थ्यांनीं अविवाहित राहिलेच पाहिजे. शिक्षणक्रम संपूर्ण झाल्यावरच विवाह करावा, अशी आमच्या धर्मशास्त्राचीहि आज्ञा आहे."

त्याच वेळेला एक मुसलमान गृहस्थ आपल्या मुलाला घेऊन तेथें आला. त्याला पहातांच मधुकर उठून उभा राहिला आणि त्यास नमस्कार करून, त्याला शेजारच्या खुर्चीवर त्याने बसवून घेतलें.

थोडेसें इकडचें तिकडचें बोलणें झाल्यावर मधुकरानें विचारलें, "कोणीकडे आलांत?"

मुसल०:–मी आपल्या मुलाला तुमच्या शाळेंत दाखल करूं इच्छितों.

मधु०:—ठीक आहे.

इतक्यांत गणपती मध्येंच म्हणाला, "गुरुजी! वेदशाळेंत मुसल-मानाला घ्यावयाचें?"

मधु०:—काय हरकत आहे?

गणपतीः—मग वेदशाळेचा पवित्रपणा कसा राहील?

मधुकरः—येथे कोणालाहि विद्या शिकण्याला मनाई नसणें हाच खरा पवित्रपणा होय. बाकी, तुम्हांला जर एखाद्या मुसलमान गृहस्थाच्या मुलाजवळ बसण्यांत अपवित्रता वाटत असेल, तर या गृहस्थाला देखील आपल्या मुलाला तुमच्यासारख्या काफराजवळ बसविण्यांत तसाच अपवित्रपणा वाटणेंच शक्य आहे. तुमच्या शास्त्रांत स्पष्ट म्हटले आहे की, " सर्व देवमयोऽतिथिःसर्वत्राभ्यागतो गुरुः " पण तुमचे वर्तन याप्रमाणे आहे काय? तुमच्या सोयीला पडेल तेथे शास्त्रवचन पाळतां, आणि सोयीला पडणार नाहीं तेथे ते पायाखाली तुडवितां ! सारांश तुमचा धर्माभिमान म्हणजे केवळ ढोंग आहे. तुम्हांला वाटेल तर तुम्ही माझ्या शाळेत राहा, नाहीं तर चालते व्हा ! मी या मुसलमान गृहस्थाच्या मुलाला आपल्या शाळेत जरूर घेणार."

हा मुसलमान गृहस्थ एका खेड्यात राहणारा असून, तो भाऊसाहेबाची जमीन खडान करीत होता. यामुळे मधुकराची आणि या गृहस्थाची चांगली ओळख होती. त्याचे नांव ' अबदुलभाई ' होते, पण मधुकर त्याला काका म्हणत असे. बोलतां बोलतां भाऊसाहेब जहागीरदारासंबंधीचे बोलणे निघून मधुकर त्याला म्हणाला, " काका, जहागीरदारसाहेबाना भेटला होतां ? "

अबदुलभाईः—होय. त्यांच्याकडेच माझा मुक्काम आहे. लवकरच माझ्या थोरल्या मुलाचें लग्न होणार आहे. त्यासाठीं त्यांना आमंत्रणहि दिले आहे. तुम्हीहि जर या समारंभाला याल, तर मजवर तुमचे पुष्कळच उपकार होतील. मी या समारंभासाठीं हैद्राबादेहून एक नामांकित गाणारीण बोलाविली आहे.

मधुकरः—असे असेल तर मग मी तुमच्या समारंभाला मुळींच येणार नाहीं व विजयाला देखील येऊ देणार नाही. आम्ही दोघेहि नायकिणीचें गाणे ऐकत नाहीं.

अबदुलः—(विस्मित होऊन) हे काय बोवा! गाणे ऐकण्यांत देखील दोष आहे ?

मधु०:—हो पुष्कळच आहे. कारण गाणाऱ्या स्त्रिया वाईट आचरणाच्या असतात. यासाठीं त्यांचीं गाणी करण्याची पद्धत समाजांतून बंद झाली पाहिजे, असें आमचे मत आहे-

अबदुलः——यासबधाने मी आपणांशी कांही बोलूं ?

मधुकरः—खुशाल !

अबदुलः——समजा, आपल्याला एक घर बांधावयाचे आहे. त्यासाठीं आपल्याला एक उत्तम सुतार पाहिजे आहे. तर तसा सुतार मिळाल्यावर त्या सुताराची तुम्ही चालचलणूक पाहणार काय ? तसेच, आपण ज्यांच्याजवळून कापड घेतो ते कोष्टी, किंवा आपले जोडे बनवितात ते चांभार, यांचे वर्तन कसे असते ते आपण कधी पाहतो काय ? त्यांनी बनविलेली चीज कशी आहे एवढेच आपण पाहातो. हाच नियम गाणारणीला लावण कां लावू नये ? तिचे गाणे चांगले असल्यास तिची चालचलणूक कशी आहे, हे आपल्याला पाहण्याची जरूर काय ? तिचे गाणे चांगले असले म्हणजे बस्स् ! मोठी पतिव्रता आहे पण तिचे गाणे कवडीमोल आहे, तर अशीचा समारभांत उपयोग काय ? कविवर्य रवींद्रबाबूंनी देखील अशा प्रकारचे आपले विचार कोठेंसे नमूद केल्याचे माझ्या वाचण्यांत आहेत. ते म्हणतात, "हावऱ्याचा पूल बांधणारा एंजिनीयर दरोडेखोर होता, म्हणून तुम्ही त्या पुलावरून जाणार नाहीं काय ?"

त्याचे हे भाषण ऐकून मधुकर जरा चकित झाला आणि अबदुलभाईकडे प्रशंसापूर्ण दृष्टीनें पाहून म्हणाला, "तुमचे म्हणणे ठीक आहे. या बाबतींत तितक्या निरनिराळ्या अगांनीं मीं अद्यापपर्यंत विचार केला नव्हता. परंतु यासबंधाचा तुम्हीहि एका अगाने नीट विचार केला नाहीं. गाणाऱ्या स्त्रिया आकाशांतून पडल्या नाहींत, तर चांगल्या कुलदाज घरांतल्याच बायका मुली घर सोडून या धंद्यांत पडतात. तेव्हां त्यांच्यामुळें किती चांगल्या घराला काळोखी लागली असेल ! अशा स्थितींत त्यांच्या नाचगाण्यांत आपण करमणूक करून घेणें, म्हणजे रानटीपणाच नव्हे काय ?"

अबदुलभाईः—हें तुमचें म्हणणें खरें आहे. वास्तविक, नाचणें आणि गाणें हें स्त्रियांचें कर्तव्य आहे. प्रत्येक कुलवधूनें ती कला शिकाव-

याला पाहिजे. पण समाजाच्या या संबंधांतील चुकीच्या विचारामुळें आम्ही या आनंदाला मुकत आहोंत.

मधु०:—आतां मात्र तुम्ही ठीक बोललांत. ही व्यवस्था आम्ही बदलावयाला पाहिजे; आणि यासाठीं तोंपर्यंत आम्हांला या आनदापासून दूर राहण्याखेरीज गत्यतरच नाहीं.

अबदुल०:—तुम्हीं नवे शिकलेले लोक कांहीं आम्हांला ऐकावयाचे नाहींत. बरे हें लग्न आटोपल्यावर मुलाला शाळेत पाठवीन. तुम्ही त्याची राहण्याची सोय कोठे कराल ?

मधु०:—आमच्या घरांतच एक खोली देईन.

अबदुल०:—मग माझी काळजी दूर झाली. जेवण्याची फिकीर तुम्हांला नको. तो आपल्या हाताने जेवण करून खाईल.

मधुकर०:—कां ! तुम्ही आमच्या हातचे खात नाही काय ?

अबदुल०:—(हसून) तुम्ही ज्याअर्थीं आमच्या हातचे खात नाहीं, त्या अर्थीं आम्ही तरी कसे खावे ?

मधुकर आपल्या शाळेतील ब्राह्मण विद्यार्थ्यांकडे वळून म्हणाला, " पाहिलेंत कां ! हे काय म्हणतात ते ! ऐकलेस ना, गणपती ? तुम्ही जसे यांना नीच समजना, तसे हेहि तुम्हांला नीच समजू लागलेले आहेत. अर्थातच यांना तुम्ही दोष देऊ शकाल काय ? " नतर तो अबदुलभाईकडे वळून म्हणाला, " ठीक आहे ! तुमच्या मर्जीला येईल त्याप्रमाणे करा; बाकी आमच्या येथें त्याच्या खाण्यापिण्याची सगळी सोय होईल. मात्र आमचे येथें मांस किंवा अडीं त्याला मिळावयाचीं नाहीत. "

अबदुल०:—आमच्याहि घरांत मांसाला कोणी स्पर्श करीत नाहीं. बरे आहे. मी आतां जातो.

मधु०:—थांबा, थोडा उपहार करून जा.

एवढें बोलून तो अबदुलरभाई आणि त्याच्या मुलाला घेऊन आपल्या घरीं गेला आणि त्यांना त्यानें आपल्या दिवाणखान्यांत बसविलें. नंतर तो आपल्या आईकडे जाऊन म्हणाला, " आई ! दिवाणखान्यांत

एक मुसलमान गृहस्थ आणि त्याचा मुलगा बसला आहे. त्यांच्याकरितां कांहीं फराळाचें दे !"

मधुकराची आई फराळाचे पदार्थ काढून एका पत्रावळीवर ठेवूं लागली. ते पाहून मधुकर म्हणाला, "आई, गोंदुभट आपल्या येथे फराळाला आला, तर तू त्याला कशांत वाढतेस ?"

गोंदुभट हा एक अत्यत दुःश्चरित्र मनुष्य होता.

मधुकराच्या आईने त्याच्या म्हणण्याचा भावार्थ ओळखून म्हटले, "गोंदुभट किती झाला तरी ब्राह्मण आहे."

मधु०:—गोंदुभट जर ब्राह्मण, तर या मुसलमान पितापुत्रांनाहि ब्राह्मण कां म्हणू नये ?

मधुकराची आई म्हणाली, "हे असे कसे होईल ? हे लोक अभक्ष्य भक्षण करणारे."

मधुकरः—आणि गोंदुभट काय नाही ? तोहि इराण्याच्या हॉटेलांत जाऊन वाटेल तसा मांसावर ताव मारतो. दारूखेरीज तर त्याचा एक दिवसहि जात नाहीं. उलट विचारे हेच लोक बरे ! हे मुसलमान असून मांसाला स्पर्शसुद्धां करीत नाहीत. \ तेव्हा तूच सांग, यांत ब्राह्मण कोण आणि मुसलमान कोण ? दोन चांगलीं माणसे आपल्या घरी आली असतांना, आपण तीं केवळ आपल्या जातीची नाहीत, एवढ्या विचारानेच जर त्यांना ताटांत फराळाचे न देता पत्रावळीवर देऊ लागलो, तर हा त्यांचा अपमान नाहीं कां ?\

इतक्यांत मधुकराचा बाप तेथे आला आणि तो म्हणाला, "आपल्या देशांत राजेलोकसुद्धा जर पत्रावळीवर जेवण जेवतात, तर यांत अपमान कसला ?"

मधु०:—हें तुमचे म्हणणे ठीक आहे, बाबा. पण दहा माणसांपैकीं आठ माणसांना ताटे दिलीं आणि त्यांतल्या दोन माणसांपुढें पत्रावळी ठेवल्या, तर यांत त्या दोघांचा अपमान नाही का ? आपण त्यांना हीन जातीचे समजतो ही गोष्ट त्यावरून व्यक्त नाहीं का होत ?

हें ऐकून मधुकराची आई म्हणाली, "पुरे ही तुझी बडबड ! रोज कांहींना कांहीं तरी नवें काढतो. हीं आजकालचीं पोरें आपल्या मनाला येईल तसें वागतात. वडिलांच्या चालीरीतीचें तुम्हांला कांहीं महत्त्वच वाटत नाहीं. हे घे ! ताटांत फराळाचें घालून देते. झालें आतां ? मात्र हीं ताटें तुझ्याच खोलींत राहू देत ! तुझ्याकडे असे कोणी पाहुणे येतील, तेव्हां त्यांच्या उपयोगी हीं पडतील."

मधु०:—(हसून) आतापुरतें तर माझें काम झालें. पुढें हळू हळू हीं ताटेंहि आपल्या ताटांत मिसळल्यावाचून राहणार नाहीत !

मधुकर फराळाचीं ताटें आणि पाण्यानें भरलेला तांब्या व प्याला घेऊन दिवाणखान्यांत आला. यानंतर ते दोघेहि मुसलमान बापलेक दिवाणखान्यांतल्या एका कोपऱ्यांत बसून फराळ करूं लागले.

त्यांचा फराळ चालला असतां मधुकर अबदुलभाईच्या मुलाला म्हणाला, "महमद, तू आपल्याला महाराष्ट्रीय समजतोस ना ? मग पायांत विजार आणि तुर्की तऱ्हेची टोपी कां घालतोस ? यामुळें तुझ्या मुसलमान समाजाची आणि तुझी अभिन्नता दिसून येत असेल; पण ज्या महाराष्ट्रांत तुम्ही राहात आहात, त्याच्याशीं तुमची तद्रूपता होत नाही. आपल्या विशेष धर्मसांप्रदायाचें चिन्ह आपल्या अंगावर कायम ठेवून, राष्ट्राचे तुकडे तुकडे करण्यास कारणीभूत होणें, हे कोणाहि देशभक्ताला योग्य आहे काय? या भारतराष्ट्रांत राहणाऱ्या सर्व लोकांनीं आपण प्रथम भारतीय आहोंत, ही गोष्ट पूर्णपणे लक्ष्यांत ठेविली पाहिजे."

अबदुलभाई:—आपल्या हिंदूंत तरी ऐक्य कोठें आहे ! मारवाड्यांचें पागोटें निराळें, तर महाराष्ट्रीयांची पगडी निराळी ! पंजाबी लोक साफा बांधतात, तर बंगाली लोक उघड्या डोक्यानेंच फिरतात. यांशिवाय, प्रत्येक प्रांताप्रांतामध्यें, शैववैष्णवांच्या निरनिराळ्या खुणा आहेतच. यांत आणखी इतर सांप्रदायांचीहि भर कांहीं कमी पडली नाहीं. कोणी भस्म लावतो; कोणी चंदन फांसतो; तर कोणी केशरी गंध लावतो. कोणी रुद्राक्षाच्या माळा धारण करितो, तर कोणी

तुळसीची माळा घालतो. या गोष्टीनें जर तुमच्या राष्ट्रीयतेंत बाध येत नाहीं, तर आमच्या पोषाखानेंच कशी येते ?

मधु०:—तुम्ही केवळ पोषाखच नाही, तर आपले आचारविचारहि आम्हां हिंदूपासून वेगळे ठेवतां. तुमचीं नांवे देखील आमच्याहून निराळींच !

अबदुल०:—यांत के ळ आमच्याकडेच दोष आहे असें नाहीं. तुम्ही जसे राम, गोविंद, कृष्ण, नारायण, वगैरे आपल्या देवांचीं नांवें आपल्या मुलांना ठेवतां, तशींच आम्हीहि आमच्यांतल्या थोर पुरुषांचीं नांवे आपल्या मुलांना ठेवतो. शिवाय, आमची धर्मशास्त्रे अरबी भाषेत असल्यामुळे, त्या भाषेचा आम्हांला उपयोग करावा लागतो.

या कोटिक्रमाने मधुकर निरुत्तर झाला. फराळ आटोपल्यानतर ते दोघेहि पितापुत्र तेथून निघून गेले. नतर मधुकराने घरांतल्या नोकराला हांक मारून म्हटले, " रामा एवढी ताटे धू बरे ? पण रामा अगदीं नाखूष होऊन म्हणाला, " छे भाऊ ! तुम्ही मला नोकरीवर ठेवा अगर न ठेवा ! मुसलमानांचीं उष्टीं ताटे कांही मी धुणार नाहीं ! "

नोकराचे हे उत्तर ऐकून, मधुकराने स्वतः ती ताटे उचलली आणि तीं स्वच्छ घांसून परत दिवाणखान्यांत आणून ठेवलीं !

थोड्याच वेळाने ही बातमी मधुकराच्या वेदशाळेतलि सर्व ब्राम्हण विद्यार्थ्यांना कळली.

---

# प्रकरण १३ वें.

## जातिबहिष्कृत !

**मधुकर** वेदशाळेंमध्ये अविंधांच्या मुलाला घेऊनच थांबत नाहीं, तर त्यांचीं उष्टीं ताटे धुण्यापर्यंतहि त्याची मजल गेली, हें पाहून सर्व ब्राह्मण विद्यार्थीवर्ग त्याच्यावर अगदीं खवळून गेला. यावेळीं या घोर अत्याचाराविरुद्ध दाद मिळण्याचे ठिकाण म्हणजे बंडुनाना धडपड

होत. हे सर्व विद्यार्थी धांवतच बडुनानांकडे गेले आणि ही इत्थभूत हकिकत त्यांनीं त्यांना कळविली.

बडुनाना हातावर चुना–तमाखू चोळीत चोळीत म्हणाले, " मीं भविष्यच केले होते कीं, हा म्लेच्छ विद्या शिकलेला मुलगा एखादे दिवशीं असे कांहीं तरी घोर कर्म करून बसेल म्हणून. तुम्ही त्याच्या बापाला ही हकीकत कळविली कां ? "

विद्यार्थीवृंदः—नाहीं. अगोदर तुम्हांला हकीकत सांगावी आणि मग तुमच्या सल्ल्याने काय करावयाचे ते करावे, या विचाराने आम्ही प्रथम इकडेच आलो.

बडुनाना अगदीं खूष होऊन म्हणाले, " हे ठीक केलेत. हे पाहा! माझे इतके वय झाले, काळ्याचे पांढरे केस झाले. पण माझ्या हातून कधी चुकून देखील धर्माविरुद्ध आचरण घडले नाही. दुसऱ्याच्या आचरणाकडे देखील मी असाच डोळ्यांत तेल घालून पाहातो. यामुळे सर्व लोक मजवर नाराज आहेत; आणि माझी कांही जण खोटी बदनामीहि करितात. पण मी त्याच्या बदनामीला डरत नाहीं, मी फक्त ईश्वराला भितो. चलां, भाऊसाहेब जहागीरदाराकडे जाऊं. त्यांनाहि कांही आपल्या ब्राह्मणकुळाचा अभिमान असेलच. "

गणपतीः—तेथे जाऊन काय करणार ?

बंडु०ः—काय करणार म्हणजे ? तेथे सर्व ब्रह्मवृंद गोळा करून, त्याला प्रायश्चित घ्यायला लावतो. प्रायश्चित घेतले नाहीं, तर एकदम बहिष्कृत !

यानतर त्या सर्व विद्यार्थ्यांना घेऊन ते भाऊसाहेबांच्या घरीं गेले. भाऊसाहेब हुक्का ओढीत बसले होते. जवळ त्यांचे दिवाणजी आणि बरीच कागदपत्रें पडलीं होतीं. बडुनाना आलेले पाहून भाऊसाहेब म्हणाले, " यावे नाना ! आज पुष्कळ दिवसांनी आमच्यावर कृपा झाली ! "

बंडुनाना उभ्या उभ्याच म्हणाले, " अरे, तुम्ही जहागीरदार लोक कधीं धर्मकर्माकडे पाहतां कीं नाहीं ? सगळा धर्म रसातळाला चालला, तरी तुम्ही आपले ऐषआरामांत आणि हुक्का गुडगुडींतच मग्न ! "

भाऊसाहेब मोठ्या उत्सुकतेने म्हणाले, " काय झालें, नाना ?"

बंडु०:—काय झाले? या बिचाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना विचारा! हे आपले घरदार सोडून येथे ब्राह्मणकर्म शिकण्याकरितां आले आहेत.

भाऊ०:—मग ?

बंडु०:—मग काय ? तुमच्या जोशबुवांच्या पोराने चांगलाच ब्राह्मणकर्माचा नमुना दाखविला !

भाऊ०:—म्हणजे ?

बडु०:—म्हणजे काय कपाळ ! त्याने मुसलमानाचे उष्टे खाल्ले !

भाऊ०:—काय? बोलता काय हे, बडुनाना ?

बडु०: —अहो, त्याने मुसलमानांना घरात जेवायला घातले आणि त्यांची उष्टी ताटे धुतलीं. त्याच ताटांचा आतां ब्राह्मण भोजनाकडेहि उपयोग होईल, त्यांतूनच देवाला नैवेद्य दाखविला जाईल. राम! राम! राम! काय हा अधर्म !

भाऊ०:—हे तर त्याने मोठे भयकर कृत्य केले. छे! मी त्याला बोलावून घेतो आतां! आणि त्याजकडून ती ताटे फेकून, देववितो.

बडु०:—( मान हालवून ) छे, छे, छे! एवढ्याने भागावयाचे नाही. त्याला याबद्दल प्रायश्चित्तच दिले पाहिजे !

भाऊ०:—आणि त्याने प्रायश्चित्त नाही घेतले तर ?

बंडु:—त्याच्यावर बहिष्कार टाकला पाहिजे. तसे जर झाले नाही, तर आम्ही ब्राह्मण लोक हे गांव सोडून जाऊ ! तुमच्यासारखे प्रभू गांवांत नांदत असतांना ब्राह्मण्याची अशी अवहेलना व्हावी ! बिनप्रायश्चित्ताने त्याच्याशी सबध ठेवून आम्ही आपले पूर्वज नरकात घालावेत काय ? आम्ही प्राण सोडू पण धर्म सोडणार नाही.

बंडुनानांचे हे भाषण ऐकून किंकर्तव्यमूढ होऊन भाऊसाहेब म्हणाले, " तुमच्या मर्जीला येईल तसे करा, बोवा ! "

बोलतां बोलतां जहागीरदारसाहेबांवर आपलें आसन जमलेले पाहून बंडुनाना अगदीं खूष झाले. इतक्यांत दिवाणजी म्हणाले, " जोशीबुवांना बोलावून त्यांना एकदां विचारून पहा ! त्यांनीं मुलाकडून प्रायश्चित्त

घेण्याची व्यवस्था केली, तर सगळीच भानगड मिटेल. " कदाचित् जोशीबुवांच्या सांगण्यावरून मधुकर प्रायश्चित्तहि घेईल आणि आपले अस्त्र फुकट जाईल अशी बंडुनानाला भीति पडून ते दिवाणजीला म्हणाले, " हो! प्रायश्चित्त घेतले तर मिटेल म्हणा, पण जाणूनबुजून जो पाप करितो, तो प्रायश्चित्तानें तरी शुद्ध होईल कां ? "

गणः—तो मुळी प्रायश्चित्त घ्यावयालाच राजी होणार नाही. प्रायश्चित्त पापाला असते; आणि तो तर या गोष्टीला पाप समजतच नाहीं. यासंबधानें अगोदरच चर्चा झाली आहे.

दिवाणजीः—त्याने प्रायश्चित्त घेतले नाही, तर जोशीबुवा त्याचा त्याग करतील. ज्याचा अपराध त्याला शिक्षा. त्यांच्यासाठी जोशीबुवाला बहिष्कृत करण्याचे कारण नाही.

भाऊः— तुमचे म्हणणे बरोबर आहे, दिवाणजी! जोशीबुवांना लवकर घेऊन येण्याची व्यवस्था करा ! चला आटपा !

अखेर दिवाणजीच्या सांगण्यावरून बंडुनानाच त्याना बोलवावयाला गेले. बंडुनानाला हे काम पाहिजेच होते. जोशीबुवा आणि त्याचा मुलगा यांच्यावर बंडुनानाचा फार दिवसांपासून राग होता. कारण दोघेहि बापलेक बंडुनानाला अगदीं तुच्छ लेखीत. त्याला ब्राह्मण म्हणून मुळींच समजत नसत. यामुळे त्याच्यावर सूड उगविण्याची तो वाटच पहात होता. वाटेल तें करून त्यांना बहिष्कृत करावयाचे, असा त्याच्या मनाचा निश्चय झाला. दिवाणजी दिवाणजी मध्ये आड आले नसते, तर त्याचा हा हेतू एव्हांना सिद्धीला गेला होता; पण त्यांनी सगळा डाव बिघडविला. आणि यामुळे तो मनांतल्यामनांत दिवाणजीवर अति चडफडूं लागला.

थोड्या वेळाने तो जोशीबुवांना घेऊन तेथे येऊन दाखल झाला. जहागीरदारांनीं त्यांना सन्मानपूर्वक आपणांजवळ बसवून घेतल्यानंतर जोशीबुवा म्हणाले, " कां ! मला कशाला बोलावणं पाठविलें होतें ? "

भाऊसाहेबः—हे लोक काय म्हणतात ते ऐका ! "

जोशिबुवा भाऊसाहेबांकडे औत्सुक्यानें पाहूं लागले. भाऊसाहेब पुढे म्हणाले, " या लोकांचे म्हणणें असें आहे कीं, मधुकराने एका मुसलमान मुलास वेदशाळेंत–"

जोशीबुवाः—हो ! हे लोक जे कांहीं म्हणतात, ते सगळे खरें आहे.

भाऊः—मग पुढें काय करायचे ?

जोशीः—पुढ काय आणि माग काय ?

भाऊसाहेबः—त्याने मुसलमानाच्या हातचे–"

जोशीः—अगदीं खोटें ! त्याने मुसलमानाच्या हातचे कांहीं खाल्लें नाहीं. पण समजा खाल्लें असले, तर त्यांत काय दोष आहे ?

भाऊसाहेबः—मुसलमानाच्या हातचें खाल्ल्यानें धर्माची हानि होत नाहीं ? म्लेच्छांचें अन्न खाण्यांत पाप नाही ?

जोशीः—म्लेच्छ कोण आहे ? जो गलिच्छ, दुःशील आणि दुःश्चरित्र, तोच म्लेंच्छ होय. चांगल्या आचाराविचारांचीं माणसें म्लेंच्छ नव्हेत. मग तीं कोणीहि असोत.

बडुः—( मान हलवून ) मग काय ? गोमांस खाणाऱ्या मुसलमानाचेंहि हातचें खावे ?

जोशीः–मुसलमानांचें खात नाहीं कोण ? सोडा, लेमोनेड आणि बर्फ या वस्तू तर सर्वजण सेवन करतात. तुम्हीहि त्या खात नाहीं म्हणून छातीला हात लावून सांगावयास तयार आहां काय ? त्या पदार्थांत मुसलमान व खिश्चनांचे पाणी असतें, हे तुम्हांला ठाऊक नाही ?

बडुः—अहो ! तें बाटल्यांत असते ! आणि त्यांत मुसलमान किंवा खिश्चन यांचे पाणी असले, तरी तें आमच्या डोळ्यांसमोर घातलेले नसतें. ' दृष्टी आड सृष्टी ! ' अशा गोष्टींत कांहीं पाप नाहीं.

जोशीः—कशाला उगाच धर्माच्या गोष्टी बोलतां ? आमचे पूर्वज गोमेध करीत होते. एवढेंच नव्हे, तर गोमांस खातहि होते. याबद्दलचा आमच्या धर्मग्रथात हवा तेवढा पुरावा आहे. पण पूर्वजाचीच गोष्ट कशाला ? आजहि आमच्या समाजांत येथें किंवा विलायतेला जाऊन गोमांस खाणारे लोक नाहींत काय ? आणि त्यांनीं जरा जास्त दक्षिणा दिल्याबरोबर

त्यांच्या पंक्तीला तुमच्यासारखेच पवित्र ब्राह्मण जाऊन बसत नाहींत काय ? बंगाली आणि सारस्वत ब्राह्मण यांच्यांत मत्स्यभक्षणाची प्रथा अजूनहि प्रचलित आहे. डॉक्टरच्या औषधांत हव्या त्याच्या हातचें पाणी तुमच्या डोळ्यांदेखत घातलें जातें व ते तुम्ही घटांघटां पितां. एखाद्याला एखादा पदार्थ आवडेल, दुसऱ्याला तो आवडणार नाही. पण याच कारणामुळे कोणाला नीच लेखण्याचा आम्हास काय अधिकार आहे ?

बडु:—पण शास्त्राची आज्ञा तर अशी आहे, कीं, म्लेंच्छांचे—

पण बडुनानाना पुरते बोलू न देतां जोशीबुवा त्यांना मध्येच थांबवून म्हणाले, " शास्त्राच्या आज्ञा काय तुम्ही सगळ्याच मानतां ? शास्त्रांत काळवीट, रानडुकर, नीलगाय वगैरे जनावरांचे मांस भक्षण करण्याची परवानगी आहे. त्याप्रमाणे तुम्ही आजहि मास खायला तयार आहात ? सारांश खरा प्रकार असा आहे, की, मनुष्य आपल्या सवयींस आणि रीतींस अनुसरून कोणत्याहि गोष्टीस चांगले किंवा वाईट समजतो. अर्थात्, प्रकृति किंवा सस्कारभिन्नतेप्रमाणें मतभिन्नता राहणारच ! एखाद्याला जी गोष्ट चांगली दिसते, तीच दुसऱ्याला वाईट दिसते. हा विषय केवळ तर्काच्या पलीकडचा आहे."

बडु:—( मान हलवून ) हे तुमचें पांडित्य तुमच्याजवळच राहूं द्या ! तुमच्या मुलानें समाजाच्या रीतिरिवाजाप्रमाणें हा मोठा अन्याय केला-आहे.

जोशी:—मीहि कबूल करितों कीं, खरोखर त्याने मोठा अन्यायच केलेला आहे. पण पुढे काय ?

बडु:—पुढें काय म्हणजे ? त्याने प्रायश्चित्त घेतलें पाहिजे.

जोशी:—पण त्याला प्रायश्चित्त देणारालाहि अगोदर प्रायश्चित्त घेतले पाहिजे. नंतर तो प्रायश्चित्त घेईल.

ही गोष्ट जणूं काय ऐकलीच नाहीं, अशा रीतीने बडुनाना म्हणतात, " तो जर प्रायश्चित्त घेणार नाहीं, तर त्याला आपण घराच्या बाहेरच हांकून दिलें पाहिजे. "

जोशीः—त्याने माझा काय अपराध केला म्हणून मी त्याला घराबाहेर हांकून देऊ ?

बंडुः—तर मग त्याच्याबरोबर आपल्यालाहि समाजांतून बहिष्कृत व्हायला पाहिजे.

जोशीः—तुमच्या मर्जीला येईल तसे करा !

एवढें बोलून जोशीबोवा उठले आणि जातां जातां भाऊसाहेबांना म्हणाले, " भाऊसाहेब, आजपासून तुमच्या देवाच्या पूजेची व्यवस्था तुमची तुम्ही पाहून घ्या. "

भाऊसाहेब अत्यंत खेदपूर्वक म्हणाले, " जोशीबुवा ! हें काय बरे ? जरा विचार करा ! "

जोशीः—विचार काय करूं ? मला जे योग्य वाटते, त्याप्रमाणे मी वागतों; आणि तोच माझा मार्ग प्रस्तुत प्रसंगींहि मी अनुसरला आहे. ओंठांत एक आणि पोटांत एक ही गोष्ट मजजवळ नाही.

जोशीबुवा निघालेले पाहून गणपती त्यांच्याजवळ आला आणि त्यांना म्हणाला, " गुरुजी ! मधुदादा मुळी जातिभेदच मानीत नाहीत. आम्हीं लोक मानतों म्हणून तो आमच्यावर रागावून आम्हांला विवेकहीन, मूर्ख वगैरे म्हणून आमचा तिरस्कार करितो. "

जोशीः—ज्याला जे मत प्रिय असते, ते दुसऱ्याला पटविण्याचा तो प्रयत्न करतो, यांत विशेष कांहीं नाहीं. तुम्हांला त्याचीं हीं मते पसंत नसलीं, तर तुम्ही तीं मानू नका, त्यांवर टीका करा, वाटल्यास वेदशाळा सोडून निघून जा. शास्त्राभ्यास करूनहि त्याचें यथार्थ तत्त्व ज्याला समजत नाहीं, त्याला शास्त्र काय म्हणतें हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? तें म्हणतें, असला माणूस म्हणजे केवळ शास्त्रभारवाहक गर्दभ होय. तुम्ही इतके दिवस शास्त्राभ्यास करून कसे मूर्ख राहिलांत ह्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें !

गण०:—तुम्ही जें सांगाल तें आम्ही मानू, असें तुम्ही समजूं नका.

जोशीबुवाः—नाहीं नाहीं. मीहि आपणाला इतका बुद्धिमान् समजत नाहीं.

इतक्यांत बंडुनाना त्यांच्याजवळ येऊन म्हणतात, " शास्त्रज्ञानाचा सर्व गठ्ठा आपल्या जवळच सांठवला आहे असें समजूं नका. "

जोशीबुवा:—छे, छे, आपल्यासारख्या शुचिर्भूत ब्राह्मणाला, साक्षात् वेदोनारायणाला सोडून तो आमच्याकडे कसा येईल ? मात्र सगळें शास्त्र आणि समाजाचे सर्व रीतिरिवाज इतरांकरितां आहेत. स्वतःच्या बाबतींत त्यांना धाब्यावर बसविण्याची तुमची वाटेल तेव्हां तयारी असते.

या वेळीं वेदशाळेतील विद्यार्थ्यांनाही आपलें हसें आंवरणें अशक्य झाले !

आतां मात्र बंडुनानांना आपला राग आंवरणें अशक्य होऊन ते म्हणाले, "ठीक आहे. भोगा याचे प्रायश्चित्त. आजपासून तुम्हांला समाजांतून मीं बहिष्कृत केलें आहे. "

बडुनानाकडे तिरस्काराने पाहून जोशीबुवा तेथून निघून गेले.

---

# प्रकरण १९ वें.

## प्रेमी स्वयं पश्यति !

तिसरे प्रहरची वेळ होती. नित्याप्रमाणें विजय घरांतल्या बायकांना महाभारत वाचून दाखवीत होता. यावेळीं चपी तेथें धांवत धावत आली आणि जोशीबुवांना बहिष्कृत केल्याची खबर तिने सर्वांना कळविली.

ही बातमी ऐकून सर्व चकित झालीं. विजयाचा तिच्या बातमीवर भरंवसाच बसेना. तो चपीकडे सतप्त दृष्टीने पाहून म्हणाला, " जोशीकाकांचा काय अपराध होता म्हणून त्यांना बहिष्कृत केलें ? "

चपी:—मधुदादाने मुसलमानाच्या हातचें खाल्लें.

विजयानें पोथी ताबडतोब गुंडाळून म्हटलें, " हा काय प्रकार आहे तो पाहतों."

कुसुम आज नेहमींप्रमाणे दाराच्या आड बसली होती. ती विजयालासुद्धां दिसली नाहीं. त्यानें एक वेळ चोहोंकडे दृष्टी फेकली, त्याबरोबर दाराच्या एका कोपऱ्यांत ती उभी असलेली त्याला दिसली. ती आपली मार्गप्रतिक्षा करीत असावी आणि आपल्याशींच तिला काही बोलावयाचें असावें, असे तिच्या चर्येवरून त्याला वाटलें. तो तिच्याजवळ गेला, पण जवळ जातांच त्याचे हृदय धडधडूं लागलें. आश्चर्याची गोष्ट ही की, आज ती त्याच्याजवळून पळून गेली नाहीं. ती त्याला अगदीं विनम्रपणे म्हणाली, " जोशीबुवांची काय हकीकत आहे ती कृपा करून मला कळवा."

तिचे ते शब्द विजयाच्या कानाला केवळ अमृतवृष्टी वाटली! आज ती पहिल्यानेंच त्याच्याशी बोलली.

विजयाच्या तोंडांतून फक्त "होय" एवढा एकच शब्द बाहेर पडला.

यानतर कुसुम तेथून निघून गेली.

विजय भानावर आला, त्या वेळीं त्याच्या हृदयांत एक विलक्षण शल्य खोचूं लागलें. ज्याला मत्सर म्हणून म्हणतात, तेच हे शल्य असावें. मधुकराची हकीकत कळावी एवढ्यासाटींच ती आपली मार्गप्रतीक्षा करीत राहिली होती, याबद्दल त्याला बिलकुल शंका राहिली नव्हती. पण मत्सर त्याच्या कानांत म्हणूं लागला, " मधुकर केवढा भाग्यशाली!"

एक दीर्घ निःश्वास सोडून तो तेथून निघून गेला.

विजय मधुकराच्या घरी पोंचतांच मधुकर त्याला हसत हंसत म्हणाला, " आमच्यावर आज समाजाचा जो क्षोभ झाला, त्याची बातमी लागल्यामुळेंच तूं येथें आलास ना ?"

विजयः—होय. पण सर्व हकीकत कळली नाहीं.

मधु०:—ऐक, सांगतो.

आणि एवढें बोलून मधुकरानें सर्व वृत्तांत निवेदन केला.

ती हकीकत ऐकून विजय म्हणाला, " अस्से. मला वाटलें तूं कांहीं एकादी भयंकर गोष्ट करून बसलास! तरी पण या कामांत तुझा उतावीळ-

पणा झाला असेंच मी म्हणतों. लोकमत आरंभापासून विरुद्ध असणें आपल्या कार्याच्या दृष्टीनें ठीक नाहीं. यामुळें आपल्या कार्यात अडथळे उत्पन्न होण्याची मोठी भीति आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं, मुसलमानाचे उष्टे ताट धुणें मी दोषार्ह समजतो. माझें म्हणणें इतकेंच आहे कीं, अशीं कार्ये करतांना थोडेसे परिस्थितीकडे लक्ष द्यावयाला पाहिजे. पण असला विचार तुझ्या कपाळीं ब्रह्मदेवानें लिहिलाच नाहीं, त्याला कोणीं काय करावयाचे ? सुधारणा समाजाच्या डोक्यावर एकदम लादण्यापेक्षां तिचा भार हळूंहळू त्यानेच उचललेला बरा असे माझे मत आहे."

मधु०—मला तुझा हा कमकुवत मार्ग मुळींच पसत नाहीं. समाज-सुधारणेचे तत्व मी जोरानेच पुढे ढकलणार! मग त्यांत कांहींहि होवो ! भगवान् सत्यस्वरूपी आहे अशीं प्राचीन ऋषींची वचने आहेत. म्हणून सत्याचा जो बेधडक स्वीकार करीत नाहीं त्याच्या हातून काय होणार, हे मी तुलाच विचारतो. जो परिस्थिती किंवा लोकाची मने पाहात राहातो, त्याच्या हातीं सत्य कधींहि लागत नाही. असत्याची समजूत करतां करतां शेवटीं ते असत्य त्याला लाथेखाली तुडवते आणि त्याच्या तोंडाला काळे फासते."

मधुकराचे हे तेजस्वी भाषण ऐकून विजय म्हणाला, "तुझ्या पित्याच्या हृदयातले उदार विचार आज तुझ्या द्वारे प्रगट होत आहेत, यात शंका नाहीं. हरकत नाही. बडुनानासारख्या पाजी माणसाने जरी समाजा-कडून बहिष्काराचें अस्त्र फेकले असले, तरी मी तुम्हांला सोडावयाला तयार नाहीं. तुमच्याबरोबर मीहि जातीबाहेर राहीन." मधुकर त्याच्या खांद्या-वर चापट मारून म्हणाला, "चल निघ ! खुळा कुठला ! सुधारणेचे कोण-तेहि कार्य न करितां विनाकारण बहिष्कृत व्हावयाचे ? तू जे कार्य हातीं घेतलें आहेस ते अगोदर पूर्ण कर. समाजाला आमचे आम्ही पाहून घेतो."

विजयः—बरे यासबधाने मग बोलू ! अगोदर काकाकडे चल ! काकूनांहि भेटायला मला बरेंच दिवस झाले.

मधु०:—अरे जातां येईल. इतकी घाई कां लावलीस ? जातीबाहेर टाकलेल्या माणसाच्या घरांत फार वेळ थांबण्याची तुला भीति वाटते काय ?

एवढें बोलून मधुकर मोठमोठ्यानें हंसूं लागला.

विजयः—अरे कंगालाला भीति कसली ? मी घाई करीत आहें ती कुसुम-साठीं. ती तुझ्याकडची बातमी ऐकण्यासाठीं अगदीं वेडी होऊन गेली आहे.

मधुः०— माझ्यावर तिचें किती लक्ष आहे हें मला ठाऊक नाहीं; पण इतक्या थोड्या दिवसांत तुझे मन मात्र तिच्याकडे किती ओढ घेऊं लागले आहे याचा हा ढळढळीत पुरावा आहे.

विज०—खासें ! माझे तिचे अजून भाषणसुद्धां नाहीं. ती आज पहिल्यानेच माझ्याशी बोलली, आणि तेमुद्धां केवळ तुझ्यासाठीं.

मधु०:—तुझ्यासारखा मुखदुर्बळ मनुष्य जन्मभर जरी एका घरांत राहिला, तरी त्याचे कुणाशीं बोलणेचालणे व्हावयाचे नाहीं, हे अगदीं शक्य आहे. पण हरकत नाही. आतां दोघेहि एक ठिकाणीं आलां आहांत ! हळू हळू सगळे कांहीं होईल. पण कायरे ! अजून तुझे तिचे बोलणे झाले नाही तरी तू इतका वेडावलास ! पण प्रत्यक्ष बोलणेचालणे सुरू झाल्यावर मग कसें काय होणार ?

विजयः—छट् ! परस्त्रीसबधाने असें बोलणे हा मोठा अन्याय आहे.

मधुकरः— असें जर तुला वाटते, तर मग ताबडतोब तिला तू आपली अर्धांगी बनवून टाक. ही गोष्ट लवकरच अमलांत आणावी म्हणून मी हे बोललो.

विजयः— छट् , ही गोष्ट घडून येणे मुळीच शक्य नाहीं.

मधुकरः—का बरे ? प्रणयरोगाची स्पष्ट लक्षणें दिसू लागलीं आहेत. तुझी मनकामना लवकर पूर्ण होवो असा हा गरीब ब्राम्हण तुला आशीर्वाद देत आहे.

आतां मात्र विजयाला त्याची ही थट्टा असह्य होऊन तो मधु-कराला म्हणाला, “ चल ! उगीच कां चावटपणा चालवला आहेस ! काकाकडे तू येणार नसलास तर मी एकटाच जातों. ”

विजय जोशीबुवाजवळ जाऊन दाखल झाला. त्या वेळीं ते हात-पाय धुऊन सध्या करण्याच्या गडबडींत होते. विजयाला पाहून ते म्हणाले, “ आज आम्हांला ब्रह्मवृंदाने बहिष्कृत केलें ! तुला कळलें कां ? ”

विजयः— हो! मला आतां लवकरच तुमच्या कुटुंबांत येऊन राहिले पाहिजे.

जोशीबुवाः–छट्! असा वेडेपणा करू नकोस? विनाकारण आई-बापांचीं मने नाराज कां करावीं?

विजयः—मी होऊन कांहीं त्यांचे मन दुखविणार नाहीं. पण तेच आपण होऊन माझा त्याग करतात.

जोशीबुवाः—ही गोष्ट काय शक्य आहे? मुलाचा त्याग करणे ही गोष्ट कांही तितकी सुलभ नाहीं.

विजयः—बरें आपणच पहाल.

त्याचे भाषण ऐकून मधुकराची आई बाहेर आली आणि त्याला उद्देशून म्हणाली, " कोण विजय का? ये बाळ ! "

विजयाने तिच्या पायावर डोके ठेऊन म्हटले, "काकू, फार दिवसापासून तुमची भेट झाली नाहीं म्हणून भेटीला आलो. मधुकराने काय काय दगा माडला आहे? तुम्ही त्यामुळे त्याच्यावर नाराज तर झालां नाहीत ना, काकू ? "

मधुकराची आईः— मी काय म्हणून नाराज होईन ? त्याने कां कुणाची चोरी केली, कीं दुसरें कांहीं पाप केले ? मीच त्याला ताटांत फराळाचें घालून दिले होते.

विजयः– तुम्हांला मुसलमानाचा तिरस्कार वाटत नाहीं ?

मधुकरची आईः—त्याचा तिरस्कार करावयाला मला काय अधिकार आहे? आणि मुसलमानांचा तिरस्कार करावयाचा तर आमच्यांतल्या ब्राम्हणांचाहि तिरस्कार कां करूं नये? मुसलमानांना जर शिवायचें नाहीं, तर कित्येक दुर्वर्तनी ब्राह्मणांना तरी कां शिवावें ?

विजयः– काकू, तुमच्याप्रमाणें जर देशांत पुष्कळ स्त्रिया निघतील, तर समाजांत आज जे अन्याय दिसत आहेत, ते हां हां म्हणतां नाहींसे होतील.

मधुकराची आई हंसूं लागली. नंतर विजय तिचा निरोप घेऊन तेथून निघून गेला.

# प्रकरण २० वें.

## पराचा कावळा !

विजय घरी परत गेल्यावर थेट आपल्या काकीच्या खोली-जवळ गेला आणि दाराशीं उभा राहून तिला त्यानें हांक मारली.

ती संध्याकाळची वेळ होती. खोलींत दिवा मिणमिण करीत जळत होता. विजयाचा आवाज ऐकतांच कुसुम बाहेर आली आणि म्हणाली, " मावशी नाहींत हो ! "

विजयः—कुठें गेल्या ?

कुसुमः—देवघरात जप करीत बसल्या आहेत.

संध्याकाळच्या वेळी अशा अंधेरांत एकांत ठिकाणीं तिच्याशीं बोलत राहावें कीं नाही, या विचारांत विजय पडला. इतक्यांत कुसुम त्याला म्हणाली, " आपण जोशीबुवाच्या घरून आलां ? "

विजयः—होय !

कुसुम त्याच्याकडे कुतूहलपूर्ण दृष्टीने पाहू लागली. तिचा मनोभाव ओळखून विजय म्हणाला, " तसे म्हटले तर भानगड कांहीं विशेष महत्वाची नाहीं. मधुकरानें मुसलमानाचे उष्टे ताट धुतले याबद्दल त्याला समाजाने बहिष्कृत केले आहे."

कुसुम अस्वस्थ होऊन म्हणाली, " मग आपणहि आपल्या मित्राचा त्याग करणार काय ? "

विजय जोरानें म्हणाला, " शक्य नाहीं. मला जें शिक्षण प्राप्त झालें तें केवळ मधुकरामुळेच होय. म्हणून मी त्याचा जन्माचा ऋणी बनलों आहें. त्याला सोडावयाची गोष्ट लांबच राहिली, पण लौकरच मला त्याच्या घरीं जाऊन राहिले पाहिजे."

त्याचें हें निर्मल मित्रप्रेम पाहून कुसुमचे मन अतिशय प्रसन्न झालें; आणि ती त्याच्याकडे आदरपूर्ण दृष्टीनें पाहूं लागली. त्या तिच्या दृष्टीनें विजयहि मुग्ध होऊन, क्षणभर त्याला स्वतःची विस्मृति झाली. थोड्या वेळानें तो तेथून निघून गेला. मधुकर आणि विजय या दोघांमधील अद्वितीय मित्रप्रेमाचा विचार करीत असतांना कुसुमहि क्षणभर स्वतःला विसरली. या विचारांत ती गढली आहे, तोंच काकी तेथे पाय आपटीतच आल्या आणि तिच्या तोंडापुढे हात ओंवाळून म्हणाल्या, "अग काळतोंडें, हे काय चालविलेस तूं ? दोन दिवसहि तुला गुण्यागोविंदाने राहतां येत नाहीं काय ? जरा थड पडली नाही, तोंच पुन्हा आग लावलीस ? तुला मरण तरी कसें येत नाहीं ?"

मावशीच्या या अचानक हल्ल्याचा कुसुमला बिलकूल अर्थच कळेना. ती अगदी किंकर्तव्यमूढ होऊन गेली. नतर मावशीकडे जरा विस्मयाने पाहून ती म्हणाली, "काय झाले, मावशी ?"

मावशीः—तुझे कपाळ झाले अवदसे ! विजयाशीं कशाला बोलत होतीस ? तरुण पोरगी तू ! एकातात त्याच्यासारख्या तरुणाशी बोलायला तुला शरम कशी वाटत नाहीं ? आता काय तुझ्यापुढे कपाळ आपटून प्राण देऊ ?

एवढं बोलून काकी डोळ्याला पदर लावून अश्रु पुसू लागल्या. हा प्रकार पाहून कुसुम बिछान्यावर जाऊन पडली.

विजय आणि कुसुम बोलत असतांना चपीने लाबून पाहिले. तिला ही सधी फार नामी वाटली आणि तशीच धांवत धावत ती घरांतल्या यमुना, रमा, वगैरे रिकामटेकड्या स्त्रिया चकाट्या पिटीत बसल्या होत्या तेथे गेली आणि जमीनीवर बसून पोटाला हात लावून सारखी हसूं लागली. तिची हंसण्याची तऱ्हा आणि तो एकंदर प्रकार पाहून त्या सगळ्या बायका चकित झाल्या आणि तिला म्हणाल्या, "अग चपे झाले काय ? तुला वेड तर लागले नाहीं ? कां कांहीं लागीर झाली ? अशी हसतेस कां ?"

चंपा हसें दाबण्याचा आविर्भाव घालून म्हणाली, "आतां कांहीं आपण या घरांत राहात नाही. माईसाहेबांना म्हणते, माझा पगार चुकता

करा ! मी आपली कुठेहि नोकरी पहाते. हसता हसतां मेलं पोट फुटायची वेळ आली."

रमाः—अग पण झालं तरी काय हे तर सांगशील कीं नाहीं ?

चपीः—हे बघा ! माझी पोट फुटायची वेळ आली आणि यांची घाई.

रमाः—चल जा हडळी. तुला येथे यायला कुणी सागितले होते ?

चंपी पदरानें आनंदाश्रु पुसून म्हणाली, "सांगतें बाई. ती तुमची मडम नाहीं--" पण एवढेच बोलून पुन्हा ती हसू लागली.

बाळोबाची आईः—कुसुमसबधाची हकीकत आहे कां ? बोल ! तिने काय केले ?

कुसुमचे नाव ऐकताच सगळयाजणी ती हकीकत ऐकायला उत्सुक झाल्या. आपल्याला पाहिजे तशी मनोभूमिका तयार झाली हे पाहून आतां चंपीने आपली हकिकत सांगावयास सुरवात केली. ती म्हणाली, "त्या कुसुमबाई अंधेरात आपल्या खोलीच्या दारापुढे उभ्या होत्या आणि त्याच्याजवळच आपले बाळासाहेब उभे होते. आणखी ती काय करीत होती कळल कां ? तिने बाळासाहेबांच्या गळ्यांत हात घातला होता; आणि त्यांच्याशीं गुजुगुजू गोष्टी करीत राहिली होती. पण तुम्हाला शपथ आहे बर कां ! ही गोष्ट कोणाला सांगू नका. धाकट्या मालकाना जर हे कळले, तर ते माझा जीव घेतील."

ही हकीकत ऐकून रमा म्हणाली, "असे आहे कां ? आम्हांला वाटले कीं ती बाळासाहेबांशीं बोलत देखील नाही. एवढ्याशा कारटीच्या अंगांत इतके रंग ! पुणे खेळलेली आहे ना ? तिला वाटत असेल की, आपण मोठा गुपचिप रग उडवितो; पण म्हणावं पाप छपून नाहीं रहात टवळे !"

बाळो॰आईः—मी पहिल्यापासूनच तुम्हांला सांगत नव्हतें, कीं, तिचा पतिव्रतापणा तर केवळ तुम्हांआम्हांला दाखविण्याकरितां आहे. उघड बाळासाहेबांकडे डोळा उघडून पहावयाचें नाहीं आणि अधेरांत असा रंग उडवायचा !

यानंतर त्या खोलींत हशाच हशा पिकला. ही गोष्ट कोणाजवळहि फोडूं नका असे चपीने जरी शपथ घालून सर्वांना सांगितले होतें, तरी थोड्याच वेळांत तिने स्वतःच ती गोष्ट सर्व घरभर केली !

त्या रिकामटेकड्या बायका जागजागी उभ्या राहून या गोष्टीची चर्चा करीत होत्या. त्याच वेळीं काकी देवघरातून बाहेर आल्या. जागजागी बायका कुजबुजत आहेत हे पाहून घरात कांहीं तरी भानगड झाली असावी, हे त्यांनी ओळखले. काहीं जणी त्यांच्याकडे बोट करून हसत असलेल्याहि त्यांना दिसल्या. काकींचे मन अगदी व्यग्र झाले. ही सधी पाहून चपी त्यांच्या डोळ्यांपुढून पलीकडे जाऊ लागली. तेव्हां काकी तिला म्हणाल्या, " काय भानगड आहे ग, चपे ? "

चपी बेफिकिरपणाने म्हणाली, " मला तरी काय माहित, काकी ? भानगडी समजून घ्यायला माझ्या कामामुळे मला फुरसत कोठे आहे ? तुमची कुसुम बाळासाहेबाशी अधेरात कांहीं कानगोष्टी करीत होती, एवढे मात्र ओझरते माझ्या कानावर आले आहे. खरे खोटे राम जाणे ! "

एवढे बोलून चपी निघून गेली. ती बातमी ऐकून शेपटीवर पाय पडलेल्या नागिणीप्रमाणे काकींची अवस्था होऊन, त्या तशाच फणफणत आपल्या खोलीकडे गेल्या; आणि वर सांगितल्याप्रमाणे त्यांनी कुसुमवर आपल्या सतापाचा वर्षाव केला.

ही बातमी हळुहळु विजय आणि माईसाहेब यांच्या कानावर जाऊन पोचली.

माईसाहेब तत्काळ म्हणाल्या, " माझा विजय असा नाहीं. हें सारे त्या अवदसेचे खेळ असतील. माझ्या बाळाला पाहिले कीं, ती कशी विजलीसारखी नाचत असते. "

ही आग चपेने लावून दिली हें लवकरच विजयाला कळून आलें. त्याबरोबर तिला लाथ मारून घरांतून हांकून द्यावें, असा विचार त्याच्या मनांत आला. पण लागलीच फिरून तो आपल्या मनाशीं म्हणू लागला, " ज्या कुटुंबाची इमारत अज्ञानाच्या पहाडांवर उभारलेली आहे, तेथे त्यांतली

एक चीप काढून टाकून काय होणार ?' कुटुंबांतल्या स्त्रियांतील अज्ञान दूर करण्याचा आतां विजयाचा पक्का निश्चय झाला आणि यापुढें कुसुमशींहि उघड उघड सर्वांदेखत बोलावयाचें असेंहि त्यानें ठरविलें.

आपल्या कुटुंबांतील स्त्रियांच्या कुसंस्कारासंबंधीं विचार करतांना विजय आपल्या मनाशीं म्हणाला, "स्त्रियांच्या मनांत ही जी नीचता भरलेली आहे, ती म्हणजे अनेक पिढ्यांचा सांचलेला गाळ होय. ज्या समाजाच्या वातावरणांत या कुटुंबाची वाढ झालेली आहे, तो समाज स्त्रीशिक्षण म्हणजे महापातक आणि स्त्रीस्वातंत्र्य म्हणजे केवळ स्वेच्छाचार समजतो. तसेंच या समाजाला आपल्या स्त्रिया तर केवळ पापाच्या खाणी वाटतात. पुरुषांशी त्यांचा संसर्ग झाल्याबरोबर त्या चारित्र्यभ्रष्ट झाल्याच पाहिजेत, इतकी त्यांच्या बाबतींत त्यांची हीन समजूत आहे. म्हणूनच जेथें सूर्यकिरणाचा देखील प्रवेश होणें शक्य नाही, अशा अंतःपुरांतल्या कैदखान्यांत त्यांना तो डांबून ठेवितो. अनेक युगांच्या अशा प्रकारच्या गुलामगिरीमुळें स्वतः स्त्रियांच्याहि ठिकाणी स्वतः-विषयींचा आत्मविश्वास उरला नाहीं. इतकेंच नव्हे, तर आपण मनुष्यप्राणी आहोंत, ही देखील जाणीव त्यांच्या मनांतून नाहींशी झाली आहे. समाजांत आपला दर्जा काय आहे, किंवा त्याच्यासंबंधानें आपलें कांहीं कर्तव्य आहे, हे समजण्याची किंवा समजून घेण्याची त्यांच्या ठिकाणीं पात्रताहि उरली नाही. याचमुळें त्या समाजसुधारणेच्या शत्रु बनल्या आहेत. सारांश, त्यांची स्थिती अंधेरांत चालणाऱ्या वाटसराप्रमाणें झाली आहे. पदोपदीं आपण कोठें एखाद्या खड्ड्यांत पडूं कीं काय, किंवा सर्पाच्या शेपटीवर आपला पाय पडतो कीं काय, अशा प्रकारची भीति त्यांना वाटत आहे. ही त्यांची भीति दूर करण्याचा एकच उपाय म्हणजे ज्ञानाचा दीप त्यांच्या हातांत देणे हा होय. त्यांच्या मनांतले दुष्ट संस्कार नाहींसे व्हावयालाहि याशिवाय दुसरें औषध नाहीं. म्हणून आपण प्रथम हेंच काम करायला पाहिजे."

त्याचा हा निश्चय ठरल्यानंतर हे कार्य कशा रीतीनें करावयाचें, याचा तो विचार करूं लागला. अज्ञानाशीं झगडतांना युक्तिवाद व्यर्थ आहे.

तसें करणें म्हणजे केवळ कालक्षेप करणें होय. जेथे जरूर पडेल तेथे सत्याचाच अवलंब केला पाहिजे. आपल्या मताप्रमाणे ज्याला काम करतां येत नाहीं, त्या माणसाची त्या मतावर बिलकूल श्रद्धाच नाही असे खुशाल समजावें. ज्याच्या बोलण्यांत आणि कृतीत मेळ नाहीं तो मनुष्य तर केवळ नराधम होय, इत्यादि अनेक विचार यावेळी त्याच्या मनांत उभे राहिले.

---

# प्रकरण २१ वें.

## स्त्रियांचा वर्ग !

आदल्या दिवसापासून घरातल्या स्त्रियाकडून हृदय व्यथित करणारे चावे घेण्याचा तडाका जरी चाललेला होता, तरी नित्याप्रमाणे विजय महाभारताचा पाठ सुरू करण्यासाठीं ठरलेल्या वेळी दिवाणखान्यात येऊन पोचला. पण आज तेथे श्रोतृवृंदांपैकीं कोणीच हजर नव्हते; पोथीचा चौरगही जाग्यावर आणून ठेवला नव्हता. नाहीं म्हणावयाला कांही तरुण स्त्रिया गालातल्या गालांत हसत दिवाणखान्यांत इकडे तिकडे फिरत होत्या.

विजयाने खूप आत्मसंयमन करून विचारले, “ रमे, तुम्ही सगळ्या जणीं इकडे तिकडे फिरून काय करीत आहांत ? रोजची पोथी वाचावयाची वेळ झाली, तरी अजून कोणी चौरगहि आणून ठेवला नाहीं ! जा, लौकर चौरग आणून ठेव; मी माईला घेऊन येतो. ”

विजय आईच्या खोलीजवळ येऊन म्हणाला, “ माई ! ”

माई०:—काय आहे ?

विजयः—आज पोथी ऐकावयाला यायचे नाहीं कां ?

माई०:—रोज रोज ऐकायचा कंटाळा आला.

इतवयांत मनू त्याच्या पायाला मिठी मारून आपल्या गोड आवाजाने म्हणाली, “ तल दादा मी येतें. माईला बतू दे खुशाल इथे. ”

विजय तिचा मुका घेऊन म्हणाला, " छे, छे, माईलाहि न्यायचें; तूं तिचा हात धर ! "

त्याबरोबर मनू आईचा हात धरून ओढीत ओढीत म्हणाली, "तल, तल, तलतेस कीं नाही? कां ओलू फलफल ? "

मनूच्या या मधुर क्रीडेने माईसाहेबांचा सगळा राग शांत झाला. त्या म्हणाल्या, " तुम्ही दोघे पुढे व्हा, मी आलेच. "

विजय मनूला मोठ्या गमतीनें पाठीशी धरून दिवाणखान्यांत घेऊन गेला. तोपर्यंत बहुतेक स्त्रीश्रोतृवृंद तेथें गोळा झाला होता. मात्र कुसुम आणि काकी त्याला दिसल्या नाहीत. तेव्हां तो मनूला उद्देशून म्हणाला, " चल मनू, आपण कुसुमला आणि काकीला बोलावून आणू ! मनू त्याच्या गळ्यात मिठी मारून त्याला म्हणाली, " नको, नको दादा ? आई लागावेल ! "

पण तिच्या मनाईची परवा न करतां विजय तिला कडेवर घेऊन काकांच्या खोलीकडे गेला काकी त्याला पाहून म्हणाली, " ये बाळ ! या वेळीं काकी माळ जपत असून कुसुम त्यांच्याजवळच बसली होती. तिनें फक्त एक वेळ विजयकडे पाहिलें आणि नतर आपली मान एकीकडे फिरविली. तिच्या गालांवर आज बहारीचा गुलाबी रंग होता. विजय काकींना म्हणाला, " काकी, अजून तुम्ही येथेच ? तुम्हाला महाभारताची कथा आवडत नाहीं कीं काय ? "

काकीः—महाभारताची कथा कोणाला आवडणार नाही, बाळ ! त्यांतून तुजसारखा वाचणारा असल्यावर तर त्याची बहार काय सांगावी? पण मला त्या बायकांच्या झंझाटांत नको वाटते. तुम्ही मला आपल्या येथे आश्रय दिलां हेंच मजवर मोठे उपकार आहेत.

विजयः—असे काय बोलतां, काकी ?

काकींचे डोळे या वेळी अश्रूंनीं भरून आले होते.

विजयः—इतके दिवस तुम्ही आपल्या पतीजवळ होतां, आतां मुलाजवळ येऊन राहिलां आहांत. आम्ही तुम्हांला आश्रय देणारे कोण ? घर तुमचें आहे. चलां, मी तुम्हांला असें एकलकोंडें राहूं देणार नाहीं.

काकी डोळे भरून आणून म्हणाल्या, " नको बाळ, शिवाय माझा अजून जपहि व्हावयाचा आहे. "

विजयः—" ठीक आहे तर! तुम्ही जप सपवून या ? पण तोपर्यंत कुसुमला येथे बसून काय करावयाचे आहे ? ती तर कांही जप करीत नाहीं ना! कुसुम चल. "

कुसुम खालीं मान घालून स्तब्ध बसली होती.

काकींनीं विजयाकडे एकवेळ चमत्कारिक दृष्टीनें पाहिले. अशा स्थितीत कुसुमला त्या बायकांत नेणे बरे काय, हा त्या दृष्टीचा अर्थ होता. तो विजयानें ओळखला. लागलीच तो तिला म्हणाला, "यासाठीच तर तिला तिकडे न्यावयाचे आहे. अपवादाचे भय कोणाला ! जो पाप करीतो त्याला! ज्याला कर नाही त्याला डर कसची? चल कुसुम, तुला आज यायालाच पाहिजे. "

कुसुमचे मुख प्रफुल्ल होऊन त्यावर मधुर हास्य चमकू लागले. ती कंपित स्वराने म्हणाली, " चला, आपण पुढे व्हा! मी आलेच! "

इतक्यात मनु विजयाच्या कडेवरून खाली उतरली आणि कुसुमचा हात धरून म्हणाली, " तल लवकल कुसुमताई ! दादा बोलावतोय.

कुसुम मनूला कडेवर घेऊन त्याच्या मागोमाग निघाली. काकी मनांतल्यामनात चरफडत पुनः माळ जपू लागली. "

विजय दिवाणखान्यांतील आपल्या आसनांवर बसल्यानंतर म्हणाला, " उद्यांपासून पोथी मी वाचणार नाही. तुमच्यापैकी कोणाला तरी वांचायला लावीन, समजले ? "

माईसाहेब त्याच्या अगोदरच तेथे येऊन बसल्या होत्या. त्या म्हणाल्या, " इश्श, हेरे काय बोलतोस ? बायका कां कुठे वाचीत असतात. बायका लिहिणेवाचणें शिकल्या, की, एक बिघडतात किंवा विधवा तरी होतात. नाहीं नाहीं, दोन्हीं गोष्टी होतात. "

एवढे बोलून तिने कुसुमकडे अर्थपूर्ण दृष्टीने पाहिलें. त्याबरोबर सगळ्या बायकांची दृष्टी कुसुमकडे वळली.

या वेळीं कुसुमनें विजयाकडे दीन दृष्टीनें पाहिलें.

विजय आपल्या आईकडे पाहून म्हणाला, " शिकण्यानें स्त्रिया बिघडतात किंवा विधवा होतात, हें तत्त्व तुम्हांला कोणीं शिकविलें, माई ! पुण्यांत बघ किती बायका शिकलेल्या आहेत. मग त्या काय बिघडल्या आहेत, कीं विधवा झाल्या आहेत ? शिवाय तेथे प्रत्येक सुशिक्षित गृहस्थ आपल्या बायकोला शिकविण्याचा प्रयत्न करीत असतो, तो काय आपल्या मरणाचीच तयारी करीत असतो ? "

यमुना मध्येच म्हणाली, " जे लोक असे मानीत नाहींत त्यांचे येथे असे कांही होत नाही; पण मानतात त्यांच्या येथे मात्र हे हटकून घडून येतं. "

विजयः—( हसून ) मग याला थोडक्यांत युक्ती आहे. आपणही हे मानूं नये म्हणजे झालें.

माई०:—छे, छे, अनाचार. अशा अनाचारापासून कधी कल्याण व्हायचे नाही. काकींचे पतीहि ह्या समजुतीला भीक घालीत नव्हते. पण अखेर काय झाले ? बिचारीचे कपाळ फुटलेच की नाहीं ? शिवाय बायकाना शिकून करायचेच काय ? त्याना का नोकरी करायची, की व्यापार-धदे चालवावयाचे ? उलट लिहिणे शिकल्या म्हणजे त्या मडम मात्र बनतात. घरचे कामकाज तर त्याना कांही येत नाही. पोरसुद्धा दुसऱ्याला पाजायला लावतात. अशाने घरादाराचा उन्हाळा का होणार नाही ? घरांतली कामे करणें, मुलेबाळे साभाळणे, शिवणे टिपणे, ही बायकाची कामे. त्यांना लिहिणे काय करायचे आहे ?

विजयः—हो ! ही बायकाची कामे आहेत खरी. पण त्या जर लिहिणेंवाचणे शिकल्या, तर त्यांना ती अधिक चांगल्या रीतीने करतां यावयाचीं नाहींत कां ? लिहिणेवाचणे येत असलेल्या बायका घरांतल्या कामाला हात लावीत नाहींत म्हणून जे तू म्हणालीस, ते अगदी चुकीचे आहे. अशा कांही बायका असतील, पण त्या लिहिणें शिकल्या नसल्या तरी तशाच राहल्या. मोठ्या घरांतल्या मुली काय करतात ? धड लिहिणेवाचणेंहि शिकत नाहींत आणि घरांतलें कामकाजहि करीत नाहीत. आपल्या घरांत आज इतक्या बायका आहेत, त्यांपैकीं कोण कोण घरांतली कामें करतात

सांग पाहू ! त्यांना दुसऱ्याची निंदा आणि चुगल्या करावयाला सांगा ! हेंच जर यांना लिहितांवाचतां येत असते, तर त्या पोथ्यापुस्तकें वाचीत राहिल्या नसत्या ? आणि त्यांची मनें चांगलीं बनलीं नसतीं ? आजच्या-सारख्या वाईट गोष्टींत त्या आपला वेळ कशाला घालवित्या ? लिहिण्या-वाचण्यामुळे मनुष्याचें ज्ञानहि वाढतें आणि कितीतरी नव्या नव्या गोष्टी माणसाला कळतात. लिहिणाऱ्या माणसाला चांगलें काय, वाईट काय, धर्म काय, अधर्म काय, हे स्वतःचे स्वतःलाच ठरवितां येतें. तू आतां म्हणालीस कीं, स्त्रियांना शिकून नोकऱ्या करावयाच्या आहेत, कीं व्यापारधंदे चालवावयाचे आहेत ? पण मी म्हणतों, कारण पडलें तर स्त्रियांनी व्यापारधंदे किंवा नोकऱ्या कां करूं नयेत ? आपल्या कुसुमचेंच उदाहरण घे ! तिच्या निर्वाहाची कांहीं सोय नसल्यामुळें, ती आपल्या घरीं येऊन राहिली आहे. येथें तिचा हलकट बायकांकडून कितीतरी अपमान होतो ! अशा स्थितींत तिला लिहिणेंवाचणें येत असल्यामुळें तिनें मास्तर-णीची वगैरे जर कोठें नोकरी पत्करली, तर त्यांत वाईट काय ? काकींचें उदाहरण घे ! त्यांना जर लिहितावाचतां आलें असतें, तर त्यांची आज अशी दुर्दशा कां होती ? स्वतःच्या इस्टेटीचें त्यांच्या हातून संरक्षण नसतें झालें ?

काकीशीं आणि कुसुमशीं आपण जे अन्यायानें वागत आहोंत, त्याचा असा पर्यायानें उल्लेख केल्यामुळें माईसाहेब जरा नाखूष झाल्या आणि म्हणाल्या, " तुला रात्रंदिवस काकी आणि कुसुम यांशिवाय दुसरें कोणी दिसतच नाहीं. जिथें तिथें त्यांचे घोडें पुढें आणतोस ! तुला काय लिहिणें-वाचणें शिकवायचें तें त्यांना शिकीव. आम्हांला कशाला आणखी मध्यें ओढतोस ? "

एवढें बोलून माईसाहेब गाल फुगवून बसल्या.

विजयः—( हंसून ) त्यांना तर शिकवीनच, पण तुम्हांलाहि सोड-णार नाहीं. तूं कशी मनांत आणलेली कोणतीही गोष्ट पार पाडल्याशिवाय सोडीत नाहींस ? मीहि तुझाच मुलगा आहें.

त्याच्या या प्रेमळ भाषणाने माईसाहेबांचा राग दूर झाला आणि त्या म्हणाल्या, " तुझें पोरपण कधीं जाईल रे विजय ? लहानपणी जसा हट्टी होतास, तसाच अजूनहि आहेस."

माईसाहेबांची वृत्ती बदललेली पाहून यमुनाही विजयाला खूष करण्यासाठीं म्हणाली, " मला शिकवाल कां बाळासाहेब ? मी विधवा असल्यामुळे माझ्या पाठीमागे काहीं व्यापहि नाहीं. "

विजयाने तिला कांहीच उत्तर दिले नाही. एकवेळ तिजकडे तिरस्कारपूर्ण दृष्टीनें मात्र पाहिले. नतर तो इतर स्त्रियांकडे वळून म्हणाला, " तुम्हां सर्वांना माझ्यापासून शिकावयाला पाहिजे समजले ? उद्यां मी स्त्रियांचा वर्ग सुरू करणार ! "

त्यावर कांहीच कुणी बोलले नाहीं. यमुना मात्र त्याच्या उपेक्षेची पर्वा न करतां मोठ्या उत्साहाने म्हणाली, " हो ! मी आणि रमाताई तर अगदीं वेळेवर येत जाऊ ! बाकींच्याबद्दल मी कांही सागत नाही. "

पण तिच्या भाषणाकडे बिलकुल लक्ष न देतां विजय पुढे म्हणाला, " सगळ्या जणींनीं अगदी वेळेवर आले पाहिजे. ज्याना मजजवळ येऊन शिकण्याची लाज वाटत असेल, त्याना कुसुम शिकवीत जाईल. कुसुम तू काय शिकणार ? तूहि आपला अभ्यास पुढे वाढविला पाहिजेस ! चल। जी पुस्तकें पाहिजे असतील, तीं माझ्या लायब्ररीतून घेऊ चल. "

विजयाने कुसुमविषयीं एवढा आपलेपणा आणि कळकळ दाखविली, यामुळे त्या सगळ्या जणींच्या अंतःकरणात आग पेटली. कुसुमला मात्र अतिशय आनद झाला. तिने नुसती मान हलवूनच आपली समति प्रकट केली. विजयाने महाभारताचे वाचन पुढे चालू केले.

हें वाचन सपल्यावर तो कुसुमला म्हणाला, " चल कुसुम, मी तुला आतां माझी लायब्ररी दाखवितो. "

कुसुमची प्रत्येक हालचाल विजयाचे मन आकर्षित करून घेत होती. आज तिने त्याच्याशीं जें मतैक्य आणि सहकारिता करण्याविषयींची उत्सुकता दाखविली, त्याने तर तिच्याविषयींचा आदर त्याच्या मनांत अतिशयच वाढला. उलटपक्षीं, विजयाची ही सत्प्रवृत्ती पाहून त्याच्या

विषयींच्या आदरानें कुसुमचे मन भरून गेले. ती आतां त्याजकडे अनुराग दृष्टीनें पाहूं लागली. त्याच्या ठिकाणचा प्रत्येक गुण तिचें मन त्याजकडे आकर्षित करूं लागला. ती त्याच्याबरोबर त्याची लायब्ररी पहावयाला गेल्यानंतर इकडे स्त्रीसमाजांत एकच हंशा पिकून त्यांच्यासंबधाने चर्चा सुरूं झाली. ही चर्चा कशा प्रकारची असेल हे येथे सांगण्याची जरूरी आहे काय ?

---

# प्रकरण २२ वें.

## बंडुनानांची तिरपिट !

संध्याकाळची वेळ होती. हळुं हळुं सर्वत्र अंधार पसरत चालला होता. अशा वेळीं बंडुनाना मारुतीच्या देवळातील बाहेरच्या बाजूच्या फरशीवर बसून गांज्याच्या चिलमीचे दमावर दम मारीत होते. मारुतीच्या दर्शनाला येणाऱ्या लोकांची 'ये जा' आतां बरीच कमी झाली होती. चिलमीवर यथेच्छ ताव मारल्यानंतर बंडुनानांनीं 'गजा, ए गजा' म्हणून हांक मारली.

गजा आंतूनच त्रासिक स्वराने म्हणाला, "काय आहे ? कां ओरडतां ? नेहमीं आपले गजा, गजा चालूच आहे !"

बंडु०:—(रागावून) अरे संध्याकाळ झाली, शुद्धीवर आहेस कां ? भाऊसाहेबांच्या येथे आरतीला कधी जायचे ?

गजोबाचे हातानें गांजा मळण्याचे काम चालूच होते. तो तशाच स्थितींत बाहेर येऊन म्हणाला, " ही खटखट आपल्याच्याने रोज व्हायची नाहीं बोवा ! समजलें ? तुम्ही कां जात नाहीं ? आज त्या वरच्या आळीच्या मठींत तमाशा आहे, तिकडे मी जाणार आहें."

बंडुनाना जरा आतां विनीत स्वराने म्हणाला, " अरे तमाशा साऱ्या रातभर चालेल; आरतीला काय वेळ लागणार ? जरा थोडा वेळ जाऊन घंटा

हलविली म्हणजे झाले. उद्यांचा शिधा मिळेल तो घरीं आणून दे. नंतर पाहिजे तर तिकडे जाऊन मर. ”

गजाः—मी रोज रोज जातोंच; आज तुम्ही कां जात नाहीं?

बंडुनानाः—अरे मी आतां म्हातारा झालो. माझ्याच्यानें इतकी दगदग होत नाहीं. हात कांपत असल्यामुळे आरती तरी हातांतून गळून खालीं पडते, किंवा घंटेचा तरी नेम चुकतो. शिवाय मला नैवेद्याचा मत्रहि ठाऊक नाहीं.

गजाः—आणि इथें कोणा लेकाला येतो आहे? वेदाचे अक्षर तरी मला ठाऊक आहे?

बंडुनानाः—अरे! तूं जवान असल्यामुळें घंटा तरी जोराने वाजविशील. यजमान तेवढ्यावरच खूष होतील. तुला नैवेद्याचा मत्र येतो की नाहीं, हें पाहायला कोण बसलें आहे?

गजाः—मग नुसती घंटा वाजवूनच परत यानांत, बाबा? आरतीच हातांत कशाला घ्यायला पाहिजे?

बंडुनानाः—मी तसेंहि करून आलो असतों, पण खरे सांगूं? मला त्या जहागीरदाराच्या पोरट्याची मोठी भीति वाटते! त्याचा सोबती तो मथ्या व तो या दोघांना पाहिले की, माझे काळीजच धडधडूं लागते. ते मजकडे अशा कांहीं तीक्ष्ण दृष्टीनें पाहतात की, कांहीं बोलावयाची सोय नाहीं. माझ्या अंगांतले रक्त जागच्या जागीं गोठून जातें. जोशीबुवांना बहिष्कृत केल्यापासून, तर ते माझे कट्टे वैरी बनले आहेत. देवघरांत मी एकटाच पाहून एखादे दिवशीं ते मला खूप चोपतील, अशी मला भीति वाटत आहे.

गजाः—आणि मला नाहीं चोपणार वाटतें?

बंडुनानाः—संभव आहे. पण तूं जवान असल्यामुळें त्यांनीं दोन चार लाथा मारल्यानें तुला मोठीशी दुखापत होईल असें नाहीं. समजा, त्यामुळें तुझें हाड मोडलें, तरी तें पुनः जडेल. पण म्हातारपणीं माझें हाड मात्र जोडलें जावयाचें नाहीं.

गजाः—बाबा, तें हाड मोडून घेणेंहि नको व पुनः जुळून घेणेंहि नको. तुम्ही जोशीबुवांना काय म्हणून बहिष्कृत केलें ? माझीं हाडें मोडण्यासाठीं काय ? तुम्हांला जर इतकी भीति वाटत होती, तर तुम्ही या पंचाइतींत पडला कशाला ? यांत फायदा काय ?

बडुनानाः——फायदा कां नाहीं? एका दगडानें दोन पांखरें मारल्याचें श्रेय घेतले नाहीं ? जोशीबुवाला बहिष्कृत करून समाजांत त्याची छीः थू केली, आणि त्याबरोबरच भाऊसाहेबांच्या येथचा पुरोहितपणा पदरांत पाडून घेतला. त्यांच्या घरांतला रोजचा नैवेद्यच किती येतो तुला ठाऊक आहे ? त्याच्यावर दोन तीन दिवस चूल पेटविण्याची गरज पडत नाहीं. यांशिवाय शिधा, दक्षणा, वर्षासन हे निराळेंच ! लेकाहो, कुठवर खाल ! खातां खातां अजीर्ण व्हायची वेळ आली आहे, आणि म्हणे फायदा काय झाला ?

गजाः——केवढाही मोठा फायदा असला, तरी बाबा आज कांहीं मी जाणार नाही. आज अगदीं नांवाजलेला तमाशा बोलाविला आहे. तो पाहिल्याखेरीज मी कांहीं सोडावयाचा नाही. मला अजून जेवायचे आहे. त्यालाच अर्धा तास लागेल.

एवढें बोलून गजोबा घराकडे गेले. त्याच्या मागोमागच बडुनाना त्याला शिव्या देत देत घरीं येऊन पोंचले. घरीं आल्यावर त्यांनीं आपल्या नोकराला हाक मारली, " गण्या, गण्या! "

नोकरः——जी, आलो. असें म्हणून गण्या बाहेर आला. त्याचे पाय शेणानें भरले होते आणि गाईची नुकतीच धार काढलेले दुधाचें भांडें त्याच्या हातांत होते.

बंडु०ः——अरे लवकर कंदील लाव ! मला भाऊसाहेबांच्या येथें आरती करायला जायचें आहे.

तो कंदील लावून आणण्यासाठीं गेल्यावर बडुनाना आपल्या मनांतल्यामनांतच मारुतीची प्रार्थना करूं लागले. "बलभीम मारुतीराया, मला आज भाऊसाहेबांच्या येथून सुखरूप परत येऊ दे. मी तुला येत्या शनिवारीं सव्वा पैशाचा गुळ वाहीन. राम, राम, राम ! आज देवाच्या भरंवशावर मी

यमाच्या दाढेत जात आहें. देवा बलभीमा ! तुलाच माझी काळजी. तूच माझें सरक्षण कर ! ”

थोड्याच वेळांत गण्या कंदील लावून तेथें आला आणि त्याने तो बंडु नानापुढे ठेवला. बडूनानांनीं तो कदील हातांत घेतला व गण्याला म्हटले, “ अरे हे काय ? हा असा कां जळतो ? गज्या आहे कां घरांत ? ”

गण्या दात काढून म्हणाला, “ गज्यावा बाहेर गेले आहेत. माझा शेणानें भरलेला हात कंदिलाला लागल्यामुळे त्याचा चांगला उजेड पडँत नसेल ! ”

बडूनाना सतापून म्हणाला, “काय गधडा आहेस तू ! हात धुऊन कदील लावायचा का लेका तसाच ? छे. राम, राम, राम ! माझा सगळा हात खराब झाला ना ! एखादी चिंधी नाहीं तर कसला तरी रद्दी कागद घेऊन ये ! ”

गण्याने एक कागद आणून त्यांच्या हातांत दिला. त्याने कंदिलाची कांच साफ करून बंडूनाना एकदांचे दाराच्या बाहेर पडले. पण घराच्या बाहेर पडते वेळीं पुन्हा एकदां बलभीमाची प्रार्थना करावयाला ते विसरले नाहीत. घरापासून थोडेसे पुढे गेल्यावर, वाळलेल्या पानांच्या एका ढिगांतून खडबडल्याचा आवाज निघाला व बडूनानाच्या पायांचा आवाज ऐकून, त्याच्यात असलेला प्राणी पलीकडे निघून गेला. त्याच्या पुढे गेल्याव झाडावरून एक पक्षी उडून, तो त्यांच्या डोक्यावरून पलीकडे निघून गेला. त्याच्याहि थोडेसे पुढे गेल्यावर त्यांच्या कानांवर हिंस्र प्राण्याचा भयकर शब्द ऐकायला आला. सर्व प्रकार पाहून घाबरभट बडूनाना आपल्या मनांत म्हणू लागले, “ मारुतीराया ! आज काहीं चांगले लक्षण दिसत नाहीं. जागोजाग अपशकून होतात. घरांतून बाहेर पडल्याबरोबरच पाने खजबजलीं, त्यांतून आपल्याला साप आडवा गेला असावा; त्याच्यापुढे डोक्यावरून एक पक्षी गेला ते घुबड असावे; आणि अखेरचा तो क्रूर श्वापदाचा आवाज, या एकदर अपशकुनांवरून बाळासाहेबांकडून आज आमचीं हाडें मोडली जाणार. निदान, अपमान तरी चांगलाच होणार, यांत शंका नाहीं. काय बेटा हा पोरगा ! चांगल्या जहागीरदाराच्या

घरांत जन्मलेला, पण कांहीं ऐषआराम भोगील तर शपथ ! मूर्ख बेटा; इतके दिवस विद्याच काय शिकत राहिला आहे ? देवकृपेने एवढें मोठें उत्पन्न असतांना याला एवढे कष्ट करून काय करावयाचे ? याला कां कोणाची नोकरी करावयाची, कां विद्येवर पोटाला मिळवायचे ? बरें, इकडून तिकडून आतां विद्या शिकून घरी आला आहे, तरी काहीं बेस्याला ऐषआराम सुचतो कां ? पुण्यामुबईसारख्या ठिकाणी जाईल, का नाटके पाहिल कां, गाणारणी आणून त्यांचे गाणे करवील ? ते कांहीं नाही. पुरा अरसिक ! अगदी जन्मदरिद्री. त्या भिकारड्या जोशीबुवांच्या पोराच्या नादी लागून त्याने त्याच्यासारखे भिकारी चाळे चालविले आहेत. गांवोगांव शाळा काय काढायची म्हणतो, बायकांना काय शिकवायचें म्हणतो, येथून तिथून सगळीं भिकार लक्षणे. आणि कांहीं कशाचा शोक असलाच तर तो तेवढा तालमीचा. पण जाऊ द्या ! त्या भिकारड्याच्या भिकार चाळ्यांचा विचार करून मी आपले डोकें कशाला शिणवून घेऊ ? बलभीम ! बलभीम ! ”

बडूनाना जहागीरदारांच्या देवडीजवळ आल्याबरोबर त्यांनीं देवडी-वरच्या पाहारेकऱ्याला विचारले, “ कायरे रामसिग ! छोटे महाराजसाहेब आत आहेत का ? ”

रामः—ते इतक्यांतच बाहेर गेले. बहुतकरून जोशीबुवाच्या घरीं गेले असावेत.

या उत्तराने बडूनानांना बराच धीर आला, आणि ते जहागीर-दारांच्या वाड्यांत शिरले. तेथून ते थेट अतःपुरांत घुसले. तेथ गेल्यावर त्यांनीं चपीला हांक मारली. चंपी दूध आटवीत होती. तिनें तेथूनच विचा-रिलें, “कोण आहे ?”

बंडूः—मी बंडुनाना आहें. मी आरती करायला आलों आहें.

जवळच मसाला कुटीत असलेल्या दुसऱ्या एका दासीला हांक मारून चंपी म्हणाली, “ कृष्णे, कृष्णे, तूं जरा या दुधाकडे पहा ! तिकडे नाना आरती करायला आलेले आहेत. मी त्यांच्या आरतीची देवघरांत व्यवस्था लावून येतें. काय मेलं ! जो उठतो तो मलाच त्रास देतो. जणूं काय चंपीशिवाय घरांत दुसरी कोणी मोलकरीणच नाहीं. ”

वास्तविक बंडुनानांनीं हांक मारल्यामुळें चंपीला अतिशय आनंद झाला होता, पण आपली ही वृत्ति लक्ष्यांत येऊ नये, म्हणून तिनें बाह्यतः ही नाखुषी प्रकट केली. कुटिलता, छिद्रान्वेषित्व, परोपकर्षासहिष्णुता, आणि दुष्टपणा हे गुण बडुनाना आणि चंपी या दोघांच्याहि ठिकाणीं सारखेच भरले होते. यामुळें समानशील या नात्यानें दोघांची मैत्री व्हावयाला उशीर लागला नाहीं. बंडुनानांचा सहवास तिला मोठा सुखदायक होता. ती बडुनानाजवळ गेल्याबरोबर ते तिला म्हणाले, " कसें काय ? आज काय नवी खबर आहे ? "

चंपीः—आमचे येथें खबरेला कांहीं तोटा आहे कां, गुरुमहाराज ? रोज कांहीं ना कांहीं तरी नवी गम्मत दिसते. सध्यां बायकाना शिकविण्याची शाळा आमच्या घरांत सुरू झाली आहे.

बंडुः—ठीक ! पण काय ग, बाळासाहेब जोशीबुवांच्या घरीं अजूनहि रोज जातात म्हणे !

चंपीः—होय ! तो संसर्ग कधीं सुटला आहे ?

बडुः—हे ठिक नाहीं. हा समाजाचा धडधडीत अपमान आहे. यासंबधानें कांही तजवीज केली पाहिजे.

चपीः—काय तजवीज करणार ? मधुकर म्हणजे आमच्या छोट्या मालकांचा कलिजा आहे. बर आहे, पाहू काय होतें ते.

यानंतर बडुनाना पाय धुऊन देवघरांत गेले.

चंपीः—आपण आरती करा ! तोपर्यंत मी स्वयंपाकीणबाईला सांगून येते कीं, मी देवघरांतच तुमची व्यवस्था लावीत आहे.

देवघरांत कोणी नाहीं हे पाहून बडुनानाला समाधान वाटले. त्यांनीं घटा वाजविल्याची आणि आरतीचे दोनचार हात फिरविण्याची लटपटपंची करून ते कसें तरी समाप्त केलें. मध्यतरीच कोणी येऊन आपलें भांडवल बाहेर फुटतें कीं काय, अशी त्यांना मोठी भीति होती. पण बलभीमाच्या कृपेनें तसें कांही घडलें नाही.

चंपी स्वयपाकघरांत गेल्यावर, स्वयंपाकीणबाईने कांहीं धुण्यासाठीं तिला एक पाण्याचा तांब्या भरून आणावयास सांगितलें. याच वेळीं

यमुना देवाच्या नैवेद्याचे ताट भरून घेऊन खालीं येत होती, आणि बंडुनाना घंटा जागच्याजागी लटकावून देणार होते. इतक्यांत खालून विजयाचा शब्द त्या तिघांनाहि ऐकायला आला, आणि त्या तिघांच्या तीनहि जिनसा हातांतून खालीं पडल्या. विजय एवढ्यांत वर आला होता. त्या तिघांचीही उडालेली तिरपिट त्याच्या नजरेला पडली. तेव्हां तो हसून म्हणाला, " वा ! आतां देवाचें नशीब पुरते उघडले म्हणायचे ! जोशीबुवांच्या बदली बडूनानाची देवपूजेवर योजना झाली आहे, आणि त्यांचे सहाय्यक यमुना आणि चपी ! एवढे थोर त्रिकूट एकत्र झाल्यावर मग काय पहावयाचें ? अगदीं कपिलाषष्ठीचाच योग ! "

एवढे बोलून विजय पुन्हां मोठमोठ्याने हंसूं लागला. ताट, तांब्या आणि घंटा यांचा झणझणाट ऐकून माईसाहेब बाहेर आल्या, तेव्हां एकंदर प्रकार त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आला. त्या तिन्ही व्यक्ती अजून चित्रासारख्या जागच्याजागींच उभ्या होत्या.

माईसाहेब प्रथम यमुनेला उद्देशून म्हणाल्या, " हे ग काय केलें ? आतां नैवेद्य कशाचा दाखवायचा ? आणि चपे तूं अशी उभी कां राहिलीस ? सगळ्या घरभर पाणी केलेंस टवळे !"

तथापि त्या तिघांना अजूनहि हालवले नाहीं. विजयाच्या भीषण हास्याचा ध्वनि अजून त्यांच्या कानांत घुमत होता !

विजयः—( हसून ) माई, इतक्या पुण्यवान् लोकांच्या हातचा नैवेद्य भक्षण करणें देवाला अशक्य झाल्यामुळें, त्यानेंच हे ताट खालीं पाडण्याची व्यवस्था केली. जेथें बडुनानासारखे पुजारी, यमुनेसारखी नैवेद्य तयार करणारी आणि चपीसारखी पूजेच्या साहित्याची व्यवस्था लावणारी आहे, तेथें मनुष्याची सुद्धां ते खाण्याची इच्छा होणार नाहीं, मग देव तर देवच आहे ! माईसाहेब ! तुम्हांला स्वतःला जर देवांची पूजा करायला वेळ मिळत नाहीं, तर घरांत देवाची पीडा ठेवण्याची जरूर तरी काय ? आणि असल्या लोकांची त्या कामाकडे योजना करून विनाकारण पापांत तरी कां पडतां ? देव काय तुम्हां जहागीरदाराचा कारभारी आहे, म्हणून

तो तुमच्या इच्छेप्रमाणे ऐकत राहिल ? आणि अन्नासाठीं तुमच्या तोंडाकडे पहात राहील ?

माई०:—असें काय अवलक्षणी बोलतोस ? तूं देवधर्मेहि मानीत नाहींस कां ?

विजय आवेशानें म्हणाला, " मानतो ! म्हणून तर हे पाप मला पाहवेना. ज्याचे तोंड पाहिले तर पाप लागेल—"

पण त्याला पुढे बोलू न देता माईसाहेबानी त्याला हाताने एकीकडे ढकलले आणि म्हटले, " जा. उगीच काही तरी भकत राहिला आहेस ! "

विजय पहिल्यापेक्षांहि मोठमोठ्याने हसत तेथून निघून गेला. माईसाहेब यमुनेला म्हणाल्या, " जा, दुसरं चागलं नैवेद्याचे ताट भरून घेऊन ये आणि बडूनानाना शिधाहि काढून दे !

बडुनानानी हळूच दाराबाहेर डोकावून विजय गेला, कीं नाही हे पाहिले. तो गेला आहे अशी खात्री झाल्यावर त्यांच्या तोंडून शब्द उमटला. ते म्हणाले, " शिधा काढायला बराच वेळ लागेल. मला एक फार जरूरीचे काम आहे. मला आतां गेलेच पाहिजे. बलभीम, बलभीम ! " या यमपुरींतून आपण बाहेर कसे पडू असें बडुनानाला होऊन गेलं होतं. या वेळीं विजय जरी तेथे नव्हता, तरी तेथच्या भिंतीतून त्याची नरसिहमूर्ती प्रकट होऊन ती आपल्या तीव्र नखांनी आपले पोट फाडते कीं काय, अशी भीति त्याला वाटत होती.

माई०:—ठीक आहे. तुम्ही तेवढा नैवेद्य दाखवा आणि निघून जा. मी चपीबरोबर तुमच्या घरीं शिधा पाठवून देतें.

एवढें बोलून माईसाहेब आणि यमुना तेथून निघून गेल्या.

बंडुनाना एकटेच देवघरांत थरथर कांपत बलभीमाचा जप करीत राहिले !

# प्रकरण २३ वें.

## 'खलभुजंगा'च्या लीळा !

देवाला नैवेद्य दाखवून भाऊसाहेबांच्या बैठकीत आल्यावर बडुनानाच्या जरा जिवांत जीव आला. तथापि विजयाचें उपरोधिक हास्य आणि भाषण अद्यापि त्याच्या कानात घुमतच होतें. ते आपल्या मनातल्या मनांत म्हणाले, " बर आहे बच्चाजी! जर या गोष्टीचा सूड उगविला नाही तर,—"

बडुनाना शपथ घेतां घेताच थाबले. जहागीरदारांच्या मुलाचा सूड उगविणे ही गोष्ट काही सोपी नाही, हा विचार या वेळी त्यांच्या डोक्यांत उभा राहिला. एका हातात तो जुना मळकट कदील व दुसऱ्या हातात अनेक शतकापासून त्यांच्या घरात असलेली व भुरकट बनलेली काठी घेऊन बडुनानाची स्वारी दिवाणखान्यात आली. त्या वेळीं भाऊसाहेब अन्नपचनाचे चूर्ण तोडात टाकून भोजनाला जाण्याच्या तयारीत होते. त्याना पाहून भाऊसाहेब म्हणाले, " जरा घेतां का हें चूर्ण. आज इतकी रात्र का केली? थडी खूप आहे बोवा ! घ्या जरासें हें चूर्ण." बडुनानांचे चित्त या वेळी ठिकाणावर नव्हते. त्यांची अस्वस्थता पराकाष्ठेला पोचली होती. यामुळे ते चूर्ण घेण्यांत त्यांना बिलकूल मजा वाटली नाहीं. ते म्हणाले, " मला नको ! आणखी तुमच्या येथली ही देवपूजाहि बस्स झाली. इतका अपमान कोणी सहन करावा ? उद्यापासून देवपूजेला तुम्ही दुसरा कोणीहि ब्राह्मण पहा ! माझ्याच्याने कांही तुमच्या येथचें काम होणार नाहीं. "

भाऊसाहेब आश्चर्याने म्हणाले, " कां ? काय झालें ? "

बडु०:——काय आतां म्हातारपणी मार खाऊन या पांढऱ्या केंसांना काळीमा लावून घेऊं ? तुम्ही थोर लोक काय पाहिजे ते करूं शकाल! आमची प्रत्येक गोष्ट म्हणजे तुमच्या थट्टेचा विषय. आम्हां गरीब लोकांचे मरण आहे, दुसरें काय ?

भाऊसाहेब हे एकांतप्रिय गृहस्थ होते. यामुळे जग हे कसें आहे, याची त्यांना बिलकूल कल्पना नव्हती. ते कोणाला फारसे भेटत नसत. घरच्या माणसाशींसुद्धां त्यांचा संबंध फारच थोडा येत असे. घरांत फक्त दोन वेळां जेवावयाला जायचे, बाकी सारा दिवस ते आपल्या हुक्का गुडगुडींत मग्न. त्यांचा जिवलग दोस्त म्हणजे त्यांना दिवसभर गुडगुडी भरून देणारा आणि हमेशां त्यांच्या तैनातीत असलेला त्यांचा नोकर. जहागिरीचे सर्व कामकाज दिवाणजीच पाहात होते. विशेष महत्वाच्या प्रसंगीं ते भाऊसाहेबांकडे येऊन त्यांचा सल्ला घेत. एरवीं सर्व गोष्टी ते आपल्या जबाबदारीवर करीत. ऐषआरामप्रिय भाऊसाहेब त्यांच्या कामांत कधीहि हात घालीत नसत. दिवाणजींच्या कामांत आपण पचाईत केली, तर त्या कामाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी आपणांवरच पडायची अशी भीति त्यांना नेहमी वाटे. म्हणूनच ते या भानगडींत पडत नसत. जोशीबुवाना बहिष्कृत करण्याच्या भानगडीची सर्व जबाबदारी बडुनानाने आपल्या शिरावर घेतली, म्हणूनच भाऊसाहेबानीं त्या गोष्टीला संमति दिली होती.

बडूनानांनीं पूजेचा राजीनामा दिल्यावर अर्थातच कमकुवत प्रकृतीचे भाऊसाहेब गांगरले आणि ते त्याला म्हणाले, " पण झाले काय, हे तर अगोदर सांगाल कीं नाहीं ? "

बडु०:—ही सगळी करणी तुमच्या चिरंजीवांची ! भाऊसाहेब, तुमच्या चिरंजीवांची बरें ! एम्. ए. झालेले आहेत. जहागीरदारांचे चिरंजीव आहेत ! त्यामुळे त्यांचा जमिनीवर पाय ठरत नाहीं. आज मला त्यांनीं ठार केले असते, पण माईसाहेब आल्या म्हणून वांचलो. बिचारी खरी माउली. मीं काय तुमचा अपराध केला होता ? तुमच्या येथची देवपूजा करायला कोणी नव्हतें, म्हणून मीं ते काम पतकरलें. हा काय माझा अपराध झाला ? बस्स झाली तुमची देवपूजा. उद्यांपासून मीं कांहीं येणार नाहीं. तुमचा तुम्ही दुसरा ब्राह्मण ठेवून घ्या !

भाऊ०:—(डोळे झांकून) छे, छे, नाना असें करू नका ! त्यानें जर तुमच्याशीं अन्यायी वर्तन केले असेल, किंवा तुम्हांला तो कांहीं कमी जास्त

बोलला असेल, तर त्याचे कान उपटतो. पुनः त्याच्याकडून असे होणार नाहीं याची खात्री असू द्या !

भाऊसाहेबांच्या भाषणानें नानाला बरेच उत्तेजन मिळाले, ते म्हणाले, " तुम्हांला माझं बोलणं कदाचित् खरे वाटणार नाही, तर तुम्ही माई-साहेब, यमुना, चपी याच्यापैकी कोणालाहि विचारा ! त्या सगळ्या जणी त्या वेळी तेथे हजर होत्या. असा माझा अपमान कधीहि कुणी केला नव्हता. फक्त पायातला घेऊन मारावयाचा बाकी राहिले. खैर झाली ! माईसाहेब जर त्यावेळी आल्या नसत्या, तर आज तुमच्या घरात ब्रह्म-हत्या घडती ! "

भाऊ०:—नाना ! तुम्ही बिलकुल काळजी करूं नका ! मी त्याचा चांगला समाचार घेतो. तुम्ही नेहमीप्रमाणे पूजा आणि आरती करायला येत चला. यापुढे तेथे तुम्हाला कोणी काही बोलणार नाही याबद्दल खात्री बाळगा ! "

बडूनानाः—हे पाहा भाऊसाहेब, तुम्ही गावचे जहागीरदार, आमचे मालक ! तुमचे शब्द काहीं आम्हाला मोडता येत नाहीत. तथापि तुम्ही आमचा प्राण जरी घेतला, तरी आम्ही काहीं धर्म सोडायला तयार होणार नाहीं.

भाऊ०:—आणखी काय झाले ?

बडूनानाः—आणखी काय व्हावयाचे राहिले आहे ? तुमच्या घरांत बायकांची शाळा उघडली आहे, बायकाची शाळा, भाऊसाहेब ! आणखी काय व्हावयाचे बाकी राहिले आहे ? सोवळ्या ओवळ्याचा तर काहीं गधही राहिला नाही. तुमच्या आणि किरस्तांवांच्या घरांत बिलकुल फरक राहिला नाहीं. तुम्ही कुलपुरोहिताला बहिष्कृत करून मोठी चूक केली. मीच आपला समाजापासून अलग रहावयाला पाहिजे होते.

भाऊसाहेब विस्मयाने म्हणतात, " अरे ! माझ्या घरांत इतक्या भानगडी होऊन मला त्याचा पत्ता नाही ? कोणी तरी विजयाला बोलावून घेऊन यारे ! "

बडूनानाः—(घाबरून) छे, छे, भाऊसाहेब! हा काय गहजब करतां! तुम्हांला माझी शपथ आहे, निदान आज तरी त्याला कांहीं बोलू नका! त्याला वाटेल कीं, मीच ही कळ लाविली. मग तो माझे डोकें फोडल्याशिवाय कधीं राहणार नाहीं. भाऊसाहेब, तुम्हांला माझी शपथ आहे बरे! काही बोलू नका. नाही तर मला काहीं तो जिवत ठेवायचा नाहीं. माझें तुम्हाला कांही म्हणणे नाही. मीच आपला समाजाला सोडून राहतो. बलभीम, बलभीम!

भाऊसाहेबः—ठीक आहे. आता मी त्याला काही बोलत नाहीं. नंतर मला काय कळवायचें ते मी त्याला कळवीन.

बडूनाना जावयाला निघालेला पाहून भाऊसाहेब म्हणतात, "पूजेला रोज यायचें बरें, नाना!"

बडूनाना याचें कांहींच उत्तर न देता, "बलभीम बलभीम" म्हणून तेथून निघून गेले.

भाऊसाहेबांच्या घराच्या दाराजवळच एक मोठी पडवी होती. तिला देवडी म्हणत. तेथें जहागीरदाराचे सगळे नोकर, आश्रित आणि त्याचे दोस्त किंवा गावातले रिकामे लोक येऊन बसत, आणि दिवसभर आणि रात्रीहि उजाडेपर्यंत सोंगट्या, पत्ते, वगैरे खेळ खेळण्यात किंवा गांज्याच्या चिलमीवर ताव मारण्यात निमग्न होत. या ठिकाणी सगळ्या दुनियेच्या पंचायती चालत. बडूनाना तेथें गेल्यावर "शंभू" म्हणून त्यांनीं हांक मारली.

शंभू हा माईसाहेबांचा भाचा होता. बाळोबाची आई म्हणून जें पात्र या कथानकांत आलें आहे, ती या शंभुरावांचीच पत्नी होय.

बडूनानाचा आवाज ऐकतांच गांज्याची चिलीम झटपट एका बाजूनें लपवून, "कोण आहे, कोण आहे" करीत शंभूराव देवडीच्या दाराशीं आले.

बडूनाना प्रेमळपणानें म्हणाले, "मी आहें."

शंभूराव खोंकत खोकत म्हणाले, "कोण, बंडूनाना! इतक्या रात्रीं कोणीकडे?"

बंडूनानांनीं त्याच्या खांद्यावर हात ठेवून त्याला एका बाजूला नेले आणि म्हटलें, "हे बघ शंभू, तुला एक गोष्ट सांगावयाची आहे. तुम्हा लोकांना आम्हांसारख्या म्हाताऱ्याचे शब्द अगदी तुच्छ वाटतात. पण एकंदर प्रकार उघड्या डोळ्यांनी आम्हाला पाहवत नसल्यामुळे आमचा नाइलाज होतो. आम्हाला अधर्म पहावत नाही. कोठे अधर्म होतो असे दिसल्याबरोबर तेथे जाऊन प्राण द्यावा असं वाटते. शंभू, तू फार भोळा मनुष्य आहेस! जगाची तुला बिलकुल कल्पना नाही. पण तुझ्यावर जो प्रसंग कोसळणार आहे तो माझ्याच्याने पाहवेना, म्हणून मी इतक्या रात्रीं तुजकडे धावत धावत आलो."

ही प्रस्तावना ऐकून बिचाऱ्या शंभूची छाती फाटली. आपल्यावर कोणती आपत्ति कोसळणार, याची त्याला कल्पना होईना. भाऊसाहेबांतर्फे तो त्या गावचा मुखत्यार पाटील होता, आणि त्या कामानिमित्त एका बाबींत त्याने काही पैसे खाल्ले होते. तेव्हापासून त्याच्या मनाची शांती अगदी नष्ट झाली होती. त्याच कारणाने अलीकडे त्याची गांजाच्या चिलमीची आराधनाही अधिक प्रमाणाने सुरू झाली होती. तो भयचकित दृष्टीने बडूनानांच्या मुखाकडे सारखा पाहू लागला.

बडू०:–तुला ठाऊक आहे? तुझ्या बायकोच्या बाळंतपणाला विजय किरस्ताव दाई आणणार आहे ते? बिचाऱ्या शंभूच्या जिवांत जीव आला. कांहीं असो, पैसे खाल्ल्याचे प्रकरण काही उघडकीस आले नाही. पण बाळंतपणाला ख्रिश्चन दाई आणल्याने काय आपत्ती कोसळेल, याची शंभूला कल्पना होईना. तो म्हणाला, "होय! यासंबधाने बाळासाहेब काही नवीन व्यवस्था करणार आहेत, असे मी ऐकले खरं!"

बडूनाना:–तुझ्या धर्मपत्नीवर त्यांची एवढी मेहेरबानी कां झाली, याची तुला कल्पना आहे? बाबारे, तुला जर आपली जात आणि धर्म सांभाळावयाचा असेल, तर आपल्या बायकोला घेऊन येथून चालता हो! आजच्या आज माईसाहेबांच्या हातांपायां पडून त्यांची परवानगी घे आणखी निघून जा! नाही तर तुझा सत्यानाश होईल बघ!

शंभूः—नववा महिना आहे आणि आतां तिला घेऊन कसा जाऊं ?

बडुनाना क्षणभर विचार करून म्हणाले, " बर! असे होत नसेल तर निदान त्या ख्रिस्तांव दाईकडून बाळंतपण तरी करून घेऊ नको! तुझ्या बायकोला शिकवून ठेव कीं, 'मी कांहीं त्या बाईकडून बाळंतपण करून घेणार नाही' असे तिजकडून माईसाहेबांना साफ सांगायला लाव! जा! आतां नामी संधी आहे. भाऊसाहेब एकटेच बसले आहेत."

असे म्हणून बडुनानांनी त्याला तिकडे जायला मोठ्या प्रयत्नाने राजी केले आणि नंतर आपण तेथून निघून गेले.

शंभुराव भाऊसाहेबांकडे गेले त्या वेळीं भाऊसाहेब भोजनाला जाण्यासाठी तयार झाले होते. शंभुराव त्यांना म्हणाले, " मामा!"

भाऊ०:—काय आहे ?

शंभुरावः—बाळंतपणाला बाळासाहेब ख्रिश्चन बाई बोलावणार आहेत, असे मी ऐकले आहे.

भाऊसाहेबः—जा, जा, मी सर्व व्यवस्था ठीक करतो. तुला काय त्याची पंचाईत ?

बिचारा शंभुराव मुसकडांत खाल्ल्याप्रमाणे मुकाट्याने तेथून परतला आणि आपल्या नेहमींच्या ठिकाणीं येऊन गांजाच्या आराधनेंत पुनः निमग्न झाला.

इकडे तो जातो न जातो तोंच, भाऊसाहेबांना भोजनगृहाच्या अलीकडेच यमुनेनें गांठलें. ती त्यांची वाट पहात बराच वेळ तेथे उभी होती. भाऊसाहेब तेथे आल्याबरोबर ती म्हणाली, " माझं जरा ऐकून जाव."

भाऊसाहेब तिच्याजवळ जाऊन हंसून म्हणाले, " कोण यमुना! काय आहे ? आज किती दिवसांनी भेटतेस!"

यमुनाः—म्हटलं, मी आतां आपल्या घरांत राहू इच्छित नाहीं. मला आपली काशीला पोंचती करा ?

भाऊ०—कां ? काशीवासाची एवढी घाई कां ?

यमुना:-ज्या घरांत उठल्याबसल्या अपमान होतो, तेथे राहावयाचें कशाला ?

भाऊ०:—कोण अपमान करतें ?

यमुना:-आपल्या चिरंजिवाशिवाय दुसऱ्या कोणाची छाती लागली आहे माझा अपमान करायला ?

भाऊ:—वाहवा ग वेडे ! एवढ्याकरितांच कां काशीला जावयाचे ? मीं बाळासाहेबाला चांगला चापतो. जा !

यानंतर दोघांनींही एकमेकांकडे पाहिलें. या पहाण्यांत त्यांचा सर्व गतेतिहास सांठवला होता. त्याने दोघांनांही काय सांगावयाचे होते तें सांगितले आणि दोघेंही आपापल्या मार्गाला लागले.

आज आपल्या चिरंजिवासंबधानें एकामागून एक बऱ्याच तक्रारी त्यांच्या कानांवर आल्यामुळे भाऊसाहेब अगदी त्रासून गेले होते. जेवण झाल्यावर ते याच गोष्टीसंबधाने विचार करीत आपल्या शय्यागृहांतल्या पलंगावर पडले होते. थोड्या वेळाने त्यांची पत्नी तेथे येऊन त्यांच्या एका बाजूला बसली. भाऊसाहेब तिला म्हणाले, "बाळासाहेबाने घरात बायकांकरितां शाळा काढल्याचे मी ऐकतो आहे. शंभूच्या बायकोचें बाळंतपणही म्हणे एका खिश्चन दाईकडून तो करवणार आहे."

माई:- (खिन्नपणे) होय! अलीकडे पुण्याहून आल्यापासून त्याचा स्वभावच कोण जाणे कसा बनला आहे. तो रोज कांहीना कांहीं तरी नवे प्रकार काढतो. तो हल्लीं तर इतका बनला आहे कीं, कांहीं विचारायची सोय नाहीं. पहिला कसा शांत होता! पण आतां चिडखोरही झाला आहे. ती पांढऱ्या पायाची कार्टी घरांत आल्यापासूनच घरांत कोणाला सुखानें झोप येईनाशी झाली आहे. आरभीं तिने मधुकरावर जाळें फेंकलें होतें. आतां ती याला पकडावयाला पाहते. पोरगा जवान आहे. कोणत्या वेळेस काय घडून येईल याचा नेम नाही. त्यांतून अजून त्याचे लग्नही झालें नाहीं. तरणीताठी आणि खुपसुरत पोरगी घरांत असल्यावर त्याचें मन बिथरलें, तर त्यांत कांही आश्चर्य नाहीं.

भाऊसाहेब डोळे झांकून विडा चावीत चावीत म्हणाले, " त्या पोरीला आणि तिच्या मावशीला या दोघीनांही घरांतून हांकून दे म्हणजे कटकट मिटेल."

माई०:—अगबाई! मग तो तर डोकेंच फोडून घेईल. काकीला तर तो आपला जीव की प्राण समजतो. अगोदरच तिच्यावर त्याची भक्ति आणि त्यांतून तिने ही पोरगी आणल्यापासून तर तिला कोठे ठेवू आणि कोठे न ठेवू असे त्याला झाले आहे. त्या पोरीने त्याला मोहिनी टाकल्यासारखें केले आहे.

भाऊसाहेबः—थांब. मी आता त्याच्याकडूनच त्या दोघीना हांकून देतो!

माईसाहेबः—पण माझ्या समजुतीने त्याचे आपण आतां लवकर लग्न करून द्याव हे बरे. त्याचे आता लग्न ठेवणे बरे नाहीं.

भाऊ०:—ठीक आहे. मी उद्यां परवाच यासबधाची सर्व व्यवस्था करून टाकतो. गगापूरच्या जहागीरदाराची धाकटी मुलगी फार चांगली आहे म्हणतात. त्यांनं नुकतेच बोलणे लावले आहे. तेंच स्थळ जुळवून टाकावे म्हणजे झाले!

भाऊसाहेबाना ससारांतले कोणतेही काम पाहण्याचा मोठा कटाळा असे; आणि एकदां एखाद्या कामाची त्यांच्यावर जबाबदारी पडली की, मग ते कधी करून टाकीन, असं त्याना होई. विजयाचे लग्न आता ठेवायचे नाही इतके ठरल्यावर, गगापुरच्या जहागीरदाराच्या मुलीशीं जुळवून टाकावयाचेच असा त्यांचा निश्चय झाला, आणि तो त्यांनी माईसाहेबांना कळविलाही. त्यांच्या या निश्चयाने माईसाहेब तर अगदी खूष झाल्या.

---

# प्रकरण २४ वें.

## लग्नाची वाटाघाट !

सकाळीं विजय नित्याप्रमाणे अल्पसा उपहार करून आपल्या लायब्ररीत आंग्ल कवीच्या वाचनांत गढला होता. इतक्यांत माईसाहेब तेथें येऊन म्हणाल्या, " विजय! "

विजय मान वर करून म्हणाला, " काय माई ? "

माईसाहेब हसत हसत म्हणाल्या, " आज सकाळीच तुला एक गोड बातमी कळविण्यासाठीं मी आले आहे. "

विजयः—(उत्सुकतेने) कसली ?

माई०ः—तुझ्या लग्नाचे बहुतेक सर्व जमले. आज ते सगळे पक्के करणार आहेत.

विजयः—म्हणजे ? मला एखादी लहानशी बाहुली कां तुम्ही खेळावयाला आणून देणार ?

माई०ः—विजय, तुझी की नाहीं आपली नेहमी थट्टा चालू असते ! तुझ्या गळ्यांत खरोखरच का आम्ही एखादी पाळण्यातली पोर बांधू असे तुला वाटते ?

विजयः—मग केवढी आहे ती ?

माई०ः—तिच्या घरची माणसे म्हणतात की, तिला यदाच सातवे वर्ष सरून आठवे वर्ष लागले. पण तिचे खरे वय आणखी एक दोन वर्षांनी तरी खचित जास्त असावे. आणखी कशी सुंदर आणि शहाणीहि आहे हो !

विजयः—मग खरोखरच तिला आतां लग्नाशिवाय तशी ठेवणे तिच्या आईबापांना शक्यच नाही. पण माई, माझी सध्यां मुळी लग्न करण्याची इच्छाच नाहीं !

माई०:—हे बघ, पहिल्यानें सगळे नीट ऐकून घे, मग तुला काय सांगावयाचें ते सांग. तिचा बाप जहागीरदार आहे आणि त्याच्या जहागीरीचें उत्पन्नहि भरपूर आहे. त्यांची ही एकुलती एक मुलगी. तिच्याशिवाय त्याना दुसरें मूलबाळ काही नाही. अशा स्थितीत त्यानें जर दत्तक घेतला नाही,—आणि हीच गोष्ट संभवनीय आहे, तर त्याच्यामागें त्याची सगळी जहागिरी तुलाच मिळेल. मुलगी रूपानें कशी लक्ष्मीसारखी आहे. मग आणखी काय पाहिजे?

विजय:—तरी देखील माझी सध्या लग्न करण्याची मुळीच इच्छा नाही. तू माझें हें म्हणणें बाबाना कळीव.

माई०:—तू कसा मूर्ख मुलगा आहेसरे! अरे! मागेंच जर आम्ही तुझें लग्न केलें असतें, तर एव्हाना तुला एक दोन मुलें देखील होऊन गेली असती! आणि आता देखील तू लग्न करावयाचें नाही म्हणतोसच! तू काय आमची काहीच हौस फिटू देत नाहीस? तुला बायको कशी पाहिजे, हें तरी आम्हाला एकदा नीट सांग. तुम्हा इंग्रजी शिकलेल्या पोराना वाटतें आपल्याला खूप मोठ्या—चांगल्या दोन दोन लेकांच्या आया शोभणाऱ्या—अशा बायका असाव्यात. पण आपल्या समाजांत एवढाल्या मुली बिन लग्नाच्या कधीं राहतील का? आहे त्यांत फार तर एखादी मोठी निवडतां येईल!

विजय:—(हसून) पण प्रत्येक जन्मलेल्या प्राण्यानें लग्न केलेंच पाहिजे असें शास्त्र का आहे, माई? वाटेल तें झालें तरी मी कोवळ्या पोरीशीं लग्न करणार नाही हें तुला अगदी साफ सांगून टाकतो. शिवाय माई, खरें म्हणशील तर मला मुळी लग्न करण्याची जरूरच काय? तुझ्या प्रेमाचा जो हिस्सा माझ्या पदरांत पडतो, त्याला मी आणखी वांटेकरी कशाला होऊं देऊं? हे असो; पण आपल्या घरांत येणाऱ्या त्या मुलीचा स्वभाव कसा असेल, काय असेल, याची आपल्याला यत्किंचित् तरी कल्पना होऊं शकेल कां? ती आपल्या दोघांच्या प्रेमांत अंतर आणून, आम्हांला परस्परापासून दुरावणार नाहीं म्हणून तरी कोणी सांगावे?

त्याच्या या भाषणाने माईसाहेब अगदी प्रसन्न होऊन म्हणाल्या, " हें तुझें म्हणणें अगदीं खरें आहे. पुष्कळ ठिकाणीं असा प्रकार झाल्याचे आणि होत असल्याचे आपण पाहतों. पण तू जर आपल्या बायकोला दाबात ठेविलीस, तिला आपल्या डोकीवर चढू दिली नाहीस, तर आपल्या घरात असे काही होण्याची भीति बाळगावयाला नको. तिनें आपणास एकमेकापासून दुराविण्याचें मनांत आणिलें, तरी देखील काहीं होणार नाहीं. "

विजयः—हे सगळे ठीक आहे, माई! पण उद्या माझे मन माझ्या ताब्यात राहीलच अशी मी आज कशी ग्वाही देऊ? म्हणूनच मी म्हणतों, सध्या आपण मायलेकरं आनंदात आहो हे फार छान आहे. उगीच ही लग्नाची ब्याद मध्ये आणू नकोस!

माई०:—छे, छे, असे कोठे होते बाबा! तू काय असाच जन्मभर कुंवार राहणार? ज्या वेळी जी गोष्ट व्हावयाची ती झाली नाही, तर बरें नव्हे. लोकही नावें ठेवतात. आतला प्रकार कोणाला ठाऊक असतो का? पण सध्याच जो तो नावें ठेवू लागला आहे. म्हणतात, "बघा! पोरगा एवढा वाढला आहे, पण अजून त्याच्या लग्नाचा पत्ता नाही! सख्खी आई, असती तर तिने इतके दिवस लग्नावाचून राहू दिले असते का? बोलून चालून सावत्र आई! तिच्या काय काळजाला पीळ पडावयाचा"? तूच सांग, विजय, अशी लोकांची बोलणी ऐकून माझ्या मनाला दुःख झाल्याशिवाय राहील का? "

विजयः—असे कसे होईल? पण माई, लोकांना काय पाहिजे ते बडबडू दे, तू त्याच्याकडे मुळीच लक्ष देऊ नकोस. तू मला कशी सख्या आईपेक्षाही जास्त आहेस, हे मी तर पूर्णपणाने जाणतों ना? तू माझ्याकडे लक्ष दे. लोक काय म्हणतात ते पाहू नकोस.

माई०:—छे, छे, लोकनिंदा ही काही साधारण गोष्ट नाही. तिच्यासाठीं रामाला सीतेचा त्याग करावा लागला. बाळ, तू माझे एवढे कसेही करून ऐक. या गोष्टीला एकदा हो म्हण.

विजयः—छट् ! सध्यां मला मुळींच लग्न कर्तव्य नाही. या
खरें कारण ऐकून घेण्याची तुझी इच्छा आहे ? याचे खरे कारण हेच आ
की, तुम्ही मजकरिता जी वधू निवडाल ती मला पसत पडणार नाह
आणि मी निवडेन ती तुम्हाला पसंत पडणार नाही
यासाठीच मी म्हणतो की, सध्या ही भानगडच उपस्थित न केलेली बर
सगळे जग लग्न करतं, मी एकट्यानेच केले नाही म्हणून त्याची का
हानि होणार ?

माईसाहेबांना सुनमुख कधी पाहीन असें झाले होते. पण आप
ही हौस फेडावयास विजय मुळीच तयार नाही, हे पाहून त्या अगदी न
स्तूप होऊन गेल्या आणि म्हणाल्या, " जा तुझ्या मर्जीला येईल तसे क
आता मी तुझ्या कोणत्याही गोष्टीत पडावयाची नाही, किंवा अमुक एका
गोष्ट कर म्हणून तुला कधी म्हणणारही नाही. कुत्ता जाणे, आ
चमडा जाणे ! तुझा बाप आणि तू पाहून घे. मी आपली पराकाष्ठा कर
वयाची ती केली. मी त्यांना जाऊन सांगते. "

एवढं बोलून माईसाहेब तेथून जावयाला निघाल्या. इतक्यात घर
तल्या एका नोकराने तेथे कापडाचे गाठोडे आणून टेविले. ते पाहून मा
साहेब म्हणाल्या, " यात काय आहे ? "

विजयः—यात पोलकीं आहेत, माई !

माई०:—ही कशाला ?

विजयः—वगातल्या सगळ्या बायकांसाठी मीं ही पुण्याहून मुद्द
तयार करवून आणली आहेत ?

माई०:—आम्ही ही पोलकी घालून आता मिरवावयाचे ?

विजयः—काय हरकत आहे ?

माई०:—हीं घालून देवघरांतसुद्धा जायचे ?

विजयः—धुतल्यावर याना विटाळ कुठला, माई ?

माई०:—मला हे नाहीं चालावयाचे ! तू काय आम्हां सगळ्या
ती किरस्तांवणि कुसुम समजतोस ? ती सटवी येथे आल्यापासूनच तूं अ
बिघडलास. आता मला कळून आले तू लग्न करावयाला कां नको म्हणत

ते ! थांब, मी काकीकडे जातें. तिनें जर आजच्या आज त्या कार्टीला घरांतून काढून दिले नाही, तर मी तोंडात पाणी देखील घेणार नाही.

विजय संतापलेल्या माईसाहेबांकडे पाहून सद्गदित कंठाने म्हणाला, " माई, आपल्या आश्रयाला येऊन राहिलेल्या माणसासंबधाने असे उद्गार काढणे हे महापाप आहे. तिला घरातून काढून देण्यानें तर आपले कधींहि कल्याण व्हावयाचे नाही. तु जर तिला घरातून बाहेर काढून देशील, तर मीहि तिच्याबरोबर घराचा त्याग करीन. '

त्याचे हे भाषण ऐकून माईसाहेब अधिकच संतापल्या आणि म्हणाल्या, " माझा असा अपमान ! माझे कल्याण व्हावयाचें नाही म्हण-तोस? तुझी आई जिवत असती, तर तुझी अशी बोलावयाची छाती होती ?"

यावर विजय कांहींच बोलला नाहीं. त्याच्या डोळ्यातून आतां सारख्या अश्रुधारा वाहू लागल्या होत्या.

तो पुन्हा एकदां करुणस्वराने माईसाहेबांना म्हणाला, " माई ! "

माईसाहेबानी त्या वत्सल भावनेनें भरलेल्या शब्दाकडे लक्ष दिले नाही. इतकेच नव्हे, तर त्याच्या अश्रुमलीन मुखाकडे त्यांनी एकवार दृष्टि-सुद्धा फेकली नाही. त्या तशाच संतापाने पाय आपटीत तेथून बाहेर पडल्या.

माईसाहेबांच्या या तिरस्काराने विजयाचे भावप्रवणहृदय अधिकच व्यथित झाले ! तो बिछान्यांत तोंड खुपसून एखाद्या लहान बालकाप्रमाणें रडू लागला. त्याला इतर कोणत्याही अपमानाचे इतके वाईट वाटले नाहीं. पण त्याच्या मातृभक्तीविषयी माईसाहेबांनी जो संशय प्रकट केला, त्यानें त्याच्या हृदयावर सुऱ्याप्रमाणें आघात केला. तथापि रडतां रडतांच आपली आई तिकडे काकींना आणि कुसुमला आणखी काय काय बोलते कोण जाणे, हा विचार त्याच्या मनांत एकदम उभा राहिला. त्याबरोबर त्यानें आपलें रडणें थांबविले आणि डोळे तो पुसून तिकडे निघून गेला.

पण तो तिकडे जाण्यापूर्वीच माईसाहेबांनीं काकीवर आपले संतापास्त्र चालविण्यास सुरुवात केली होती.

त्या काकींना म्हणाल्या, " काकी, तुम्ही आणि तुमची भाची या क्षणीं माझ्या घरांतून चालत्या व्हा. यापुढे माझ्या येथे तुम्हांला जागा नाहीं. तुम्ही आपला मार्ग सुधारा ! "

एवढे बोलून माईसाहेब तेथून निघून गेल्या. काकीना नुसतें तोंड उघडावयाला देखील त्याहून अधिकच वेळ लागला असता ! त्यांना खुलासा विचारावयालाही माईसाहेबांनी संधि मिळू दिली नाही.

विजय काकींच्या खोलीत येऊन पोचला, त्या वेळी काकी आणि कुसुम दोघीहि स्तब्ध बसल्या होत्या. विजयाला पाहून काकींच्या अश्रुधारा वाहूं लागल्या. कुसुमने आपले अश्रु त्याला दिसू नयेत, म्हणून खाली मान घातली. हा देखावा पाहून विजयालाही आपले अश्रु आंवरणे अशक्य झाले ! काही वेळ तीं तिघेही स्तब्ध होतीं. नंतर विजय आपले अश्रु पुसून म्हणाला, " काकी, माई काय म्हणाली ? "

त्याचे हे भाषण ऐकून काकी केविलवाण्या स्वरानें म्हणाल्या, " त्यांनीं आम्हां दोघींनाही या घरांतून आताच्या आतां चालते होण्याचा हुकूम केला आहे ! मर्जी प्रभूची ! त्यानेच आम्हांला निर्माण केले, तसे तो आमच्या पोटाचीही कुठे तरी तरतूद लावीलच. "

विजयाच्या नेत्रांत पुन्हां अश्रु उभे राहिले. तो रुमालाने डोळे पुसून म्हणाला, " काकी, इतके दिवस जसा तुम्ही सहन केला, तसा आणखी एक महिना माझ्याकरिता होईल तो अपमान सहन करा. एवढ्या अवधींत मी तुमच्या जहागिरीचा हिस्सा तरी तुम्हाला परत करीन, किंवा तुमच्याबरोबर मीही या घरांतून बाहेर पडेन. "

काकी आपले अश्रु पुसून सद्गदित कंठाने म्हणाल्या, " छे, बाळ ! माझ्याकरितां तू आपल्या आईबापाच्या मर्जीबाहेर वागू नकोस. तसें तू केलेस, तर मला फार दुःख होईल. माझ्याकरितां तू आतांपर्यंत कांही कमी दगदग सोसली नाहींस ! आम्हां अभागिनीकडे परमेश्वरानेच पाठ फिरविली, त्याला तू तरी काय करणार ? तुला पुन्हां हात जोडून सांगतें कीं, माझ्याकरितां तू आपल्या आईबापांना दुखवू नकोस आणि स्वतःही तक-

लीफ भोगू नकोस ! तूं दुःखी झालास, तर मला जन्मभर दुःख होईल, याचा विचार कर. ”

विजयः—काकी, मी हें तुमच्यासाठीं करीत नसून धर्मसंरक्षणार्थ करीत आहे. यामुळे कोणाला दुःख झाले, तर ते त्याने सहन केले पाहिजे. आणखी एक महिना मात्र स्तब्ध राहा. नतर कांहीं झालें नाही, तर मी तुम्हांला काशीला घेऊन जाईन. मीं आजपर्यंत सपादन केलेली विद्या माझे आणि तुम्हां दोघींच पोट कसेही सहज भरील. वडिलानीं केलेल्या पापाचे प्रायश्चित्त मला भोगावयालाच पाहिजे. मी त्यांना त्या ऋणात राहू देणार नाही.

काकींचे डोळे अश्रूंनी भरून आले आणि कठही दाटून आला. यामुळे त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडणे अशक्य झाले. त्या डोळे झांकून आणि हात जोडून विजयाला सुखी ठेवण्याविषयीं ईश्वराची मूक प्रार्थना करू लागल्या.

विजयाचे ते वीरजनोचित अतःकरण पाहून कुसुमही सद्गदित झाली. तिच्या हृदयांत प्रेमाचे तरग उसळू लागले. तिने त्याजकडे एक वेळ कृतज्ञतापूर्ण दृष्टीने पाहून त्याचे हृदयाच्या भाषेने आभार मानिले !

---

# प्रकरण २५ वें.

## परीक्षेचा निकाल !

**लग्नाच्या** बाबतीतील विजयाचे विचार पतिराजांना कळविण्यासाठीं माईसाहेब अगदीं उतावळ्या झाल्या होत्या. त्यांना त्या बोलावण्यांवर बोलावणी पाठवीत होत्या. इतक्यांत विजय त्याच्याकडे आला आणि म्हणाला, “ माई ! ”

पण माईसाहेब त्याच्याकडे मुळीच लक्ष न देतां गाल फुगवून दुसरीकडे पाहू लागल्या. विजय माघार घेणारा नव्हता. तो चटकन् आंत

घुसला आणि त्यांच्या पायावर डोकें ठेवून म्हणाला, " माई, मी पास झाल्याची तार आली. पहिल्या वर्गांत पहिला आलों ! "

माईसाहेबाचा सगळा राग हां हां म्हणतां नाहींसा झाला, आणि त्यांचें हृदय आनदाने फुलून गेले ! त्यानी त्याला प्रेमभरानें पोटाशी धरले. नतर एका नोकराला हांक मारून त्या म्हणाल्या, " अरे ! ही बातमी तिकडे दिवाणखान्यांत जाऊन सर्वांना कळीव आणि दिवाणजीना म्हणावे कीं, दहा रुपयांचे पेढे आणवून द्या ! चपे, गजाननभटजीला म्हणावें, आज देवपूजेची घाई करू नका. देवाला पक्वान्नाचा नैवेद्य दाखवावयाचा आहे.

थोड्याच वेळात माईसाहेबाभोवती घरातल्या बायकांची एकच गर्दी झाली, आणि जी ती विजयाजवळ काहींना काही तरी बक्षीस मागू लागली !

गजाननभटजीना माईसाहेबांनी पाठविलेला हुकूम ऐकून विजय म्हणाला, " माई, आजच्या पूजेशी तरी गजाननभटजीचा संबध ठेवा-वयाचा नव्हता. त्याच्या पूजेचा देव कधींच स्वीकार करणार नाही. अशाच्या हातून केलेल्या पूजेमुळे माझे कल्याण होण्याऐवजी अकल्याणच होईल."

माई०:—छे, छे, असं बोलू नये, बाळ ! ईश्वर तुझे निरतर कल्याणच करील.

विजयः—तू काही म्हण माई. पण असल्या ब्राह्मणापेक्षां आपला केरु महार हजार हिश्शांनीं श्रेष्ठ आहे. गजानन खरोखर ब्राह्मणच आहे काग, आई ?

माई०:—चूप बैसरे ! त्याच्या जर हे कानांवर गेले, तर त्याला किती वाईट वाटेल ? आजच्या आनदाच्या प्रसगीं कोणाचेही मन दुखवू नकोस, बाबा ! "

विजयः—माई, आज जर आनदाचा दिवस आहेत, तर जोशी काकांना बोलावून त्यानाच पुन्हां देवपूजा करावयाला लावीनास ? माई, माझ्याकरितां एवढे करच. मी पास झालों याबद्दल तुला आनद व्यक्त करावयाचा असेल, तर तो अशा रीतीने कर. काकांसारख्या पवित्र

ब्राह्मणाचा आशिर्वाद घेऊन या कार्याला आरंभ झाला, म्हणजे आपली सर्व उदासीनता आणि मनोमालिन्य नष्ट होईल.

त्याचे हें भाषण ऐकून माईसाहेब म्हणाल्या, "कोण आहे तिकडे? जरा काकींना आणि कुसुमला इकडे बोलावून आणा बरें!"

विजय अगदी खूष होऊन म्हणाला, "माई, मीच काकींना बोलावून आणतो."

विजय काकींच्या खोलीकडे गेला. पण तो पास झाल्याची बातमी काकींना अगोदरच लागली असल्यामुळे, त्या आपला आनंद व्यक्त करण्यासाठीं केव्हाच खोलीच्या बाहेर पडल्या होत्या. सध्या त्या खोलीत एकटी कुसुमच होती. जमिनीवर एक चादर हंतरून त्यावर ती पडली होती. तिच्या अंगावरचा पदरही एका बाजूला झाला होता, आणि तिचा भरगच्च केशसमूह अस्ताव्यस्तपणे भूभागावर लोळत होता. त्या वेळची तिची ती मनोरम छबी आणि अप्रतिम सौंदर्य पाहून विजय अगदी मुग्ध होऊन गेला! पण तो आलेला पहाताच कुसुम चटकन उठून बसली आणि तिनें आपला पदर नीट सावरला. थोडा वेळ दोघेही स्तब्ध होतीं. नंतर विजय किंचित् स्मित करून म्हणाला, "काकी कोठें आहेत?"

कुसुमः—मावशी येथून केव्हाच बाहेर गेली.

विजयः—मी पास झाल्याचे तुला कळलें?

कुसुमः—होय.

विजयः—माई तुला तिकडे बोलावीत आहे, चल.

कुसुम त्याच्याकडे स्मितपूर्वक आणि प्रसन्न दृष्टीनें पाहून म्हणाली, "चलां पुढे, मी येते.

आनंदसागरांत बुडालेल्या विजयाला तेथून एकटेंच निघून जाणें मोठें जड वाटू लागलें. इतक्यांत धूमकेतूप्रमाणें मधुकर एकदम तेथें प्रगट झाला आणि त्याला म्हणाला, "विजय, तूं येथें काय करीत बसलास? अरे! तिकडे काय भयंकर प्रकार चालला आहे!"

मधुकराची चर्या संतापानें आरक्त बनली होती, आणि त्याचें सर्व अंग थरथरत होतें!

विजय आश्चर्यचकित होऊन म्हणाला, "काय झालें?"

मधुकरः—काय झाले ते तुमच्या काकासाहेबांना विचार, किंवा त्यांचे सल्लागार बंडुनानाना विचार.

विजयः—अरे पण सांगशील कीं नाहीं, काय झाले ते?

मधुकरः—बडुनानाच्या सागण्यावरून तुझ्या काकानीं कमलेला घराच्या बाहेर हांकून दिले.

मधुकराच्या तोंडून ही बातमी ऐकून विजयच्या मस्तकावर वज्र पडल्याप्रमाणे झाले! काय करावे, किंवा काय बोलावे हे त्याला सुचेना!

मधुकरः—विचार काय करीत राहिलास? आपल्याा भावाबंदांच्या पापाचे प्रायश्चित्त आपल्यालाच भोगावयाला पाहिजे. त्या बिचारीला प्रसव-वेदना लागल्या आहत ही खबर कळतांच बडुनाना काकासाहेबाकडे गेले आणि त्यांना म्हणाले, "सांभाळा, काकासाहेब! तिला जर यावेळी तुम्ही घरांतून बाहेर काढून दिले नाहीत, तर समाज तुम्हाला बहिष्कृत करील!" मग काय? काकासाहेबांनी त्याच क्षणी तिला घराच्या बाहेर हाकून दिले! हा समाज आणि हा धर्म! त्या बड्यानं एवढा पाजीपणा चालविला असून तुम्ही त्याला लवमात्र विरोध करीत नाही! त्याला भिऊन गुपचूप बसत हे केवढे आश्चर्य! पण ही वेळ मात्र अशी गुपचूप बसण्याची नव्हे. कमलेचा शोध लाव आणि तिला परत घेऊन ये. तुझ्या स्वतःच्या घरांत तिल आणून ठेवण्याचे तुला धैर्य होत नसेल, तर माझ्या घरात आणून ठेव मला गगापूरला जावयाचे आहे. तिकडच्या तहाशिलदाराने तेथची राष्ट्रीय शाळा राजद्रोहाच्या सबबीवर बद केली आहे! गांवांतले लोकही भेदरून गेले आहेत! यासाठीं मला तिकडे जाऊन ती शाळा सुरू करण्याची पुन व्यवस्था केली पाहिजे. कमलचा शोध लावून तिला इकडे आणण्याच भार आतां सर्वस्वीं तुजवर आहे. माझा या कामीं नाइलाज आहे. य कामीं तुजकडून हेळसांड होतां कामा नये.

एवढे बोलून त्याने विजयाच्या हाताला धरून त्याला तेथून खेचून नेले! कुसुम किंकर्तव्यमूढ होत्साती जागच्याजागींच स्तब्ध राहिली!

थोड्या वेळाने कुसुमने पाहिले, तो सर्व घरभर विषण्णतेची छाया पसरलेली तिला दिसली. सर्वांच्या मुखावर उदासीनतेची छाया पसरलेली होती. आनदोत्सवाची अगदीं जय्यत तयारी झाली होती, पण त्यावर थड पाणी पडल्याप्रमाणे झाले होते. सैपाकीणबाईने चुलीवरची तुपाची कढई खाली उतरली होती, आणि यमुना पूजेची तयारी करतां करताच थाबली होती.

ती माईसाहेबाकडे येऊन म्हणाली, " माईसाहेब, गजाननभटजी पूजा करतां करताच मधु दादाच्या तोंडून आपल्या वडिलांचे नाव निघाल्याबरोबर देव जागचे जागीच ठेवून तेथून पळून गेला! देव खाली उतरलेले तसेच आहेत. आता पूजा करून त्याना नैवेद्य कोण दाखवील ? "

ही बातमी ऐकून माईसाहेब दगडी पुतळ्याप्रमाणे निश्चल झाल्या! त्या घरातील सर्वच माणसे मत्ताने भारल्याप्रमाणे अचल बनली होती! छोटी मनीसुद्धा एका कोपऱ्याचा आश्रय करून गुपचूप बसली होती. तिच्या तोंडून आज गाणंसुद्धा निघत नव्हते. हाच प्रकार विलासचा! त्याचे उड्या मारणे आज सपशेल बद झाले होते. तो मनीजवळ तिच्याप्रमाणेच स्तब्ध बसला होता.

थोड्या वेळाने कुसुम मनीजवळ येऊन तिने तिला हळूच कडेवर उचलून घेतले.

मनी तिला म्हणाली, " कुसुमताई, तू आमच्या बलोबल खेळतेस का ? "

कुसुमः—हो. माझ्या खोलीत चला म्हणजे आपण सर्वजण तेथे खेळू.

मनीः—तिकल नको. तिथे दादा येईल.

कुसुमः—बरे तर आपण इथेच खेळू.

एवढे बोलून कुसुम तेथेच त्याच्याजवळ बसून त्यांच्याशीं खेळू लागली. माईसाहेब उदास वृत्तीने ती मौज पहात उभ्या होत्या!

# प्रकरण २६ वें.

## भूतदयेचा मासला !

कमल आधले दिवशींच्या सध्याकाळपासूनच घरांतून निघून गेली, असे शोधाअती विजयला कळून आलें. आतां दुपारची वेळ झाली होती. बिचारी रात्रभर कोठें राहिली असेल, तिची या अवधींत काय अवस्था झाली असेल, इत्यादि विचारांनी विजयचे हृदय दग्ध होऊन गेलें; आणि त्याबरोबरच ज्या दुष्टांनी तिच्यावर असा प्रसग आणिला, त्यांच्याविषयींचाही सताप अगदी अनावर झाला !

आपल्या चुलत्याला भेटून त्याचा एकदां खूप समाचार घ्यावा आणि पंडुनानाची तर हड्डीच नरम करावी, असाहि विचार त्या वेळी त्याच्या मनांत आला. पण अगोदर कमलचा शोध लावणे जरूरीचे असल्यामुळे त्याला तो विचार दाबावा लागला. अशा वेळी कमलला घराबाहेर घालवून देणें म्हणजे तिची आणि तिच्या पोटी जन्मणाऱ्या बालकाची साक्षात् हत्याच करणे होय. अशा रीतीनें दोन जिवाची हत्या करावयास प्रवृत्त झालेल्या नराधमाच्या ठिकाणी सामान्य मानवता तरी आहे की नाही, या संबधानें विजयाला जर शका आली असली, तर त्यांत आश्चर्य कसलें ? त्याचे मन त्या नराधमाच्या तिरस्कारानें अगदीं भरून गेलें. आणि अशा स्थितींतच तो कमलचा शोध करण्यासाठी घराच्या बाहेर पडला. एका मोठ्या जहागीरदाराच्या पोरानें—समाजानें निंद्य गणलेल्या एका 'पापिणी' च्या—एका गरोदर विधवेच्या शोधासाठी उन्हांतान्हांतून धांवावे ही गोष्ट लोकांना अत्यत विस्मयजनक वाटली. विजयबरोबर त्याचे नोकर चाकरही इकडे तिकडे धांवू लागले. परतु कोणालाहि तिचा पत्ता म्हणून लागला नाहीं.

विजयाच्या चुलत्यानें कमलला हांकून दिले, त्यावेळीं तिच्या अगावर फक्त एक नेसतें लुगडे मात्र होतें; आणि प्रसववेदना व्हावयालाही

सुरवात झाली होती. अशा वेळीं आपण कोठे जावें, काय करावें, या विचाराने त्या अनाथ बालिकेचे हृदय कापू लागले. शेवटीं आपल्याला या वेळीं कोणाच्याही घरांत आश्रय मिळणे अशक्य आहे, हे जाणून तिने एका देवळाचा आश्रय केला. हें देऊळ जहागीदारसाहेबाच्या पूर्वजांनी बांधलेले असून त्यावर अजून जहागीरदारसाहेबाचाच ताबा होता. कमल या देवळात शिरली, त्या वेळी तेंथ जहागीरदाराचा एक नोकर होता. ती आंत आलेली पाहिल्याबरोबर तो तिच्या अंगावर एकदम चवताळून गेला आणि त्याने तिला तेथून त्याच क्षणी निघून जाण्यास सांगितले. बिचाऱ्या कमलला देऊळ सोडणे भाग पडले. जहागीरदारसाहेबाच्या नोकराने तिच्याशी हें जे निष्ठुरपणाचे वर्तन केलं, त्याचे कारण आपण जर हिला येथे ठेवून घेतले, तर आपल्यावर आपल्या मालकाची मर्जी खप्पा होईल, असे त्याला वाटले हेंच होय. पण पुढे त्याला आपल्या या निष्ठुर वर्तनाचा अतिशय पश्चात्ताप झाला, आणि त्यान ती हकीकत विजयाला कळविण्याचे ठरविले.

त्याप्रमाणे संध्याकाळच्या सुमारास तो विजयकडे आला, आणि त्याच्यापुढे हात जोडून उभा राहून म्हणाला, " सरकार, काल रात्रीं माझ्या हातून एक मोठी चूक झाली."

विजय त्याच्याकडे जिज्ञासापूर्ण दृष्टीने पाहू लागला.

नोकर पुढे म्हणाला, " काल रात्री ती मुलगी देवळात येऊन एका कोपऱ्यात बसली होती. रात्री देवळातच राहावयाचा तिचा विचार होता; पण मालक माझ्यावर रागावतील या भीतीने मी तिला तेथे राहू दिले नाही. पण आता मला या गोष्टीबद्दल फार वाईट वाटत आहे. माझ्या हातून अतिशय निष्ठुरपणाचे कृत्य घडले आहे. मालकांनी मला याबद्दल माफी करावी."

त्याचे हें सगळे बोलणे शांतपणाने ऐकून घेतल्यानंतर विजय म्हणाला, " झाले ते सगळे ठीकच झाले म्हणावयाचे. पण तू हाकून दिल्यावर ती कोणीकडे गेली ? "

नोकरः—ती या समोरच्या जंगलाच्याच बाजूकडे गेलेली मला दिसली.

त्याच्या तोंडची ही माहिती ऐकावयाचा अवकाश, विजय त्याचक्षणीं बरोबर कांहीं नोकर घेऊन त्या जंगलांत तिचा शोध

करीत निघाला. जगलांतून झपाट्याने चालत असतांना आपल्या पायांत कांटे रुपत आहेत, किंवा आपले कपडे काटेरी झुडपाला अडकून फाटत आहेत, याचेहि त्याला भान नव्हते! अशा स्थितीत तो बराच वेळ जगलात भटकला, तरी कमलेचा म्हणून कोठे मागमूसही दिसेना! अखेर एके ठिकाणी ती अगदी बेशुद्ध स्थितीत पडली असल्याचे त्याच्या एका नोकराने येऊन त्याला कळविले. विजय धांवत धावतच गेला. नोकराने सांगितल्याप्रमाणेच खरोखर वस्तुस्थिति होती. प्रसववेदना सहन न झाल्यामुळे असो, कीं पोटात काहीं नसल्यामुळे असो, बिचारी कमल एका झाडाखाली गवताच्या शय्येवर देहभानरहित अशी पडलेली होती. पण तशा स्थितींतहि एक सुंदर बालक तिने आपल्या हृदयाशी घट्ट आवळून धरले होते. बालक अप्रतिम सुंदर होते. रक्तचदन माखल्याप्रमाणे त्याचे सर्वांग रक्ताने थबथबले होते, आणि त्यावर माशाची खूपच गर्दी झालेली होती. तथापि त्या बालकाच्या सुदैवाने त्याच्या अस्तित्वाची खबर त्या जगलातल्या कोणत्याही हिंस्र पशुपक्षाला अद्यापि कळली नसल्यामुळे ते अजूनपर्यंत सुरक्षित होते.

विजयची त्या बालकाकडे दृष्टी जाताच त्याने त्याला झटकन् उचलून आपल्या छातीशी धरले. मालकच स्वतः बाळ बाळंतिणीच्या शुश्रूषेला लागल्यानतर नोकरांना त्या कार्यापासून दूर राहणे थोडेच शक्य होते? त्यांच्यापैकी एकाने कमलच्या अगावर आपल्या अगावरचे धोतर घातले! दुसऱ्याने विजयाजवळून मुलाला आपल्याजवळ घेतल. बाकीच्या नोकरांपैकी कोणी विस्तव करू लागले तर कोणी पाणी आणावयाला धावले. ऊब लागल्यावर थोड्या वेळाने मूल किंकाळू लागले. त्याच्या किंकाळण्याने कमलचीहि मूर्च्छा दूर होऊन ती इकडे तिकडे पाहू लागली. ती शुद्धीवर आलेली पाहताच विजयला समाधान वाटले आणि तो तिच्याजवळ जाऊन म्हणाला, "कमलाताई!"

त्या हतभागिनीशीं इतक्या प्रेमाने आणि आदरानें आजपर्यंत कोणीहि बोललें नव्हते.

ती क्षीण स्वराने म्हणाली, " आपण कोण आहां ? येथे कशा-करितां आला आहा ? "

विजय:—तुम्हाला न्यायला आलो, कमलाताई.

कमल:—मला न्यायला ? कुठे नेता मला तुम्ही ?

विजय:—घरी.

कमल:—कोणाच्या ?

विजय:—कोणाच्या म्हणजे ? माझ्या.

कमल:—थोड्या वेळातच जिच्या आयुष्याचा शेवट होणार आहे तिला घरी नेऊन तुम्ही काय करणार ? तिच्यासाठी कशाला तुम्ही एवढे कष्ट घेता ?

विजय:—म्हणजे ?

कमल:—आता हे आपले काळे तोंड दाखविण्याची माझी मुळींच इच्छा नाही.

विजयाने नोकराच्या मांडीवर बसलेल्या बालकाकडे बोट करून म्हटले, " कमलाताई, दुसऱ्या कशासाठी नसले तरी या बालकासाठी तरी तुम्हाला जिवत राहावयाला पाहिजे."

आपल्या बालकाकडे दृष्टी जाताच कमल म्हणाली, " आणा, आणा त्याला माझ्याकडे. माझे बाळ जसे माझ्या निर्लज्जतेचा तसेच माझ्या सुखाचाहि ठेवा आहे."

विजयाने त्या बालकाला कमलजवळ देण्यास नोकरास सांगितले.

कमल आपल्या तान्हुल्याला छातीशी धरून म्हणाली, " बाळा, तुला जिवत ठेवावे, म्हणून तर मला आज या अपमानाच्या यातना भोगाव्या लागत आहेत. आणि येथून देखील पुढे मी तुझ्यासाठी—केवळ तुझ्या-साठीच—त्या भोगावयाला जिवत राहीन."

तो अपत्यप्रेमाचा देखावा पाहून विजयाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. थोड्या वेळाने तो तिला म्हणाला, " कमलाताई, चला आतां येथून ! "

तिच्याकरितां म्याना आणण्याची विजयाने अगोदरच व्यवस्था केली होती. कमलने उठून बसण्याचा प्रयत्न केला. पण अगांत आलेल्या अशक्तपणामुळे तिचा तो प्रयत्न निष्फळ झाला, विजयाने फिरून तिला या भानगडीत पडूं दिले नाहीं. आपल्या नोकराकडून तिला म्यान्यांत उचलून बसाविले. यानंतर ते सर्वजण त्या म्यान्यासह गावांत निघून आले. गांवात येतांच विजयाने आपल्या एका नोकराला डॉक्टराकडे रवाना केले. आम्ही घरी पोंचतों तोंच डॉक्टर तेथे हजर पाहिजे, अशी त्यांनी त्याला ताकीद केली.

कमलला म्यान्यांत घालून विजय तिला आपल्या घराकडे घेऊन जात आहे, ही बातमी सर्व गावभर पसरावयाला आणि तिच्या मागोमागच लोकांच्या झुंडीच्या झुंडी रस्त्यावर गोळा व्हावयाला बिलकुल वेळ लागला नाही. ज्या स्त्रीपुरुषांना रस्त्यात येण्याइतकी सबड नव्हती, ती आपापल्या घराच्या ओट्यांवरून किंवा दारांच्या फटीतूनच आपल्या नेत्रांची जिज्ञासा तृप्त करीत होतीं. निदेची अस्त्रे तर सर्वांनीच उचलली होती.

बंडुनाना आणि त्याचे चिरंजीव गजोबा हे दोघेही दाराच्या आड उभे राहूनच आपल्या डोळ्यांचे पारणे फेडीत होते. विजय आणि मधुकर यांच्या भीतीमुळे त्यांना घराच्या बाहेर येण्याची छाती झाली नाही. तथापि दाराच्या आड उभे राहून पाहण्याचा त्यांचा प्रयत्न स्त्रियांनाही खरोखर फिक्का पाडीत होता, आणि विजय त्यांच्या घराजवळ येऊन पोचल्यावर त्यांनीं घराचीं दारेच बद करून घेतली! तथापि त्यावेळीं विजयाला त्यांच्याकडे लक्ष देण्याला फुरसत नव्हती; त्यामुळे ती गोष्ट त्याच्या लक्षांतही आली नाहीं.

थोड्या वेळाने कमलच्या म्यान्यासह विजय आपल्या घराजवळ येऊन पोंचला. पण तो म्याना आंत घेऊन जाणार तोंच, देवडीवरचा पाहरेकरी त्याला म्हणाला, " मालकसाहेब, थोरल्या धनीसाहेबांनीं बाहेरच्या कोणाही माणसाला आंत येण्याची मनाई केली आहे. मला जसा हुकूम झाला आहे, तसा मी आपल्याला कळवितो. "

विजयः—ठीक आहे. तू आपले कर्तव्य बजावलेंस. आतां मी हा हुकूम मानीत नाहीं हें तूं बाबांना जाऊन सांग जा. आणि एवढें बोलून विजय म्याना घेऊन घरांत गेला. पाहरेकऱ्यांपैकी कोणाचीही त्याला अडविण्याची छाती झाली नाही. घरांतलीं माणसें तर तो प्रकार पाहून चित्रासारखींच तटस्थ झालीं. आज घरांत देवाची पूजाही झाली नव्हती आणि सैंपाकही झाला नव्हता. अजूनपर्यंत सगळी माणसे उपाशी होतीं. त्यांतल्यात्यांत या प्रकारामुळे मुलांची अवस्था फारच कठीण झाली होती. त्यांच्या चर्या सुकलेल्या फुलाप्रमाणे म्लान झाल्या होत्या !

विजय कमलला घेऊन आंत आलेला पाहून माईसाहेब म्हणाल्या, "बाळ ! हें तूं चालविलेस तरी काय ? सगळ्या घरांत भ्रष्टाकार करावयाचा आहे काय मेला ! कुठले पाप घेऊन आलास आणि लागलास तें घरभर घेऊन फिरावयाला ! देवा ! देवा ! लुगडेसुद्धां तेंच !"

पण माईसाहेबांच्या या बडबडीची परवा न करितां विजय कमलेला घेऊन तसाच वरच्या मजल्यावरील आपल्या खोलीकडे घेऊन गेला. पण तो तेथे जाऊन पोचतो न पोचतो तोंच घरांतल्या रिकाम्या बायकांची तेथें अगदी दाटी होऊन गेली. कमलला खोलीत नेऊन बसविल्यानतर विजयानें स्टोव्ह पेटविला आणि स्वःत बादली घेऊन पाणी आणावयाला निघाला. तेथें तमाशा पहावयास गोळा झालेल्या बायकांचा त्याला इतका संताप आला होता कीं, त्याच्याकडे नुसती नजर टाकणे देखील त्याला पापमूलक वाटलें; मग त्यांना काम सांगावयाची गोष्ट तर दूरच राहिली. बायकाही इतक्या बेशरम कीं, पाणी आणावयाला तो स्वतः चालला आहे हे पाहून देखील त्यांच्यापैकीं कोणीही पुढे सरसावली नाही तरी त्या घरांतला इमानी नौकर कोंडीबा पुढें सरसावला आणि त्यानें विजयाच्या हातांतलि बादली घेऊन ती पाण्याने भरून आणली. थोड्या वेळांत पाणीही गरम झालें. पण आतां तिला न्हाऊ घालावयाचे कसे, हा प्रश्न त्यावेळीं विजयाच्या मनांत उभा राहिला आणि तो त्या स्त्रियांकडे पाहून संतप्त दृष्टीनें म्हणाला, "तुम्ही अजूनही नुसता तमाशाच पाहात राहणार काय ?

१२

हिला न्हाऊ घालावयाचे कामही आम्ही पुरुषानींच करावे ? आपल्या एका भगिनीची लज्जा संरक्षण करावयालाही तुम्ही पुढे येत नाहीं ? ”

विजय इतका चिडून बोलला, तथापि त्यांपैकीं एकीलाही घाम फुटला नाहीं. इतकेंच नव्हे तर मागच्या बाजूस ज्या उभ्या होत्या, त्यांनीं हळुंहळुं मागे पाय घ्यावयास सुरुवात केली. बाकीच्या जागच्या जागीं निर्लज्जपणें उभ्या होत्या. इतक्यांत कुसुम तेथे आली. आणि ती विजयाला म्हणाली, “ चला, आपण बाहेर व्हा. मी न्हाऊ घालते. आणि सगळं कांहीं करतें. ”

विजयाने तिजकडे आदरपूर्ण दृष्टीने पाहिले. नंतर तिचे आंग पुसावयाला टॉवेल, नेसावयाला पातळ वगैरे जिनसा तेथ ठेवून तो कोंडीबाला घेऊन खोलीच्या बाहेर निघून गेला. तो बाहेर पडतांच कुसुमने खोलीचें दार लावून घेतलें. बाहेर आल्याबरोबर विजय कोंडीबाला म्हणाला, “कोंडीबा डॉक्टर अजून आला नाहीं. जा. लौकर त्याला घेऊन ये. ”

माईसाहेब तेथेंच होत्या. त्या म्हणाल्या, “ डॉक्टर कशाला ? असलीं माणसें मेलेलीच चांगलीं. त्यांना जगवावयाचें कशाला ? ”

यमुनाः—होय. मरणानेच तिच्या तोंडाची काळोखी झांकून जाईल.

विजयाने एक वेळ तिजकडे तिरस्कारपूर्ण दृष्टीने पाहिलें, पण तो तिला कांहीं बोलला नाहीं. आज कोणाशी हुज्जत घालीत बसावयाला त्याला वेळ नव्हता.

दहा मिनिटांच्या आंतच डॉक्टर तेथें आले. विजय खोलीच्या दाराजवळ जाऊन म्हणाला, “ कुसुम, आटोपलें ना न्हाणे ? बाहेर डॉक्टर आले आहेत. ”

कुसुम आंतूनच म्हणाली, “ सर्व कांहीं आटोपलें आहे. आपण खुशाल त्यांना आंत घेऊन या. ”

यानंतर विजय डॉक्टरला घेऊन आंत गेला. आंत गेल्याबरोबर कमलची तपासणी करावयास डॉक्टरांनीं सुरुवात केली. थोडा वेळ तपासणें झाल्यावर ते विजयाला एके बाजूस नेऊन म्हणाले, “ या आजाऱ्याची अवस्था

सध्यां तरी मोठी कठीण आहे. थोडेंसें गरम दूध तिला पाजा आणि खोली चांगली गरम ठेवा. मजबरोबर कोणी मनुष्य द्या म्हणजे मी दवाखान्यांतून औषध पाठवितो. औषध दोन दोन तासांनीं द्या, सध्याकाळीं फिरून तिचें प्रकृतिमान मला कळवा. म्हणजे औषधांत फरक करणें जरूर वाटल्यास करीन. विजयाने औषध घेऊन येण्यासाठीं कोंडीबाची डॉक्टरबरोबर रवानगी केली, व कुसुमला हांक मारून डॉक्टर काय म्हणाले, तें सर्व तिला कळविलें. आणि खोलींत सतत शेगडी ठेवण्याची व कमलला गरम दूध पाजण्याची कामगिरी त्याने तिच्यावर सोंपविली.

याचवेळीं माईसाहेब तेथें येऊन त्याला म्हणाल्या, " अरे, आज तुला आंघोळ जेवण वगैरे कांहीं सुचतय कीं नाहीं ? घरांतलीं सगळीं माणसें तुझ्यासाठीं अजून उपाशीं आहेत. "

विजय मधुर स्वराने म्हणाला, " माई, तुम्ही सगळे जेवा. मला सध्यां बिलकुल फुरसत नाही. "

माई०:—असें कसे बोलतोसरे तूं ? तुझ्याशिवाय आम्हांला खाणें पिणे गोड कसे लागेल ? तू अगोदर खाऊन घे. मग काय हवें ते करीत बस.

विजयः—नाही, माई. आपल्याच लोकांच्या दुष्टपणामुळें एक मानव प्राणी अत्यवस्थ स्थितीत असतांना मी जेवत बसू ? नाहीं. माई, आपला मुलगा इतका नीच आहे अशी कल्पना तूं मनांत आणू नकोस.

इतक्यांत कुसुम मध्येंच म्हणाली, " मी इथें आजाऱ्याची देखरेख करावयाला आहे. तुम्ही खुशाल जेवण करून या. "

विजयः—छे, छे, खाण्यापिण्याला पुढें पुष्कळ सवड आहे. आज तास दोन तास जेवावयाला उशीर झाला, म्हणून कांहीं मी मरणार नाहीं. पण हिच्या शुश्रुषेंत जरा हलर्जीपणा झाला तर ही मात्र हातची जाईल. "

याच सुमारास बाळोबाच्या आईला दूध घेऊन यावयाचें सांगितलें होतें ती तेथें दूध घेऊन आली. पण खोलींत पाय ठेवतांच भांडें कसें तरी तेथें आदळून नाक धरून बाहेर आली आणि म्हणाली, " इश्श ग बाई ! काय मेली येथून तेथून सगळी नरकाची घाण ! आंत नुसता पाय

ठेविला तरी माणसाला जन्मभर अन्न गोड लागावयाचें नाहीं. मग तेथें बसण्याची गोष्ट तर कशाला पुसावी ? "

पण बाळोबाच्या आईला जी खोली साक्षात् नरकपुरी वाटली त्याच ठिकाणीं कुसुम संथपणाने त्या अनाथ बाळंतिणीची शुश्रुषा करीत राहिली होती. बाळोबाच्या आईने जें दुधाचें भांडे खालीं आदळून दिले होतें तें तिने उचलून घेतले आणि त्यांतील दूध एका वाटीमध्यें घेऊन ते कमलला हळूहळू पाजू लागली.

दूध प्याल्यावर कमलला जरा हुशारी आली. पण सगळ्यांची दृष्टि आपणाकडे लागलेली पाहून तिचें मन पुन्हां खचलें ! त्या दृष्टि जणू काय आपल्या अंतःकरणांत घुसून तेथें दडून बसलेल्या आपल्या पापाचा सुगावाच लावीत आहेत असे तिला वाटलें. त्या दृष्टींत तिला उपहास आणि तिरस्कारही दिसत होता !

थोड्या वेळाने विजयाने ती खोली एका मोलकरणीकडून साफ करून घेतली आणि डॉक्टरकडून आलेले औषध कुसुमकडून कमलला देवविलें. याप्रमाणें सर्व ठीकठाक व्यवस्था लागल्यावर त्याचे मन जरा प्रसन्न झाले. इतक्यांत भाऊसाहेब खोलीच्या दाराशी येऊन म्हणाले, " विजय. "

विजय बाहेर येऊन म्हणाला, " काय म्हणतां बाबा ? "

भाऊ०:—हा तू काय प्रकार चालविला आहेस ? तिला आतांच्या आतां घराच्या बाहेर काढून दे.

विजय शांतपणे म्हणाला, " तिला घरांतून हांकून देण्याची जरूरच नाहीं. कांहीं तासानंतर ती आपण होऊनच जाणार आहे. आतां फार तर दोनचार तासांची बिचारी सोबतीण असेल ! "

भाऊ०:—तें कांहीं नाहीं. तिला येथें मी मरू देणार नाहीं. जिकडचें पाप तिकडे जाऊ दे.

यावर चांगले खरपूस उत्तर द्यावयाचे विजयाच्या मनांत आलें होतें. पण त्यानें आपली जीभ चावली. तो म्हणाला, " मी अशा स्थितींत कांहीं तिला येथून बाहेर काढणार नाहीं. "

भाऊ०:—काय पोरगा आहे ! अरे तुला या लोकांच्या उठाठेवीची जरूर काय ?

विजयः—लोकांची उठाठेव कशी ? हा पराक्रम तर खुद्द आपल्या काकासाहेबांचा आहे ! हे बिचारें निरपराधी बालक म्हणजे आपल्या घराण्याचेच रक्तमांस होय. त्याला मी माझ्या डोळ्यांदेखतां मरू देणार नाहीं. इहलोक आणि परलोक या दोहोंच्याही दृष्टीनें त्याचें संरक्षण करणें माझें कर्तव्य आहे.

भाऊसाहेबांचा हा बधु त्यांच्यापासून विभक्त होता. पण भाऊ-बदकी वाटणी संबधाने या दोघां भावांत अजूनपर्यंत तटे चालू असल्यामुळे ते परस्पराना कट्टया वैऱ्याहूनही अधिक लेखीत.

मुलाचे वरील भाषण ऐकून भाऊसाहेब म्हणाले, “ तू तर मोठ्याच ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगूं लागलास. असल्या पापाच्या फळाचें संरक्षण करण्यांत स्वार्थ तर नाहींच, पण परमार्थ तरी कोणता आहे हें मीच तुला विचारतो. वा ! इंग्रजी दोनचार बुकें वाचल्याने आपण मोठे ज्ञानी बनलो, आणि बाकी सगळे मूर्ख आहेत, असें तुला वाटते काय ? मी तुला साफ सांगतो, माझ्या घरांत असले वेडेचार चालावयाचे नाहींत. ”

विजयाचाही संताप पराकाष्ठेला पोचला होता. पण त्यानें तो मोठ्या शर्थीनें आवरून म्हटलें, “ या घरांत माझाही पण कांही थोडाबहुत अधिकार आहे आणि त्याच्या जोरावर मी या दोन अनाथ प्राण्यांना येथें ठेऊन घेत आहे. ”

मुलाचें हें तेजस्वी भाषण ऐकून भाऊसाहेबांची तळपायाची आग मस्तकाला जाऊन पोंचली. ते म्हणाले, “ काय ? तुझी येथपर्यंत मजल गेली ? पण मी जिवंत असतांना तुझा या घरांत काय अधिकार आहे ? तूं बऱ्या बोलानें ऐकशील तर ठीक आहे. नाहीं तर मी नोकराकडून तिला बाहेर घालवून देईन ! ”

विजय निश्चल दृष्टीनें पित्याकडे पाहूं लागला. शेवटीं तो म्हणाला, “ ठीक आहे. कृपा करून आजची रात्र तिला येथें राहूं द्या. मग उद्यां

तिच्या प्रेताबरोबर मीही येथून बाहेर पडेन. कदाचित् जिवत राहिली तरी देखील मी तिला घेऊन बाहेर जाईन. "

यावेळीं विजयाच्या नेत्रांत अश्रू उभे राहिले होते. हे अश्रु पाहिल्या बरोबर भाऊसाहेबांचे अंतःकरण विरघळले. आणि ते करुणार्द्र स्वरानें विजयाला म्हणाले, " अरे तू रडतोस का ? मी तुला असें काय बोललो ? जा ! तुझ्या मर्जीला येईल तसे कर. मी कांहीं बोलत नाहीं. मग तर झाले ? "

एवढे बोलून भाऊसाहेब तेथून निघून गेले. आपल्या पतीनें एकदां हुकूम केला कीं, विजय तो मुकाट्यानें ऐकेल अशी माईसाहेबाना मोठी आशा होती. पण अखेर ती व्यर्थ ठरली. लढाईला सुरुवात झाली नाहीं तोंच योद्धयाने पाठ फिरविलेली पाहून त्यांच्या निराशेला पारावार उरला नाहीं. घरांतला अनाचार नाहीसा करण्याचा त्यांच्या दृष्टीने हाच एक अखेरचा रामबाण उपाय उरला होता. पण त्याचीही अखेर अशी वाट लागली.

भाऊसाहेब निघून गेल्यावर विजय कमलजवळ गेला आणि तिला म्हणाला, " कां कमलाताई आतां बरें वाटते ना ?

विजयाचे भाषण ऐकून कमलने डोळे उघडले आणि क्षीण स्वराने म्हटलं, " आता माझ्या बरे किंवा वाईट वाटण्यावर कोणते नफानुकसान अवलंबून आहे ? माझी अखेरची वेळ आतां जवळ आली आहे. माझ्या बाळाला तेवढे एकदां मजजवळ द्या.

कुसुमने मूल घेऊन तिच्याजवळ दिले. त्याच्या स्पर्शसुखाचा कांहीं वेळ अनुभव घेतल्यानतर ती कुसुमला म्हणाली, " बाई, तुझी माझी जरी ओळख नाहीं तरी सख्ख्या आईनें घेतले नसते इतके कष्ट तू माझ्याकरितां घेतले आहेस. तू माझी पूर्वजन्मींची खरोखर माताच असावीस ! तुझे उपकार मी कसे फेडूं ? नाहीं. मी तुझ्या उपकारांतच मरते आणि यातच मला सुख आहे. तुला माझी अखेरची एवढीच विनंती आहे कीं, माझ्या बाळाचा तूं सांभाळ कर. अतर देऊ नकोस. त्याच्या आईच्या पापाचे प्रायश्चित्त भोगण्याचा प्रसंग त्याजवर येऊ देऊं नकोस. "

पण हे बोलतां बोलतांच तिचे डोळे पांढरे झाले आणि अडखळत अडखळतच म्हणाली, " छेः ! माझ्याने आतां बोलवत नाहीं. "

विजयानें मोठ्या लगबगीनें तिला औषध पाजलें, आणि तात्याबाला म्हटले, " तात्याबा, जा लौकर. डॉक्टरला घेऊन ये. "

पण कमलची मुखप्रभा तैलहीन दीपकाप्रमाणे क्षणोक्षणीं निष्प्रभ होऊं लागली. मृत्यूनें आपला कराल पाश तिच्या गळ्यांत टाकल्याचे आतां स्पष्ट दिसू लागले ! थोड्याच वेळांत त्या अभागिनीनें अखेरचा श्वास घेतला !

कुसुमनें चटकन उठून तिच्या हृदयाशीं असलेल्या अर्भकाला उचलून घेतलें. त्या कुसुम-कोमल-हृदय बालिकेला यावेळीं आपले अश्रु आंवरणे अशक्य झाले !

विजयानें एक दीर्घ निश्वास सोडला. यावेळीं त्याच्या तोंडून फक्त " भगवान् " एवढा एकच शब्द बाहेर पडला !

यानतर तो डोळे झांकून किती वेळ तरी जागचे जागींच बसून होता !

---

# प्रकरण २७ वें.

## धात्रीपद !

**थोड्या** वेळाने तें दुर्दैवी अर्भक रडूं लागलें. तेव्हां विजय भानावर आला आणि धोतराच्या पदरानें अश्रु पुसून घरांतल्या स्त्रियांना उद्देशून म्हणाला, " या अर्भकाची आई तर याला सोडून गेलीच ! आतां तुमच्यांपैकीं कोणाला याची कीव येते आणि कोण माउली याची आई बनावयाला तयार आहे ? "

विजयाच्या या प्रश्नाचें उत्तर द्यावयाला एकही माउली पुढे सरसावली नाहीं. बराच वेळ झाला, तरी कोणी कांहींच बोलत नाही हे पाहून

तो पुन्हां म्हणाला, " बोला, बोला, या अनाथ जीवाचें पुण्य घ्यावयाला कोण तयार आहे ? "

आतां मात्र माईसाहेब बोलल्या पण अगदीं बेसूर ! भेसूर ! त्या मान वेळावून आणि नाक मुरडून म्हणाल्या, " अरे ! काय चालविलीस रिकामी बडबड ! हे पाप कोण आपल्या पदरांत घेईल ? चल, ऊठ. मी तिकडे सागून त्याला पढरपूरच्या आश्रमांत पाठवून देण्याची व्यवस्था करते. तेथे त्याची चांगली सोय लागेल. "

आईचे हे निष्ठुर भाषण ऐकून विजय व्यथित अतःकरणाने म्हणाला, " माई, हे निष्ठुर भाषण तुझ्या थोर मातृहृदयाला बिलकूल शोभत नाही. ज्या वेळीं माझी आई मला सोडून गेली, त्या वेळी तूंच ना मला आपल्या हृदयाशी धरलेंस ? आणि आज या बिचाऱ्याच्या बाबतींत असे बोलतेस ? त्या वेळीं मला देखील तूं पढरपुरला का पाठवून दिलें नाहींस ? "

हें बोलत असताना विजयाचे डोळे अश्रूंनी भरून आले होते. या दोहोनीहि माहेसाहेबांच्या हृदयाला बराच जोराचा धक्का दिला. तथापि त्यांच्या वृत्तींत मोठासा फरक पडला नाही. त्या म्हणाल्या, " हे तू कसा वेड्यासारखा बोलतोसरे ? तू आमच्या कुळाचा कुळदीपक. तुला मी पढरपुरला कशी पाठवीन ? शिवाय, तू काय अशा पापमार्गानें जन्मला होतास ? तुझी याला कोणत्याच प्रकारें बरोबरी करतां यावयाची नाहीं. "

विजयः—माझ्यांत आणि यांच्यात फारसा फरक नाहीं, माई. हाही आपल्या वशाचा कुळदीपकच आहे. हा पापमार्गाने उत्पन्न झाला असला तरी त्याचा दोष याच्याकडे नसून काकांकडे आहे. त्याबद्दल त्यांना सोडून या अनाथाला शिक्षा कां ? पण तुम्ही कोणी याला जवळ करा कीं न करा, मी मात्र आपल्यापासून याला एक क्षणभरही दूर होऊ देणार नाहीं. याचा जन्म कशाही रीतीनें झाला असला, तरी मी याला आपला भाऊ समजतों. माझ्या देहांत ज्या कुलाचें रक्त आहे तेंच याच्याही देहांत आहे. मी याला बेवारस म्हणून सोडून द्यावयाला तयार नाहीं. शिवाय, याच्या संगोपनाच्या बाबतींत मजवरच विश्वास ठेवून याच्या आईनें प्राण सोडिला. तिचा विश्वास मी प्राण गेला तरी खोटा पडूं देणार नाहीं. माझ्या जवळ

त्याला पाहिजे त्या गोष्टींपैकीं फक्त एकच गोष्टीची उणीव आहे. ती मातृहृदय ही होय. ही उणीव मला प्राण देऊनही दूर करितां येणें शक्य नाहीं. आणि म्हणूनच मी तुमची इतक्या काकुळतीने याचना करीत आहे."

एवढें बोलून त्यानें अशापूर्ण दृष्टीने पुनः एकदां त्या सर्वजणींच्या तोंडाकडे पाहिलें. पण कोणाच्याही हृदयाला पाझर फुटला नाही. इतकें झाल्यावर मात्र विजय अतिशय सतापला आणि त्या स्त्रियांना उद्देशून म्हणाला, "अरेरे! अखेर यांत एकजणीचें देखील हृदय द्रवले नाही ना? देवा! जगांतील सर्व मायाममता आजच नष्ट झाली काय? एक दिवसाच्या मातृहीन बालकाला पाहूनही या निष्ठुर बायकांचे अतःकरण पाझरत नाहीं? हाय! अखेर हे दुर्दैवी अर्भक कोणा कळकळीच्या धात्रीच्या अभावीं आईच्या पाठोपाठच स्वर्गाची वाट धरणार? माझी खातरी आहे कीं, भाडोत्री धात्रीकडून हे फार दिवस जिवत राहणे शक्य नाहीं."

पण त्याचे हे भाषण सपते न सपते, तोंच कुसुमपुढे आली आणि अत्यत विनम्र स्वराने म्हणाली, "ही जबाबदारी जर मजवर आपण सोपवित असाल, तर मी याचें संगोपन करावयाला आहें. माझ्या आयुष्यांत मला दुसरे कांही काम देवानें ठेविलेच नाही. हे तरी सत्कार्य माझ्या हातून घडूं द्या. मात्र याला दूध पाजण्यासाठीं एखादी दाई मात्र आपण ठेविली पाहिजे."

तिच्या या भाषणाने विजयाची सर्व चिंता दूर झाली. अत्यंत उत्साहपूर्ण स्वराने तो तिला म्हणाला, "त्याची काळजी तूं करू नकोस. मी ती व्यवस्था तावडतोब करितों. हे मूल आजपासून तुझें झाले!"

कुसुमला पराकाष्ठेचें समाधान वाटलें. ती आपल्या मनाशीं म्हणाली, "मी जशी सर्वांच्या तिरस्काराचा विषय आहे, तशाच प्रकाच्या अर्भकाचाही मला लाभ झाला हें ठीकच झालें!"

कुसुम याप्रमाणें आपल्या मनाशीं विचार करीत असतांना बाकीच्या स्त्रियांच्या मनांत कांहीं निराळेच विचार घोळत होते. ते कुसुमला कळलें असतें, तर तिची मनःशांति अशी टिकली नसती.

मुलाची याप्रमाणें व्यवस्था लागल्यावर विजय कमलच्या प्रेतयात्रेच्या व्यवस्थेकडे वळला. त्या हतभागिनीचें प्रेत अजूनपर्यंत तसेंच होतें! अशा "पापिणी"चे प्रेत "पवित्र" ब्राह्मणांनीं न्यावयाचें कसें? गांवांतला एकही ब्राह्मण किंवा एकही भट या गोष्टीस राजी होणार नाहीं, याबद्दल विजयाची पूर्ण खातरी होती. त्याच्या दुर्दैवानें आज मधुकरही गांवीं नव्हता. नाहीं तर त्या दोघांनीच ही प्रेतयात्रेची क्रिया पार पाडली असती. निदान विजयाला तरी असें वाटत होतें.

अखेर बराच वेळ विचार केल्यावर त्यानें तात्याबाला हांक मारली आणि म्हटलें, "तात्याबा, बाहेर देवडीवर आणि राममंदिरांत आपले जेवढे ब्राह्मण नौकर असतील त्या सर्वांना या प्रेतयात्रेसाठी बोलावणें कर. त्यांना फक्त माझा निरोप कळीव. तो त्यांच्यापैकीं कोणी मान्य केला तर ठीकच. नसल्यास त्यांची मर्जी. कोणाला आग्रह करूं नकोस किंवा कोणावर सक्तीही करूं नकोस. हें काम संपल्यावर तसाच जोशीकाकांकडे जा आणि त्यानाही ही बातमी कळीव."

तात्याबा निघून गेल्यावर विजय त्या प्रेतापाशीं जाऊन बसला. संध्याकाळ व्हावयाला आतां फारच थोडा अवधि उरला होता. त्यानें अजून स्नान वगैरे कांहींच केलें नव्हतें. त्याच्यामुळें आणि त्यांतच "घरांत प्रेत आहे" या कारणाचीही भर पडल्यामुळें घरातली इतर माणसेंहि अद्यापि अन्नाला मिळालीं नव्हतीं. यामुळें अर्थातच सर्वांचा विजयावर रोष झाला होता. पण अखेर या संतापाची वीज अखेर गरीब बिचाऱ्या कुसुमवर कोसळली! कोणाच्याही रागाचें पर्यवसान शेवटीं दुर्बळावर व्हावयाचें हा जगाचा नियमच आहे. या वेळीं ती घरांतल्या सर्व जणींचा टीकाविषय होऊन राहिली होती. आपणां सर्वांना हीन भासवावें म्हणूनच तिनें तें मूल सांभाळण्याची कामगिरी पतकरली, त्यांत तिचा दुसरा कोणताही चांगला हेतु नव्हता, हाच त्यांच्या टीकेचा इत्यर्थ होता. जी ती म्हणे, "आम्ही पुष्कळ बायका पाहिल्या, पण हिच्यासारखी उत्ताणखाट आणि बेशरम बायको कुठेंहि पाहिली नाहीं."

अखेर संध्याकाळची वेळ ठेपली; हे पाहून माईसाहेब यमुनेला म्हणाल्या, "यमुने, घरांत सांजवात तर कर. आज देव उपाशीच राहिला आहे. पण त्याला निदान अधेरात तरी बसवूं नका. मला बाई, आज भारी अवलक्षणें दिसतात. ती पांढऱ्या पायाची अवदसा घरांत आल्यापासून घरांत कोणाच्या जिवाला म्हणून चैन नाहीं."

विजय तिरस्काराने म्हणाला, "माई, तू कोणासबंधानें बोलत आहेस ?"

माई:—मी बाबा कधी तोंडदेखलें बोलत नाही. खरे बोलावयाला कोणाच्या बापाची चोरी आहे? यमुने, रमे, असे पाहतां काय? घरांत जाऊन दिवे लावा! कोणाचा मुडदा आणि कोणाला फिकीर! लोकाचा वरवटा घेऊन आपला वाथ्या बडवील दसावे म्हणतात ते यालाच.

यानतर यमुना, रमा, बाळोबाची आई वगैरे स्त्रिया निरनिराळ्या खोल्यांतून दिवे लावण्यासाठीं तेथून जावयाला निघाल्या. इतक्यात माईसाहेब बाळोबाच्या आईला म्हणाल्या, "तू त्या मुडद्याजवळ जाऊ नकोस बरं का ग बाई! तू गरोदर बायको आहेस. तिकडे पाहूसुद्धां नकोस. देवघरातच जाऊन बसलीस तर बरे होईल. तुला एकटीला भीति वाटत असेल तर रमेला सोबत घे."

थोडेसे लांब गेल्यावर यमुना म्हणाली, "पाहिलेत ना, पांढरी पाल कशी जहांबाज आहे ती. आम्ही, माईसाहेब या सगळ्याजणी, जवळ पण कशी बेशरमपणानें पुढे आली आणि मी मुलाला सांभाळते म्हणून बाळासाहेबाला म्हणाली. आम्ही काय त्या मुलाला टाकून दिले असते? इतक्या बायकापैकीं कोणाला त्याची दया आली नसती? हीच मोठी दयेची पुतळी आहे! पण लोकांना दिसावे कसे? केवढे पण त्या पोरासाठीं तिचे काळीज तिळतिळ तुटतय! म्हणतातना, 'घरमे नही दाणा अन् अमा गयी पिसनेकु!' स्वत: लोकांच्या घरी तुकडे खात पडली आहे, आणि दुसऱ्याच्या पालनपोषणाची काळजी घ्यायला पुढे येते."

रमा:—खरें ग खरं. ती सगळ्याच गोष्टीत आपला वरचढपणा दाखवावयाला पाहते. तिचे सर्व धोरण बाळासाहेबांवर मोहनी घालण्याचे.

त्यांच्याशीं बोलावयाला सांपडावे म्हणून ती नेहमीं कांहींना कांहीं निमित्त शोधीत असते.

मणिकर्णिकाः—हा सगळा जवानीचा दोष आहे, बाई.

बाळो० आईः—पण असली बेशरम बायको आपण साऱ्या जन्मांत पाहिली नाही, बाई. जवानी काय आणखी कोणाला नव्हती ? तुम्ही आम्ही काय भरज्वानींत नव्हतो ? माझे गाल तर कसे गुलाबासारखे होते. पण बाळूचा जन्म झाल्यापासून काय झाले असेल तें होवो, त्याची टवटवीच मोडली. तेव्हां कां होईना, पण मी असे कधींच केले नाही बाई.

मणिकर्णिकाः—पण तुम्ही कांहीं म्हणा, ती रूपवान आहे ही गोष्ट खरी.

रमा नाक फेदारून म्हणाली, " दगडाची आली आहे रूपवान् ! डोळे काय मेले मारक्या म्हशीसारखे ! नाक येळवाच्या वाशासारखे भले लांबच लांब ! आम्ही तिच्यासारख्या पांढऱ्या पाली नसू, पण आमच्या नाकाडोळ्यांची ठेवण कांही तिच्याजवळ नाही."

यमुनाः—ते सगळे खरेंग. पण तिच्या गोऱ्या भुरक्या रंगाखालीं तिचे सगळे आयब झांकून जातात ना ? गोरे कातडे पाहिलें, कीं, सगळे लटपटतात.

याप्रमाणे कुसुमची नालस्ती करीत करीत त्या सगळ्या जणी दिवे लावण्याच्या उद्योगाला लागल्या. बाहेरचे दिवे लावणें झाल्यावर निरनिराळ्या खोल्यांतून दिवे लावण्याचा प्रश्न सगळ्याच जणीच्या पुढे उभा राहिला.

यमुना म्हणाली, " रमे, तूं त्या पलीकडच्या खोलींत दिवा लावून ये बरें. "

रमाः—मी नाहीं बाई. मला एकटीला काळोखांत जावयाला भीति वाटते. घरांत मुडदा पडला आहे. हें बघ, नांव काढल्याबरोबर अंगावर कांटा उभा राहतो. तूं मजबरोबर येत असलीस तर मी येतें.

नंतर सगळ्या जणींनीं मिळूनच हें काम करावयाचें ठरलें. आणि मग " राम " " राम " म्हणत त्या प्रत्येक खोलींत दिवा लावूं लागल्या.

दिवे लागले हे पाहिल्याबरोबर माईसाहेबांनीं हात जोडून दिव्याला नमस्कार केला. या वेळीं त्या तोडाने कांहीं पुटपुटतही होत्या.

याच वेळी विजयाने ब्राह्मणांना बोलावून आणण्यासाठीं पाठविलेला नोकर तेथे आला आणि विजयाला म्हणाला, " सरकार, कोणी येत नाही. जो तो म्हणतो की, आम्ही जर या प्रेताला खांदा दिला, तर आम्हांला जातीबाहेर टाकतील. नाहीं म्हणावयाला दोघे गुंड कबूल झाले आहेत. त्यांना जातीची कांहीं परवा नाहीं. जोशीकाकाहि येतो म्हणाले. "

इतक्यांत जिन्याची पायरी चढत असलेले जोशीकाका म्हणाले, "अरे, येतो कसला, हा आलोच बघ ! विजय, काय झाले बाबा ? "

विजयः—प्रेत न्यावयाला पुरेशी माणसे मिळत नाहींत, काका.

त्याचे हे भाषण ऐकून माईसाहेब मध्येच म्हणाल्या, " माणसें कशाला पाहिजेत ? गाडीत घालून न्यायला सांगावे आपल्या गड्याला. "

त्यांच्या या भाषणाने विजय अगदीं चिडून म्हणाला, " मी असे बिलकूल होऊ देणार नाही. "

त्याची परीक्षा पाहण्याच्या उद्देशाने जोशीबुवा म्हणाले, " कां बरे ? असं व्हावयाला काय हरकत आहे ? "

विजयः—वाः काका ? तुम्हीहि असें म्हणता ? हा धडधडीत मृताचा अपमान् आहे. तो मी आपल्या डोळ्यादेखता तरी होऊ देणार नाही. नेहमीच्या परिस्थितीत कांहीं अडचणीमुळे असे झाले असते, तर माझी त्याला हरकत नव्हती. पण आजच्या स्थितीत हे हेतुपूर्वक केलं जात आहे, आणि म्हणूनच मी ते होऊ देणार नाही. हिच्या हातून पाप घडले आहे हेच मुळी मला अगोदर कबूल नाही. इतक्या उपरही याला पाप म्हणावयाला कोणाचा आग्रहच असला तरी देखील मी म्हणतो त्याची जबाबदारी हिच्यावर मुळींच नाहीं. आपल्या मुलाचा प्राण वांचविण्याच्या बाबतींत हिनें जें धैर्य दाखविलें तें खरोखर अभिनंदनीय नाहीं असें कोण म्हणेल ? हिने आपल्या जीवाचें बलिदान केले, पण मुलाची हत्या करावयास ती राजी झाली नाहीं ! धन्य हें मातृहृदय ! कोंडीबा, ते दोघे जण ब्राह्मण,

कोण येतों म्हणतात त्यांना घेऊन ये जा. आम्ही तिघे जणच हें प्रेत घेऊन जाऊ.

जोशिबुवाः—आणि चौथा मी नाहीं का ?

विजयः—छे, छे, आपण वृद्ध आहां. आपल्याला मी बिलकूल तकलीफ घेऊ देणार नाहीं. आम्ही तिघे जण हे प्रेत सहज घेऊन जाऊं.

जोशिबुवा हंसून म्हणाले, " बाळ, शरीर जरी वृद्ध झाले असले तरी माझे मन वृद्ध झाले नाही. अशा कार्यात माझ्या शरीराला मुळींच त्रास होत नाहीं. "

याच वेळीं कोंडीबा त्या दोघा ब्राह्मणाना घेऊन तेथे आला. नंतर ते चौघे जण ते प्रेत घेऊन स्मशानाकडे रवाना झाले! घरांतील सर्व स्त्रिया तो देखावा पाहात होत्या. पण त्या अभागिनीसाठीं कोणाच्याही डोळ्यांतून अश्रू निघाला नाही. नाहीं म्हणावयाला कुसुमने मात्र आपल्या डोळ्यांला पदर लावला आणि त्या मुलाला हृदयाशी धरिले.

---

# प्रकरण २८ वें.

## कमलेचा मृत्यु !

विजयानें स्वतः त्या प्रेताला खांदा दिलेला पाहून गांवांतील ब्राह्मण मंडळींपैकीं कोणी कोणी खांदा देण्यासाठीं पुढें सरसावूं लागले. पण विजयाने त्यांच्यांपैकीं कोणालाही ही तकलीफ घेऊं दिली नाहीं.

थोड्याच वेळांत ते स्मशानांत जाऊन दाखल झाले; आणि त्या अनाथ प्रेताचा यथासांग दहनविधि पार पडला.

इकडे तें प्रेत घरांतून बाहेर पडल्याबरोबर माईसाहेब यमुनेला म्हणाल्या, " यमुने, तूं ओसरीवरील ज्या बाजूनें प्रेत नेलं तेवढी जागा सारवून घे बरे. "

यमुना:—मला नका हें काम सांगू, माईसाहेब. चंपी नाहीं कां हे काम करावयाला ?

माई०:—अग, ती प्रेत ठेविलें होतें तीच खोली सारवति आहे. तें काम संपवायला तिला बराच वेळ लागेल.

यमुना:—दुसऱ्या मोलकरणी नाहींत कां, माईसाहेब ?

माईसाहेब:—त्या देखील अशाच कांहींना कांहीं कामांत गुंतल्या आहेत.

यमुना:—मग या बायकांपैकीं दुसऱ्या कोणाला सांगा माईसाहेब. आतां फिरून स्नान करण्याचा जर मजवर प्रसग आला, तर मी खरोखरच आजारी पडेन.

माईसाहेबांनीं नतर बाकीच्या बायकांपैकी प्रत्येकीला ते काम करावयाचें सांगितलें. पण प्रत्येक जणीनें अशींच कांहीं तरी सबब सांगून तें करावयाचे टाळलें.

हा प्रकार पाहून कुसुम आपण होऊन पुढें सरसावली आणि म्हणाली, " माईसाहेब, मी हे काम करते. आपण स्वस्थ असा." पण कुसुमने ती कामगिरी अगदी मनःपूर्वक पार पाडली तरी माईसाहेबांना ती पसंत पडली नाहींच. त्यांनी नेहमींप्रमाणे तिला नाक मुरडून 'मडम' म्हणून टोमणा मारावयाचा तो मारलाच.

अंमळशाने माईसाहेब तिला म्हणाल्या, " काय ग पोरी, तूं या मुलाला घेऊन कोणच्या खोलींत तळ देणार ? "

कुसुम:—कां बरे ? मी आपली नेहमींप्रमाणें मावशीच्याच खोलींत राहीन.

माई०:—पण मावशी परवानगी देतात कां, हें तरी एकदां पहा. काय काकी, या मुलाला तुम्ही आपल्या खोलींत आश्रय देणार कां ?

काकी:—मला नको ग बाई ही पीडा. आदल्या जन्मीं काय पाप केलें तें मी या जन्मांत भोगतें आहे आणि आतां फिरून या पापाची सगत करून तें कधीं फेडूं ?

माई०:—मग तिनें मुलाला घेऊन कोठें रहावें ?

काकी:—ते तिचे तिने पहावें.

काकींच्या या भाषणाने देखील कुसुम बिलकूल डगमगली नाहीं.

माईसाहेब तिचा हा निर्भयपणा पाहून जरा चकित झाल्या. नंतर त्या तिला म्हणाल्या, " ते प्रेत होते त्या खोलींत तू राहशील का? त्या बाटलेल्या खोलींत आतां आमच्यांपैकीं कोणी राहणार नाही ! "

कुसुम:—तुम्ही म्हणाल तेथे माझी रहावयाची तयारी आहे.

माई०:—पण तेथे तुला सोबत कोण आहे?

कुसुम:—सोबतीची जरूरच काय?

माई०:—तेथे तूं एकटी राहशील? तुला बिलकूल भीति वाटणार नाहीं?

कुसुम:—नाही.

यावर यमुना खोचून म्हणाली, " कशाला वाटेल भीति, माईसाहेब? शेजारच्याच खोलींत बाळासाहेब असतात ना ? "

तिच्या बोलण्यांतली ही नीचपणाची खोच कुसुमने ओळखली, पण तिने आपल्या मनाचा शांतपणा लवमात्र ढळू दिला नाहीं.

तिची ही बेफिकीरपणाची वृत्ति पाहून माईसाहेब जास्तच चकित झाल्या. पण त्या कांही बोलल्या नाहीत. थोड्या वेळाने त्या म्हणाल्या, " आज देवाला नैवेद्य मिळतो की नाहीं कोण जाणे. तिकडे जाऊन पाहाते तरी पूजेची अद्यापही कांहीं व्यवस्था झाली कीं नाहीं ते ? "

माईसाहेबांचे हे भाषण ऐकून कुसुमला हसू आले! देव सगळ्याचा अन्नदाता, त्याची काळजी दुसऱ्याने करावयाची?

माईसाहेब थोड्याच वेळांत परत येऊन यमुनेला म्हणाल्या, " यमुने, जा बरे, कोणा तरी ब्राह्मणाला आज पूजेला घेऊन ये. बडुनाना आणि त्यांचा मुलगा गजानन हे दोघेही आतां आपल्या घरांत पाऊल घालणार नाहींत. त्या दिवशीं अगोदरच बाळासाहेबानें त्यांचा केवढा अपमान केला हें तर तुला ठाऊक आहेच. छेः बाई! आजकालची पोरं देवाब्राह्मणांना बिलकुल मानीत नाहींत! ब्रह्मद्वेषानें कोणाचेंही चांगलें होत नाहीं हे बाळासाहेबाला कधीं कळेल कोण जाणे! रमे, पाणी तापलें असेल तें एक।

गंगाळांत ओतून बाहेरच्या न्हाणींत ठेव बरें ! विजय इतक्यांत येईल. तो आला, कीं थेट आंत घुसेल. यासाठीं त्याची बाहेरच्या बाहेरच स्नानाची व्यवस्था आपण अगोदरपासूनच करून ठेवलेली बरी." साऱ्या दिवसभर उडालेल्या गोंधळानतर त्या घरांत पुन्हां शांतता आणि सुव्यवस्था दिसू लागली. देवघरातूनही घंटानाद ऐकूं येऊं लागला. सैंपाकघरांत नित्याप्रमाणें दंगल सुरू झाली. दिवसभर आईपासून दूर असलेली मनी आईने मांडीवर घ्यावें म्हणून सारखी हट्ट घेऊन बसली. माईसाहेब तिला म्हणाल्या, " जरा थांब बाई. सैंपाकघरांत चालले आहे, देवाच्या नैवेद्याची नीट व्यवस्था लागली आहे कीं नाहीं, आणखी बाळासाहेबही आतां येईल त्याच्या करितांही काय काय केले आहे, हे एकदां मी पाहून येतें."

हे ऐकून यमुना म्हणाली, " असे हो कसें बोलतां, माईसाहेब ? साऱ्या दिवसभर लेकरूं दूर राहिलें आणि आतांही जवळ घेत नाहीं. तुम्ही तिला घ्या. मी तिकडची सगळी व्यवस्था पाहून येतें."

यमुना तिकडे गेल्यानतर तिच्या मागोमाग काकीही तिकडे गेल्या. नंतर माईसाहेब मनीला मांडीवर घेऊन म्हणाल्या, " हे काय बरें मनू ? तुला मांडीवर घेऊन मी इथेच बसून राहिलें, तर घरांतली व्यवस्था लागावी कशी ? मला चोंहोकडे पाहिलें पाहिजे. आपण आपले देवघराच्या जवळ जाऊन बसूं चल. म्हणजे तेथून चोंहीकडे पाहतां तरी येईल."

नंतर त्या कुसुमकडे वळून म्हणाल्या, " कुसुम तूं एकटी येथें बसशील ना ? आम्ही कांहीं तुझ्यापासून दूर नाही. भिऊं नको बरें, बाळ."

साऱ्या जन्मांत माईसाहेब आपल्याशीं आज प्रेमळपणानें बोलल्या हें पाहून कुसुमच्या मनाला केवढें तरी समाधान वाटले. ती म्हणाली, " जा, माईसाहेब तुम्ही खुशाल जा. मला एकटीला येथे कांहीं भीति वाटत नाहीं."

तिच्याकडून इतकें आश्वासन मिळाल्यावर माईसाहेब तेथून उठून देवघराकडे गेल्या.

थोड्या वेळानें कमलेची दहनक्रिया आटोपून विजय घरीं आला. पण माईसाहेबांच्या योजनेप्रमाणें दाराजवळ न थांबतां तो थेट माईसाहेबांजवळ दाखल झाला. त्याला पाहून माईसाहेब म्हणाल्या, " हां हां हां! हें रे काय बाळ! आल्याबरोबर स्नान करावयाचें, कीं असें धडक इकडे निघून यायचें? जा, दाराजवळच्या न्हाणींत पाणी ठेविलें आहे. तेथें जाऊन अगोदर स्नान कर, शुद्ध हो आणि मग मजकडे ये."

विजय इतका थकून गेला होता आणि त्याला भूकही इतकी लागली होती कीं, तो या बाबतींत माईसाहेबांशीं वादविवादाच्या भानगडींत न पडतां मुकाट्यानें त्यांच्या सांगण्याप्रमाणें न्हाणीवर गेला आणि स्नान वगैरे उरकून त्यांच्याकडे परत आला. आपली आज्ञा आज त्यानें बिनतक्रार मान्य केली हें पाहून माईसाहेबांनाही समाधान वाटलें. तो आला तो थेट माईसाहेबांच्या पायांजवळ येऊन बसला. माईसाहेब त्याच्या डोक्यावर हात फिरवीत फिरवीत म्हणाल्या, "हें रे काय बाळ! डोकें नीट पुसलें देखील नाहीस? अजून केंस तसेच ओले आहेत. अशा ओल्या केंसांनींच झोंपी गेलास, तर उद्यां आजारी पडशील."

पण माईसाहेब एवढें बोलून थांबल्या नाहींत. आपल्या लुगड्याच्या पदरानें त्या त्याचें डोकेंही पुसूं लागल्या! विजय नको नको म्हणून पुष्कळ म्हणाला. पण त्याचें ऐकतो कोण? त्याचें डोकें चांगल्या तऱ्हेनें पुसून झाल्यावर माईसाहेब म्हणाल्या, " विजयाकरितां एका ताटांत लाडु आणि थोडी बरफी घेऊन या बरें, काकी—चिवडा असला तर तोही आणा."

विजयः—छे, छे, छे, आई! मला हें असलें कांहीं नको.

माई०:—कां रे बाळ? मग काय खातोस?

विजयः—आपलें रोजचें खाणें; भात, भाकरी, भाजी, वरण.

माई०:—हें सगळें व्हावयाला अजून अवकाश आहे.

विजयः—मी तोंपर्यंत थांबतों. होऊं दे सावकाश.

माई०:—काय बोलतोस? दिवसभर तोंडांत पाणी घातलें नाहींस, आणखी अजूनही सावकाश होऊं दे म्हणतोस. शिवाय दगदगही झाली. घसा कोरडा पडला असेल. चल, थोडेंसें कांहीं खा आणि पाणी पी.

मिठाई तुला नको असेल तर दूध आणतें. मग सैपाक झाल्यावर जेव. काकी, बघा बरें सैपाकाला अजून किती अवकाश आहे तो. विजय, पण तूं आज कुठें निजणार बाळ ?

विजयः—कुठें म्हणजे, माझ्या खोलींत.

माई०:—छे. तेथें तुला निजायचें नाहीं !

विजयः—कां बरें, माई ?

माई०:—तेथें आज तिचा मृत्यु नाहीं कां झाला? तेथें नाहीं मी तुला निजू द्यायची.

विजयः—मृत्यु झाला म्हणून काय झालें, माई? तेथें निजलें म्हणून काय माणूस मरतें ?

माई०:—गप. असें अमंगल बोलूं नकोस. त्या खोलींत कुसुम त्या मुलाला घेऊन निजणार आहे. मीं तिला ती जागा दिली आहे.

विजयः—मग मी आपल्या वाचनालयांत निजेन. चंपे, इकडे ये बरं जरा.

चंपी पुढे येऊन म्हणाली, "काय म्हणतां, सरकार."

विजयः—तें माझें वाचनालय झाडून घे आणि तेथें माझा बिछाना घाल.

माई०:—त्या खोलींत कशाला निजतोस ? तेथें जिकडे तिकडे पुस्तकेंच पुस्तकें भरलीं असल्यामुळें तशा अडचणींत तुला झोंप कशी येईल ?

विजयः—अगदीं छान येईल माई. पुस्तकें म्हणजे आम्हां लोकांचा स्वर्ग होय.

विजयाचा स्वभाव माईसाहेब पूर्णपणें जाणून असल्यामुळें या बाबतींत त्या पुन्हां म्हणून कांहीं बोलल्या नाहींत.

थोड्या वेळानें भोजन आटोपून विजय आपल्या वाचनालयांत निजावयाला गेला. या वाचनालयाच्या अलीकडेच त्याची खोली होती. तेथें कुसुम नुकतीच येऊन बसली होती. तिला पाहून तो म्हणाला, "कुसुम, एकटीच बसली आहेस ?"

कुसुम हसून म्हणाली, " आतां मी एकटी नाहीं. परमेश्वरानें मला एक सोबतीही दिला आहे. "

या वेळीं कल्याणरूपिणी मातृदेवतेप्रमाणें कुसुम त्या अनाथ अर्भकाला मांडीवर घेऊन बसली होती. तें अद्वितीय दृश्य विजय अतृप्त नेत्राने पाहूं लागला. कुसुमच्या चर्येवर या वेळीं मनोहर शोभा तळपत होती. तिच्या अवलोकनानें तर विजय स्वतःचे देहभान विसरला.

त्याची ही तन्मय वृत्ति पाहून कुसुम त्याला म्हणाली, " आतां रात्र पुष्कळ झाली. आपण जाऊन निजा जा. "

विजयाला अनिच्छेने कां होईना पण तेथून जाणें भाग पडलें.

---

# प्रकरण २९ वें.

## विवाहाची तयारी !

**कुसुमनें** आणिलेलें ते अनाथ बालक अखेर कालाने तिला पचू दिले नाहीं.

त्याला काळाच्या दाढेतून सोडवावे म्हणून विजयाने किती तरी खटपट केली, डॉक्टरांचीं केवढी तरी मोठमोठीं बिलें भरली, पण अखेर त्याचा काहीं उपयोग झाला नाहीं. त्या अवधींत विजय अष्टौप्रहर कुसुमजवळ बसून असे. इतकेंच नव्हे, तर त्या अर्भकाच्या शुश्रुषेच्या कामी तिला तो प्रत्येक गोष्टीत मदत करित होता. कुसुम त्या बालकाची साक्षात् माताच बनली असल्यामुळे त्याच्या मृत्यूमुळे तिला जो शोक झाला, तो केवळ वर्णनातीत होय. पण अशा प्रसगीं देखील तिजसंबधीं सहानुभूति दाखविण्यास, किंवा तिच्या मनाचें समाधान करण्यास, घरांतल्या स्त्रियांपैकीं कोणीही पुढे सरसावली नाहीं. विजयानें मात्र या बाबतींत आपणाकडून शक्य तेवढें प्रयत्न केले. तिनें आपलें दुःख विसरावें, म्हणून तिला तो रोज नवीं नवीं पुस्तकें आणून देत होता.

विजयानें तिच्याशीं एवढी लगट ठेवलेली पाहून एके दिवशीं माई-साहेब आपल्या पतीला म्हणाल्या, "हे बरें आहे कां आतां ? तुमच्या तर कानाआड ऊं जात नाहीं. एखाद वेळ कांहीं करितां कांहीं झालें म्हणजे मग बरें होईल !"

त्यांचे हें भाषण ऐकून भाऊसाहेब आश्चर्यानें म्हणाले, "अग पण झालें काय, हे तर सांगशिल कीं नाहीं ?"

माई०:—आणखी काय व्हावयाचें ? विजय त्या पांढऱ्या पालीजवळ रात्रंदिवस बसून असतो.

भाऊसाहेबः—मग म्हणणें काय आहे ?

माई०:— त्याचे लग्न लौकर उरकून टाकावें.

भाऊ०:—येत्या वैशाखांतच उरकून घेतो. मग तर झालें ?

माई०:—हो. अगदी याप्रमाणें करावयाचें. शुभस्य शीघ्रं. ही घरांत एक मोठी पीडा आली आहे !

भाऊ०:—मग तिला हांकून का देत नाहीस ? मी किती वेळा तरी सांगितले !

माई०:—अगबाई ! असें केल्यावर केवढा अनर्थ होईल.

भाऊ०:—काय होईल ?

माई०:—तिला हांकून दिले तर विजय देखील घरांतून निघून जाईल.

भाऊ०:—कांहीं तरी आपलें बोलावे ! घरांतून निघून जाणें म्हणजे कांहीं सोपें काम नाहीं.

माई०:—छेः छेः, तुम्हांला त्याचा स्वभाव अजून माहीतच झाला नाहीं. तो बोलल्याप्रमाणें करावयाला कधीं चुकावयाचा नाहीं. या पंचायतींत पडूं नका बरें. त्याचें आपलें लग्न लौकर उरकून टाकावें एवढेंच खरें. सूनबाई आल्यावर ती आपोआप त्याला ताळ्यावर आणील.

भाऊ०:—ठीक आहे. त्याला जरा बोलाव बरें. या संबंधांत मी त्याच्याशीं थोडें बोलतों.

याच वेळीं उराशीं ससाचें गोजीरवाणें पिल्लु कवटाळीत कवटाळीत विलास तेथें आला. त्याला माईसाहेब म्हणाल्या, " विलास, तुझ्या दादाला इकडे घेऊन ये बरें."

विलास पळतच गेला आणि लागलाच विजयाला घेऊन आला.

तो आंत आल्याबरोबर बापाला म्हणाला, " बाबा, कां बोलावलेंत मला ? "

भाऊ०:—एवढ्याकरितां बोलावलें कीं, तूं घरांत दिवसभर बसून करतोस तरी काय ? जहागिरदारीचें कामकाज कां पाहात नाहींस ?

विजयः—आपली आज्ञा होईल, तर मी जहागिरीचे काम पहावयास तयार आहें. पण कोणाही नोकराची लबाडी किंवा अन्याय मी बिलकुल सहन करणार नाहीं. दिवाणजीपासून तों खालच्या शिपायापर्यंत मी सर्वांना वठणीवर आणतों. आपल्या पांघरुणाखालीं गरीबगुरीब लोकांवर आणि शेतकरी वर्गावर हे लोक केवढा तरी अन्याय करीत आहेत. हे सर्व अन्याय मी नाहींसे करून टाकतो. या गोष्टीला जर आपली परवानगी असेल, तरच मी जहागिरीची देखरेख पाहण्याचे काम हातीं घेईन.

भाऊ०:—ह्या सर्व गोष्टींचा विचार मागून पाहतां येईल. तू उद्यांपासून कामकाज पहावयाला तर आरंभ कर. दहा वाजतां जेवण आटपून कचेरींत येऊन बसत जा.

" ठीक आहे." असें म्हणून विजय जावयाला निघाला. पण भाऊसाहेब त्याला थांबवून म्हणाले, " थोडा थांब, तुला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. × × × × × चे जहागीरदार × × × × × यांच्या मुलीबरोबर तुझें लग्न करावयाचें मीं नक्की ठरविलें आहे. "

विजय आश्चर्यानें म्हणाला, " माझें लग्न इतकें एकाएकीं ?

भाऊ०:—यांत तुला इतकें आश्चर्य वाटण्यासारखें काय आहे ? मीं पुष्कळ विचार करून ठरविलें आहे.

विजय अत्यंत शांतपणानें म्हणला, " पण इतक्यांतच लग्न करावयाची माझी इच्छा नाहीं. "

भाऊ०:---कां बरें? जी गोष्ट सगळी मनुष्यजात आतांपर्यंत करीत आली, त्यांत तुला एवढें अवघड काय वाटतें ?

विजय०:---तुमची मर्जीच असेल, तर मी लग्न करतों. पण त्या मुलीशीं करणार नाहीं.

भाऊ०:---कां ?

विजयः---ती वयानें फार लहान आहे.

भाऊ०:---तुझ्या अकलेची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडीच होईल. अरे ! जन्मतांच कोणी मोठें जन्मत असते काय ? ती लहान आहे तर उद्यां मोठी होईल. लहानाचीच मोठी होते. मोठ्याची लहान होत नाहीं. मी तिच्या बापाला वचन देऊन चुकलों आहे. तुला तिच्याशीं लग्न केलेंच पाहिजे.

विजय०:---शक्य नाहीं.

आपला कुसुमशीं विवाह करण्याचा विचार आहे, असे आतांच बापाला सांगून टाकावें असे विजयाच्या मनांत आले. पण या संबधांत तिचा विचार काय आहे याची त्याने अद्यापपर्यंत चौकशी केली नसल्यामुळें त्याने तो विचार जागच्याजागीं दाबला. ती आपल्याशीं विवाह करावयाला राजी नसेल, तर बापाला तसे सांगणें निखालस मूर्खपणाचें होईल असे त्याला वाटलें. पण तो पुन्हां कांहींच न बोलतां तेथून निघून गेला. त्याच्या या वर्तनानें भाऊसाहेब आणि त्यांच्या पत्नी हीं दोघेही चकित झालीं, आणि एक-मेकांच्या तोंडाकडे पाहूं लागलीं.

थोड्या वेळानें माईसाहेब म्हणाल्या, " त्याच्या बोलण्याकडे आपण लक्ष देऊं नये. त्याला अजून काय कळतें ? ठरवून टाकावें. मुकाट्याने लग्न करील तो. "

मुलाची ही वागणूक अगदीं उद्धटपणाची आहे असें भाऊसाहेबांना वाटल्यामुळें ते मनांतल्यामनांत अगदीं गरम झाले होते. ते बायकोला म्हणाले, " ठीक आहे, तूं म्हणतेस तसेंच करतों. "

एवढें बोलून भाऊसाहेब आपल्या बैठकीच्या ठिकाणीं निघून आले. थोड्याच वेळांत विजयाचा विवाह वैशाख शुद्ध ९ ला होणार अशी बातमी

गांवभर झाली. वैशाखाचा महिना कांहीं लांब नसल्यामुळे लग्नाच्या सामानासुमानाची तयारी करण्याची भाऊसाहेबांच्या घरांत एकच दगल उडाली. माईसाहेबांची धांदल तर पुसू नका. त्या सारख्या ऑर्डरीवर ऑर्डरी सोडीत होत्या. त्यांच्या बडबडीला तर पारावार राहिला नव्हता. अमक्या वेळेला अमकी जिन्नस लागते; पुण्याहून अमुक जिन्नसा आणावयाच्या, सुनबाईच्या अगावर अमुक अमुक मोत्यांचे आणि हिऱ्यांचे डाग घातलेच पाहिजेत; अमक्या पक्वान्नांत अमुक इतके केशर घालावे लागते, आणि तमक्या पक्वान्नात इतकी साखर घालतां उपयोगाची नाही; माझ्या त्या अमक्या हिला या वेळी महिनाभर अगोदर आणिले पाहिजे आणि तमक्या तिला या वेळीं अशा अशा प्रकारचें लुगडे घेतले पाहिजे; अशा एक ना दोन, किती तरी योजना त्यांच्या सारख्या चालल्या होत्या. शिवाय, हे मगलकार्य सुखासमाधानाने पार पडावे म्हणून त्याचे देवाला नवसांवर नवसही चालले होतेच. पण या सगळ्यांत मनूला झालेला आनद कांही और होता. ती सारखी नाचू बागडू लागली. इतकेच नव्हे, तर जो भेटे त्याला म्हणे, "आतां आमच्या दादाचे लगीन होनाल आहे. घलात वैनी येणार आहे. आतां खूप मजाच मजा होईल." हीच अवस्था विलासच्याही मनाची झाली होती. तोही मनूप्रमाणे आनंदाने नाचू बागडू लागला.

याप्रमाणे ते सगळे घर आनदानें भरून गेले, पण ज्याचे लग्न व्हावयाचें त्याच्या मात्र मनांत आनदाचे लवमात्रही चिन्ह दिसले नाहीं. उलट, अमावास्येच्या रात्रीप्रमाणे त्याच्या चर्येवर दुःखाची घनघोर छाया पसरली होती. त्याच्या मनाला विषण्णतेनें घेरून टाकिलें होतें !

तो आपल्या पित्यापासून निघाला तो थेट आपल्या वाचनालयांत गेला. मध्यंतरीं कुसुमची खोली होती, पण तेथे जाऊन तिची भेट घेण्याचीही त्याला इच्छा झाली नाहीं. वाचनालयांत गेल्यानतर तो एका आरामखुर्चीवर पडला आणि जवळच एक पुस्तक पडले होतें ते घेऊन तो तें वाचूं लागला. पण तें पुस्तक तो वाचूं लागला, म्हणजे नुसतीं त्याचीं पानें उलटीं पालटीं करूं लागला इतकेंच. त्यांतील मजकूर वाचून तो ग्रहण करण्या इतकी त्याच्या मनाची स्थिति नव्हती. डोळ्यांना तर त्यावर

भयंकर काळेकाळे डाग दिसू लागले. केवळ तें पुस्तक वाचण्याचें निमित्त करून तो सध्यांच्या आपल्या दुर्दैवी स्थितीचा विचार करीत होता. पुढें येऊन उभ्या राहिलेल्या लग्नाच्या संकटांतून कसे सुटावे हाच एक प्रश्न सध्यां त्याच्या मनापुढे उभा होता. परन्तु पुष्कळ विचार करूनही त्याला कांहींच उपाय दिसेना.

तो आपल्या मनाशीं म्हणाला, "या वेळी आपलें कर्तव्य काय आहे? जेव्हां जगावयाचें कीं मरावयाचें असा प्रश्न माणसाच्यापुढें उभा राहतो. त्या वेळी माणसाने भीड, संकोच, लज्जा हीं सोडलींच पाहिजेत. त्या वेळी हा प्रश्न सोडवावयाला उशीर करणेंही बिलकूल उपयोगाचें नाहीं. सध्यां आपले कर्तव्य हेंच आहे. कुसुमची भेट घेऊन तिला आपली मनःस्थिति कळवावी. प्रस्तुत संकटांतून माझी मुक्तता करावयाला तिच्याखेरीज या वेळीं दुसरें कोणीही समर्थ नाही. ती माझ्याशीं विवाह करावयाला तयार झाली तर हा प्रश्नच सुटला. नाहीं झाली, तर पुढचें पुढे पाहू. भविष्यकाळाचा प्रश्न भविष्यकाळच सोडवील. या वेळी मधुकर येथे असता तर किती तरी छान होतें! त्याला पत्र लिहून ताबडतोब इकडे बोलवावें. या संकटातून सुटावयाला तो निःसंशय कांहींना कांहीं तरी मार्ग अवश्य शोधून काढील."

यानंतर तो मधुकराला पत्र लिहिण्याच्या उद्योगाला लागला.

इकडे ही वातमी, विजयाच्या विवाहाची खूष खबर, कुसुमला जाऊन कधीं कळवीन असे चपीला होऊन गेले होते. असे छान शस्त्र हातीं आल्यावर तिच्यानें स्वस्थ कसं बसवेल? घरांतलीं सगळीं माणसें आनंदांत रममाण झाली असतांना एकट्या कुसुमने दुःखांत, आणि तेही दुसऱ्या कोणाच्या तरी मुलासाठीं, मग्न होऊन राहावें ही गोष्ट तिच्या परोपकारी मनाला पटली नाही. ती तिच्या खोलीजवळ गेली आणि तेथें विजय बसला आहे कीं काय हे तिनें हळूच पाहिले. तो तेथे नाही अशी तिची खातरी झाल्यावर तिच्या आनंदाला सीमा राहिली नाहीं. ती हसत हंसतच खोलींत गेली. तिच्या मुखावरील हास्य पाहून कुसुमचें हृदय कांपूं लागलें!

चंपी धीर गंभीरस्वरानें म्हणाली, " कुसुमबाई, माझ्या तोंडांत साखर घाला. मी तुम्हांला एक अत्यत आनंदाची खबर सांगावयाला आलें आहे."

कुसुम कपितस्वरानें म्हणाली, " कसली ? '

चंपी मान हालवून म्हणाली, " आपल्या धाकट्या धनीसाहेबांचें लग्न ठरले आहे ! "

कुसुमची चर्या एकदम म्लान होऊन गेली ! तथापि बळेंच हसण्याचा आव आणून ती म्हणाली, " कोणाबरोबर ठरले ? कधीं ठरलें आहे ? "

चंपीः—आजपासून एक महिन्यानें आणि तेंही जहागीरदारांच्या मुलीबरोबर. मुलगी तुमच्याहून सवाई देखणी आहे. धाकट्या धनीसाहेबांनाही ती पसत पडली आहे !

यावर काय उत्तर द्यावे हें कुसुमला सुचेना. तसेच या बातमीने आपल्याला आनंद न होतां दुःख कां व्हावे या कोड्याचाही तिला नीटसा उलगडा होईना. त्या बातमीनें तिच्या हृदयावर एवढ्या जोराचा आघात झाला कीं, तिला तो सहन होणें अगदीं अशक्य झालें ! ती आपल्या मनांत म्हणाली, " हाय ! देवानें मला एकटे ठेवण्यासाठीच जन्माला घातले काय ? "

तिचें हृदय भरून आले; आणि तिला आपले अश्रु आंवरणेही अशक्य झाले. चंपी यावेळीं येथून निघून जाईल आणि आपल्याला मोकळ्या मनाने रडावयाला साधि देईल, तर किती तरी बरें होईल असें तिला वाटले.

याच वेळीं विजयाच्या पायांची चाहूल ऐकावयाला आली. ती ऐकून चंपी तेथून जिव घेऊन पळाली.

कुसुमही तेथें जवळच असलेलें एक पुस्तक घेऊन त्याच्या वाचनांत गढल्याचे मिष करून बसली.

विजय तिच्या खोलींत आला. तथापि तिनें आपलें ढोंग तसेंच कायम ठेविलें. त्याच्याकडे मान वर करून देखील तिनें पाहिलें नाहीं.

अखेर त्यानेंच होऊन तिला हांक मारली " कुसुम. "

कुसुमला आतां आपला दुःखावेग आंवरणें अशक्य झालें. ती एकदम रडूं लागली.

विजय घाबरून म्हणाला, " काय झाले. कुसुम ? अशी रडतेस कां ! सांग ? "

पण कुसुमने याचें उत्तर काय द्यावें ? आपण कां रडतों याचे कारण तिचें तिला कळलें नाहीं.

त्याला वाटले की, आपल्या घरच्या माणसांपैकीं हिला कोणी कांहीं तरी वाईट साईट बोलले असावे म्हणून हीं रडत असावी. हा विचार मनांत आणून तो तिला म्हणाला, " कुसुम, तुला घरांतल्या बायकांपैकीं कोणी कांही बोलले काय ? तुला त्या त्रास देतात हे मला पक्के माहीत आहे. परतु त्यांचा हा अत्याचार नाहीसा करावयाला एक रामबाण उपाय आहे आणि तो सर्वस्वीं तुझ्या हातांत आहे."

कुसुम आपले अश्रुभरित नेत्र त्याजकडे लावून उत्सुकतेने पाहूं लागली.

विजय म्हणाला, " मी बोलूं नये ते बोलत आहे. तथापि ते बोलल्याखेरीज माझ्यानें रहावत नाही. यात मजकडून कांही अनुचित गोष्ट घडत आहे असं जर तुला वाटत असेल, तर तू याबद्दल मला क्षमा कर आणि मी जे बोलतो ते विसरून जा. मीही ते विसरेन."

अशा प्रकारची प्रस्तावना करून तो काय बोलणार आहे त्याची कुसुमला कल्पना होईना. ती पुन्हा त्याजकडे उत्सुकतेनें पाहूं लागली.

इकडे विजयाचीही मोठी चमत्कारिक अवस्था झाली. त्याच्या जिभेवर शब्द आले पण ते बाहेर पडेनात ! आपले हृदय तिच्यापुढे कशा रीतींने उघडें करावे याचा त्याला विचार पडला. त्याच्या आणि तिच्यामध्ये असलेलें अतर अशाच प्रकारचें होते कीं, त्याला आपले हृद्गत विचार तिच्यापुढें ठेवावयाला संकोच वाटूं लागला. अखेर मोठें धैर्य धरून तो तिला म्हणाला, " सध्यां घरांत माझ्या लग्नाची वाटाघाट चालली आहे. "

कुसुमच्या मस्तकावर जणू काय वज्रप्रहार झाल्याप्रमाणें झालें ! तथापि ती आपलें हृदय घट्ट करून म्हणाली, " हो, मींही हें ऐकिलें आहे."

विजयः—पण कुसुम, तुला हे ठाऊक आहे ना, माझी पत्नी व्हावयाला मी कोणाला लायक समजतो ते ?

कुसुमचा जीव गोळा झाल्याप्रमाणे झाले ! आपले हृदय जणू काय कोणी चिरीत आहे असे तिला वाटले. तथापि ती एखाद्या दगडी पुतळीप्रमाणे स्तब्ध राहिली.

ती कांहींच बोलत नाहीं हे पाहून विजय म्हणाला, " कुसुम, तू माझा स्वीकार करतेस कां ? माझी धर्मपत्नी बनतेस ? "

पण कुसुमकडून याचें कांहीं उत्तर मिळाले नाहीं. ती स्तब्ध बसलेली पाहून त्याला जरा उत्तेजन येऊन तो म्हणाला, " कुसुम, बोल, तुला माझी प्रार्थना मान्य आहे ? "

त्यानें तिचा हात आपल्या हातात घेतला. कुसुमच्या हाताला स्पर्श करण्याचा हा त्याचा पहिलाच प्रसंग ! आणि तोही प्रेमभावनेनें ! त्याच्या अंगांत विद्युत्सचार झाल्याप्रमाणे झाले ! तिच्या तोंडून समतीचे शब्द बाहेर पडावेत म्हणून त्याचा जीव अगदीं वेडावून गेला ! या उन्मादावस्थेत आपण त्या बालिकेचा हात केवढ्या जोराने दाबित आहों याचे त्याला भान राहिलें नाहीं. पण त्या बिचारीला मात्र ते करपीडन अगदी दुःसह झाले !

तिने मोठ्या युक्तीने हळूच त्याचा हात आपल्या हातांतून सोडवून घेतला, आणि त्याच्या प्रश्नाला नकारार्थीं उत्तर दिले.

ती असे उत्तर देईल अशी त्याची कल्पना नव्हती. ते उत्तर ऐकून तो अगदीं निश्चल झाला. त्याच्या डोळ्यांना अंधेरी आली. तिच्या एका शब्दानें त्याच्या आज कित्येक दिवसांच्या आशेची एका क्षणांत गाखरांगोळी झाली.

तो पुन्हां म्हणाला, " कुसुम, हे तुझे शेवटचेंच उत्तर काय ? कीं पुन्हां विचार करून उत्तर देणार आहेस ? "

विजयाचा कंठ सद्गदित झाल्याचें आणि त्याचें हृदय भरून आल्याचें कुसुमला दिसलें. ती गंभीर स्वराने म्हणाली, " मीं विचार करूनच उत्तर दिलें आहे. "

यानतर विजयाच्या तोंडून एक अक्षरही बाहेर पडले नाहीं. थोडा वेळ दोघेही जागचे जागीच स्तब्ध होतीं. ही स्तब्धता भंग करण्याचें कोणाचेच धैर्य होईना. नतर अशाच स्थितीत थोड्या वेळाने विजय तेथून निघून गेला.

तो गेल्यावर कुसुम उशीवर डोकें ठेवून सारखें अश्रुमोचन करू लागली. याच वेळीं काकी तेथे आल्या आणि कुसुम रडत असलेली पाहून अगदीं चकित झाल्या. कुसुमला त्या आल्याची जाणीवही झाली नाहीं. थोड्या वेळाने काकी म्हणाल्या, " कुसुम, तुझ्या सगळ्या कांही गोष्टी मेल्या दुनियेच्या वेगळ्या आहेत ! तुला असे रडत बसायला काय झाले ? ते पोर काय तुझ्या पोटीं जन्मले होतें ? मग मेला एवढा गोंधळ का ? "

काकींचे हे भाषण ऐकून कुसुमने आपसे रडे आंवरले आणि ती एकदम उठून बसली.

काकी म्हणाल्या, " कोणाचे कोण आणि त्याच्यासाठीं जीव काय काढीत बसलीस ? तुला कळले ना ? बाळासाहेबांचे लग्न ठरले आहे. चल तिकडे. घरांत निरनिराळ्या कामाची गर्दी झाली आहे. आपण त्याला हातभार लाविला पाहिजे. शिवाय घरात मंगलकार्य उभे राहिले असतांना असे रडत बसणे बरें नाही. "

कुसुम स्तब्ध राहिली. ती कांही बोलत नाही हे पाहून काकी पुन्हां म्हणाल्या, " हो, मला माहीत आहे तू फार हट्टी पोर आहेस. माझा जीव घ्यायला तू येथे आली आहेस. "

एवढे बोलून काकी पाय आपटीत आपटीत तेथून निघून गेल्या.

# प्रकरण ३० वें.

## बंडुनानांचा अधमपणा !

इकडे कुसुम उशीवर डोकें ठेवून अश्रुमोचन करीत असतांना तिकडे विजय मोठ्या घाईनें बडुनानांच्या घराच्या बाजूला चालला होता. त्याच्या नेत्रांतील अश्रु अजून थांबले नव्हते.

बडूनाना घरीं एका फाटक्या चटईवर बसून तबाखूचा बार भरण्याच्या उद्योगांत होते. त्यांचे चिरंजीव गजोबाही आज घरींच होते. त्यांनीं नुकताच गांज्याच्या चिलमीवर ताव मारला होता, आणि वासरांसाठीं अंबाडीचें दोरखंड वळीत वळीत वडिलांशीं गप्पा मारीत होते. तो बापाला म्हणाला, " बाबा, तुमची सगळी पोकळ घमेंड आहे. पाहिली तुमची कर्तबगारी. त्या लुच्या विजयानें आणि मधुकरानें त्या दिवशीं माझीं हाडें चांगली मऊ केलीं असतीं, पण मोठ्या मुष्किलीनें वांचलों. त्या वेळेचें स्मरण झालें कीं, अजून अंगावर कांटा उभा राहतो. अजून त्यांची कोठें गांठ पडते कीं काय, अशी भीति वाटते ! त्या दिवशी पळतां भुई थोडी झाली ! मारुतीरायानेंच त्यांतून वांचविलें ! बाकी त्यांच्या हातून त्या दिवशीं जिवत सुटण्याची मला बिलकुल आशा नव्हती. "

बडुनानाः—थांब. याचा सूड जर मी घेतला नाहीं, तर हा नांवाचा बडुनानाच नव्हे. मधुकराला तर मीं बहिष्कृतच केला आहे.

गजोबाः—काय बहिष्कृत केलें आहे ? त्याचा बाप आणि तोहि अजून भाऊसाहेबांच्या येथें जातात येतात; त्यांचा अजून त्या घराशीं असलेला संबंध कुठे सुटला आहे? गांवच्या लोकांचा देखील त्यांच्यांशीं संबंध आहेच. याला काय बहिष्कृत करणे म्हणतात ?

बंडुनानाः—अरे, जरा दमानें घे. बीं पेरलें आहे, आतां योग्य वेळीं पीक पदरांत पडेल. त्यांतून विजय जहागीरदाराचा मुलगा पडला. याला नमविणें काय सहज काम आहे ? त्याचें त्या जहागीरदाराच्या मुलीशीं

लग्न ठरलें आहे, तेंच मी मोडून टाकतों. ऐन वेळीं बिब्या ठेंचून शिशुपाला-प्रमाणें मीं जर त्याची फजिती उडविली नाहीं, तर मला विचार ! लग्न न लावतां त्याला काळें तोंड घेऊनच परत यावे लागेल. मी त्या जहागीर-दाराला पत्र लिहून कळवितों, कीं, " तुम्ही आपल्या मुलीला जो वर पाहिला आहे, तो पक्का सुधारक आहे. तो मुसलमानांच्या पक्तीला बसून अंडीं, कोंबडीं आणि गाईचें मांसही खातो. या शिवाय त्यानें एक विधवा पोर घरांतच ठेविली आहे. या शिवाय आणखीही अशाच दोन चार गोष्टी कळवितों. तो जहागीरदार पक्का कर्मठ ब्राह्मण आहे. हें पत्र वाचल्याबरोबर तो त्याच क्षणीं लग्न मोडील. आणि या कारणानें विजयाचें लग्न मोडाव-याला कितीसा उशीर लागणार ? मुलाकरितां बाप कांहीं समाजापासून अलग राहावयाला तयार होणार नाहीं. अर्थात् तो मुलाला घराबाहेर काढून देईल. याप्रमाणें मी हा डाव घडवून आणणार आहे.

याच सुमारास विजय तेथें येऊन पोंचला. त्याला पाहतांच बंडुना-नांची पांचावर धारण बसली. त्यांनीं नुकताच तोंडांत बोकणा भरला होता. त्याची धार पिकदाणीऐवजी न कळत त्याच्या तोंडांत गळली. गजोबाही आंबाडीची एक बट दगडानें तोडीत होता. त्या दगडाचा घाव त्या आंबा-डीच्या बटेऐवजीं त्याच्या हातावर बसला ! दोघांही पितापुत्रांच्या तोंडावर एकदम प्रेतकळा पसरली. इकडे कीं तिकडे पाहण्याची दोघांपैकीं एका-चीहि छाती होईना. पण त्यांच्या या दुःस्थितीकडे बिलकुल लक्ष न देतां विजय म्हणाला, " बंडूनाना, मी आज आपणांकडे एका महत्वाच्या कामा-साठीं आलो आहें. "

बंडूनाना आणि गजोबा त्याच्याकडे आश्चर्यपूर्ण दृष्टीने सारखे पाहूं लागले.

विजय पुढें म्हणाला, " तुम्ही मजवर बहिष्कार टाकावा, अशी तुम्हांला विनंति करण्याकरितां मीं आज तुमच्याकडे आलो आहें. "

ते पितापुत्र अधिकच गांगरले.

विजयानें आपलें भाषण चालू ठेविलेंच होतें.

" आपण ज्याला अधर्म, पाप किंवा भ्रष्टाकार म्हणतां, तो मजकडून झाला आहे. मीं मुसलमानांच्या हातचे खाल्ले आहे. "

कुसुमकडून मिळालेल्या नकारामुळे विजयाच्या हृदयावर आघात झाला होता. तो कोणाला दाखविणे त्याला शक्यच नव्हते, तर त्याचे निरीक्षण करण्याचें त्याला स्वतःला देखील साहस होत नव्हते. ह्या दारुण आघाताच्या वेदना दुसऱ्या एखाद्या आघातानेंच उपशम पावतील, असें त्याला वाटलें. म्हणून तो बडूनानाकडे अशी विलक्षण मागणी करण्याकरितां आला होता.

पण त्याच्या मनःस्थितीची गजोबाला काय कल्पना ! त्याला वाटले, घात झाला ! आपले गुप्त भाषण या लुच्च्याने ऐकलें.

बडूनाना म्हणाले, " सरकार, आपण असे कसे म्हणतां ? आपण म्हणजे आमच्या समाजाचे भूषण. आमच्या समाजाचा प्राण. आपल्यावर आम्ही बहिष्कार कसा टाकणार ? तारुण्यांत सगळ्यांच्याच हातून दोष घडतो. सगळ्यांचेच पाय घसरतात. सगळ्यांच्याच हातून अनाचार घडतात; मग तुम्हांलाच मी कसा दोष देऊं ? हा त्या अवस्थेचा दोष आहे, तुमचा दोष नाहीं; समजले मालक ? आपल्या अगांत जरा पोक्तपणा आला कीं, आपले हे सगळे दोष निघून जातील. "

विजयः—माझ्या सुधारण्याची आशा बिलकुल करू नका, बडूनाना ! मी कधींच सुधारणार नाहीं. आणि हा तारुण्याचा दोष म्हणून तुम्ही मला एक प्रकारची सवलत देतां, पण ही सवलत तुम्ही माझ्या मित्राला——मधुकराला—दिली नाहीं. असे कां ? तो कांही म्हातारा नाहीं, माझ्या इतकाच तरुण आहे. मग तुम्ही त्याला बहिष्कृत कां केलें ? आपल्याला आपल्या धर्माची शपथ आहे. माझी निराशा करूं नका.

बंडुनाना—हं, ह, हं! धनीसाहेब, आपण हें काय बोलतां ? आपली आणि मधुकराची काय बरोबरी आहे ! तो किती झालें तरी एका दरिद्री भटाचा पोरगा! आणि आपण मोठ्या लक्ष्मीपती जहागीरदारांचे चिरंजीव! तुम्ही म्हणाल तर मी आजचे आज जोशीबुवांना परत जातींत घेतों.

विजयः---छे, छे, छे! असे भलते सलते कधींच करूं नये बरें, नाना. आपल्यासारख्यांच्याबरोबर जातीत एकत्र राहण्यापेक्षां तिच्यांतून बाहेर पडलेले---बहिष्कृत झालेलेच- लाखो पटीने उत्तम. तुम्हांला शपथ आहे मला बहिष्कृत कराच,आणि बाबांना सांगून ते मला घरांतून बाहेर हाकून देतील अशी व्यवस्था अमलांत आणाच; हे ठरलेले लग्न देखील मोडण्याची तजवीज आपण करालच; आपण ही सगळीं कामें सहज करू शकाल अशी माझी खात्री आहे.

त्याचे हे भाषण ऐकून बडुनाना आपल्या मनांतल्या मनांत म्हणाले, " घात झाला ! याने आपले सगळे भाषण ऐकल्यासारखे दिसते. "

नतर ते विजयाला उद्देशून म्हणाले, " राम ! राम ! मगलकार्याला आणि मी असे विघ्न आणू ? आतां काय, फार गेले आणि थोडे उरलें ! आणि त्यांत असा अखेरीला अधमपणा करू ? छे, छे, हे पाप मी कोठे फेडू ? धनीसाहेब, आपण मला इतके नीच समजतां ? बरें, तसा मी आहे असे जरी घटकाभर कबूल केलें, तरी तुमचे हे मगल कार्य हाणून पाडण्याची माझ्यांत काय ताकद आहे ? "

विजयः---आपली ताकद सैतानालासुद्धां खालीं पहावयाला लावील. पण कस्तुरीमृग, किंवा शापग्रस्त हनुमान यांच्याप्रमाणे आपल्याला आपल्या ठिकाणच्या गुणांची जाणीव नाही. आपण एक जराशीं चिठ्ठी पाठविली, तर माझ्या मगलकार्याचे बारा वाजतील.

बडुनानाः---मी इतका नीच नाहीं बरें, मालक ? असे माझ्या हातून घडेल तरी कसे ? मी इकडे चिठ्ठी लिहून पाठवावी आणि तुमच्या वडिलांनी दुसऱ्या दिवशीं माझ्या घरादारावरून नांगर फिरवावा, इतका मूर्ख मी नाहीं, समजले ?

विजयः---चिठ्ठीत तुम्ही आपले नांव कशाला लिहिता ? निनांवी पत्र लिहिण्याचा आपल्याला चांगला अभ्यास असेलच.

बंडुनाना---हें: हे: हे:, हे काय ? ही सर्व लोकांनीं मजवर कांहीं तरी कुभांडे रचिलीं आहेत. लोकांना कोणाचे बरें पाहावत नाहीं. गांवांत विनाकारण माझी बदनामी चाललेली असते ! निनांवी पत्र ? राम ! राम ! राम !

विजयः—मग आपण मजवर कोणत्याही रीतीनें हा उपकार करीत नाहीं तर ?

बंडुनाना आपल्या मनांतल्या मनांत म्हणाले, "बच्चाजी! तुला हें लग्न कोणीकडून तरी मोडावयाचें आहे काय ? मग तें लागलेंच पाहिजे! माझा उद्योग आतां या दिशेनें चालू राहील. बरें मला सावध केलेस! तुला नको असेल तें घडवून आणणें हेंच तर माझें ब्रीद ! आतां या योगानें सासऱ्याची मोठी जाहगीर तुझ्या पदरांत पडेल, ही जरा वाईट गोष्ट आहे. पण त्यालाही माझ्या हातांत उपाय आहे. तो योग्य वेळीं मी अंमलांत आणीन. तुझ्या सासऱ्याचें मन वळवून मी त्याला दत्तकसुद्धां घ्यायला लावीन. जहागीर कांहीं तुझ्या नरड्यांत जाऊं देणार नाही."

बंडुनाना कांहींच बोलत नाहीं हें पाहून विजय चिडून म्हणाला, "हे काय ? विचार कसला करितां ? कसायाला हत्त्या करण्याचा संकोच, ही गोष्ट मी आज नवीनच पाहतो!"

बंडुनानाः—नाहीं सरकार, मजकडून ही गोष्ट होणार नाहीं. मग तुम्ही मला बरे म्हणा अगर वाईट म्हणा.

विजयः—ठीक आहे. तुमचेकडून होत नाहीं तर जाऊं द्या. मी अन्य मार्गानें प्रयत्न करीन.

एवढें बोलून तो तेथून निघून गेला. त्यानतर ते उभयतां पितापुत्र तेथें बराच वेळ स्तब्ध होते. विजय खरोखरच गेला आहे अशी त्यांची खातरी झाल्यावर बडुनाना हाताचा इशारा करून मुलाला म्हणाले, "बघ बरें, तो खरोखरच गेला कां ? नाहीं तर तो लपून आपलीं भाषणें ऐकेल."

पण बापाचे हें भाषण ऐकून गजोबा मान हालवून म्हणाला, "वाः वा ! तुम्ही आपले जागचेजागीं बसून आपला जीव सुरक्षित ठेवा, आणि मला पहायला लावा. माझा जीव वर आला आहे होय ? तुम्हीस्वतःच कां उठून पाहात नाहीं ?"

बंडुनानाः—अरे, इतका भितोस कां ? असला तरी काय करतो ? त्याच्या मनांतून जर आपल्याला मारावयाचें असतें, तर आल्याबरोबर त्यानें

चोर जशी झोडपतात, तशी आपल्याला झोडपावयाला सुरुवात केली असती, समजलास ?

बापाचें हें भाषण गजोबाला पटून तो हळूंच दाराबाहेर गेला आणि तेथें चोहोंकडे नजर फेंकून लागलाच परत येऊन म्हणाला, " नाहीं, तो तेथे दिसत नाहीं. गेला वाटतें. "

मुलानें इतकें खातरीपूर्वक सांगितल्यावर बंडुनानाला अवसान आलें. नंतर मोठ्या लगबगीनें डोक्यावर पगडी चढवून व हातांत काठी घेऊन ते म्हणाले, " मी जरा भाऊसाहेबांना भेटून येतों हो. नाहीं तर या पोराच्या बोलण्याकडे लक्ष देऊन ते विवाहसंबंधच तोडून टाकावयाचे ! "

एवढें बोलून ते घराच्या बाहेर पडले. इतक्यांत दाराची भिंत लिंपीत असलेला त्यांचा नोकर गणू त्यांना म्हणाला, " धनीसाहेब, कुठें चाललांत ? मल्हारी तेली पेंडीचा हिशेब करावयाला येणार आहे. "

नोकराच्या तोंडचें हे भाषण ऐकतांच नानांच्या अंगाची अगदीं आग झाली आणि ते अत्यंत सतापून म्हणाले, " हाटकलेंस कां लेका मला ! मी कामाला निघालों होतों. आणि त्यांत फिरून तेल्याचें नांव घेतलेंस ! तुला लेका झोडपून काढले पाहिजे. "

असे म्हणून बंडुनाना त्याच्या अंगावर काठी घेऊन धांवले. गणूनें प्रथम पलायन करण्याचा विचार मनांत आणला, पण पाठीमागें असलेल्या भिंतींमुळें या बाबतींत त्याचा नाइलाज झाला. अखेर आत्मसरंक्षणाला दुसरा उपाय नाहीं, हें पाहून त्याने नानांची मानगूट पकडली. या दरम्यान त्यांच्या काठीचा त्याच्या अंगावर एक तडाखा बसला होता.

गणूने पकडलेल्या मानगुटीमुळें बडुनानांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली होती. हा प्रकार त्या रस्त्याने धुणे घेऊन जाणाऱ्या एका परटानें पाहिला. त्याबरोबर तो धांवत धांवतच तेथें आला आणि नानांची मान गणूच्या मगरमिठींतून सोडवून त्याला म्हणाला, " बामणाला मारतोस काय, बिऱ्या ! "

गणुही आतां भानावर आला असल्यामुळें तो नानांची क्षमा मागण्याच्या विचारांत होता; पण इतक्यांत नाना त्या परटाच्या अंगावर जाऊन

म्हणाले, "अरे लेका परट्या! तू इतका उन्मत्त झालास? माझ्या-सारख्या ब्राह्मणाला स्पर्श करावयाला तुला शरम वाटली नाही? मी शुभ कामाला जात असतांना तू आपले तोंड मला दाखविलेस हीच गोष्ट अगोदर वाईट केलीस."

परीट चकितच झाला. तथापि लागलाच हात जोडून तो नानाला म्हणाला, "भटजीबुवा, माझ्या हातून हा मोठा गुन्हा झाला. माफ करा. तुमचा जीव वांचवावा म्हणून मी धांवलों. पुन्हा मी अशी चूक करणार नाही."

बडुनानाः—जा निघ. एकवार तुला माफ केले आहे. नाही तर दाखविला असता ब्रह्मकोप कसा आहे तो.

बाहेर चाललेला गोंधळ ऐकून गजोबाची स्वारी तेथे आली. या दरम्यान गणु आणि परीट हे दोघेही तेथून निघून गेले होते.

गजोबांनीं एकदर हकीकत बापाच्या तोंडून ऐकून त्यांना थोडी विश्रांति घ्यावयास सांगितले. मुलाच्या इच्छेप्रमाणे बडुनानांनी थोडा वेळ थांबून नतर तेथून प्रयाण केले.

ही बातमी थोड्याच वेळात सर्व गांवभर पसरली. विजयाला ती कळली, त्याच वेळी तो परीटही कर्मधर्मसंयोगाने त्याचे कपडे नेण्यासाठी त्याच्या घरीं आला होता. त्याला उद्देशून विजय म्हणाला, "कायरे बुवा? तूं बडुनानाला सोडवावयाला गेला असतांना तो उलट तुझ्या अंगावर धांवून आला म्हणे?"

परटाने सर्व खरीखुरी हकीकत त्याला निवेदन केली. ती ऐकून विजय म्हणाला, "मग असल्या हरामखोराच्या तू एक थोबाडांत का लगावली नाहीस? केलेल्या उपकाराबद्दल तुझे आभार मानावयाचे तर एकीकडे राहिले; आणि उलट अशी संभावना! खरोखर तो शुद्ध पशु आहे. अशा कवडीमोल माणसांना खेटरानेच बडविले पाहिजे."

परीट—राम! राम! राम! असे कसे बोलतां सरकार! ते किती झाले तरी बामन आणि मी बोलून चालून हीन जात. मी असे कसें करीन? पूर्वजन्मीं कोणते पाप केले मी म्हणून अशा हीन जातींत जन्मलों, आणि आतां

असे पाप करून मी तें कुठें फेडूं ? ब्राह्मण म्हणजे आमचे देवबाप, अठरा वर्णांचे गुरू.

विजयः—हाच तुम्हां लोकांचा मूर्खपणा आहे. उच्च जात आणि नीच जात कसली घेऊन बसलां ? ईश्वराने जर सर्व माणसे निर्माण केलीं, तर त्यांत उच्च कोण आणि नीच कोण ? असल्या तर सर्वच जाती उच्च असतील, नाहीं तर सर्वच जाती नीच असतील. राष्ट्राला सर्व जातीच्या धद्यांची जर जरूर आहे, तर मग त्यांत उचनीचपणाचा भेदाभेद काय करीत बसलांत ? तुम्ही असल्या पापी लोकांना भिऊन आपल्या स्वतःची अवनति करून घेत आहां. कोणत्याही जातींतील चांगली माणसं असतील त्याना मान द्या. पण बडुनानासारख्या नीच माणसाला, तो केवळ ब्राह्मण जातीत जन्मला म्हणून, पूज्य समजणे म्हणजे आपण माणसं आहोत हें विसरणे होय. बंडुनाना किंवा त्याचा पोरगा गजा यांच्यापेक्षा तुम्ही लोक शतपटीनें श्रेष्ठ आहा. या गांवांत ब्राह्मण या नांवाला जर कोणी पात्र असेल, तर ते जोशीबुवा आणि त्यांचा मुलगा मधुकर होय. बडुनाना, गजा हे काय ब्राह्मण ? चल, मी तुझ्याबरोबर येतो. माझ्या देखत त्या अधमाला दोन लाथा लगाव. तू केलेल्या उपकाराची फेड तो चांडाळ अशा रीतीनें करतो ?

परीटः—तुम्ही कांहीं म्हणा दादासाहेब, पण आपल्या हातून काही बामनाला मारणे व्हावयाचें नाही.

एवढे बोलून तो तेथून निघून गेला. त्याच्या मागोमाग संतापलेला विजय बंडुनानांच्या घरीं गेला. पण त्या पितापुत्रांच्या सुदैवाने ते दोघेही त्या वेळीं घरीं नव्हते.

बडुनाना नुकतेच त्याच्या पित्याजवळ येऊन दाखल झाले होते. त्यांना पाहून भाऊसाहेबांनीं आपल्या तोंडांतील गुडगुडीची नळी दूर करून म्हटलें, " यावें, यावें गुरुदेव. तुम्हांला भरपूर शमर वर्षे आयुष्य आहे. मीं इतक्यांत तुमचें स्मरण केलें होते. "

बंडुनाना अत्यंत खिन्न स्वरानें म्हणाले, " यजमान, सध्यांच्या काळीं जास्त जगण्यांत कांहीं मौज नाहीं. ज्या काळांत लोक जातीपातीचा विचार

मानीत नाहींत, धर्मावर श्रद्धा ठेवीत नाहींत, ब्राह्मणांना मान देत नाहींत, त्या काळांत जगण्यापेक्षां मरणे चांगलें."

भाऊसाहेबः—पण मरण्यानें तरी दुःखांतून सुटका कोठें होते ? मेल्यावरही यमलोक, यमराज, यमदूत आणि त्यांचे ते अनेक नरक आणि नरकयातना या आहेतच. तुमच्या आमच्या नशिबी स्वर्ग तर नाहींच हें निश्चित. मग अशा स्थितींत येथेंच जितके जास्त दिवस राहतां येईल तेवढे राहण्याचा प्रयत्न करून मजेंत दिवस काढलें, तर त्यांत वावगें काय ? पुनर्जन्म आहे ही गोष्ट जर खरी मानली, तर पुढच्या जन्मीं आम्ही ब्राह्मणच होऊं हे कशावरून ? अस्पृश्य कां होणार नाहीं ? म्हणून माझ्या दृष्टीनें इथेंच जितके जास्त दिवस राहतां येईल तितके बरें. याच्यांत नुकसान तर नाहींच, झाला तर लाभच आहे. प्रस्तुत जन्मांतल्या सुखदुःखाचा आपल्याला अनुभवही आला आहे. नव्या जन्मांत आणखी काय नव्या भानगडी उपस्थित होतात कोणाला ठाऊक ! त्यापेक्षां आपण त्या भानगडींतच न पडलेलें बरें नाहीं ?

बंडुनानाः—आपलें म्हणणे अगदीं बरोबर आहे, भाऊसाहेब. धर्माची डोळ्यांदेखतां होत असलेली हानी पाहून तोंडांतून मरण्याची गोष्ट बाहेर पडली. बाकी जगणें कोणाला पसत नाहीं, कोणाला आवडत नाहीं? पण अधर्माच्या गोष्टी ऐकिल्या कीं, नको हे जगणे असें होऊन जातें. थोड्या वेळापूर्वीं विजय माझ्या घरी आला होता आणि आपण कोंबडी, अंडीं, गोमांस वगैरे काय पाहिजे तें खातों, एवढेंच नव्हे, तर मुसलमानाच्या येथें खुशाल जेवतो असें मला सांगूं लागला. राम ! राम ! राम ! अशा गोष्टी ऐकल्यावर काय वाटेल हें तुम्हीच सांगा.

पण या प्रश्नाचें कांहींच उत्तर न देतां भाऊसाहेब म्हणाले, "पण आज विजय तुमचे घरीं कशाकरितां आला होता ? तुमच्या इकडे तर तो कधीं येत नाहीं ?"

बंडुनाना जांभई देत देत चुटकी वाजवून म्हणाले, "हेंच तर तुम्हांला सांगावयाला मी आलों आहें. तो मजकडे आला आणि म्हणाला, 'नाना, बाबांनीं ठरविलेल्या या मुलीशीं लग्न करण्याची माझी इच्छा

नाहीं. मला बाबांना सांगण्याचें धैर्य होत नाहीं, पण तुम्ही त्यांना जाऊन कळवा कीं, जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी हें लग्न लागूं देणार नाही. माझा कुसुमशीं लग्न करण्याचा पक्का निश्चय झाला आहे.' तेव्हां मीं त्याला म्हटलें, 'वेड्या! असें कोठें होतें, लग्नाचें पक्कें ठरलें आहे. तुझा बाप वचन देऊनही चुकला. आणि आतां हें कसलें वेड तुझ्या डोक्यांत शिरलें?' पण माझें हें भाषण ऐकून तो मजवर जास्तच गरम झाला आणि मला म्हणाला, 'तें कांही नाहीं. तुम्हांला मी सांगतो ते तुम्ही त्यांना जाऊन कळवा. इतक्या उपर त्यांनीं नच ऐकिलें, तर मग मला काय करावयाचें हें मी आतांच सांगतों. मी त्या मुलीच्या बापाला एक निनांवीं पत्र पाठवून स्पष्ट कळविणार आहे कीं, मी अंडीमांस वगैरे काय पाहिजे ते खातो, मुसलमानाच्या येथे जेवतो. अशा स्थितींत तुमच्या मुलीचें लग्न माझ्याशी होऊं देणे तुम्हांला इष्ट वाटतें काय, याचा तुम्हींच विचार करा.' त्याचें हें भाषण ऐकून त्याचा मगज फिरला असावा, अशी माझी खातरी होऊन चुकली. आतां जर त्याला नाही होय म्हटलें, तर मार बसण्याचाही रंग दिसूं लागला. तो मार टाळण्यासाठींच मीं त्याचें म्हणणें कबूल केलें. तेव्हां तो माझ्या घरून मुकाट्यानें निघून गेला. आणि मी ही हकीकत सांगण्यासाठीं तुमच्याकडे आलों. तुम्ही आपले सावध रहा. हा मुहूर्त कांहीं टळतां कामा नये. या संबंधानें तुमच्या घरांत एक मोठी जहागीर आयतीच येईल. त्याला तुमच्या जोशीबुवांनीं भडकवलें आहे. शिवाय तो स्वतःही कुसुमच्या रूपावर उल्लू झाल्यासारखा दिसतो. अखेर तो खरोखरच तिच्याशीं विवाह करून बसतो कीं काय, याची मला मोठी भीति पडली आहे. कारण त्याची धर्मावर श्रद्धा नसल्यामुळे, विधवाविवाह ही एक धर्मविरुद्ध गोष्ट आहे, याची त्याला मुळींच किंमत नाहीं. भाऊसाहेब, तुम्हांला वाईट वाटलें तर खुशाल वाटो मला कांहीं तोंड देखलें बोलतां येत नाहीं, पण तुमचे चिरंजीव मधुकराच्या संगतीनें बिघडले यांत शंकाच नाहीं."

भाऊसाहेबः— जोशीबुवांना जातींत घ्यावें असें कळविण्यासाठींच मी तुम्हांला आज मुद्दाम बोलावून आणणार होतों. पण तुमच्या तोंडून हा एकंदर प्रकार ऐकून माझ्या मनांतला हा विचार आतां बदलला.

मधुकराच्या नादाला लागून मूर्ख विजय काय काय अनर्थ करील हे सांगवत नाहीं. अशा स्थितींत जोशीबुवा जातीबाहेर आहेत हेच ठीक आहे. तुमचे काय मत आहे ?

बडुनाना मनांतल्या मनांत अगदीं खूष होऊन म्हणाले, "हो, असेंच. तुम्ही जर त्याला आतां जातींत घ्याल, तर माझ्याशिवाय भाऊसाहेबांच्या येथचे कोणतेच कार्य पार पडत नाही, अशी त्याला घमेंड चढेल; आणि आपण कसेंही वागलो, तरी आपले कोणी कांहीं करू शकत नाहीं असे त्याच्या मुलालाही वाटेल, समजलं ?"

भाऊ०:—पण विजयाच्या लग्नात पुरोहिताचे काम कोण करील ? तुम्ही कांही तितके शिकलेले नाही ?

बडुनानाः—त्याची कशाला तुम्ही एवढी फिकीर करतां ? पुण्यात शेंकडो वैदिक ब्राह्मण पडले आहेत. त्यातले डझन अर्धा डझन बोलावून घेऊ.

भाऊ०:—ठीक सांगितलेत. आतां दिवाणजींच्या सल्ल्याने यासंबंधांत तुम्हाला काय व्यवस्था करावयाची ती करा.

बडुनानाः—हे काय तुम्हीं सांगावयाला पाहिजे? हे आमचे कर्तव्यच आहे.

संसारांतल्या कामकाजाच्या सर्व झंझाटापासून अलिप्त राहू इच्छिणाऱ्या भाऊसाहेबांना या भानगडीपासूनही आपण अलिप्त राहात आहों, हें पाहून समाधान वाटलें. नंतर अमळशाने ते बडुनानाला म्हणाले, "पण विजयाची समजूत कशी काढावयाची ? तो मोठा हट्टी मुलगा आहे. त्याच्या मनांत जे येईल ते केल्यावांचून तो कधीं राहात नाही."

बडुनानाः—तुमच्यापुढें तो काय हट्ट करतो ? पहिल्यानें त्याला एकांतांत बोलावून दोन समजुतीच्या गोष्टी सांगा. इतक्या उपर त्यानें नच ऐकले, तर घरांतून हांकून देण्याची आणि इस्टेटीवरचा वारसा उडविण्याची धमकी द्या. माझी खात्री आहे कीं, या धमकीने तो ताळ्यावर आलाच पाहिजे. मात्र त्याच्या जोडीला आणखी एक काम करा. काकी आणि तिची भाची कुसुम या दोघींनांही प्रथम घरांतून काढून द्या. हे सगळे तिचे खेळ आहेत. जोशीबुवांच्या सल्ल्याने विजयाला आपल्या जाळ्यांत पकड-

ण्यासाठीं तिनें कुसुमला येथें आणवून घेतले आहे. पण एवढें मात्र कृपा करून लक्षांत ठेवा, कीं, मीं तुम्हांला हा सल्ला दिला आहे, ही बातमी विजयाच्या कानावर जाऊ नये. नाहीं तर माझी बरी गत राहणार नाहीं. मधुकरासारखे इग्रजी शिकलेले पाजी, धर्मभ्रष्ट कार्टे गोमांस खावयाला भीत नाहींत, ते काय माझ्यासारख्या ब्राह्मणाची हत्या करावयाला भितील ? शास्त्रांत गाई आणि ब्राह्मण सारखेच पूज्य गणले आहेत. पण या राक्षसांना त्याचे काय ? तेव्हां तुम्हांला माझ्या गळ्याची शपथ आहे की, ही गोष्ट त्यांच्या कानावर जाऊ देऊ नका. त्याचप्रमाणे मला वाटतें, वधूच्या बापाच्या मनांत कोणी कारळे कालवू नयेत, म्हणून मी तेथें गेलो तर बरें. या गोष्टीला मला तुमची परवानगी मिळावी.

भाऊसाहेब अगदी खूप होऊन म्हणाले, " फार चागले ! अगदीं जरूर जा. तुम्हांला खर्चासाठी शभर रुपये देण्याविषयीं मी दिवाणजीला चिट्टी देतों. ते रुपये घेऊन तुम्ही उद्यांच एथून रवाना व्हा. "

एवढे बोलून त्यानी तशा प्रकारची एक चिठ्ठी लिहून ती बडूनानांजवळ दिली. " हरीची इच्छा " म्हणून नाना ती चिठ्ठी घेऊन लागलेच तेथून निघून गेले.

याप्रमाणे एका दगडाने अनेक पांखरे मारून तो सैतान आपल्या घरीं आला ! बडूनाना निघून गेल्यावर भाऊसाहेबांनीं आपल्या एका नोकराकडून विजयला बोलावून घेतले आणि त्याला म्हटलें, " तूं हा काय चावटपणा चालविला आहेस ? मी लग्न करणार नाहीं, सासऱ्याला निनांवीं पत्र पाठवून तें मोडून टाकण्याचा प्रयत्न करीन, वगैरे वगैरे जें तूं बरळत आहेस याचा अर्थ काय ? "

पण विजयानें याचे कांहींच उत्तर दिलें नाहीं. हें पाहून भाऊसाहेब अधिकच चिडून म्हणाले, " बापाची आज्ञा पाळणे हे पुत्राचें कर्तव्य आहे. तूं ठरलेल्या तिथीला लग्न केलेंच पाहिजेस. नंतर तुला पाहिजे तें कर.

विजयः—माफ करां, मी लग्न करणार नाहीं.

भाऊसाहेबः---( संतापून ) तू लग्न कां करीत नाहींस, हें मला कळून चुकलें आहे. तूं काकीच्या भाचीसाठीं वेडा झाला आहेस काय? पाहूं, कसा तिच्याशीं पुनर्विवाह लावतोस ते! ही सगळी तिची कारवाई आहे! मी त्या दोघींनांही घराबाहेर हांकून देतों.

विजयः---आपण विश्वासघात करून तिचें सर्वस्व हरण केलेंत आणि फिरून तिला हांकून देतां काय? पाहतो कसे हांकून देतां ते? तिचें सगोपन करणे तुमचें कर्तव्य आहे. त्यापासून मी तुम्हांला ढळू देणार नाहीं. तुम्ही जर त्यांना घराबाहेर हांकून द्याल, तर मीहि घराचा त्याग करून त्यांच्याबरोबर निघून जाईन!

मुलाच्या या भाषणानें भाऊसाहेबांच्या तळव्याची आग मस्तकाला गेली, आणि त्या भरांत ते अगदीं बेहोष होऊन म्हणाले, " काय? तू इतका उन्मत्त झाला आहेस? जा, तूही माझ्या घरांतून चालता हो. मला भीति घालतोस! आतांच्या आतां निघून जा. "

स्वाभिमानी विजयाच्या डोळ्यांत अश्रुबिंदु चमकूं लागले. तो सद्गदित कंठानें म्हणाला, " ठीक आहे, मी आज तुमच्या घरांत पाणी प्यावयाला रहात नाहीं. "

---

# प्रकरण ३१ वें.

## गृहत्याग!

बापापासून निघून आपल्या खोलींत आल्याबरोबर विजयानें आपल्या प्रवासाची तयारी करण्याचें व जरूर तें सामानसुमान व कपडे बांधण्यास नोकराला सांगितलें. नोकर विचारा चकित झाला. पण धन्याची आज्ञा पाळणें त्याचें कर्तव्य होतें. तो आपली कामगिरी बजावण्यास निघून गेला. नंतर आरामखुर्चीवर बसल्या बसल्या आपण कोठें आणि कोणत्या ठिकाणीं गेलों असतां आपणास शांतिलाभ होईल, याचा तो विचार करूं

लागला. पण तो जसजसा या गोष्टीचा विचार करूं लागला, तसतशी त्याला ती गोष्ट अशक्य दिसू लागली. त्याला एक गोष्ट मात्र यामुळें दिसून आली, कीं, आपला पिता केवळ आपल्यामुळेंच काकीला आणि कुसुमला घराबाहेर हांकून देत आहे, अर्थात आपणच जर त्यांच्या आधीं निघून गेलों, तर मग कांहीं आपला बाप त्यांना घरांतून हांकून देणार नाहीं. हा विचार त्याच्या मनांत या वेळीं उभा राहून त्याचा निश्चय कायम झाला.

विजयाच्या नोकरानें सामानाची बांधाबांध करण्यापूर्वीं त्याचा हा विचार माईसाहेबांना कळविला. त्याबरोबर त्या कपाळावर हात मारून म्हणाल्या, " हायरे, दैवा ! आतां कांहीं आपल्याला हें दुःख सहन होत नाहीं. मला वाटले, आतां आठ चार दिवसांत सून घरांत येईल आणि आपले डोळे निवतील. पण कसचें काय नी कसचें काय ? सून घरांत येण्याचें तर बाजूलाच राहिलें ! उलट मुलगाच अंगाला राख फांसून चालला आहे ! कोणत्या वाईट मुहूर्तावर ती अवदसा घरांत शिरली कोण जाणे ! हा सगळा तिचा पायगुण ! ती घरांत आल्यापासून कोणाच्या जिवाला चैन म्हणून नाहींच. तो काय म्हणतो हे पाहूं तरी ! "

माईसाहेब त्याच क्षणीं तेथून उठून विजयाच्या खोलींत आल्या आणि त्याला म्हणाल्या, " बाळ विजय! "

माईसाहेबांची हांक ऐकल्याबरोबर विजय खुर्चीवरून उठून उभा राहिला. या वेळीं त्याचे डोळे अश्रूंनीं भरून आले. त्यानें हे अश्रु थांबविण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. माईसाहेबांनीं त्याला आपणांजवळ ओढून छातीशीं धरलें. विजय त्यांच्या हृदयप्रदेशीं आपले डोकें ठेवून एखाद्या लहान मुलाप्रमाणें स्फुंदून स्फुंदून रडूं लागला. माईसाहेबांच्याही डोळ्यांतून आशीर्वादाप्रमाणें त्याच्या मस्तकावर अश्रुधारा गळूं लागल्या !

थोड्या वेळानें माईसाहेब आपले अश्रु आंवरून त्याला म्हणाल्या, " विजय, हा काय पोरपणा चालविला आहेस, बाळ ? यामुळें तुला सुख नाहीं आणि आम्हांलाही नाहीं. पहिला तूं असा नव्हतास ! "

विजयः—आतां यापुढें मी तुम्हांला दुःख देणार नाहीं, माई! तुमची आणि माझी ही शेवटचीच भेट!

माई०:—हें असें भलतेंच काय बोलतोस बाळ? तू आमचा प्राण! आमचें सर्वस्व! तू गेल्यावर मग आम्हाला संसारांत राहून तरी काय करायाचें? मला तू अगोदर आईपणा दिलास, आणि आतां तू मला सोडून जातोस?

विजयः—काय करूं माई, माझा निरुपाय आहे. आजपर्यंत मी तुला सोडून कधीही कोठें फार दिवस राहिलो नाही. पण आता मला तुझा वियोग सहन केलाच पाहिजे! माझें दुर्दैव मला तुझ्यापासून दूर नेत आहे. तुला सोडून जातांना माझ्या काळजाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडत आहेत. पण काय करूं? मला हें सहन केलेंच पाहिजे.

माईसाहेबः—नकोरे! बाळ, असें बोलू नको! मला सोडून जाऊं नकोस!

विजयः—नाहीं. मला आता हें घर सोडलेंच पाहिजे बाबांनी मला निघून जाण्याची आज्ञा केली आहे, ती मी कशी मोडूं? शिवाय मी इथें राहून तरी तुम्हांला काय फायदा? माझ्यामुळें तुम्हांला उलट दुःखच होतें ना? मी परीक्षेनंतर घरी आल्यापासून तुम्हाला काय सुख लागलें? तुमच्या विचाराशीं माझे विचार जुळत नाहींत, माझ्यापासून तुम्हाला कोणत्याही प्रकारचें सुख लागत नाहीं, तर मी ह्या घरांत राहण्यापेक्षां घरांतून जर निघून गेलों, तर काय वाईट?

माई०—तूं येथें राहून आम्हांला कितीही दुःख दिलेंस, तरी त्यातच मला आनंद आहे, त्यांतच माझें सुख आहे.

माईसाहेबांच्या या भाषणानें विजयाचें हृदय आपल्या निश्चयापासून परावृत्त होण्याच्या बेतांत होतें; पण इतक्यांत शेजारच्या खोलींत कुसुम आहे या गोष्टीचें स्मरण होऊन त्याचा ढासळूं पाहणारा निश्चय पुनः दृढ झाला आणि तो माईसाहेबांना म्हणाला, "तें कांहीं नाहीं. आतां या घरांत मी पाणी प्यावयालाही राहणार नाहीं."

त्याचा हा हट्ट पाहून माईसाहेब म्हणाल्या, " अखेर तू आपलाच हट्ट शेवटास नेणार ना ? अरे देवा ! विजय, तुझ्यामुळे मी पुत्रशोक विसरले होते ! मला रडतांना पाहून तूही रडतोस, म्हणून मी कधी मोकळ्या मनाने रडले देखील नाही. आणि आता तू मला रडावयाला लावून जात आहेस, तर जा ! तू जगांत कोठेही रहा ! माझा आशिर्वाद तुझे कल्याणच करील. पण तू एवढे तरी कर की, सध्या आठ पधरा दिवस चांगला मुहूर्त नाही, तेवढ्या अवधींत तरी कोठे जाऊ नकोस. असल्या अमगळ मुहूर्तावर लोक आपल्या कुत्र्यामांजरालासुद्धां कोठे जाऊ देत नाहीत. मग तू तर आमचा जीव की प्राण ! तुला आम्ही कसे जाऊ द्यावे ? "

विजयः—पण माई, जो मुळी स्वतःच अवलक्षणी आहे, त्याला शुभ मुहूर्ताची काय गरज ? माई, तू कांही म्हटलेस तरी मी आतां म्हणून घरांत रहाणार नाही.

माई०:—मग तुझ्या मर्जीला येईल तसे कर, बाबा. तू माझ्या पोटचा पोरगा असतास तर असे केले नसतेस.

एवढे बोलून लुगड्याच्या पदराने अश्रु पुशीत पुशीत माईसाहेब तेथून निघून गेल्या.

इकडे विजयही आपले मानसिक दुःख शमविण्याकारिता अश्रुमोचन करू लागला.

विजयाला भाऊसाहेबांनी घराबाहेर निघून जाण्यास सांगितले आहे ही बातमी सर्व घरभर पसरल्यामुळे. घरातल्या बायका कामकाज सोडून स्तब्ध बसल्या होत्या. काकी मात्र अगदी घाबरून जाऊन खरा प्रकार काय आहे, हे समजून घेण्यासाठी विजयाला शोधीत निघाल्या होत्या. चपीहि कुसुमला धुंडाळीत होती.

काकी खोलीत आल्यावर विजयाने आपले अश्रु थांबविले. काकी त्याला म्हणाल्या, " हे कायरे मी ऐकते, विजय ? तू आम्हांला सोडून जाणार काय ? "

विजय तोंडावर खोटेंच हास्य धारण करून म्हणाला, " काय करू काकी, प्रसगच असा आला आहे कीं, मला घर सोडल्याखेरीज गत्यंतरच नाहीं."

काकीः—हे असे कसें बोलतोसरे ? तुझें घर. तूं या घराचा मालक. आणि घर सोडिल्याखेरीज गत्यंतर नाहीं म्हणतोस ! तूं गेल्यावर आम्हीं येथें कोणाच्या आधारावर रहावें ? आमच्यासारख्या अभागिनींचा तरी विचार मनांत आणून येथें रहा.

विजयः—सर्व बाजूंनीं विचार करूनच मीं हे ठरविलें आहे, काकी. माझी खात्री झाली आहे कीं, घरांतल्या सगळ्या तंट्याचे कारण माझें येथचे राहणेंच आहे. आणि त्याचे कारण माझे मत कोणाच्याही मताशीं जुळत नाहीं हेंच होय. यामुळे मीच घरांतून गेलों म्हणजे घरांत पुनरपि शांतता प्रस्थापित होईल अशी मला आशा आहे; तुम्हांलाही मग त्रास होणार नाहीं. इतक्याउपरही झालाच तर तुम्ही मजकडे निघून या. मी स्वतः जरी कफल्लक आहें, तरी तुम्हांला सुखानें नसलें, तरी शांततेनें राहण्याइतकी मी तुमची सोय लावीन.

काकीः—बाळ, मी माझ्या स्वार्थाच्या दृष्टीनें बोलत नाहीं. माई-साहेबांचें तुजवर पोटच्या पोरापेक्षांहि अधिक प्रेम आहे. त्यांची तू गेल्यावर काय अवस्था होईल याचा विचार कर ! अशी सावत्र आई माझ्या कोठेंही पहाण्यांत नाहीं. तुला केवळ ती नशीबानेच लाभली आहे !

विजयः—माईसाहेबांचे प्रेम मी काय जाणून नाहीं ? पण मला गृहत्याग केलाच पाहिजे !

काकीः—इथें राहणें तुला इतकें दुःसह झालें !

विजयः—होय, काकी. बाबा मला ज्या मुलीशीं लग्न करावयाला सांगतात, ती मला मुळींच पसत नाहीं. या माझ्या नापसंतीबद्दल त्यांनीं मला घराबाहेर जाण्याचा हुकूम केला आहे.

काकीः—मग तूं आपल्या वडिलांच्या इच्छेप्रमाणें त्या मुलीशीं लग्न कां करीत नाहींस ? त्यांत अवघड काय आहे ?

विजयः—फार अवघड आहे, काकी. जी गोष्ट आपल्या मनाला पसंत नाहीं ती मीं काय म्हणून करावी ? आईबापांच्या हट्टाखातर माझ्या ना-पसंतीला मी एका कोवळ्या मुलीचें काय म्हणून बलिदान करूं ?

काकी:—पण ही गोष्ट तूं आपल्या बापाला जर नीट समजावून सांगितलीस, तर ते तुझ्या आवडीप्रमाणे चांगली मुलगी शोधतील.

विजय हंसून म्हणाला, " असें होणें अगदीं अशक्य आहे, काकी, याला एक मुख्य कारण असें आहे कीं, मीं जरी एखादी मुलगी पसंत केली तरी तिलाहि मी पसत झालों पाहिजे. मीं तिला पसंत केलें, म्हणून ती मला पसंत करील असा कांहीं नियम नाहीं. मी जिला पसंत केलें ती मला कदाचित् नापसंतही करण्याचा संभव आहे. म्हणून मी या भानगडींतच पडलों नाहीं ! "

काकी:—बायकांच्या पसंतीनापसंतीची किंमत काय ?

विजय:—तुम्हां कोणाशीं माझे जुळत नाहीं हे याचमुळें. तुम्ही बायकांना माणसेच समजत नाहींत मुळीं. पण त्यांनाहि चांगलें वाईट कळ-ण्याची शक्ति आहे. सुखदुःखाची जाणीव करून देणारे हृदय त्यांना आहे. त्यांना पुरुषांप्रमाणेच जीव आहे.

काकी:—तुझ्याशीं कोणी बोलावे बाबा ? तुझ्यासारखी मी थोडीच पंडित आहे ? तुला जसें बरे दिसेल तसें कर. पण खरें म्हटले तर कोणती मुलगी तुझ्यासारखा नवरा पसंत करणार नाहीं ? जिचे भाग्य थोर तिलाच असा नवरा लाभावयाचा ?

एवढें बोलून व एक दीर्घ निश्वास सोडून काकी तेथून निघून गेल्या. शेजारच्याच खोलींत असलेल्या कुसुमला हे सर्व भापण ऐकावयाला गेलें. याच वेळीं चंपी तिच्याजवळ येऊन घाबऱ्या घाबऱ्या म्हणाली, " कुसुमताई, तुम्हीं एक बातमी ऐकली कां ? "

कुसुम:—कसली ?

चंपी:—छोटे धनीसाहेब घराचा त्याग करून जात आहेत !

कुसुम:—मग ?

चंपी:—मग म्हणजे ? असें सोन्यासारखें माणूस घर सोडून जात आहे, आणि तुम्ही मग म्हणतां ?

कुसुम:—जात असेल, मला त्याचें काय ?

चंपीः—तुम्हांला वाईट वाटत नाही ?

कुसुम:—मला वाईट वाटावयाला मी त्यांची कोण ? मला त्यांच्या येथे येऊन कांहीं फार दिवस झाले नाहीत. त्यांची माझी पुरती ओळखसुद्धां नाहीं. मग मला त्यांच्याबद्दल काय म्हणून वाईट वाटावे ? हो, मी एवढे मात्र म्हणूं शकते की, आईबापांची आज्ञा न पाळणारें एक माणूस घराबाहेर जात आहे.

कुसुमचे अशा प्रकारचे भाषण ऐकून चंपीला अगदीं थोबाडांत मारल्याप्रमाणें होऊन ती तेथून मुकाट्याने निघून गेली. आपल्या तोंडची ही खबर ऐकून कुसुमची अगदी पाण्याबाहेर काढलेल्या माशाप्रमाणे अवस्था होईल, असे तिला वाटले होते. पण बिचारीची अगदी पूर्ण निराशा झाली!

पण शेजारच्या खोलींतल्या माणसाची निघण्याची वेळ जसजशी येऊ लागली, तसतसा कुसुमचा जीव खाली वर होऊ लागला. आज मात्र आपण खरे निराश्रित बनलो असे तिला वाटलें ! आतां आपले अश्रु आवरणेही तिला अशक्य झाले. ती उशीवर डोकें ठेवून सारखी रडूं लागली.

संध्याकाळचे वेळीं चंपी तेथे दिवा लावावयाला आली, त्या वेळीं मात्र कुसुमने आपले अश्रु आंवरून धरले. पण तिच्या चर्येचा म्लानपणा तिच्या दृष्टीपासून छपला नाहीं. ती इतकी दुष्ट, पण कुसुमची ती दीनचर्या पाहून तिला तिची खरीच करुणा आली आणि आपलें दिवा लावण्याचे काम थोडा वेळ एकीकडे ठेवून ती कुसुमला म्हणाली, "कुसुमताई, आपण दुःख करूं नका. धाकटे धनीसाहेब कदाचित् जाणारही नाहीत. थोरल्या धनीसाहेबाचे मन वळविण्यासाठी माईसाहेब त्यांच्याकडे गेल्या आहेत."

आपल्या मनोवृत्ति आंवरून धरणे कुसुमला या वेळीं अगदीं अशक्य झाले. चंपीसमोर आपल्या हृदयाची दुर्बलता व्यक्त झालेली पाहून तिला जितकी लाज वाटली, तितकेच तिला आपल्या मनोवृत्ति आंवरून धरणेही अशक्य झाले. ती रडतां रडतांच चंपीला म्हणाली," चल, निघ काळतोंडे! माझ्यासमोरून चालती हो. तू कां इतकी हात धुऊन माझ्या मागें लागलीस ? मी तुझें काय केलें ? मला तुझ्या त्या धाकट्या धनीसाहेबांची खबर

ऐकायचीच नाहीं. तूं येथून चालती हो. विनाकारण माझें काळीज जाळूं नको. मी तुझ्या पायां पडतें."

तिच्या या भाषणानें चंपी अगदीं चकित होऊन क्षणभर निश्चलपणें तिजकडे पाहात राहिली. नंतर कांहीं वेळानें दिवा लावून ती तेथून निघून गेली. पण ती तेथून गेली तरीं कुसुमसंबधाचे विचार तिच्या मनांत सारखे घोळत होते. आजच्या तिच्या वर्तनानें हसावें की रडावें, हेंच तिला कळेना. कुसुमचें हृदय आपण समजतों तसें उथळ नसून तें अगदीं खोल असावें, एवढें मात्र तिला वाटलें. आणि त्याला घरांतल्या बाकीच्या स्त्रियांचाही दुजोरा मिळाला.

विजयचें जाणें होत नाहीं हे ऐकल्यावर कुसुमच्या हृदयांत न कळत आनंदाचा प्रवेश झाला; आणि ती आकाशाकडे दृष्टि लावून हात जोडून म्हणाली, "हे जगत्पित्या, ते जावोत किंवा राहोत, त्यांच्या हृदयांत निश्चयाचें बल कायम राहो."

मुलगा आपला हट्ट कांहीं केल्या सोडीत नाहीं, हे दिसून आल्यावर माईसाहेब तडक आपल्या पतीकडे गेल्या आणि त्यांना म्हणाल्या, "तुम्ही माझ्या विजयाला घरांतून निघून जायला सांगितले आहे, तर मी तरी घरांत कशाला राहू ? पोटचें पोर ज्या घरांत राहू शकत नाही, त्या सुन्या घरांत आईनें कशाला राहावें ? मलाही कोठें लावून द्या."

भाऊसाहेबः—अग, अशी वेड्यासारखी काय करतेस ? विजय कोठें जात नाहीं. तूं आपली स्वस्थ रहा.

माईसाहेबः—त्याच्या सर्व सामानाची बांधाबांध झाली आहे आणि कोठें जात नाहीं म्हणतां हे कसें ? तुमचें हृदय दगडासारखें असल्यामुळें तुम्ही स्वस्थ राहूं शकाल. आईचें हृदय स्वस्थ राहूं शकणार नाहीं.

भाऊसाहेब जरा विचार करून म्हणाले, "चल, मी एका शब्दांतच त्याचें जाणें थांबवितों. पुन्हां तो जाण्याचें नांव घेणार नाहीं."

पतीच्या या भाषणानें माईसाहेबांना समाधान वाटलें आणि त्या आपल्या पतीबरोबर विजयाच्या कोठडीकडे निघून आल्या. त्यांचें हृदय या वेळीं आशा आणि आनंद यांनीं उचंबळत होतें. तथापि आपला पति

कोणत्या प्रेमास्त्राने पुत्राला बांधून टाकणार, याची त्यांना नीटशी कल्पना होईना. पण भाऊसाहेबांनीं त्यांना फार वेळ अशा अवस्थेत ठेविले नाहीं. ते मुलाला म्हणाले, "विजय, मजवर रागावून तूं घर सोडून जात आहेस, पण माझ्या वस्तूवर मात्र तुझा राग दिसत नाहीं. हे एवढें सामान तू बांधिले आहेस, तें कोणाचे आहे ? खबरदार माझ्या घरांतल्या वस्तू तू नेशील तर ! "

बापाचे हे भाषण ऐकून विजय गुंगच झाला. पण लागलाच भानावर येऊन तो म्हणाला, "ठीक आहे. या तुमच्या सगळ्या वस्तू तुम्ही सांभाळा. मी नुसत्या अंगावरच्या कपड्यानिशीं बाहेर पडत आहे. आतां तर तुमचें समाधान झाले ना ? "

आपलें हें एक मोठें अमोघ अस्त्र आहे, ते मुलाच्या अंगावर फेकल्याबरोबर तो नरमलाच पाहिजे, अशी भाऊसाहेबांची कल्पना होती. पण ते अस्त्र निर्बळ पडलेलें पाहतांच त्यांचा भ्रम दूर झाला. यानंतर मुलाला घरांत राहण्याविषयीं आग्रह करणे त्यांना शक्य नव्हते. बायकोच्या तिरस्काराची भीति तर त्यांना त्याहून भयंकर वाटू लागली. यामुळे ते तेथे क्षणभरही न थांबतां लागलेच निघून गेले. आपण करावयाला गेलों एक आणि झाले भलतेंच, हें पाहून माईसाहेबांच्या हृदयाची अगदीं कालवाकालव झाली आणि त्या विजयाला जवळ घेऊन सारख्या अश्रुमोचन करू लागल्या. विजयही त्यांच्या अश्रूंत आपले अश्रु मिळवीत होता. बराच वेळ अशा स्थितींत गेल्यावर माईसाहेब म्हणाल्या, "बाळ, तुझ्या बापाची बुद्धि कांहीं आतां ठिकाणावर राहिल्यासारखी दिसत नाहीं. 'साठी बुद्धि नाठी' म्हणतात, तें कांहीं खोटें नाहीं. आले तुला समजावयाला म्हणून, आणि करून बसलें हें असें! बेटा ! तुला माझ्या गळ्याची शपथ आहे. तूं मला सोडून जाऊ नकोस. आईबापांच्या बोलण्याचा का कोणी राग मानतें ? बाप रागावून बोलला म्हणून काय घर सोडून जायचें ? त्यांच्याबद्दल मी तुझी क्षमा मागतें."

आईचें हें भाषण ऐकून विजय अश्रु पुसून म्हणाला, "हें काय बोलतेस, माई ! तू माझी क्षमा मागतेस ? मी कांहीं बाबांवर रुसून जात

नाहीं. पण या घरांतल्या कोणत्याही वस्तूला मी हात लावणार नाहीं. प्रेमानें दिलेले दान अनाधिकाऱ्यालाही अधिकारी बनविते. मुलगा जन्मतो त्यावेळीं तो सर्व प्रकारें अनधिकारी आणि अक्षम असतो. पण आईच्या नैसर्गिक प्रेमामुळें तिजकडून मिळणारें दान स्वीकारण्यास त्याला कमीपणा वाटत नाहीं. दान देणाराची अहंकारबुद्धि दानाचें आणि तें देणाराचेंही महत्व कमी करते. असल्या दानानें देणाराच्या आणि घेणाऱ्याच्याही मनुष्यपणाची हानि होते.

माई०:–मग काय तू आपल्या वडिलार्जित इष्टेटीचा त्याग करणार ?

विजयः—वडिलार्जित इष्टेट असली म्हणून काय झाले ? जेथे प्रेमसंबंध नाही, तो व्यवहार केवळ विषवत् त्याज्य होय. या इष्टेटीवर मी आपला वारसा आतां बिलकुल ठेवूं इच्छित नाहीं. मी आपला सर्व हिस्सा मनु आणि विलास यांना अर्पण करीत आहे.

माई०:—छेः बेटा ! तू हा काय वेडेपणा करीत आहेस? तूं पाहिजे तर थोडा दिवस कोठें जाऊन ये. काय? उद्यांच जावयाचे म्हणतोस ? तुझ्याकरितां काय करूं बोल.

विजयः—माई, तुझ्याकरितां–केवळ तुझ्याच करितां--मी उद्यां जावयाचे ठरवितो. पण मला बरोबर मात्र कांहीं नको. मी फक्त नेसतें धोतर, अंगांतला शर्ट आणि टोपी एवढ्याच वस्तूंनिशीं घराबाहेर पडेन. यांशिवाय घरांतल्या दुसऱ्या कोणत्याही वस्तूला मी स्पर्श करणार नाहीं.

माई०:—पुनः आपला तसलाच वेडेपणा ! तूं आपल्या बापाच्या मालकीच्या वस्तू घेऊ नकोस. माझ्या मालकीच्या तर घेशील. माझ्या बापाकडून मला जे पैसे मिळाले, त्यांतून मी तुला या जिनसा आणून देतें; मग तर झाले. शिवाय, खास तुझ्या मालकीच्या तीन इनाम जमिनी आहेत.

विजयः—त्या मीं मधुकराच्या शिक्षणसंस्थेला केव्हांच अर्पण केल्या आहेत.

माई०:—अरे, एवढ्या मोठ्या उत्पन्नाच्या जमिनी लोकांना देऊन टाकल्यास ? तुला म्हणावें तरी काय ? तुझ्या मर्जीला येईल तसे कर, बाबा. तुझ्या कपाळींच जर करंटेपण लिहिलें असलें, तर त्याला कोण काय करणार !

मुलाच्या या दिवाळखोरपणानें क्षुब्ध झालेल्या माईसाहेब यानंतर तेथें एक क्षणभरही न थांबतां लागल्याच तेथून निघून गेल्या. विजय-बरोबर निघावयाची त्याचा इमानी नोकर कोंडीबा यानेंही तयारी केलेली पाहून, विजय त्याला म्हणाला, " तूं कशाला मजबरोबर येतोस, कोंडीबा ? मी एकटाच जाणार आहें. "

कोंडीबाः—मीं तुमच्याबरोबर यावे कीं नाहीं हे ठरविणार तुम्ही कोण ? हे माझा मी ठरविणार आहे. तुम्हांला लहानाचे मोठे केलें कोणी ? मग त्या वेळीं जर हा कोंडीबा तुमच्यापासून कधीं दूर झाला नाहीं, तर आतांच कसा होईल. फक्त मृत्यूच त्याला तुमच्यापासून दूर करूं शकेल.

कोंडीबाच्या या निर्वाणीच्या निश्चयापुढे निश्चयी विजयालाही मान वांकवावी लागली. याच वेळीं छोटी मनूही तेथें आली आणि ती विजयाच्या अंगावर झाप टाकून म्हणाली, "दादा, तुला पुण्याला जायचें होय ? आई म्हणाली, दादा पुण्याला जायचा आहे ! "

एवढे बोलून ती विजयाच्या गळ्यास मिठी मारून त्याच्या अंगावर लटकूं लागली. तिचे वरील भाषण ऐकून विजयाच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले. बाहेर आई रडत होती, आतां दादाही रडूं लागला, हे पाहून किशोरीचे हृदय विरघळले. तिला त्या दोघांच्याही रडण्याचा अर्थ कळला नाही. पण अस्फुट वेदनांनी तिच्याही डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. विजय तिला समजावूं लागला. किशोरी रडतां रडतांच झोंपी गेली.

शेजारच्या खोलींत असलेल्या कुसुमचे कान विजयाच्या हालचाली-कडे लागून राहिले होते. विजयाचे जाणें थांबत नाहीं असे जेव्हां तिला निश्चितपणे दिसून आले, त्यावेळीं तिचे हृदय केवळ कांट्यावर ओढल्या-प्रमाणें झाले ! ती बिछान्यावर पडून राहिली होती, पण ती सारी रात्र तिने रडण्यांत घालविली. वियोगदुःखाची खरी जाणीव तिला त्या दिवशीं मात्र झाली. उजाडतांच ती खोलीच्या बाहेर आली, तोंच दाराशीं जणु काय तिच्या भेटीसाठींच तिष्ठत राहिलेला विजय तिच्या दृष्टीस पडला. ती त्याला म्हणाली, " अखेर आपला निश्चय कायम झाला ना ? "

विजयः—( गंभीरपणें ) होय.

कुसुमः—आणि परत कधीं येणार ?

विजयः—या घरांत मी पुनः परत येणें शक्य नाही. येथून माझें हे शेवटचेच प्रयाण होय.

त्याचे हें भाषण ऐकून कुसुम मान खालीं घालून म्हणाली, " मग मीही आपणाबरोबर येतें."

विजय-( विस्मयानें ) तूं कोठें जाणार ?

कुसुमः—तुम्ही जिकडे जाल तिकडे.

विजय तिचा हात धरून म्हणाला, " मग काल तू मला तसें उत्तर कां दिलेंस ? "

कुसुमः— माझ्याकरितां आपल्याला आपल्या मातापित्यांचा त्याग करण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून !

विजयः—तर मग आज मी सगळ्यांना मुकलों असलों, तरी मला तुझी प्राप्ति झाली ! अहाहा ! इतके दिवस मला तुझी खरी योग्यता कळली नाहीं.

कुसुम त्याच्या पायावर आपलें मस्तक ठेवण्यासाठीं खालीं वांकली; पण विजयानें तिला मधल्यामधें थांबवून आपल्या हृदयाशीं घट्ट धरिलें आणि तिच्या गुलाबी गालावर त्यानें आपले ओंठ ठेविले. या वेळीं लज्जाशील कुसुमनें आपले दोन्ही डोळे झांकून घेतले होते; त्या वेळीं उषेची अरुण प्रभा कुसुमच्या हास्याप्रमाणे सर्व घरभर पसरून तिनें ह्या उभयतांच्या प्रेमविवाहाला विलक्षण शोभा आणिली होती, आणि विजयाच्या भावनेलाहि तिनें उज्वल करून सोडिलें होतें.

त्या मधुर सुखमय स्थितींत तीं उभयतांही कांहीं वेळ इतकीं बेभान होऊन गेलीं होतीं कीं, त्या अवधींत काकी आणि माईसाहेब या दोघींहि आपल्यासमोर उभ्या राहिल्या आहेत, याची त्या उभयतांनाही बिलकूल जाणीव झाली नाहीं. पण लौकरच त्यांची ही निशा उतरली आणि विजयानें कुसुमचा हात धरून तिच्यासह माईसाहेबांजवळ येऊन त्यांना प्रणाम केला. माईसाहेब एकीकडे तोंड फिरवून काकींना म्हणाल्या, "चांडाळणी, आतां झालें ना तुझ्या मनासारखें ! उगाविलासना पुरता सूड ! "

पण त्यांच्या बोलण्याकडे बिलकूल लक्ष न देतां काकी विजयाकडे वळून म्हणाल्या, " विजय, अखेर तूं माझा केंसाने घळा कापलासच ना ? चांगलें केलेंस, बाबा ! बापाने मला पैशाच्या दृष्टीनें नागविले होते, तूं मजजवळ उरलेली इज्जतही घेऊन टाकलीस ! "

विजय दुःखपूर्ण स्वराने म्हणाला, " काकी, तुमचें हे भाषण अन्यायाचें आहे. मी कुसुमबरोबर विवाह करणार आहें. "

काकी माईसाहेबांकडे वळून म्हणाल्या, " माई, मला आतांच्या आतां काशीला रवाना करा. मी या घरांत पाणी प्यावयालाही राहत नाही."

माईसाहेब गर्जून म्हणाल्या, " आतां कशाला राहशील ? तुझा हेतु शेवटाला गेला. "

याचवेळीं भाऊसाहेब तेथे येऊन मुलाला म्हणाले, " ह, चल, तुला निघावयाचें असले तर नीघ. ती बघ दाराशीं गाडी उभी आहे. तुला वाटत असेल कीं, अशा युक्तीने आपण बापाला वठणीवर आणूं ! पण हा बाप असा वठणीवर येणारा नव्हे. चल, या क्षणी माझ्या घरातून चालता हो ! " एवढें बोलून भाऊसाहेब तेथून निघून गेले.

ते निघून जातांच विजय पुनः माईसाहेबांच्या पायावर डोके ठेवून म्हणाला, " बस. माई, या घरांत राहण्याचा माझा अवधि आतां पुरा झाला. मी आतां येतों. "

त्यानतर काकीही अश्रु पुशीत पुशीत त्यांना म्हणाल्या, " माई, मीही तुमचा अखेरचा निरोप घेत आहे. माझ्यामुळे तुम्हांला पुष्कळ त्रास झाला. माझ्याकडून कळत किंवा नकळत जे अपराध झाले असतील त्याची मला क्षमा करा. "

पण त्यांच्या या भाषणाला कांहींच उत्तर न देतां माईसाहेब दुसरीकडे तोंड फिरवून म्हणाल्या, " जिने माझ्या सर्वस्वाचें वाटोळें केलें, तिचें कधीं कल्याण होणार नाहीं. देवा नारायणा, तूंच बघून घे. "

काकीः—होय. नारायणच बघतोय. मीं जर तुमचें कांहीं वाईट केलें असलें, तर माझें कधीं बरें होणार नाहीं; या जन्मांत तर झालेंच नाहीं,

पण पुढच्या जन्मींही होणार नाहीं. आतां येतें मी. उरलेलें आयुष्य मी काशींत घालविणार आहें. तुमची माझी ही शेवटचीच भेट.

माईसाहेब कांहींच बोलल्या नाहींत. आतां पुत्रवियोगाबद्दल त्यांच्या डोळ्यांतून अश्रु येईनासे झाले. पुत्राच्या बेफिकीर वर्तनामुळें मातृहृदय असे सहानुभूतिशून्य बनलें. विधवेशीं विवाह ! असला अनाचार माईसाहेबांनीं त्या प्रदेशांत तरी अद्यापपर्यंत ऐकिला नव्हता.

याच वेळीं मनु कुसुमजवळ येऊन तिचा हात धरून म्हणाली, " कुसुमताई, तुझे लगीन आहे होय ? दादाच्या बलोबल तू छाछल्याला चाललीस ? चल, मी पन तुझ्याबलोबल येते."

कुसुमने तिला हृदयप्रदेशांत उचलून घेतले आणि तिच्या कोंवळ्या, लुसलुशीत ओठांवर आपले तोंड ठेविले. या वेळीं कुसुमचे नेत्र अश्रूंनीं डबडबले होते. विलासला ही बातमी लागल्याबरोबर तोही तिच्याजवळ धांवत धांवतच आला आणि तिचा पदर धरून म्हणाला, " कुसुमताई, तू माझी वैनी होणार होय ? आजपासून मी तुला वैनीच म्हणत जाईन. " एवढे बोलून तो तिच्या अगाभोंवतीं सारखा चकरा मारू लागला.

त्या दोघांही बालकांना काय ठाऊक, कीं, या विवाहाचें कोणाकडूनही अभिनंदन होत नाहीं व कोणाच्याही मगल आशीर्वादाने तो गौरवित होत नाहीं !

थोड्या वेळाने कुसुम बाहेर उभ्या असलेल्या घोड्याच्या गाडींत जाऊन बसली. मनूही गाडीवर चढण्याचा प्रयत्न करू लागली, पण तिला चंपीनें आपल्याजवळ उचलून घेतलें. बाळोबाच्या आईनें विलासला पकडून ठेविलें. तथापि तिच्या मगरमिठींतून सुटण्यासाठीं तो जोराजोराने उसळत होताच. " मी दादाच्या लग्नाला जाणार, मी दादाच्या लग्नाला जाणार." असे तो तोंडानें ओरडतही होता.

कुसुमच्या मागून काकी गाडींत जाऊन बसल्या. त्यांच्या मागून विजय गाडींत बसणार, तोंच मधुकर तेथे एकदम प्रकट झाला आणि विजयाला म्हणाला, " कां ? अगदीं योग्य वेळेला मी आलों ना? "

विजयाच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. त्याच्या निश्चयाचें व उत्साहाचें बळ आतां शंभर पटीने वाढलें. मधुकर विजयाच्यामागोमागच गाडीवर चढला.

निघतां निघतां दोन प्रहरची वेळ झाली होती. तथापि विजयाला " जेवून जा " असेंसुद्धां कोणी म्हणाले नाहीं. ती सर्व मंडळी उपाशी तापाशींच तेथून रवाना झाली ! प्रत्येकाचें पोट जरी रिकामें होतें, तरी हृदय दुःखानें भरलें होते. बराच वेळपर्यंत कोणीच कोणाशीं कांहीं बोललें नाहीं. प्रत्येक जण आपापल्या विचारांत मग्न होता. तो ऐन मध्यान्ह काळचा समय असल्यामुळें रानांतही जिकडे तिकडे गाढ शांतता पसरली होती. मनु आणि विलास यांच्या किंकाळ्या मात्र अद्यापिही ऐकावयाला येत होत्या ! पण लौरकच त्याही ऐकावयाला येईनाशा झाल्या ! विजय आणि कुसुम आपल्या मनाशीं म्हणत होतीं, " हा आमच्या लग्नाचा सोहळा ! " काय तें भीषण आणि करुण दृश्य !

गाडी रेल्वे स्टेशनपाशीं येऊन पोंचल्यावर विजय काकीला म्हणाला, "काकी, तुम्ही आमच्याबरोबर पुण्याला येतां ना? आम्हां उभयतांचा एकदां विवाह होऊन आमच्या संसाराची व्यवस्था एकदां नीटनेटकी लागल्यावर मग तुम्ही काशीला जा. "

पण काकींना त्याचें म्हणणें रुचलें नाहीं. त्या म्हणाल्या, " मला आतां संसारांतल्या कोणत्याच गोष्टीशीं संबंध ठेवावयाचा नाहीं; मला आपलें थेट काशीचें तिकिट काढून द्या. मी तेथें गेल्याखेरीज पाणीसुद्धां पिणार नाहीं. "

एवढें बोलून त्या एकीकडे जाऊन उभ्या राहिल्या. विजय आणि कुसुम या उभयतांनीं त्यांच्या पायांवर आपलीं डोकीं ठेविलीं. तें दृश्य पाहून काकींचें सहानुभूतिशून्य हृदयही द्रवलें आणि त्यांनीं त्या उभयतांना पोटाशीं धरून त्यांना कुरवाळलें व त्यांचीं चुंबनें घेतलीं. नंतर विजयाच्या हातांत कुसुमचा हात देऊन त्या त्याला म्हणाल्या, " बाळा ! हा माझा प्राण, ही माझी इज्जत, हें माझें सर्वस्व मी आज तुझ्या हातीं सोंपवीत आहें. तूं हिला जिवाच्या पलीकडे सांभाळ. "

आतां विजय आणि कुसुम या दोघांच्याही नेत्रांतून सारखे अश्रु गळू लागले. विजय म्हणाला, " काकी, तुम्ही कुसुमबद्दल आतां कसलीच काळजी करूं नका. आम्ही दोघेही सुखी व्हावयाला फक्त तुमच्या आशीर्वादाची जरूर आहे. आईनें आम्हांला आशीर्वाद दिला नाहीं. तुम्ही तरी हा अनुग्रह करा. "

थोडा वेळ स्तब्ध राहून काकी म्हणाल्या, " घ्या ! मी तुम्हांला आशीर्वाद देतें. मीं जितके दुःख भोगिलें तितकें सुख तुम्हांला लाभो ! "

या शापवाणीसारख्या भयंकर आशीर्वादानें कुसुम आणि विजय हीं दोघेही क्षणैक किंकर्तव्यमूढ बनलीं.

दौंड स्टेशनपर्यंत काकी त्यांच्याबरोबरच होत्या. तेथून त्या मनमाड लाइनीनें काशीकडे रवाना झाल्या आणि बाकीची मंडळी थेट पुण्याला निघून आलीं. मधुकर काकींना पोंचविण्यासाठीं त्यांच्याबरोबर गेला.

---

# प्रकरण ३२ वें.

## तमण्णाच्या कैचींत !

विजयानें पुण्यास स्वतंत्र बिऱ्हाड केलें नाहीं. काशीहून मधुकर येईपर्यंत त्यानें तमण्णाच्याच बिऱ्हाडीं रहावयाचें ठरविलें आणि त्याप्रमाणें तो कुसुमसह त्याच्या घरीं जाऊन उतरला. तमण्णाला एवढ्यांत दोन मुलें झालीं असल्यामुळें तो आतां पक्का संसारी माणूस बनला होता. त्याला पुण्यास " सेंट्रल ऑफिस "मध्यें नोकरी मिळाली असल्यामुळें त्यानें पुणें हेंच आपलें कायमचें निवासस्थान करून टाकिलें होतें. येथें विजयाला कुसुमची भेट होणें देखील दुर्मिळ झालें ! याचें कारण तमण्णाची जुनी रहाणी होय ! याप्रमाणें मधुकर आणि कुसुम या दोघांही जिवलग प्राण्यांच्या सहवासाला अंतरल्यामुळें विजयाचा जीव अगदीं

उडून गेला. मधुकर काशीहून कधीं येतो आणि आपण स्वतंत्र बिऱ्हाड कधीं थाटतों असें त्याला होऊन गेलें !

तमण्णाचीं मतें विधवापुनर्विवाहाला सर्वथैव प्रतिकूल असल्यामुळें, तर त्याच्या इथें राहणं विजयाला अगदींच पसत पडेना. तमण्णा या संबंधांत त्याच्याशीं नेहमीं वादविवाद करी.

एके दिवशी बोलतां बोलतां तमण्णा विजयाला म्हणाला, " विधवाविवाह ही आर्यसस्कृतीची प्रघात नव्हे, ही विलायती चीज आहे. लग्न म्हणजे करार असें ज्या देशांत समजतात तिकडेच अशा वस्तु पैदा व्हावयाच्या. पतीच्या प्रेताबरोबर सहगमन करावयाचे हा ज्या देशांतील विधवांचा आदर्श, तेथे अशी चीज कोठून निपजणार ?

त्याचे हे बरळणे ऐकून विजय म्हणाला, " माफ कर बुवा, मी तुजशीं वादविवाद करू इच्छित नाही. त्यासाठी मी सबध मधुकर राखून ठेविला आहे. तो आल्यावर त्याच्याशीं तू पोटभर वादविवाद करीत बैस. मी फक्त तुम्हाला एवढेच विचारतो की, स्त्रीजातीवर तुमची एवढी करडी नजर कां ? पुरुषाने कोणत्याही वयांत कितीही बायका केल्या, तरी ते तुम्हांला चालते. पण विधवेने पुनर्विवाह करावयाचे म्हटले, की, तुमचा सगळा धर्म बुडतो. कुठला हा न्याय ? "

नको नको म्हणत असतांनाही विजय नकळत आपल्या वादाच्या चरक्यांत सांपडलेला पाहून तमण्णाला पराकाष्ठेचा उत्साह चढला. आणि त्याच्या भरांत तो अगदीं आवेशाने म्हणाला, " पुरुषांची बरोबरी स्त्रियांना कशी येणार ? निसर्गानेंच त्यांच्यांत भिन्नत्व आणि असमानता निर्माण केली आहे. स्त्री म्हणजे संततीचे क्षेत्र. हे एकनिष्ठच असणें जरूर आहे."

विजयः—कबूल. पण विवाहाने विधवांची एकनिष्ठता कशी नाहींशी होणार ? कदाचित् बालविवाहामुळे पहिल्या पतीविषयीं तिच्या मनांत जी उत्पन्न होणें शक्य नसेल, ती एकनिष्ठता नंतरच्या पतीविषयीं तिच्या मनांत उत्पन्न होईल.

तमण्णाः— एकनिष्ठता म्हणजे एकाच पतीविषयीं निष्ठा. मग तो संमतीने झाला असो वा नसो. हेच हिंदु सस्कृतीचे खरेखुरें ध्येय होय. आणि ध्येय हे नेहमीं उच्चच असले पाहिजे. मनुष्याचें मन हे नेहमीं पतनोन्मुख आहे. यासाठीं वासनांना टक्कर देऊन ते नेहमी उच्च स्थितींत ठेविले पाहिजे. स्त्रियांना बंधन असावे हा निसर्गचाच नियम आहे.

विजयः—हा नियम निसर्गाचा नसून तुमच्यासारख्या समाजाचा आहे. शिवाय, ध्येय कितीही चांगले किंवा उच्च असले, तरी सक्तीने तें अमलांत आणू पाहावयाचे हे शास्त्र कुठले ? जिच्या ठिकाणी हे ध्येय गांठण्याचे सामर्थ्य नाहीं तिने काय करावयाचे ?

तमण्णाः—काय करावयाचे म्हणजे ? तिच्या ठिकाणी हे सामर्थ्य यावयालाच पाहिजे. आपल्या देशांतल्या शेकडो सन्यासिनी पहा. त्यांना हें सामर्थ्य कोठून आले ? तुला मी अशा अनेक सन्यासिनी आणि ब्रह्मचारिणी दाखविते की, त्यांचे सामर्थ्य पाहून तू चकितच होशील. तू अद्वैतानद स्वामींचे नांव ऐकिलेच असशील. साक्षात् देवावतार आहेत, ते देवावतार ! चल, मी तुला आजच त्यांचे दर्शन करवून देतो. उच्च ध्येयाची महति काय आहे, आणि ते व्यवहारांत कायम राखणे किती जरुरीचे आहे हे ते आपल्या भक्तवृंदाला कसे पटवून देतात हे एक वेळ पहा. ते माझे गुरु आहेत."

इतके बोलून तमण्णाने डोळे झांकून आणि हात जोडून तेथूनच आपल्या या गुरुमाउलीला प्रणाम केला. त्या भक्तिप्रवाहांत त्याचा वादोत्साह बुडाला ! अमळशाने डोळे उघडल्यावर तो विजयाला म्हणाला, " येतोस त्यांच्या दर्शनाला ? "

विजयः—कोठे राहतात ते ?

तमण्णाः—बंडगार्डनजवळच त्यांचा आश्रम आहे. त्याचे नांव " सुखकंदाश्रम " आहे. आणि खरोखरच तो आश्रम तसा आहेच. किती पवित्र स्थान म्हणतोस ? तेथे गेल्याबरोबर ससारावर तिलांजली ठेवून सदैव त्याच ठिकाणी गुरुमाउलीची चरणसेवा करीत रहावेसें वाटतें.

विजयः—असें असेल तर, बाबा, मी तेथे येत नाहीं.

तमण्णा:—( गंभीरपणें ) अरे, इतका घाबरतोस कां ? संसारांतील मायामोह सुटणें कांहीं इतके सुलभ नाहीं. गुरुदेवांची पूर्ण कृपा झाल्याखेरीज त्यांच्या अखंड चरणसेवेचा लाभ घडत नाहीं.

विजय पुन्हा हंसून म्हणाला, "पण समज, या पातक्यावर त्यांची तशी पूर्ण कृपा एकदम झाली तर ?"

तमण्णा:—छेः, अशी भीति तूं मनांतच आणू नकोस. तितके थोर भाग्य तुझें नाहीं.

विजय:—याबद्दल तू जिम्मेदार आहेस ?

तमण्णा:—हो. चल.

यानतर ते दोघेही अद्वैतानद स्वामीच्या आश्रमाकडे रवाना झाले.

---

# प्रकरण ३३ वें.

## स्वामी अद्वैतानंद !

एका भाडोत्री व्हिक्टोरियांतून ते दोघेही थोड्याच वेळांत स्वामीच्या आश्रमापाशीं येऊन पोंचले. स्वामींचा आश्रम म्हणजे कसली तरी एखादी भिकार पर्णकुटी असेल, अशी विजयाची कल्पना होती. पण तिच्या ऐवजीं एक आधुनिक फॅशनचा बंगला त्याच्या दृष्टीला पडतांच तो अगदीं आश्चर्यविमूढ झाला. बंगल्याच्या बाहेर बगिचा असून त्यांत अनेक प्रकारचीं देशीविदेशीं फुलझाडे आणि फळझाडें लाविलेलीं होतीं. मध्यभागीं एक सुदर कारजें होतें. ठिकठिकाणीं मनोहर लताकुंजही होते. यांखेरीज बागेंत अनेक प्रकारचे पशुपक्षीही क्रीडा करीत होते. या प्राण्यांची खुद्द स्वामीमहाराजांनींच निवड केली होती.

बंगल्यांत पुष्कळच खोल्या आणि दालने होतीं. त्यांपैकीं एका खोलीचा खास स्वामीमहाराजांच्या भोजनगृहाकडे आणि दुसरीचा शयन-

ग्हाकडे उपयोग केला जात होता. एका खोलीचें देवघरांत रूपांतर केलें होतें. स्वामीमहाराजांचें आराध्यदैवत राधाकृष्ण होते. तेथची व्यवस्था स्वामींच्या तैनातींतील खास शिष्यिणींवर सोपविली होती. महाराजांजवळ शिष्य आणि शिष्यिणी या दोहोंचाही भरपूर संग्रह होता.

तमण्णा हा महाराजांच्या आवडत्यां शिष्यांपैकीं एक असल्यामुळें स्वामीदर्शन व्हावयाला त्याला बिलकूल विलंब लागला नाहीं. तो विजयासह थेट स्वामींपाशींच येऊन दाखल झाला. स्वामी या वेळी दिवाणखान्यांत बसले होते. या दिवाणखान्यांत येथून तेथून एक सुंदर गालीचा पसरला होता, आणि भिंतींवर नानाप्रकारच्या तसबिरा लटकावल्या होत्या. त्या बहुतेक पौराणिक होत्या. पण त्यांत स्वदेशी आणि परदेशी असा भेद-भाव मात्र नव्हता, हे कृष्णजननी यशोदेशेजारीच खिस्तमाता मेरीचीहि जी तसबीर लटकावली होती, त्यावरून स्पष्ट दिसत होते. तसबिरीशेजा-रीच संस्कृत, पार्शियन, इंग्रजी, आरबी वगैरे अनेक भाषांतील तत्त्ववेत्त्यांचीं किंवा संतांची सुंदर अक्षरांत छापलेली वचनांचीं फलकेंहि टांगलेलीं होतीं. दिवाणखान्यांत बिलोरी सामान, नानाप्रकारचीं चित्रे व इतरहि अनेक प्रकारचे फ्यान्सी फर्नीचर पुष्कळच होतें. दिवाणखान्याच्या मध्यभागी एक फारच सुंदर शिसवीचा पलंग होता. त्यावर गुढघ्याइतकी जाड मश्रूची गादी अंथरली होती आणि त्याच्यासभोंवार विलायती जाळीदार काप-डाची, चोहों बाजूंस कलाबतूचा गोंड लाविलेली मच्छरदाणी सोडली होती. दिवाणखान्याच्या शेजारच्या खोलीतच स्वामीमहाराजांचे वाचनालय होतें. त्यांत निरनिराळ्या अनेक भाषांतील निवडक पुस्तकांचा संग्रह होता. स्वामीमहाराज एका भारी किंमतीच्या लोकरीच्या आसनावर लोडाला टेकून बसले होते. त्यांच्यासमोर भक्तजनांची बरीच गर्दी झाली होती. त्यात कोणी श्रीमंत पण पुत्र नाही म्हणून दुःखी, तर कोणी पुत्रवंत पण दरिद्री म्हणून दुःखी, कोणी नोकरीसाठी वेडावलेले, तर कोणी बायकोसाठीं वेडावलेले, असे अनेक प्रकारचे लोक होते. कांही अध्यात्मवेडेही लोक यांत होते. पण अशांची संख्या फारच थोडी होती. यांपैकीं प्रत्येकजण निरनिराळ्या प्रकारचा प्रश्न विचारी. त्यापैकी कांहीं प्रश्न तर अगदीं मूर्ख-

पणाचे असत; पण स्वामी महाराज ते सर्व प्रश्न शांतपणानें ऐकून घेत, आणि हंसतमुखाने त्यांची उत्तरें देत.

स्वामींचें वय चाळीसाच्या जवळ जवळ होतें. त्यांची अंगकांति सुंदर आणि शरीर सुदृढ होते. त्यांनीं दाढीमिशाचे व डोक्याचे केस मुडले असून, अंगांत भगवी कफनी परिधान केली होती. त्यांचे डोळे मोठाले व पाणीदार असून, त्यांत त्यांच्या बुद्धीचे तेज झळकत होते. चेहऱ्यांतही विलक्षण मोहकता भरली होती. विजयाला तर खरोखर त्यांचा चेहरा पाहिल्याबरोबर हा कोणी तरी महापुरुष असावा असे वाटले. त्यांच्या सनिध असलेला विलासोपभोगाचा भरपूर वस्तुसंग्रह पाहून देखील विजयाला त्याच्याविषयीं लवमात्रही शंका वाटली नाहीं. तमण्णाच्या मागून तो स्वामींना नमस्कार करून एके बाजूस बसला. स्वामी तमण्णाकडे वळून म्हणाले, “ काय संसारानंद, हे गृहस्थ कोठले ? ”

तमण्णा हात जोडून नम्रतेनें म्हणाला, “हे एक माझे स्नेही आहेत, महाराज. यांचे नांव बाळासाहेब. हे एम्. ए. आहेत. खास आपल्या दर्शनासाठीं आले आहेत. ”

स्वामी हसून म्हणाले, “ मी या एम्. ए. ना भारी भितो. हे लोक केवळ वादविवादासाठीं मजकडे येतात. पण बाळासाहेब, मी आपल्याला सांगून ठेवतो की, हे लोक मजसंबधीं काय नाही नाही त्या कल्पना तुमच्या मनात भरवतील. मी साक्षात् देवावतार आहे असे देखील तुम्हांला सांगतील; परंतु खरी वस्तुस्थिति अशी नाही. मी एक रागद्वेषाने भरलेला तुमच्यासारखाच सामान्य मनुष्यप्राणी आहे. सामान्य संसारी प्राण्यांत आणि माझ्यांत जर काही फरक असला, तर तो इतकाच की, मला जे सत्य आणि मंगलमय वाटते, ते मी जगाला स्पष्टपणे सांगतो. भगवान येशु खिस्तानें म्हटले आहे कीः—

“ You shall know the truth and the truth shall make you free.”

“ हे सत्य कशा प्रकारचे आहे हंदेखील भगवान येशूने सांगितले आहे. तो म्हणतोः—

"Then shall ye know, that I do nothing of myself; but as my father hath taught me, I speak these things. And he that sent me is with me. The father hath not left me alone.

या बोधांत जो अमर्याद आनद भरला आहे त्यानें माझें हृदय उचंबळून जाते. हा आनंद आपण एकट्यानेच उपभोगणे मला बरे वाटत नसल्यामुळे मी तो सर्व जगला वाटतो. या अप्रतिम आनदाचा जगाला अनुभव आणून देण्यापलीकडे माझ्या जीवनाचा दुसरा कोणताही उद्देश नाहीं. मीं ससारत्याग केला नाही. उलट त्यावर अत्यंत असक्त असलेला हा जीव आहे. या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन माझ्याशी तुम्हांला जो वादविवाद करावयाचा असेल तो करा."

हे बोलत असताना स्वामीच्या नेत्रांत विलक्षण तेज चमकू लागले. ते पाहून विजय अगदीं मुग्ध झाला आणि त्यांना हात जोडून म्हणाला, "महाराज, विश्वविद्यालयाने जरी मजवर आपल्या सन्मान्य किताबाचा छाप मारलेला असला, तरी मी एक अत्यत अज्ञान जीव आहे, असेच आपण समजा. खरे ज्ञान म्हणून ज्याला म्हणतात ते मजजवळ मुळीच नाही. मी आपणाशीं वाद करावयाला आलो नाहीं, शिष्याप्रमाणे जिज्ञासु म्हणून आलो आहे. आपण मजवर अनुग्रह करून मनुष्यप्राण्याचे कर्तव्य काय आहे हे मला शिकवा, धर्माचे स्वरूप समजावून द्या आणि कोणत्या प्रकारच्या व्रतपालनाने माझ्यातील मनुष्यता जागृत होईल हे मला सांगा."

यानतर स्वामीमहाराज मानवी जीविताच्या कर्तव्यासबधी व्याख्या करू लागले. त्यांचे ते प्रवचन म्हणजे मोहक आणि परिणामशाली भाषेचा एक अपूर्व नमुना होता. गहन सिद्धांतही अगदीं सुलभपणे समजावून देण्याची त्यांची हातोटीहि अप्रतिम होती. विजयाचा त्यांच्या या प्रवचनांत अगदीं लय लागून गेला होता. गुरुजी काय बोलत आहेत, या एका गोष्टीशिवाय त्याला या वेळीं दुसऱ्या कशाचीहि जाणीव उरली नव्हती. मात्र स्वामीजींच्या शब्दांच्या अर्थापेक्षां त्यांतील सगीतानेंच तो

वेडावून गेला होता. थोड्या वेळानें स्वामींनीं गायनाला सुरवात केली. त्या गायनानें तर विजयाला समाधि लागली. गाणें संपल्यावर विजयाची समाधि नष्ट झाली आणि त्यानें गुरुचरणांवर डोके ठेविलें. तथापि स्वामींना दिलेलें हें प्रणामदान त्याला पुरेसें वाटले नाहीं. आपले हृदयच काढून त्यांच्या पायावर ठेवावे अशी आकांक्षा त्याच्या मनांत उत्पन्न झाली. थोड्या वेळानें स्वामीजींनी सर्वांना प्रसाद वाटला. या वेळीं विजयाच्या नेत्रांतून अश्रुधारा गळत होत्या.

विजय स्वप्नसृष्टींत लीन झाल्याप्रमाणे दिसू लागला. तमण्णाने त्याला तेथून बळेंच घराकडे खेचून नेले. पण तो घरीं आला तरी स्वामींच्या भाषणाविषयींच्याच विचारांत गुग झाला होता. त्याला सर्व भाषण आठवलें नाही. तथापि जसे आठवले तसे ते त्याने आपल्या मनश्चक्षूपुढे उभे करून त्याची त्यानं पुढीलप्रमाणें सगति लावली. स्वामी म्हणाले होते," वैराग्यमूलक प्रेम हाच खरा धर्म होय. आपल्या आत्म्याला देश, काल आणि परिस्थिति यांच्या बंधनांतून मुक्त करणे हेच मनुष्याचे कर्तव्य आहे. त्याने आपल्याला विश्वकुटुंबांतील एक घटक समजावयाला पाहिजे. अतीत आणि अनागतकालीन मानवजातीशी प्रेमभावाने समरस होणे, हाच त्याचे हृदयकार्पण्य नष्ट होण्याचा एक उपाय आहे. त्याचे हृदयांत विरक्ति आणि शांति बाणावयाला देखील याखेरीज दुसरा चांगला उपाय नाही. मनुष्यामनुष्यांत फरक असणे शक्य नाहीं. निरनिराळ्या मानव जाती ह्या त्याच एका परमपुरुषाचा प्रकाश होय. अहंकार मोह उत्पन्न करितो, आणि प्रवृत्ति ही भेदभावाची जननी आहे. नारी ही स्वर्गीय चीज आहे. तिची आराधनाच करावयाला पाहिजे. भोगमार्गाने तिला दूषित करणें हे सर्वस्वीं अनुचित आहे. परमेश्वर हा अखिल सौंदर्याचा आद्य निर्झर होय. रमणी त्या तेजोमय सौंदर्याची उज्वल किरणें होत. आम्ही वासनांचा चष्मा लावीत असल्यामुळें आम्हांला त्या भोग्य पदार्थ वाटतात. स्त्री काय किंवा पुरुष काय, सर्वच प्रेमपात्र जीव आहेत. त्यांत भेद करणारें प्रेम निर्मल नाहीं असें खुशाल समजावें. जीवात्मा आणि परमात्मा यांच्या दरम्यान असलेले प्रेम हेंच खरें अस्सल प्रेम होय. जीवात्मा

हा राधा आणि परमात्मा म्हणजे श्रीकृष्ण होय. तो श्रीकृष्ण या राधेच्या हृदयमंचकावर सदोदित पहुडलेला असतो. हा सगमोत्सव नानाविध प्रकाऱ्च्या चमत्कारिक भावना आणि प्रसंग यांनीं साजरा होत असतो. निसर्गाच्या विशेष रमणीय दिवशीं या आनदाचा अनुभव चाखावयाला मिळतो. आपल्या आत्मारामाशींच क्रीडा करीत राहणाऱ्या आत्मज्ञान्याला रासोत्सवासारखे उत्सव म्हणजे आपल्या आत्म्याच्या बाहेरचे उत्सव वाटत नाहींत. आत्मरतज्ञात्याच्या हृदयांत परमात्म्याबरोबर जीवात्म्याचे असे उत्सव नित्य चालू आहेत, इतकेंच नव्हे, तर जीवात्मा आणि परमात्मा यांच्या प्रेमयोगाचे ज्ञानही मनुष्याला त्याच्या आत्म्यापासूनच मिळतें."

स्वामीजींचे हे भाषण आपल्या मनश्चक्षूपुढें धरून विजय स्वतःशीं विचार करूं लागला, " मग काय, हा सगळा संसार म्हणजे केवळ माया आहे ? जग म्हणजे कांहीच नव्हे ? कुसुमही माझी कोणी नव्हे आणि मीही तिचा कोणी नव्हे ? आम्ही असलोच तर अखिल ब्रह्मांडाचे एक अत्यंत सूक्ष्मतम घटक आहों, आणि तें आमच्या सगमासाठीं तडफडत आहे ! छे. एकदां आपली सगळी हकीकत स्वामीजींच्या कानांवर घातली पाहिजे. ते काय म्हणतात ते तरी पाहूं. मधुकर आपले मत मजवर बळेंच लादूं पाहतो. स्वामीजी तसें करणार नाहींत, याबद्दल माझी पूर्ण खातरी आहे. माझ्या शकांचे ते खचित युक्तिवादानेंच निरसन करतील. मधुकर येथे आला, तरी आपण इतक्यांतच त्याला स्वामीसबंधाने कांहीं बोलू नये. नाहीं तर तो पुन्हां आपल्या तर्काची धूळ उडवून मला अध बनवील."

चारी बाजूंनीं होणाऱ्या आघाता प्रत्याघातामुळे तो जहागीरदाराचा पोर अगदीं किंकर्तव्यमूढ होऊन गेला. त्याला जन्मभर दुसऱ्याच्या विचारानें वागण्याची संवय झालेली होती. दुसऱ्याच्या घरांत राहिल्यामुळे कुसुम, आणि काकींना पोचवावयाला गेल्यामुळे मधुकर हीं उभयताही आज त्याच्यापासून दूर झालीं होतीं. यामुळें त्याच्या विचाराचे तारूं स्वामींच्या विचारांच्या सुकाणूस अनुसरून धांवूं लागलें. स्वामीजींच्या जोरदार व्यक्तित्वाने त्याला आपल्या काबूंत पुरें घेतलें. त्याच्या परावलंबनी दुर्बळ मनाला प्रस्तुत प्रसंगीं एक चांगलाच आश्रय मिळाला; आणि त्या दिवसापासून तो दर-

रोज स्वामीजींच्या आश्रमाकडे जाऊ लागला. आज रेमार्केटांत, तर उद्यां शिवाजी ग्राउंडवर, तर परवां फर्ग्युसन कॉलेजच्या ॲफि थिएटरांत, याप्रमाणें स्वामीजींच्या व्याख्यानांची चक्री सुरू होती. विजयही त्या त्या ठिकाणीं स्वामीबरोबर जात होता.

एके दिवशीं स्वामीजवळ कोणी नाही हे पाहून विजयाने त्यांना आपली सर्व कहाणी निवेदन केली, स्वामीजींनीही ती डोळे झांकून लक्ष-पूर्वक ऐकून घेतली. नतर " सच्चिदानद "म्हणून त्यानी एक दीर्घ निश्वास सोडिला आणि ते म्हणाले, " बेटा, प्रेम हाच धर्म आहे हे मी तुला अनेक वेळ सांगितलेच आहे. ईश्वराने तुझ्या हृदयांत प्रेमाचा प्रबल स्रोत निर्माण केला आहे, हे तुझे महद्भाग्य होय. पण त्याचा वर्षाव तू एका विशिष्ट प्रदेशावरच का करतोस ? त्यामुळे तुझा किंवा जगाचा काय फायदा होणार? यापेक्षा तुझ्या त्या प्रेमस्रोताला तुझ्या हृदयाच्या हिमालयावरून गंगेप्रमाणें सहस्र धारांनी अखिल भूप्रदेशावर ओतशील, तर अखिल विश्व त्या प्रवा-हांत विलीन होऊन जाईल. त्याचा हाच खरा उपयोग होय. मला तुझी कुसुम तर साक्षात् राधिकेप्रमाणे दिसते. तुझ्यासाठी आपल्या मस्तकावर स्वजननिंदेचा कलंक लावून घ्यावयास ती तयार झाली ! काय हे प्रेम! पण असले अपूर्व आणि सोज्वल प्रेम तू कलंकित करणार काय ? छेः, असें करूं नकोस. तुम्ही दोघेही आपला प्रेमौघ अध्यात्माकडे वळवा आणि तुमच्या पवित्र प्रेमप्रसादाने विश्वास धन्य होऊ द्या. तुमचा खरा मार्ग हाच आहे. आत्मा म्हणजे केवळ छाया नसून, तो भोग व आनदस्वरूप आहे. धरणीमातेने कित्येक युगयुगांतरे तपश्चर्या करून आत्म्याची प्राप्ति करून घेतली आहे. पृथ्वीवरील अखिल धनरत्नांचा भोग एकीकडे आणि आत्मानंद एकीकडे. म्हणून आत्म्यावर प्रेम करावयाला शीक. त्याला आपल्या भोगलालसेचें साधन बनवूं नकोस. तलावात शेवाळ वगैरे जमून त्याचें पाणी जसें व्यवहाराला निरुपयोगी होतें, त्याचप्रमाणें प्रवृत्तीच्या अनेक विधिलेखांनी आत्म्याची उज्वलता नष्ट झाली आहे. विवेक, वैराग्य आणि संयम यांच्या योगाने त्यालाही उज्वलता फिरून प्राप्त होईल. त्याला त्याची साधक स्थिति प्राप्त करून द्यावयाला याखेरीज दुसरा मार्गच नाहीं. रति-

भावनेचा परमोत्कर्ष म्हणजे आत्मरति होय. काव्य, व्याकरण, अलंकार वगैरे गोष्टींचा जसा भाषेतच समावेश होतो, त्याचप्रमाणें आत्म्यामध्ये ज्ञान, प्रेम, आनद, वीर्य वगैरे सर्व गोष्टींचा समावेश झाला आहे. भाषेवर प्रभुत्व प्राप्त व्हावयाला व्याकरण शिकावयालाच पाहिजे; ते नीरस म्हणून सोडून देऊन भागत नाहीं; कारण, त्याखेरीज काव्याचा खरा आनद प्राप्त होणेंच शक्य नाहीं. हीच स्थिति आत्मप्रेमाची आहे. हे प्रेम अगोदर हस्तगत झाल्याखेरीज कोणत्याही प्रेमाची अगर आनदाची खरी मजा अनुभवाला येणें शक्य नाहीं. तू कुसुमवर जर खरें प्रेम करू इच्छित असशील, तर तिच्या आत्म्यांत आपला आत्मा विलीन कर. तिच्या शारीरिक भोगलालसेशीं सबध ठेवू नको. तू महा थोर भाग्यवान आणि प्राणी आहेस. आपलें प्रेम श्रीकृष्णचरणीं समर्पण करून तू धन्य हो. '

एवढे बोलून स्वामीजी डोळे झाकून काही वेळ स्तब्ध राहिले. त्या अवधींत विजयही स्तब्ध होता. स्वामीजीच्या या विचारांनी त्याच्या मस्तकांत हलकल्लोळ उडवून दिला होता !

थोड्या वेळानें स्वामी म्हणाले, " बेटा ! तू या गोष्टीचा शांतपणे नीट विचार कर आणि मग तुला योग्य वाटेल ते ठरीव. "

यानतर विजय स्वामीजीना प्रणाम करून आपल्या बिऱ्हाडाकडे रवाना झाला.

स्वामीजींच्या विचारानें त्याच्या मनावर आतां पूर्ण ताबा मिळविला होता. स्वामीजींनीं त्याला कुसुमचा त्याग करावयाला सांगितलें नसून, तिच्यासबधींच्या वासनामय प्रेमाला गभीर स्वरूप देण्याचा उपदेश त्याला केला होता. स्वामीजींच्या याच विचारानें त्याला अतिशय मुग्ध करून सोडलें. वासनेच्या सकीर्ण प्रदेशांत सांपडलेलें प्रेम केवळ विषमय बनतें, हे देशोदेशींचे इतिहास आणि काव्यग्रथही स्पष्टपणे सांगत असल्याचे त्याला आतां दिसून आलें. विश्वसगीताच्या सुरात आपला सूर न मिळविता वैयक्तिक भोगलालसेची तुतारी वाजवीत राहणें, हे अस्तित्व केवळ मृत्यूचेच नामातर होय. विजय आपल्या मनाशी म्हणाला, " माझें जर कुसुमवर खरे प्रेम आहे, तर मीं तिच्या आत्म्याला मलीन न करितां तिजवर निर्मल आणि

पवित्र प्रेम करावे, हेच माझे कर्तव्य नाही काय ? पण कुसुम साक्षात् मोहिनी आहे. तिचा एकच वेळ—पण नको, हे विचारही मनांत आणणे नको." रस्त्याने चालतां चालतां " गुरुदेव ! गुरुदेव ! " म्हणून त्याने स्वामीना पुनः प्रणाम केला.

---

# प्रकरण ३४ वें.

## संकटांची परमावधि !

स्वामीजींच्या प्रबल आकर्षण शक्तीच्या प्रवाहांत सांपडून विजय साऱ्या संसाराला विसरला होता. पण संसार त्याला विसरला नव्हता. मुलगा खरोखरच निघून गेल्यावर भाऊसाहेब आणि माईसाहेब या दोघांच्याही हृदयाची कालवाकालव सुरू झाली. माईसाहेबांनी प्रत्येक देवाला नवस करण्याचा सपाटा सुरू केला. त्या ज्योतिषाला बोलावण्यावर बोलावणें पाठवूं लागल्या. देवऋषी, शकुन पाहणार, आणि अगांत देव घुमविणारे यांनाही त्या विसरल्या नाहीत. एवढेच नव्हे, तर यांच्यांपैकी जो कोणी जो उपाय सांगेल, तो करावयासही त्यांनी अनमान दाखविला नाही. एकाने तर एक देवता प्रसन्न करून घेण्यासाठी कोंबडी अड्यापासून तो सोनें, कस्तुरी आणि नऊ जातींची रत्ने एवढ्या जिनसांची मागणी केली; पण त्यासुद्धां सगळ्या जिनसा माईसाहेबांनी त्याला दिल्या. या साधनाला एकंदर खर्च जवळ जवळ तीनशे रुपये आला.

या बाबतींत भाऊसाहेबांनीं मात्र आपली सारी भिस्त बडुनानावर ठेविली. बडुनानांनीही आपल्या स्वभावास अनुसरून त्यांना एक रामबाण युक्ति सुचविली. ते म्हणाले, " भाऊसाहेब, आपल्या चिरंजीवांना शुद्धीवर आणावयाचा एकच उपाय आहे. कुसुमचा दीर आहेना ? त्याला तुम्ही

पत्र लिहा, कीं, तुमची भावजय पुनर्विवाह करून तुमच्या कुलाला कलंक लावीत आहे. ज्या कुलांत हे पाप घडेल, त्या कुलाचा त्याग करावा असें शास्त्रांत सांगितले आहे. तरी तुम्ही हरप्रयत्न करून तुमच्या भावजयीचा हा पाट रोकावा. या कामीं तुम्हांला पैशांचा जो खर्च येईल, तो मी देईन. तसेच विजयालाही एक पत्र लिहून त्याला कळवा, कीं, " तुला जर कुसुम पसत पडली असेल, तर तिला तू आपल्याजवळ राख म्हणून ठेव. तिच्याशीं पाट लावण्याच्या भानगडींत पडू नकोस. पाट लावलास, तर जाहगिरीवरचा तुझा सर्व हक्क उडवीन. "

भाऊसाहेबांना नानांच्या या दोनीही युक्त्या अगदीं रामबाण वाटल्या. आणि त्यांनीं त्याप्रमाणे त्या दोघांनाही दोन पत्रे लिहिलीं. विजयला त्यांनीं जें पत्र लिहिले त्यांत त्यांनीं स्वतःचेंही डोकें थोडेसें लढवून पुढीलप्रमाणें एक ओळ जास्त घातली. " ता. क. तू लौकर घरीं आला नाहींस, तर मी मनूचा विवाह बंडूनानाच्या कनिष्ठ चिरंजीवाबरोबर उरकून घेईन. "

विजयाचे मन संसार आणि सन्यास या दोहोंच्या दरम्यान झोके घेत असतांना, बापाचे वरील पत्र त्याच्या हातीं पडले. त्याच्यासारख्या भावनाप्रधान तरुणाची या पत्रानें काय अवस्था केली असेल, याची कल्पनाच केलेली बरी. त्यानें तसल्या मनःस्थितींतच बापाला पत्र लिहिले. ते पत्र वाचून भाऊसाहेबांनीं त्याचा वारसा उडविण्याचे कार्य वकिलाच्या समतीनें त्याच दिवशीं अमलांत आणावयाचें ठरविलें. यावरून विजयाचे ते पत्र कशा प्रकारचें असेल याची कोणालाही थोडीबहुत कल्पना होईल !

याप्रमाणे पित्याचा एका क्षणांत सर्व प्रकारें संबध तोडून विजय अगदीं स्वस्थ झाला. तथापि मधून मधून त्याला आपल्या सापत्न मातेचा विरह असह्य होत होता. पण गुरुकृपेनें आपलें एकेक बंधन तुटत आहे, तेव्हां आपलें हें दुःख देखील लौकरच कमी होईल, अशी तो आपल्या मनाची समजूत घाली. एकच गोष्ट त्याच्या मनाला अतिशय दुःख देत होती. ती बापानें पत्रांत लिहिलेल्या मनूच्या दुर्दैवासंबंधीं होय. पण जेथें प्रत्यक्ष बापच पोटच्या पोरीचा गळा कांपीत आहे, तेथें आपण कितपत तिचें संर

क्षण करूं शकूं, या विचाराने आपलें हेंही दुःख कमी करण्याचा तो प्रयत्न करीत होता. शेवटी संसाराच्या कोणत्याच झगड्यांत पडण्यांत कांहीं हंशील नाहीं, खरे सुख आणि खरी शांति वैराग्यांतच आहे, हे त्याच्या मनाने कायम ठरविलें.

इकडे कुसुमचा दीर आजपर्यंत तिच्या बाबतींत अगदी निश्चित होता. पण आतां भाऊसाहेबांचे पत्र आल्यावर आणि विशेषतः या कामीं जो लागेल तो खर्च मी देईन हे वाक्य वाचल्यावर, त्याला आपल्या कुलाची, कुसुमच्या शीलाची व त्याबरोबरच आपल्या पूज्य आर्य-धर्माचीही आठवण झाली; आणि कुसुमच्या पुनर्विवाहास विरोध करावयास त्याने कंबर कसली. कुसुम सध्यां विजयासह तमण्णाच्या बिऱ्हाडीं आहे, हे त्याला भाऊसाहेबांच्या पत्रावरूनच कळलें होतें. त्याप्रमाणे तो तमण्णाच्या बिऱ्हाडीं येऊन दाखल झाला. या वेळीं तमण्णा घरींच होते. त्याने अतिथीचे यथोचित स्वागत केल्यावर त्याला विचारलें, "आपण कोण ?"

कुसुमच्या या दिराचें नाव मनोहर असे होतें. तमण्णाचा वरील प्रश्न ऐकून तो म्हणाला, "मला मनोहरबुवा म्हणतात. वडगावच्या जमीनदाराचे चिरंजीव आपल्याच येथे उतरले आहेत ना ?"

तमण्णाः—होय.

मनोहरः—त्याच्या बरोबर एक तरुण विधवाही आहे ना ?

तमण्णाः—होय. तिचे नांव कुसुम आहे; आणि तिचा या जहागीर-दारांच्या चिरंजीवाबरोबर पुनर्विवाह होणार आहे.

मनो०:—तीच ! तीच ! मी तिचा दीर आहे. पण मी तिला आपल्या घरांत का ठेवीत नाहीं, हे तुम्हांला ठाऊक आहे ? आपल्या भाव-जयीला पोसण्याइतकें सामर्थ्य काय माझ्या ठिकाणीं नाहीं ? कां मी इतका निर्दय आहे ? खरा प्रकार असा आहे कीं, तिची एकदां चालचलणूक माहीत झाल्यावर कोणीही सभ्य गृहस्थ तिला आपल्या घरांत राहू देणार नाहीं.

तमण्णाः—(आश्चर्यानें) आपण हे काय म्हणतां ? ती तर बिचारी फारच सत्वस्थ आणि सुशील दिसते.

मनो०:—हीच तर तिची खुबी आहे. बाहेरून ती आपले आचरण असे ठेवते कीं, कोणी म्हणेल वाहवा सीतामाई!

तमण्णा:—बरे असे असेल. मग आपले काय म्हणणे आहे?

मनो०—तुमच्या घरांत ती येऊन राहिली आहे, असे कळल्याबरोबर तुम्हाला तिजसबंधी माहिती देणे मला आपले कर्तव्य वाटलें. कारण, तुम्ही तिला अजाणतेपणानेच आपल्या येथे जागा दिली असली पाहिजे. आतां आपल्याच हाताने आपले व्यंग चव्हाट्यावर आणणे जरी योग्य नाही, तरी पण तुम्हांला त्यासंबंधाच्या अज्ञानांत ठेवणे म्हणजे घोरतर पातक करणे होय असे मला वाटल्यामुळे, मी हे कर्तव्य बजावावयाला आलो.

तमण्णा:—वाः वाः वाः, तुम्ही हे फारच चांगले काम केले. तुमच्या या थोरपणाबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. मी हे आतां विजयाला कळवितो.

मनो०:—अहो, नुसते कळवून काय करतां? तिला घराच्या बाहेर काढून द्या. आपण भले गृहस्थ आहा. आपल्यावर कांही भानगड येणे मला पसंत नाही.

भानगडीचे नाव ऐकल्याबरोबर तमण्णाच्या अंगावर कांटा उभा राहिला. तथापि तोंडावर बळेच हास्य धारण करून तो म्हणाला, "हो. हो. आपले अनुमान अगदी बरोबर आहे. मी अगदीं भला माणूस आहे पहा. मला संसारांतिल डावपेच कांही माहीत नाहीत. आपण भानगडीचे नांव घेतल्याबरोबर माझ्या आंगावर काटा उभा राहिला. ईश्वर आपले भले करो. मला या संकटांतून सोडवा बुवा."

मनोहरबुवा गंभीरपणाने म्हणाले, "एवढ्याकरितां तर मी आपल्या पदरचा पैसा खर्च करून इतक्या लांब आलो. मी आपले सगळेच रहस्य तुम्हांला सांगून टाकतो, ऐका. विजयाने माझ्या भावजयीला फूस लावून नेले, अशा अर्थाची मी त्याच्याविरुद्ध पोलिसांत फिर्याद केली आहे आणि त्यांच्या पुनर्विवाहाला मनाई व्हावी म्हणून दिवाणी कोर्टात अर्जही दिला आहे. या अर्जातच मीं कुसुमला माझ्या ताब्यांत देण्याचीहि मागणी केली

आहे. अहो, आमचें माणूस आम्हांला मिळालेच पाहिजे. ती जर अशा रीतीने सत्रा नवरे करीत फिरेल, तर माझे नांव काय राहिलें? जो तो म्हणेल कीं, ही बघा मनोहरबुवांची भावजय, कशी रोज एक नवरा करून थाटांत मिरवत आहे! काय? मी म्हणतो हे बरोबर आहेना, साहेब! मात्र हें ध्यानांत ठेवा, कीं, तुम्ही जर तिला आपल्या घरांत ठेवाल, तर पोलिस तिच्याबरोबर तुम्हांलाही पकडील."

पोलिसाचें नांव ऐकतांच तमण्णा थरथर कांपू लागला. तो मनोहराचा हात धरून म्हणाला, "छे, छे, असें करू नका. तुम्हांला माझी शपथ आहे बघा. तुम्ही ब्राह्मणच आहांत. मी तुमच्या पायांवर डोकें ठेवतो. मला ब्राह्मणाला तुरुगांत घालून तुम्हांला काय मिळणार? तुम्ही आजचा दिवस मला सवलत द्या. आज माझ्या घरीं पोलिस आणू नका. मी आज रात्रींच्या रात्रीं त्या दोघांनाही घराबाहेर हाकून देतो."

मनोहरः—आपण त्यांना आतां क्षणभरहि ठेवणार नाहीं हे मी पूर्णपणें जाणतों. कारण किती झाले तरी आपण भले गृहस्थ आहां. पण आपणास आणखी एक गोष्ट करावी लागेल. ती कोठें जातात, कोठें रहातात, याचाही नतर आपण तलास ठेविला पाहिजे. नाहीतर आपणच त्यांना छपून ठेविलें असें पोलिस समजतील, आणि मग जें व्हायचें तें होईल. आलें ना लक्षांत?

तमण्णाः—अगदी पूर्णपणे. तुम्ही बिलकुल काळजी करू नका. मी त्यांच्यावर सारखी नजर ठेवितो.

मनोहरः—ठीक आहे. मी आतां जातों.

एवढें बोलून मनोहरबुवा जावयास निघाले. इतक्यांत तमण्णा त्यांना थांबवून म्हणाला, "एक विनति ऐकतां कां? आल्यासारखे या गरीबाच्या घरीं फराळ करून जा."

मनोहर०:—छे, छे, आज नको. पुढें कधीं तरी मी आपल्या येथें येऊन अवश्य फराळ करीन.

एवढें बोलून मनोहरबुवा तेथून झटकलेच.

ते घराबाहेर पडल्यावर तमण्णा दार बंद करून माजघरांत गेला आणि पत्नीला उद्देशून म्हणाला, " अग ए, कुठे आहेस ग ? "

बिचारी तमण्णाची पत्नी सैंपाकघरात अर्धा डझन पोरांनी वेढून टाकिली होती. त्यांची कशी तरी समजूत करीत ती कुसुमला दशम्या भाजावयाला सहाय्य करीत होती. नवऱ्याची हांक ऐकल्याबरोबर ती मुलांवर सतापून म्हणाली, " मेल्यांनो ! जरा गप्प रहा कीं. ते काय म्हणतात ते ऐकू द्या. तिकडचे इकडे ऐकावयाला येऊ देत नाहींत, की, इकडचे तिकडे ऐकावयाला जाऊ देत नाहीत. साऱ्या दिवसभर असाच कहर चाललेला असतो. "

आईच्या सतापण्याने मुलें जरा स्तब्ध झालीं.

तमण्णा पुनः ओरडले, " ऐकलेस का ग ? "

कुसुम म्हणाली, " अहो, तमण्णा भावोजीच हाक मारताहेत "

तमण्णांच्या छोट्या छोकरीने याच वेळीं आईला पिण्याची धांदल लाविली होती. नवऱ्याची मागची हांक ऐकून तमण्णाच्या पत्नीने तिला दूर ढकलले; त्याबरोबर ती पोर मोठमोठ्याने रडू लागली.

इकडे तमण्णाचा हांक मारण्याचा सपाटा चालूच होता. अखेर घाई-घाईने हात धुऊन तमण्णाची पत्नी कशी तरी पतींसमोर येऊन उभी राहिली. तिला पाहिल्याबरोबर तमण्णा म्हणाला, " अग, ती कुसुम कोठे आहे ? आपण ही एक ब्यादच घरांत ठेवून घेतली. तिचा दीर इतक्यांत येऊन गेला. त्याने सांगितलें की, ही पोरगी बदचालीची आहे. याच कारणामुळें आपण तिला घराबाहेर टाकून दिले होते. मला त्याने स्पष्ट सांगितले की, तुम्ही तिला आजच्या आज घराबाहेर काढून द्या. नाहीं तर मी तुम्हांला पोलिसच्या स्वाधीन करीन. तू तिला आतांच्या आतां घराबाहेर काढून दे कशी ! "

पण तमण्णाच्या पत्नीला इतकेंही कष्ट घेण्याची जरूर पडली नाहीं. कारण तमण्णाचा शब्दन् शब्द कुसुमला ऐकावयाला येत होता. एका वयस्थ पुरुषाच्या तोंडून आपणासंबंधीं असे उद्गार निघालेले पाहून तिच्या नेत्रांतून अग्निवर्षाव होऊं लागला, आणि ती नखशिखान्त घामानें डबडबून गेली.

तमण्णाची पत्नी नवऱ्याला उद्देशून म्हणाली, "हे हो काय लचांड? दुसऱ्यासाठीं आमच्या हातांत बेड्या! अगबाई, मग माझ्या मुलाबाळांची काय वाट व्हावी? अग ए पाढऱ्या पायाच्या बये! ऐकलेस कां हे आपले गुण! अवदसे! माझ्या घरात एक पळभरसुद्धां राहू नकोस. चल निघ बाहेर! हा काय कुटणखाना आहे?"

याप्रमाणे बोलत असतांना तमण्णाच्या पत्नीने दाराकडे बोट केले होते. पण तेजस्वी कुसुम असल्या भेडसावणीने भिऊन जाणारी नव्हती. कुसुम इतके दिवस तमण्णाच्या घरांत होती, पण ती कशी काळी का गोरी आहे हे त्याने पाहिले देखील नव्हते, इतकेच नव्हे, तर तिचे बोलणे देखील त्याने ऐकले नव्हते. पण आज मात्र त्याने तिला पाहिले. पण ते किती भयकर स्वरूपांत! शेपटीवर पाय पडलेल्या नागिणीप्रमाणेच उसळून ती तमण्णाच्यासमोर आली आणि त्याला व त्याच्या पत्नीला उद्देशून म्हणाली, "ज्यांनी मला येथे आणून ठेविले ते आल्याखेरीज मी येथून पाऊलभरही हालणार नाही."

नतर त्याच्यांपैकीं कोणाच्याही उत्तराची परवा न करितां, ती आपल्या खोलीत जाऊन सामानसुमान बाधू लागली. तमण्णा मुकाट्याने दाराबाहेर जाऊन विजयाची मार्गप्रतीक्षा करीत थडीत कुडकुडत राहिला.

अखेर बऱ्याच वेळाने विजय येथे येऊन दाखल झाला. त्याला पाहिल्याबरोबर तमण्णा म्हणाला, "वाः, हे फार चागलें केलेस तू?"

विजय हसत हसत म्हणाला, हो, "आज जरा उशीर झाला खरा. पण काय करावे, स्वामीजींचें भाषण एकदां ऐकू लागले म्हणजे तेथून हालू नयेसेंच वाटते. आज फारच महत्वाची चर्चा निघाली होती. पण तिच्या-सबधानें आपण जेवण आटोपल्यावर चर्चा करू."

तमण्णाः—मी तुझी ही चर्चा ऐकण्यासाठीं येथे बसलो नाही. तूं मोठा भयकर अन्याय केला आहेस.

विजयः—तू हे काय भकतोस मला कांही कळत नाही. मी कोणता अन्याय केला?

विजय या वेळीं अगदीं आश्चर्यविमूढ होऊन गेला होता.

तमण्णाः—तू माझ्या घरांत एक बदचालीची स्त्री आणून ठेवलीस नाही का ?

त्याचे हे भाषण ऐकून विजयाच्या तळपायाची आग मस्तकाला गेली; आणि तो तमण्णाला म्हणाला, " मी एक वेळ तुला गय करीत आहें. पुनः जर असले शब्द तोंडावाटे काढशील, तर बत्तिशीच पाडून टाकीन, समजलास ? तुझ्या ठिकाणीं साधारण सभ्यपणाही उरला नाहीं, गाढव कुठला !"

विजयचा हा नरसिंहावतार पाहून तमण्णा बराच मऊ आला, आणि गयावया करून म्हणाला, " ही आम्हां गरिबाला मोठीच पचाईत आली. कुसुमचा दीर इतक्यांत येऊन गेला. तो म्हणाला, कीं, तुम्ही जर तिला घरांत ठेवलं, तुम्हांला तर मी पोलिसच्या ताब्यात देईन. बरे, इकडे तुम्हाला कांही बोलावं, तर तू म्हणतोस दांत पाडीन. "

विजयः—कोण ? कुसुमचा दीर ?

तमण्णाः—होय. त्यानेंच तर मला तिचं सगळं चरित्र सांगितले.

" काय सांगितलें ? " विजय त्याच्या हाताला धरून त्याला गदगदां हालवून म्हणाला.

मऊ मेंढरू बनलेला तमण्णा त्याला ती सगळी हकीकत खालीं मान घालून सांगू लागला. इतक्यांत कुसुम तेथे येऊन म्हणाली, " अजून येथेंच उभे कां ? लौकर गाडी घेऊन या. "

यापुढे या घरांत एक क्षणभरही राहणे म्हणजे आपल्या स्वाभिमानावर तिलांजली ठेवणे होय, हे आता विजयाच्याही लक्षात आले, पण जावयाचे कोठे ? कुसुमला घेऊन जावयाचे कोठे ? या विचाराने त्याला पुनः किंकर्तव्यमूढ बनविलें. तो कुसुमकडे हताश मुद्रेने पाहू लागला. कुसुमच्या नेत्रांत आतां जास्तच तेज चमकू लागले. ती पुनः जोराने म्हणाली, "अहो, असे स्वस्थ उभे काय राहिलांत ? गाडी आणा जा. "

विजयः—पण आपण जावयाचे कुठे ?

कुसुमः—त्याचा विचार करीत बसण्याची ही वेळ नव्हे, तासांच्या बोलीनें गाडी आणा, मग वाटेल तर ती साऱ्या रात्रभर फिरत राहील. "

विजय एखाद्या यांत्रिक काष्ठपुतळीप्रमाणें तेथून मुकाट्यानें गाडी पहावयाला निघून गेला. त्याचा विश्वासु नोकर कोंडीबा त्या वेळीं तेथे पडवींतच निजला होता; पण त्याचे देखील त्याला या वेळीं स्मरण झालें नाही. विजय घराच्या बाहेर पडला खरा, पण त्याला आज सगळे पुणे शहर भेसूर दिसू लागले. आपण कोठें जातों आणि काय करतों, याचेंही त्याला भान नव्हतें. तो बुधवार चौकांतल्या गाड्यांच्या अड्ड्यावर केवळ सुदैवानेंच येऊन पोचला. तेथें आल्याबरोबर तो भानावर आला, आणि कांहीं तासांच्या बोलीनें एक व्हिक्टोरिया ठरवून तिच्यांत बसून लागलाच तो घराकडे परतला. दाराशीं कुसुम सर्व सामानसुमानासह उभीच होती. गाडी आल्याबरोबर गाडीवाल्याकडून सर्व सामान तिनें गाडींत ठेवविलें व नंतर ती आंत जाऊन बसली.

अजून सर्वांचींच जेवणें व्हावयाचीं होतीं. त्यांत हीं दोन माणसें निघून चालली हें पाहून, आज विनाकारण इतका सैपाक केला, हा विचार तमण्णाच्या पत्नीच्या मनांत येऊन तिला फारच खेद झाला. हीं माणसें संध्याकाळच्या अगोदरच कां गेलीं नाहींत, याबद्दल तिला त्यांचा अतिशय संताप आला; आणि तो संताप ती मुलांना थपडांवर थपडा मारून शांत करूं लागली!

या गोंधळांत कोंडीबा जागा झाला. एकंदर प्रकार काय आहे, हें त्याच्या लक्षांत यावयाला फारसा अवधि लागला नाहीं. तो चटकन् उठून गाडीवाल्याशेजारीं कोचबॉक्सवर जाऊन बसला. गाडी निघालेली पाहून तमण्णा विजयाला म्हणाला, "तुम्ही आतां कोठें जाणार?"

त्याच्या या प्रश्नानें विजय अतिशयच चिडून म्हणाला, "मसणांत!"

तमण्णा मनांतल्या मनांत म्हणाला, "ठिकाण तर फार छान शोधून काढिलें आहे. तेथें पोलिसचीही जाण्याची प्राज्ञा नाहीं, नी माझीही नाहीं. मी आतां कबूल केल्याप्रमाणें यांच्या हालचालीची मनोहरबुवाला बातमी देणार कशी?"

गाडीचीं दारें बंद करतां करतां गाडीवान म्हाणाला, "कोणीकडे गाडी न्यायची, रावसाहेब?"

विजयः—तुझ्या मर्जीला वाटेल तिकडे ने.

गाडीवाल्याला हे उत्तर फारच चमत्कारिक वाटलें. पण आपण आपल्या भाड्याचे मालक, जास्त पंचायतीत कशाला पडा, पैसे जर आपल्याला मिळत आहेत, तर गाडी सगळ्या शहरभर फिरत राहिली म्हणून आपले काय गेले ? असा विचार करून गाडीवान जिकडे घोडा नेईल तिकडे गाडी हांकू लागला. अशा स्थितींत रात्रीचे बारा वाजले. अखेर गाडीवालाच कंटाळून म्हणाला, "रावसाहेब, आतां कोठे उतरावयाचे तें सांगा. घोडा सोडावयाची वेळ झाली."

त्याचें हे भाषण ऐकून कुसुम आणि विजय ही दोघेही पुन्हा फिकीरीत पडली ! विजयाला कांहीच उपाय दिसेना. तेव्हां कुसुम त्याला म्हणाली, "इथे हॉटेलें पुष्कळच आहेत म्हणून मीं ऐकिलें आहे."

विजयः—हॉटेलांत उतरावयाचे ? पण चांगले हॉटेल कोणतें आहे हे मलाही ठाऊक नाहीं.

कुसुमः—गाडीवाल्याला विचारा, म्हणजे तो सांगेल. त्याना ठाऊक असली पाहिजेत.

विजयः—पण असल्या अपरिचित ठिकाणी राहिल्यामुळे पुन्हा एखादें सकट आपणावर कोसळावयाचे.

कुसुमः—असले विचार मनांत आणून कसे चालेल ? कोठे तरी उतरलेच पाहिजे. जनावराचा विचार मनात घेतला, तर गाडी काहीं सर्व रात्रभर चालणे शक्य नाही.

विजयः—यापेक्षां स्वामीजीच्या आश्रमांतच आपण जाऊन राहिलेले बरं. प्रस्तुत प्रसगी मला हीच एक तोड उत्तम दिसते. तेथे आपल्या दोघांनाही जागा आहे. तुझी इच्छा असेल तर चल. दोघेही तिकडे जाऊं. तेथे आपल्याला बिलकुल त्रास होणार नाही.

कुसुम आश्चर्यचकित होऊन म्हणाली, "हे स्वामी कोण ? आणि त्यांचा आश्रम कोठें आहे ?"

विजयः—त्यांचा आश्रम बंडगार्डनच्या बाजूला आहे. हे स्वामी केवढे थोर महात्मे आहेत, हें तुला त्यांचे प्रत्यक्ष दर्शन झाले म्हणजे समजून येईल.

कुसुमः—ते केवढेही महात्मे असोत, पण संन्याशाच्या आश्रमांत राहणें बरें नाहीं.

तिच्या या भाषणाने विजय खेदखिन्न होऊन म्हणाला, " हे बघ कुसुम, तुझे आणि माझे ससारिक मीलन घडण्याची ईश्वरी इच्छाच दिसत नाहीं ! तसं जर नसते, तर असे प्रसग कां उत्पन्न होते ? आपल्या मार्गात अनेक अकल्पित अडचणी कां उभ्या राहत्या ? स्वामीजीही म्हणतात, आपणा उभयतांचे ससारिक मीलन काही मगलकारक होणार नाही, चल. आपण दोघेही त्याच्याकडून सन्यासदीक्षा घेऊ ! वैषयिक भावनाचा त्याग करून अध्यात्मिक योगांत विलीन होऊ; आणि दोघेजणही एकमेकाच्या संनिध राहूनही ससाराऐवजी जगाची सेवा करू. शारीरिक मीलनापेक्षांहि हे आत्ममीलन आपणां उभयतांनाही केवढ्या सुखात नेऊन सोडील ! आज कित्येक दिवसांपासून माझ्या मनांत हेच विचार घोळत आहेत. पण मी वासनेवर विजय मिळवावयास असमर्थ होतो. परतु ईश्वराच्या कृपेने आज मी आश्रयहीन झालों, हे चागलेच झाले ! आपल्याला आज सगळ्या घराची दारे बद झाली असून, फक्त स्वामीच्या प्रेममय आश्रमाचेच दार तेवढे उघडे आहे. चल, आपण आता तेथेच जाऊ. आमचे शेवटचे आश्रयस्थान म्हणजे सन्यासग्रहण होय. तुम्ही हाच मार्ग पतकरा, असा जणु काय आजच्या प्रसंगानें ईश्वरानेच आम्हाला इशारा दिला आहे ! "

विजयाच्या या भाषणानें कुसुमच्या मस्तकावर केवळ वज्र कोसळल्या-प्रमाणे झाले ! तिने आतांपर्यंत जे एवढे दुःख, एवढा अपमान आणि एवढी निंदा सहन केली ती याचसाठी काय ? विजयाच्या पुनर्विवाहाची मागणी कबूल करण्यांत तिला आपल्या नातलगांचा केवढा विरोध सहन करावा लागला, त्यांच्या मनाला केवढे दुःख द्यावे लागले, आणि स्वतःलाही केवढी जननिंदा व अपमान सहन करावा लागला ! तिच्या या स्वार्थ-त्यागाची कल्पना नसण्याइतका विजय खरोखर मूर्ख आहे काय ? पहिल्याने तिने त्याला नकारच दर्शविला होता. पण आपल्यासाठी तो फकीर बनलेला पाहून तिने त्याचे म्हणणे कबूल केले ! आणि केवळ याच कारणामुळे तिला तिच्या मावशीलाही कायमचे अतरावे लागले ! पण तिचा

हा एकदर स्वार्थत्याग विजय विसरला काय ? ती त्याच्याकरितां वाटेल तेवढीं संकटें सोसावयास तयार झाली; पण त्याला आज जरासा त्रास झाल्याबरोबर तो सन्यास घेण्याच्या गोष्टी बोलू लागला, इतकेंच, नव्हे तर तिलाही तो मार्ग अनुसरण्याचा अनुरोध करूं लागला याचा अर्थ काय ? तिनें सन्यासच घ्यावयाचा तर तिची वैधव्यावस्था काय वावगी होती ? ती अवस्था म्हणजे सन्यासच नव्हे काय ? खरोखरच तिच्या पुढे ही गोष्ट काढतांना तिने आपणासाठीं काय काय दुःखे भोगिली याचा थोडा देखील विचार विजयाने आपल्या मनांत आणिला नाही.

अंमळशाने कुसुम म्हणाली, "आपल्या मर्जीप्रमाणे करा; पण मधुकर भावोजी येईपर्यंत आपण कोणत्या तरी हॉटेलमध्येच उतरू."

विजय आपल्या मनाशीं म्हणाला, "फिरून मधुकर. त्याच्यावर हिचा भरवसा आहे आणि माझ्यावर नाही. याला काय प्रेम म्हणतात ? मग हिला जर मधुकराचाच विश्वास वाटतो, तर मग तू त्याचाच आश्रय कर, मग मला कशाला चिकटावयाला पाहतेस ? मला तरी हेंच पाहिजे. परमेश्वराचा अदृष्ट मंगलमय हात माझे एकेक बंधन तोडीत आहे हे एक प्रकारे ठीकच आहे. हे सर्व स्वामीमहाराजांच्या कृपेचें फळ होय. ठीक आहे. तिच्या इच्छेप्रमाणेच होऊन जाऊ द्या. एकवेळ आपण हिला त्याच्या स्वाधीन केले, कीं, हिच्या जबाबदारीतून आपण मोकळे झालो."

अशा प्रकारचा विचार करून तो व्हिक्टोरियावाल्याला म्हणाला, "चल बाबा, आम्हांला कोठल्या तरी एखाद्या चांगल्या हॉटेलांत नेऊन सोड."

व्हिक्टोरियावाल्याने त्यांना स्टेशनापलीकडच्या "आर्य-रसिकाश्रम" नांवाच्या हॉटेलांत नेऊन सोडिलें. या हॉटेलाचा मॅनेजर फारच सभ्य गृहस्थ होता. त्याने तेवढ्या रात्रीं देखील त्याची फारच चांगली व्यवस्था लाविली. कुसुमकरितां एका स्वतंत्र खोलीची व्यवस्था करून, विजयानें स्वतःकरितांही एक निराळी खोली घेतली. कांडीबा कुसुमच्या खोलीच्या दाराशीं असलेल्या बेंचावर निजला.

# प्रकरण ३५ वें.

## विजयाचा संसार!

विजय आणि कुसुम यांना आदले दिवशीं रात्रीं बरेंच जागरण झालें होते, तरी दोघेंही सूर्योदयाच्या आंतच उठलीं. तमण्णाकडे मधुकराचें कांहीं पत्र आले आहे कां हे पाहण्याची विजयाला घाई झाली असल्यामुळें, तो कुसुमचा निरोप घेऊन तिकडे निघून गेला. तमाण्णा घरींच होता. मधुकराचे पत्र मात्र आजच्याही डाकेला आले नव्हतें, यामुळें विजयाची फारच निराशा झाली. तो लागलाच तेथून निघाला. त्याच्या मागोमागच तमण्णा "तुझें बिऱ्हाड कोठे आहे, पाहूं तर खरें." असे म्हणत म्हणत निघाला. मनोहरला कबूल केल्याप्रमाणें त्या जोडप्याचा पत्ता त्याला कळविण्यासाठी विजयाच्या मागोमाग जाण्याची तमण्णाने एवढी घाई केली.

सगळ्या आयुष्यांत स्वतंत्रपणे राहण्याचा आणि सांसारिक गोष्टींच्या किंवा व्यवहाराच्या भानगडींत पडण्याचा विजयाचा हा पहिलाच प्रसंग होता. तथापि तो हॉटेलांत उतरला असल्यामुळे खानपानादि अनेक सांसारिक गोष्टींच्या दगदगीपासून तो मोकळा होता; पण उरल्यासुरल्या किरकोळ बाबी देखील त्याला केवढ्या त्रासदायक वाटू लागल्या. बिचारे परावलंबी पोर! स्वतःच्या प्रत्येक कामासाठी दुसकडे पहाण्याची त्याला जन्मभर सवय लागलेली! प्रवासाला निघण्याची हिंमत केली, तीही मधुकरासारख्या अभिन्न हृदय मित्राच्या जोरावर! संसारांतल्या किरकोळ बाबींसाठीं जर एवढी दगदग आणि भगभग सोसावी लागते, तर स्वतंत्रपणें घर करून रहावयाचें म्हणजे केवढी यातायात करावी लागत असेल हा भयंकर विचार आतां त्याच्या मनांत घोळूं लागला! त्याजबरोबर सामन्य हिंदु जीवनाचा तो सामान्य इंग्रज जीवनाशीं तुलना करूं लागला. या तुलनेंत त्याला हिंदु जीवनापेक्षां इंग्रजांचें जीवन किती तरी स्वास्थ्यपूर्ण वाटलें. विशेषतः त्यांची ती हॉटेलांतून जेवण मागवि

ण्याची पद्धति त्याला फारच बरी वाटली. दोन्ही वेळेला ठरलेले पैसे टाकले की, काम भागले! धान्य आणण्याची, ते दळण्याची आणि सैंपाक करण्याची कांहींच दगदग नको! बायकोने आणि नवऱ्याने, दोघानींही खुशाल शेक्सपियर, टेनिसन्, बायरन् याच्या काव्यरसात अष्टौप्रहर डुबत रहावे! पण संसारांतल्या ज्या दगदगीचा विजयाला कटाळा होता, त्याच दगदगी कुसुमला अगदी प्रिय होत्या. भाडोती जागेतच का होईना, पण आज ती स्वतःची पूर्ण मालकीण होती. सकाळी स्नान वगैरे उरकल्या-बरोबर ती कोंडीबाला म्हणाली, "कोंडीबा, मला हॉटेलमधले जेवण बिलकुल आवडत नाही. या लोकाना स्वच्छता कशी ती ठाऊकच नसते. तू हॉटेलच्या मॅनेजरला भेटून येथे सैंपाक करण्याची परवानगी घेऊन ये. आम्हीं स्टोव्ह आणि शेगडी यांच्यावरच सैपाक करितो, तुमची जागा बिलकुल खराब करीत नाही, असे त्याला कळीव. आणि मी पैसे देतें ते घेऊन बाजारांतून एक स्टोव्ह, शेगडी, रॉकेल आणि सैपाकाचें इतर 'साहित्य घेऊन ये."

कोंडीबाने ही सगळी व्यवस्था दोन तासाच्या आंतच लाविली.

त्यानतर थोड्याच वेळाने विजय घरीं आला आणि पाहातो तों कुसुम सैंपाकात दग! त्याच्या आश्चर्याला पारावार उरला नाहीं. तो आपल्या मनाशीं म्हणाला, "खरोखर रमणीचे रमणीयत्व गृहकार्यांतच दिसून येतें. अशा कठीण प्रसगी आणि इतक्या गैरसोयीतही तिने पाक-निष्पत्तीची इतकी सुंदर सोय लावून घेतली ही गोष्ट निःसशय तिचा श्रेष्ठ गृहिणीपणा शाबीत करीत आहे." कुसुमला कल्याणमयी गृहदेवतेच्या स्वरूपांत पाहण्याचा योग त्याला अद्यापपर्यंत लाभला नव्हता. आज त्याला ती साक्षात् अन्नपूर्णाच वाटली. तिच्या मुखावरील हास्यानें तर त्याला मुग्ध करून सोडिले आणि त्याच्या हृदयांत एका नवीन भावनेचा उदय झाला. त्या उभयतांमध्ये स्वामीजीनी एक नवेच व्यवधान निर्माण केले होते. ते या भावनेने तर समूळ नष्ट झाले.

सर्व जगाला विसरून आणि आपल्या सर्वस्वाचें मोल देऊन जी कुसुम त्याला हवी होती, ती आज इतक्या दिवसांनीं त्याला लाभली. या

वेळी त्या उभयतांमध्ये कोणतेही व्यवधान व कोणताही अडथळा उरला नव्हता. यामुळे आजचा दिवस म्हणजे त्यांच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा दिवस असा व्हावयाला पाहिजे होता; पण काय असेल ते असो, विजयाच्या मनांत ती पहिली उत्कटता राहिली नव्हती. आज तो स्वतःच स्वतःला व्यवधानरूप बनला !

अशा स्थितीत हॉटेलमध्ये त्याचे दोन दिवस निघून गेले. तिला एकटीला हॉटेलमध्ये ठेवून आपण कोठे जाणे विजयला बरें वाटेना. यामुळे परस्पराना परस्पर व्यवधानरूप वाटू लागली. विजयाजवळ स्वामीजींच्या-खेरीज दुसरी कोणतीच गोष्ट बोलावयाला नाहीं, असेच या अवधीत दिसून आले. कुसुमला पुरुषजात म्हणजे एक अत्यत दुर्बोध असे कोडे वाटू लागले ! ईश्वराने पुरुषजातीत स्थैर्य, धैर्य आणि निष्ठा हे गुण मुळी घातलेच नसावेत काय, अशीही शंका क्षणैक तिच्या मनात उभी राहिली. विजयाचा सन्यास घेण्याचा विचार म्हणजे एक क्षणैक लहर आहे, हे तिने ओळखल. श्रीमतीत आणि परावलबनात वाढलेल्या त्याच्यासारख्या जाहगिरदारच्या पोराने सकटांवर सकटे दिसू लागताच रणांगणाला पाठ दाखवून पळून जायला पाहावे, यांतही तिला विशेष आश्चर्य करण्यासारखें कांहीं दिसले नाही. मात्र त्याच्यासाठीं आपणास जी भयकर जननिंदा आणि कमालीचा स्वार्थत्याग करावा लागला, त्याची त्याला कल्पनाही नसावी, ही गोष्ट तिला अत्यत खेदजनक वाटली. अशा वेळीं आणि अशा स्थितींत त्याने तिचा त्याग करणे म्हणजे तिचा सर्वस्वी केसाने गळा कापणें होय. स्त्रीजातीचा यापेक्षां दारुण विश्वासघात आणि अपमान कोणता ?

ते लग्नसराईचे दिवस होते आणि तिच्या डोळ्यासमोरून अनेक नववधुवरांचीं जोडपीं वावरत होतीं. अशा प्रसगीं ती आपल्या दुर्दैवाला दोष देऊन दीर्घ निःश्वास सोडी.

अखेर विजयाशीं एकदां अखेरचे बोलून शेवटचा काय तो सोक्ष-मोक्ष लावून घ्यावा, असे तिने ठरविले. कारण अशा स्थितीत त्याच्या जवळ राहणे म्हणजे घोर पातकच करणे होय, असे तिचे मन तिला सांगू लागलें. यापेक्षां रस्त्यानून भीक मागत फिरणेही तिला अधिक सन्मान-

जनक वाटले. या वेळीं मधुकरदादा असते तर आपल्यावर अशी घोर आपत्ति ओढवतीना, निदान तो आपल्याला योग्य मदत तरी देता, असें ती आपल्या मनाशीं म्हणू लागली. अखेर कांहीं होवो, आपलें संकट आपल्यालाच दूर करावयाला पाहिजे, असा विचार करून त्याप्रमाणें वागण्याचा तिनें निर्धार केला. ही गोष्ट स्त्रीजातीच्या विनयाला शोभण्यासारखी नव्हती; पण या गोष्टीला तिचा नाइलाज होता.

वरीलप्रमाणे निश्चय करून कुसुम विजयाकडे गेली. पण त्याच्यासमोर जातांच तिला रडू कोसळलें. विजय मुग्ध दृष्टीनें तिजकडे पाहू लागला. इतक्यात त्याला स्वामीजींच्या उपदेशाचे स्मरण होऊन तो आपल्या मनाशी म्हणाला, "हे स्त्रीरोदन म्हणजे कामदेवाचे एक अस्त्र आहे. ज्ञात्यानें याच्या मोहात सापडूं नये." नतर तो कुसुमला उद्देशून म्हणाला, "तूं हे काय चालविले आहेस? माणसानें प्रवृत्तीच्या इतक्या आधीन होणे चागले नाही. याच काय, पण यापेक्षाही खडतर प्रसगाला आपण तोंड दिलेच पाहिजे. खरा आनद अध्यात्मिक मीलनांतच आहे; आणि ते मीलन आपल्याला स्वामीजींच्या कृपेनें लाभेल."

याच वेळेला मनोहरने आपला पुनर्विवाह थांबविण्यासाठीं दिवाणी आणि फौजदारी कोर्टात फिर्यादी केल्या असल्याची बातमी त्याला लागली. त्याबरोबर तो कुसुमला म्हणाला, "पाहिलेस, हा ईश्वरी निषेध किती बाजूनीं आपल्याला बजावीत आहे. म्हणूनच मी म्हणतो, चल, आपण स्वामीजींच्या आश्रमांत जाऊन राहू."

यावर कुसुम म्हणाली, "थांबा, अजून दोन दिवस वाट पहा. तोंपर्यंत मधुदादा येतील."

मधुकराच्या अगांत आपल्या मित्राला वाटेल त्या संकटांतून सोडविण्याचे सामर्थ्य आहे, असा कुसुमला पूर्ण विश्वास होता; पण ती जसजसा त्याजविषयीं आपला दृढ विश्वास व्यक्त करू लागली तसतसा विजयाचा आपल्या जिवलग दोस्ताविषयींचा सशय अधिक अधिक वाढूं लागला. आपल्याला पुनर्विवाहाला प्रवृत्त करण्यात "आपल्या प्रयत्नामुळें ही केवढी जंगी समाजसुधारणा घडून आली," हे लोकांना दाखविण्याचा व त्याबरो-

बर स्वतःचे स्तोम माजविण्याचा त्याचा स्वार्थी हेतु असावा, असे त्याला वाटले. एकदां एखाद्याच्या हेतुविषयीं एखाद्याला संशय आला कीं, तो त्याच्या प्रत्येक कृत्याकडे तशाच दृष्टीने पहातो. मधुकराच्या बाबतींत विजयाची या वेळीं अशीच अवस्था झाली. तो आपल्या मनाशीं म्हणूं लागला, "अरेरे ! माझ्या सरळ स्वभावाचा फायदा घेऊन मधुकराने माझ्या आयुष्याची केवढी तरी नासाडी केली ! शिक्षणप्रसाराचा बहाणा करून त्याने माझ्या चागल्या उत्पन्नाच्या तीन इनाम जमिनीही लाटल्या ! इतकेच नव्हे, तर त्याच्यामुळेच आज आपण आपल्या आईबापांला आणि घरादाराला अंतरलो ! कुसुमच्या मनावर देखील मोहनी पाडण्याची त्यानें काही युक्ति केली असली पाहिजे. नाहीं तर तिचा जवि त्याच्यासाठीं एवढा कां तळमळावा ?

तथापि मधुकराच्या कुटिल नीतीची त्याला नीटशी कल्पना होईना. पण त्याचमुळे त्याला ती अधिक भयंकर वाटू लागली. त्याला या वेळीं सर्व जग म्हणजे शुद्ध लबाडीचा बाजार वाटूं लागला. त्यांत फक्त एक स्वामीजीच त्याला उद्धारकर्ते वाटले !

अशा स्थितींत आणखी दोन दिवस गेले. तिसरे दिवशीं मधुकर पुण्यांत येऊन दाखल झाला. तो विजयाला भेटण्यापूर्वींच तमण्णाकडून त्याला त्याच्यासबंधाची साधारण हकीकत कळली होती. तो विजयाकडे आल्याबरोबर त्याला म्हणाला, " फार चांगला माणूस आहेस तूं. इतके दिवस हॉटेलांत पडून राहिलास, पण तुझ्यानें एक घर भाड्याने घेववलें नाहीं. चल ऊठ ! "

मधुकराच्या या दांडग्या इच्छाशक्तीपुढे विजयाचें दुर्बल हृदय वांकलें !

तो मधुकराला म्हणाला, "कुठें चलावयाचें ?"

मधुकरः—मी एक भाड्यानें घर ठरवून आलों आहें. गाडी दारांत उभी आहे. येथें तुला "थांबा" म्हणावयाला कोणी नाहीं. पण "चल ऊठ" म्हणावयाला मात्र बंदा हजर आहे.

विजयः—(विस्मयानें) पण तूं येथें आलास कधीं आणि घर भाड्यानें घेतलेंस कधीं ?

मधुकरः——मी पहाटे मद्रास मेलनें आलों आणि तमण्णाकडून एकंदर हकीकत कळल्याबरोबर लागलेंच घर पाहिलें.

विजयः——मजवर फिर्याद झाल्याचे तुला कळले ?

मधुकरः——होय. पण त्याबद्दल तुला चिंता वाहण्याचे कारण नाहीं. कुसुम सज्ञान आहे. ती आपल्या इच्छेला येईल ते करावयास पूर्ण मुखत्यार आहे. तिचा पुनर्विवाह रोकण्याचा किंवा तिला आपल्या घरी घेऊन जाण्याचा त्याला बिलकूल अधिकार नाही.

पण त्याच्या या भाषणाने विजयाला बिलकूल आनद वाटला नाहीं. हें सारे त्याच्या इच्छेच्याविरुद्ध घडून आले. तो स्वामीजीकडे जाऊन राहण्यासाठीं अगदीं वेडावला होता. पण मधुकराने एकाएकीं येऊन सगळी घाण केली ! पण कुसुम त्याचे भाषण अगदी लक्षपूर्वक ऐकत आहे आणि त्याच्या भेटीने तिच्या नसानसांतून आनद पाझरत आहे, हें पाहून तर त्याचें मन अधिकच विषण्ण झाले !

मधुकर त्या दोघांकडेही लक्ष न देतां घरातील कर्त्या माणसाप्रमाणें म्हणाला, " कोर्टातले प्रकरण मिटतांच तुमचा विवाह लागेल; पण मला एक मोठी अडचण दिसत आहे. आज किती तरी दिवसांपासून मी तिच्यासबधीं सारखा विचार करीत आहे. "

कुसुम त्याजकडे बावरलेल्या दृष्टीनें पाहू लागली.

विजयानें विचारले, " कसली अडचण ? "

मधुकरः——तुमचा विवाह कोणत्या पद्धतीने करावयाचा ? प्रचलित हिंदुपद्धतीनें विवाह करण्यांत दोन अडचणी आहेत. एक, हा विवाह लावावयास जुन्या विचाराचे पुरोहित मिळणार नाहींत. एकही भट हे कार्य करावयास कबूल होणार नाहीं; उलट विरोधच करील. बरे, यदाकदाचित असा एखादा भट सांपडलाच, तर अग्नीला देव मानून त्याच्यापुढें विवाहाची शपथ घ्यावी लागेल, हीच दुसरी अडचण. कारण, आपल्या कार्यासाठीं अग्नीला देव मानणें म्हणजे आपल्या सदसद्विवेकबुद्धीचा निखालस खून करणें होय. बरें, अग्नीला साक्ष ठेवून विवाह करू नये, तर तो विवाह हिंदुधर्मपद्धतीप्रमाणें खरा ठरत नाहीं. ब्राह्मपद्धतीप्रमाणे विवाहविधि

करून तो रजिष्टर केला, तर चालण्यासारखें आहे. पण त्यांतसुद्धां एक गोम आहेच. विवाह रजिष्टर करतेवेळीं आपण हिंदु नाहीं अशी शपथ विवाहित वधुवरांना घ्यावी लागते. हाही सदसद्विवेकबुद्धीचा तितकाच भयंकर खून होय. आम्ही किती झालों तरी हिंदु आहोंत. आमचा एवढा भव्य गतेतिहास सोडावयाला आम्ही तयार नाहीं. पण तें कांहीं असो; तुम्ही अगदीं निश्चिंत असा. मी यांतून एखादा योग्य मार्ग काढितों. सध्यां येथून चलां.

मधुकर बोलल्याप्रमाणे खरोखरच करील असा कुसुमचा भरंवसा असल्यामुळे, ती त्याच्या आश्वासनानें निश्चित झाली. विजयाला मात्र यांतहि त्याचें कारस्थान दिसू लागले. विवाहाच्या बाबतींत त्याने ज्या अडचणी दाखविल्या, त्यामुळे तर आपला विवाह लागू नये असें त्याच्याच मनांत असावे अशाहि त्याला शंका आली.

थोडक्याच वेळांत ती सर्व मंडळी गाडीत बसून मधुकरानें घेतलेल्या घराकडे रवाना झाली.

विजयाला आतां पहिल्यासारखा मधुकराचा विश्वास वाटत नव्हता. तथापि त्याचें दुबळें मन त्याचा संबध सोडावयाला तयार नव्हतें. तो मनांतल्या मनांत मधुकरावर वाटेल तेवढा चडफडत होता, तरी आपली नाखुषी बाहेर व्यक्त करण्याची त्याला छाती होत नव्हती. यामुळे त्याचा रोष समुद्रांतल्या वडवानळाप्रमाणे पोटांतल्या पोटांतच धुमसत राहिला होता.

# प्रकरण ३६ वें.

## गृहत्याग !

मनोहरबुवांनीं लावलेल्या फिर्यादीचा अखेर एकदांचा निकाल झाला. त्यांत विजयाचाच विजय झाला. आतां कुसुमबरोबर विवाह लावावयाला त्याला कोणत्याही प्रकारची हरकत राहिली नव्हती. पण या फिर्यादीच्या भानगडीमुळे विजयचे मन संसाराच्या बाबतीत अधिकच विरक्त झाले. कोर्टाचे रोजचे हेलपाटे, एका तरुणीच्या बाबतींतील केसमध्ये आरोपी या नात्याने सगळ्या लोकांसमोर मॅजिस्ट्रेटपुढें उभे राहणे, प्रेक्षकाच्या दृष्टींचे आघात, आणि या सर्वांहूनही अपमानस्पद प्रकार म्हणजे विरुद्ध बाजूच्या वकिलाच्या उलट तपासणीतील नाहीं नाहीं ते प्रश्न, यांमुळे त्याचं डोकं अगदी भणाणून गेले. या प्रत्येक गोष्टीत त्याला ईश्वरी निषेधाचा संकेत दिसत होता. कुसुमच्या मनाचे समाधान मात्र अद्यापिही ढळले नव्हते, विजयाच्या प्रेमाच्या आशेने तिने तो सर्व अपमान आणि ती सर्व दगदग मुकाट्याने सहन केली.

मुकदमा चालू असतानांच मधुकराने त्या दोघाचा विवाह कोणत्या पद्धतीने घडवून आणावा यासबंधी पुष्कळ विचार केला. पण त्याला निर्दोष असा मार्ग एकही आढळेना. अखेर तो त्रासून आपल्या मनाशी म्हणाला, "काय आश्चर्य आहे ! ब्राह्मसमाजाचा कायदा असा कां बनविला गेला कळत नाहीं. बरे, हा कायदा इतके दिवस अस्तित्वांत असूनही त्यांतले व्यंग काढून टाकावयाची अद्यापि कोणालाही आवश्यकता दिसत नाही असो. जे घडले नाहीं त्याबद्दल खेद करून उपयोग काय? आपणच कांही तरी उपाय काढिला पाहिजे."

पण मधुकराने पुष्कळ डोकें खाजविले तरी त्याला निर्दोष उपाय असा कोणताच दिसेना. अखेर तो त्रासून आपल्या मनाशीं म्हणाला, "मग काय या दोघांचा विवाहच लागणे शक्य नाहीं ? होणार तरी का

सदसद्विवेकबुद्धीच्याविरुद्ध कोणतीही गोष्ट करणे मधुकराला काल-यत्रीही पसत पडणे शक्य नव्हते.

याप्रमाणे मधुकर इकडे या घोर चिंतेत मग्न असतांना, विजय दर-रोज स्वामींच्या आश्रमात जाऊन त्यांच्याशी बिनघोर मनाने वेदान्तचर्चा करित होता. मधुकराला या गोष्टीची गधवार्ताही नव्हती. पण कुसुमला ही गोष्ट टाऊक असल्यामुळे हिचा परिणाम पुढे काय होईल हा विचार तिच्या मनांत येऊन. तिचें मन क्षणोक्षणीं साशक होत होते. अखेर एके दिवशी तिने विजय असाच स्वामीच्या मठात गेला असतांना मधुकराजवळ त्या-सबधाची चर्चा सुरू केली. ती म्हणाली, " आपले स्नेही आजकाल कोठें जात असतात याची आपल्याला काही कल्पना आहे का ? "

कुसुमची दुःखी मुद्रा पाहून मधुकर मनातल्या मनांत चरकला आणि म्हणाला, " नाहीं. का बरे ? कुठे जात असतो ? "

कुसुमः—एका सन्याशाच्या आश्रमात. त्याचाही सन्यासी व्हावयाचा विचार आहे. "

तिचे हे भाषण ऐकून मधुकर मोठ्याने खदग्वदा हसला आणि म्हणाला, " विजय जर खरोखरीच सन्यासी होणार असला, तर त्याचे कपडे भगवे करावयाला आणि त्याचे यमनियम अमलांत आणावयाला मलाही त्याजबरोबर सन्यासी व्हावे लागेल. कदाचित् तुलासुद्धां सन्यासिनी होण्याची आवश्यकता उत्पन्न होईल. "

कुसुमः—आपण हा विषय थट्टेवारी घालवीत आहा. पण मला खरोखरीच मोठी भीति वाटत आहे. ते अलीकडे रात्रंदिवस सन्याससबधीच विचार करीत असतात. मला देखील सन्यासिनी हो म्हणून म्हणतात ! त्यांच्या गुरूने त्यांना अशी आज्ञा केली आहे.

मधुकरः—त्याचे गुरू ? त्याने गुरू कधी केला ? वाः ! एकदरींत स्वारी माझ्यापश्चात् गुरू करूनही बसली तर ! या गुरूचें नांव काय ?

कुसुमः—मला त्यांचे नांव ठाऊक नाहीं. पण बंडगार्डनजवळ त्यांचा आश्रम आहे. त्या आश्रमाकडे हे रोज जातात. आरंभी त्यांना ~डे तमण्णादादांनीं नेले होते. त्यांचा विचार तेथे कायमचेंच जाऊन

रहावे असा आहे. मलाही आपल्याबरोबर येण्याविषयीं आग्रह करतात. मला वाटते ते, लौकरच तेथे जाऊन राहतील.

मधुकराने एकदां या स्वामींना पाहिले होते. त्यांच्या ठिकाणीं दांडगी आकर्षणशक्ति असावी हें त्यांना पाहिल्याबरोबरच मधुकराने ओळखले होते. शेकडो शिक्षित तरुण त्याचे अनुयायी होत आहेत, हेंही मधुकराला ठाऊक होतें. याच प्रवाहांत सांपडून उद्भ्रांत चित्त झालेला विजयही स्वामीजींच्या जाळ्यांत सांपडला असला तर त्यांत काही आश्चर्य नाही! असे मधुकराला वाटले.

या विचाराने मधुकराचे चित्त फारच अस्वस्थ झाले. तथापि बाहेरून शांतपणा कायम ठेवून तो कुसुमला म्हणाला, " कांहीं तरी वेड्यासारखे तू बोलत आहेस झाले. विजय सन्यासी होणार? तूं आपली निश्चिंत रहा. मी लौकरच तुझ्या या जगली पोपटाला पिंजऱ्यांत अडकावून तुझ्या स्वाधीन करतो."

त्याच्या या आश्वासनाने कुसुमची चर्या पुन्हा प्रफुल्लित झाली. मधुकराच्या अंतःकरणाला मात्र अमगल शकांच्या मेघांनी घेरून टाकिले. त्याचा पुनर्विवाह शक्य तितक्या लौकर उरकून घ्यावा असा त्याचा आतां अगदीं निश्चय झाला. त्याप्रमाणे नतर विजयाची भेट होताच तो त्याला म्हणाला, " विजय, मीं पुष्कळ विचार केला; पण तुमचा विवाह कोणत्या पद्धतीने करावा हे अद्यापिही मला सुचत नाहीं. तुला कोणता मार्ग आवडतो हे तूच सांग; म्हणजे मी त्याप्रमाणे व्यवस्था करतो."

विजय मान हालवून म्हणाला, " मला मुळी विवाहच करावयाचा नाहीं."

मधुकराने त्याला विवाहाला तयार राहण्याची आज्ञा केली, असती तर त्याची ना म्हणण्याची छाती होतीना; पण मधुकराने तसे न करतां त्याच्यावर विवाहाचा मार्ग निवडण्याचाही बोजा टाकल्यामुळे त्याने मान हिसकली. पण त्याच्या या उत्तराने मधुकराला अतिशय राग आला आणि त्या भरांत तो विजयाला म्हणाला, " मूर्खा, काय बोलतोस हे? हे बोलावयाला तुला लाज वाटत नाहीं! चांगल्या घराण्यांतली मुलगी इतक्या

आणून, आतां तिच्याशीं मी विवाह करीत नाहीं म्हणतोस! ही काय माणुसकी झाली?"

पण त्याच्या या भाषणाने विजय अतिशयच चिडला आणि म्हणाला, "चांगल्या घराण्यांतल्या मुलीला इतक्या दूर आणण्याची जबाबदारी काय मजवर आहे? माझ्या मनोवृत्तीत फुंकर घालून तूच तर हा वणवा पेटविलास! मी आतां शुद्धीवर आलो! तुझें कुसुमवर प्रेम आहे आणि तीही उलट तुझ्यावर प्रेम करीत आहे. मजवर तिचे प्रेम मुळीच नाही. तेव्हां तूंच तिच्याशीं विवाह लावणे रास्त आहे."

जो विद्वेषाग्नि आज कित्येक दिवस विजयाच्या मनांत हळुहळू साठवत गेला होता तो आज एकदम बाहेर पडला, आणि त्याने आतांपर्यंतच्या त्या उभयतांमधील सुखाची आणि मित्रप्रेमाची राखरांगोळी करून टाकली. ही आग विझवावयाला किती तरी अश्रुजल लागले.

त्याच्या या भाषणाने मधुकर चकित झाला. कुसुमच्या पुढे असे शब्द बोलावयाचे त्याला धैर्य तरी कसे झाले याचीच त्याला कल्पना होईना. हे शब्द विजयाच्या तोंडून निघाले असतील हेच त्याला कांही वेळ खरें वाटेना. आपलें कुसुमवर प्रेम आहे याची खुद्द मधुकराला स्वतःलाच कल्पना नव्हती. पण विजयाच्या तोंडून वरील उद्गार बाहेर निघाल्यानतर त्यानें आपल्या हृदयाची तपासणी केली. त्या वेळीं आपल्या हृदयाच्या अगदी गूढ प्रदेशांत त्या प्रेमाचे अत्यत सूक्ष्म बीज असल्याचे त्याला आढळून आले. त्याची आणि कुसुमची ज्या वेळी प्रथम भेट झाली त्या वेळीं हे बीज त्याच्या हृदयांत अकुरित झालें होते. पुढे त्याच्या पित्याने तिच्याशी विवाह लावण्याची जेव्हां सूचना केली त्या वेळीं तर तें थोडेसे पल्लवितही झालें होते. मधुकराच्या डोळ्यांपुढें या वेळीं ती रमणीय दृश्ये उभीं राहिली. विजयाच्या निर्दय आघातानें त्याच्या अतःकरणांत ती गतस्मृति पुन्हां निनादित झाली. त्यानें कुसुमकडे पाहिलें, तों ती या निष्ठुर आघाताने मृतप्राय होऊन गेली असल्याचे त्याला दिसून आलें. लज्जा, अपमान आणि संताप या तिन्हीं विकारांचा तिच्या हृदयांत हलकल्लोळ उडून, त्यांच्या छटा तिच्य चर्येवर दिसूं लागल्या. या रमणीय फुलाला त्या नीच माणसाच्या हातून

सोडविण्याचा उपाय आणि साधनही आपल्या हातीं आहे असा विचार मधुकराच्या मनांत उभा राहिला.

तो विजयाकडे पाहून सतापाने म्हणाला, " मूर्खा, तू जरी अशा अधमपणाने हिचा त्याग करावयाला तयार झालास तरी मी असें करणार नाहीं. कुसुम जर मला पतकरीत असेल, तर मी तिचे पाणीग्रहण करावयाला तयार आहे. "

त्याचें हे भाषण ऐकून विजय म्हणाला, " बस. मला हेच पाहिजे होते. आतां कुसुमच्या बाबतींत कोणतीही जबाबदारी मजवर राहिली नाहीं, हा बघ मी निघालो. "

एवढें बोलून तो त्या घराच्या बाहेर पडला.

आपल्या या वाक्याने कुसुमच्या हृदयावर दारुण आघात झाल्याचे विजयाला आढळून आले आणि त्याबद्दल त्याला नतर अतिशय पश्चात्ता-पही वाटू लागला. पण आतां त्याचा काय उपयोग ? तीर हातांतून सुटून गेला !

आज कुसुमच्या अपमानाला सीमा राहिली नव्हती. तिने आज-पर्यंत ज्याच्यासाठीं इतके दुःख सहन केले, तो आज तिला इतक्या सहजा-सहजी दुसऱ्याच्या हातीं सोंपवून गेला. मधुकरावर तिचे बधुप्रमाणे प्रेम होते, आणि उलटपक्षी त्याचेही आपणावर अशाच प्रकारचे प्रेम असावें अशी तिची कल्पना होती; पण त्याचेंही हृदय आज तिच्यापुढे उघडे झाले !

विजय तिच्या हृदयावर अशा प्रकारचा दारुण आघात करून तेथून निघून गेल्यावर क्षणैक ती हतबुद्ध बनली. त्या वेळीं तिच्या ठिकाणीं नुसती विचार करण्याचीसुद्धां शक्ति राहिली नाहीं. तिला सर्व सृष्टि अंध-कारांत आच्छन्न झाल्याप्रमाणें दिसू लागली. थोड्या वेळानें ती भानावर आली त्या वेळीं आपल्या सुखाचा आशांकुर समूळ दग्ध झाल्याचें तिला आढळून आलें.

आतां तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा वाहूं लागल्या. आप-ल्याला जगांत आतां कोणाचाही आश्रय राहिला नाहीं हेंही तिला स्पष्ट आढळून आले. विजयानें तर तिला सोडलेंच; पण मधुकरावरही विस-

बून राहण्याची सोय उरली नाहीं हेही तिला आढळून आले. या वेळीं जगाची कठोरता आणि स्वतःची दुर्बलता तिला फारच चांगल्या प्रकारे प्रतीत झाली.

अश्रुधारांनीं तिचे सगळे वक्षस्थळ ओले चिंब झाले. ती मनातल्या मनांत ईश्वराची प्रार्थना करू लागली, " हे भगवंत, तू मला अशा एखाद्या ठिकाणी नेऊन ठेव की, तेथे मी कोणाही पुरुषाला दिसणार नाही. माझी लाज तूच राख. माझे सर्व दुःख तूच निवारण कर. तू मृत्युरूपानें अवतरून मला आपल्याजवळ ने. "

आपल्या भाषणाने कुसुमच्या हृदयावर केवढा आघात झाला हे आतां मधुकराला स्पष्टपणे कळून चुकले. या अपराधाची तिच्याजवळ क्षमा मागण्याचे देखील धैर्य त्याला होईना. तो अगदी किंकर्तव्यमूढ बनून गेला !

कल्पनासृष्टि आणि खरीखुरी सृष्टि यांत केवळ जमीनअस्मानाचे अंतर आहे हें थोड्याच वेळाने विजयाला कळून चुकले. त्याबरोबर त्याचे कमकुवत मन चकरा खाऊ लागले. सरितापृष्ठावर नौकेचे ललितनृत्य अवलोकन करून त्याला तो केवळ आनंदविलास वाटला. जलकेलींत केवळ स्वर्गीयताच भरून राहिली आहे अशी त्याची कल्पना झाली. पण नौकेंत पाय ठेवतांच त्याला या कल्पनेतील मृगजळाचा अनुभव आला.

⌊चंद्रम्याजवळ अमृत तो दूर आहे तोंपर्यंतच, जवळ गेल्यावर नाही. कल्पना आणि कर्तव्य यांच्यांत फार मोठें अंतर आहे. कर्तव्य म्हणजे आनंदसमाधींत डुलणे नव्हे, ती एक तीव्र अशी जागृति आहे. नावेंत बसल्यावर एका हाताने वल्हे मारलें पाहिजे, तर दुसऱ्या हाताने तिच्यांत शिरणारे पाणी बाहेर काढून दिले पाहिजे. एका हाताच्या कर्तव्यांत जरी चूक झाली, तरी नौका रसातळाला गेलीच म्हणून समजावे. जराशी असावधनता, जराशी भूल, जरासा झोला, तिचा सर्वनाश करण्यास पुरेसा आहे.⌋ त्याला आज आपलें आश्रयस्थान अत्यंत संकीर्ण असल्याचे दिसून आलें. तें विस्तृत कधींच नव्हतें; परंतु निरापद मात्र निःसंशय होते. इतके दिवस जीवन म्हणजे काव्याची एक बहारदार तान होय असें त्याला वाटत होतें.

परतु जीवन म्हणजे केवळ मृगजळ आहे, अशी त्याची आतां खात्री झाली. या मृगजळामागे धावून मरण्यांतच सुख आहे हेही त्याला कळून चुकले. पण तो शांतीचा भोक्ता होता; आणि ही शांति आपल्याला स्वामीजींच्याच आश्रमांत लाभेल असे त्यास वाटत होते. बिनकष्टाने मिळणाऱ्या जाड्या भरड्या अन्नावर राहण्याला तो तयार होता. कुसुमच्या वियोगाने जळणारा आपला देहही तेथेच शांत होईल, अशी त्याची समजूत होती. शिवाय, खडतर जीवनसंग्रमापेक्षां तिचा वियोगवन्हि त्याला अधिक सुसह्य वाटला.

कुसुमला आपल्याबरोबर स्वामीजींच्या आश्रमांत घेऊन जावे आणि तेथे दोघांनींही आपले जीवन अध्यात्मजनित आनदांत घालवावे, अशी विजयाची फार इच्छा होती. पण कुसुम या गोष्टीला राजी नव्हती. यामुळे तो मोठ्या पचायतीत पडला होता. पण मधुकराने तिची जबाबदारी पतकरण्याचे कबूल केल्याबरोबर त्याला हायसे वाटलें. पण दुसऱ्याच क्षणीं त्याच्या सुखाचा त्याला हेवा वाटून त्याचे अतःकरण जळू लागले. तिचा त्याग करण्यांत आपण मोठा अविचार करीत आहो हा विचार त्याच्या मनाला लवमात्रही शिवला नाहीं. उलट, तिचें जर मधुकरावर खरेंच प्रेम असले, तर त्याच्याशीं तिचा विवाह लागल्यानेच ती अधिक सुखी होईल, असें त्याला वाटले. मनुष्य जेव्हां एखादें अन्याय्य काम करावयाला तयार होतो, त्यावेळीं त्याच्या धर्मबुद्धीचे समाधान करणाऱ्या युक्त्याप्रयुक्त्याही त्याला कांहीं कमी सूचत नाहींत. आपल्या दोषांचें खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडण्यास मनुष्याचे मन नेहमींच उत्सुक असते.

साऱ्या दोषांचे खापर मधुकराच्या माथ्यावर फोडावयाची संधि मिळाल्याबरोबर विजयाच्या धर्मबुद्धीचें बरेच समाधान झालें. नंतर स्वामीजींच्या आश्रमांत जाण्यासाठीं तो आपल्या सामानसुमानाची बांधाबांधी करूं लागला. पण त्याच वेळीं आपलें अतःकरणही कोणी खेंचून बांधीत आहे, असें त्याला आढळून आले. त्याचे हृदय विव्हल झालें ! पण जसें जाण्यांत दुःख, तसेंच राहण्यांतही त्याला शरम वाटूं लागली. तो आपल्या मनाशीं म्हणूं लागला, " मधुकर पहिल्यासारखाच मला आतांही प्रतिबंध

करील, कुसुमही डोळ्यांत आंसवे आणून माझ्या मार्गांत आडवी येईल, तर किती बरे होईल!" असे कांहीं व्हावे म्हणून तो मुद्दाम रेंगाळू लागला. पण तसे घडून आले नाहीं. कुसुमला सोडून जाण्यांत केवढे दुःख आहे, याची त्याला आतां मात्र यथार्थ कल्पना झाली.

जेथे युक्तिवादाचा उपयोग होत नाहीं आणि हृदयगत प्रेमालाही जेथे पायाखाली तुडविलें जाते, तेथे दयेची भिक्षा मागावयास तयार होणाऱ्यापैकीं मधुकर आणि कुसुम ही दोघेही नव्हती. स्वाभिमानामुळे कुसुम आणि लज्जेमुळे मधुकर त्याच्याशीं कोणत्याही प्रकारे अनुरोध करावयाला तयार नव्हता.

आपल्या मार्गांत कोणीच अडथळा करीत नाही हे पाहिल्यावर विजयाच्या स्वाभिमानाला जबरदस्त धक्का बसला आणि तशाच स्थितीत तो घराच्या बाहेर पडला. तथापि आपल्याला अजूनही कोणाकडून तरी विरोध होईल ही त्याची आशा अद्यापि कायमच होती. त्यानतर रस्त्यांत थोडा वेळ इकडे तिकडे भटकल्यावर त्याने आपल्या मनातली ती आशा काढून टाकली; आणि आतां तो गाडीत बसणार, इतक्यांत कुसुम त्याच्याजवळ येऊन म्हणाली, "थांबा, मी आपल्याबरोबर येते."

आता विजयाच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. तरी पण हृदयांतल्या तारुण्याच्या इच्छा तशाच दाबून टाकून आपणाबरोबर सन्यासिनी बनावयाला कशाला येतेस? मधुकराबरोबर विवाह लावून आयुष्य आनदांत काढावयाचा तुझा मार्ग तुला मोकळा आहे, असे तिला म्हणावें असें त्याच्या मनांत आले. पण न जाणो, यामुळे तिच्या स्वाभिमानाला धक्का बसून आपल्याबरोबर यावयाचा तिचा विचार खरोखरच नाहींसा व्हावयाचा, असे विचार त्याच्या मनांत येऊन त्यानें हा मोह टाळला. ती स्वामीजींच्या आश्रमांत आपल्याबरोबर राहिली तर निदान तिचे दर्शनसौख्य तरी आपल्याला लाभेल, या कल्पनेने देखील विजयाच्या मनाला पराकाष्ठेचा आनंद झाला. पण आपल्या विरक्त वृत्तीस शोभणार नाहीं म्हणून त्यानें हा आनंद बाहेर दिसू दिला नाहीं. एवढेंच नव्हे, तर चर्या जेवढी ठेवितां येईल तेवढी त्याने गभीर ठेवली.

कुसुम कोणत्याही स्थितींत पूर्णतया निराश होणारी बालिका नव्हती. नैराश्याचा पगडा बसू देण्यास तिचे तेजस्वी मन कधींही राजी होत नसे. त्याचप्रमाणे ती आशेला एकदम वश होत नव्हती. आपल्याला आज आपल्या प्रियकराचें सर्वस्व लाभत नाहीं तर नाही, निदान त्याच्या सहवासाला तरी आपण का मुकावे असा विचार तिने केला आणि त्याच्याबरोबर जावयाला ती तयार झाली. प्रतिकूल परिस्थितीमुळे त्याचा प्रेमौघ वेगहीन झाला आहे, त्याला आपण आपल्या प्रयत्नाने गति दिली, तर तो पुनः पहिल्याचसारखा वेगवान होणे शक्य आहे. अशी तिला आशा होती. रक्तहीन रोग्याच्या शरिरात दुसऱ्याचे ताज रक्त घालणे जसे त्याच्या बचावाच्या दृष्टीने अवश्यक असते, तसेच त्याच्या प्रेमाच्या बाबतींत आपल्याला करावयाला पाहिजे असे कुसुमने आपल्या मनाशी ठरविले. संग्राम केवढाही खडतर असो, अखेर त्यात आपल्या प्रेमाची सरशी झालीच पाहिजे असा तिचा पक्का विश्वास होता. मात्र त्याला आपण पतकरतो हाच मार्ग पतकरला पाहिजे, दुसऱ्या मार्गाने जर आपण गेलो तर त्यांत आपला खचित नाश आहे हेही तिने जाणले.

आपला बाडबिछाना घेऊन कुसुम विजयाच्या मागोमागच गाडींत जाऊन बसली. ती आपण होऊनच विजयाच्या मागे गेली हे पाहून मधुकरच्या छातीवरील मोठे ओझे खालों उतरल्याप्रमाणे झाले. नतर आपले पूर्व हृदयबल धारण करून तो त्या दोघांच्या जवळ आला आणि त्यांना म्हणाला, "तुम्ही जातां तर जा. मी तुमची याच ठिकाणी मार्गप्रतीक्षा करीत राहतो. तुम्हांला जेव्हा वाटेल तेव्हा परत या. तुम्ही परत याल याबद्दल मला शकाच नाहीं. विजय, तुला तुझ्या आणि माझ्याही अपराधाबद्दल प्रायश्चित भोगावे लागेल हे पक्के लक्षांत ठेव."

मधुकराने शेवटचें वाक्य अगदी जोराने उच्चारले होते. त्याच्या या भाषणाने ती दोघेही जडमूढ बनली. त्यांच्याने मधुकराकडे पाहवेना. एवढेच नव्हे, तर एकमेकांकडेही पाहवेना. त्यांची शून्यदृष्टि रस्त्याकडे लागून राहिली होती. गाडी हळू हळू जात होती. मधुकर तिजकडे नुसता पाहात होता. त्याच्या हृदयांतले ते पूर्वीचे बल, तेज, दर्प, साहस.

विश्वास आणि उत्साह हीं आज कोणीकडच्या कोणीकडे नाहींशीं झालीं होतीं. तीं पुनः प्राप्त करून घ्यायाला कसलें प्रायश्चित घेतले पाहिजे हे त्याचे त्यालाच कळेना.

---

# प्रकरण ३७ वें.

## स्वामीजींच्या आश्रमांत !

स्वामीजींच्या आश्रमापाशीं विजयाची गाडी येऊन थडकली, तोंच बंगल्याच्या फाकटापाशी तमण्णाची स्वारी उभी असलेली त्याला दिसली. त्याबरोबर त्याचे आणि कुसुमचेही मुख आरक्त झाले. त्याना तोंड दाखवावयाची तमण्णालाही शरम वाटली. परतु आपली ही लाज एकीकडे गुडाळून ठेऊन तो हसत हसत विजयाला म्हणाला, "काय, बाळासाहेब, आज अगदी जोड्यानेच आलांत. पण हा सन्याशाचा आश्रम आहे. एखादे कुजवन नव्हे."

त्याच्या या हलकटपणाच्या थट्टेने विजयाच्या संतापाग्नींत तेल ओतल्याप्रमाणे झाले. पण बाह्यतः तो अत्यत शांतपणे म्हणाला, "आपल्याला घाबरण्याचे कारण नाही. धर्ममूर्ति, आम्ही दोघेही येथे सन्यास घ्यावयाला आलों आहो."

तमण्णा पुन्हा दांत काढीत काढीत म्हणाला, "हो, हेंही बरोबरच आहे. धर्ममाचरेत्."

विजयाने आपली शांत वृत्ति अद्यापही कायम ठेविली आणि म्हटलें, "आमचा विवाह झाला नाहीं. तूही सन्यास घेण्याची प्रतिज्ञा केली होतीस. चल, आतां आपण बरोबरच ही दीक्षा घेऊं."

तमण्णा पंचायतींत पडला; पण लागलींच चर्येवर गांभिर्य धारण करून म्हणाला, "तुझ्या इतकें माझें भाग्य कोठें आहे? संसाराचा

पदोपदीं निर्विवादपणें त्यांच्या लक्षांत येत होते. आपली मनःस्थिति कुसुमला कळून चुकली आहे, हेंही त्यांनीं ओळखलें; पण त्यांचा निश्चय ढासळला नाहीं. इतकेंच नव्हे तर तो उलट वाढला.

अशा स्थितींत एके दिवशीं कुसुम आपल्या खोलींत पडल्या पडल्या कविता लिहित होती. खिडकींतून येणाऱ्या वाऱ्याने उघडून ठेवलेल्या एका पुस्तकाचीं पाने आणि तिच्या डोकीवरील केस सैरावैरा धांवत होते. अशा वेळीं स्वामीजी हळूच तिच्या खोलींत घुसून तिच्या जवळ आले आणि ती लिहीत असलेला कागद त्यांनीं एकदम उचलून घेतला.

कुसुम कविता लिहिण्यांत अगदी गुग झाली असल्यामुळें, तिला स्वामीजींच्या येण्याची चाहूल बिलकूल लागली नाहीं. पण स्वामीजींनीं कागद उचलल्याबरोबर सर्पाला भिऊन ज्याप्रमाणे मनुष्य उठावा, त्याप्रमाणें ती एकदम उठून उभी राहिली. तिने आपला पदर आणि केशपाश सांवरून स्वामीजींकडे पाहिले, तों त्यांच्या नेत्रांतून अग्निकणांचाच जणू काय वर्षाव होत आहे असे तिला आढळून आलें. पण तिच्या या मनःस्थितिकडे बिलकूल लक्ष न देतां स्वामीजी म्हणाले, " वः! सन्यासिनीचें व्रत तर फार उत्कृष्ट चालविलें आहे, राधिका देवी ? "

स्वामीजीच्या वर्तनानें कुसुम अतिशय सतापली; पण ती इतकेंच म्हणाली, "आपण गुरू आहां की चोर, स्वामीजी ? " पण तिच्या या मर्माघातानें स्वामी बिलकूल न रागावतां म्हणाले, " मी गुरू आहे. पण शिष्य जेव्हां चोरून अकर्म करूं लागतात, तेव्हां त्यांचा त्याच मार्गानें तपास लावणें गुरूचें कर्तव्य आहे. तू काय हा सन्यासिनीचा धर्म पाळीत आहेस ? "

कुसुम आतां त्याच्या गुरुपणाची बिलकूल परवां न कारितां म्हणाली, " मी एक वेळ नाहीं, हजार वेळ सांगते कीं, मी सन्यासिनी नाही. मला आपण आपल्या आश्रमांतून खुशाल बाहेर घालवून द्या. पण अशा प्रकारें माझा अपमान करण्याचा आपल्याला बिलकूल अधिकार नाहीं. "

एवढें बोलून आपल्या दोन्ही हातांना तोंड झांकून ती मोठमोठ्यानें रडूं लागली. हें पाहून स्वामीजी अगदीं शरमून म्हणाले, " रड ! रड !

राधिकादेवी ! रड ! आणि अश्रूजलानें आपले हे सगळे पाप धुवून काढ. धर्माचा मार्ग फार अवघड आहे. तो चालतांना मनांतले सगळे गबाळ दूर फेकून बोजा हलका केलाच पाहिजे; नाहीं तर इच्छित स्थळी जाऊन पोचणे अशक्य आहे. हृदयांतील तळमळ दूर होत नसेल तर भागवत वाच, रामायण वाच, महाभारत वाच; कविता करावयाची असेल तर भगवद्गुणवर्णनपर कर; पण अशा प्रकारच्या वासनाप्रवाहात उडी घेऊं नकोस."

कुसुम एके बाजूला तोंड करून उभी होती. ते हिवाळ्याचे दिवस होते, तरी तिचे अंग घामाने भिजून गेले होते. स्वामीजीच्या निर्लज्ज-पणाची आणि दुर्वासनेची तिला अगदी चीड आली होती.

तिने जेव्हां स्वामीजीकडे तोंड फिरविले, त्या वेळी ते शेंदराप्रमाणें आरक्त बनलेलें स्वामीजींना दिसून आले.

ती निग्रहाने स्वामीजींना म्हणाली, "आपण या क्षणीं माझ्या खोली-तून चालते व्हा. नाही तर मी आतां मोठ्याने ओरडून सगळ्यांना येथे गोळा करीन."

स्वामीजी अगदीं गांगरून म्हणाले, "ठीक आहे. तुझा राग या वेळी अनिवार झाला आहे. मी जातो. तू शांत हो. योग्य वेळी तू यांत कसा अन्याय केलास हे मी तुला दाखवून देईन."

एवढे बोलून हळूहळू मागें सरत स्वामीजी तेथून निघून गेले.

ते गेल्याबरोबर कुसुम आपल्या बिछान्यावर जाऊन पडली आणि उशींत तोंड खुपसून निःशब्दपणे अश्रुमोचन करू लागली.

# प्रकरण ४१ वें.

## गैरसमज !

या प्रकरणानतर कुसुमचें मन अतिशय शंकाकुल झालें. स्वामीजी कोणत्या वेळीं आपल्या खोलींत घुसतील आणि काय करतील व काय नाहीं याची तिला भीति वाटूं लागली. खोलीला आंतून कडी वगैरे कांही नसल्यामुळे तिला तेथें राहूनच त्याचा पक्का बदोबस्त करतां येणें शक्य नव्हतें. अशा स्थितींत येथे एक घटकाही सुरक्षितपणे आपणास राहतां येणे शक्य नाहीं अशी तिची खातरी झाली. त्याची आसक्त दृष्टी आपणास चोहोंकडून ग्रासावयास कशी तयार आहे, हें आतां तिनें प्रत्यक्षच पाहिलें होतें. जरासें कोठे खुट्ट झाल्याबरोबर तिचे मन भयभीत होत होतें. यामुळें तिला निश्चिंतपणे विश्रांति किंवा निर्भयपणे झोप घेणे अगदीं अशक्य झालें. इतकेंच नव्हे, तर या भीतिमुळें स्वतःच्या स्थितीचा विचार करण्यासाठीं तिनें एकांतांत बसावयाचेंही टाळलें.

त्या दिवसापासून चार पांच दिवस स्वामीजी तिला मुळींच भेटले नाहींत. ते त्या अवधींत भजनपूजनांतच मग्न झाले होते.

एके दिवशीं त्यांनीं विजयाला आपल्याकडे बोलावून घेतले आणि कुसुमला बोलावून आणण्यासाठीं नर्मदेला तिजकडे पाठविले.

नर्मदा तिजकडे आल्यावर कुसुम तिला म्हणाली, "तेथे कोण कोण आहे, ताई ?"

नर्मदाः—कोणी नाहीं. एकटे स्वामीजी आहेत. बाळासाहेबांना बोलावणें पाठविलें आहे.

आपला प्रियकर तेथें येणार आहे हें कुसुमला कळल्यावर ती नर्मदेबरोबर निश्चिंतपणें स्वामीजीकडे गेली.

ती स्वामीजीजवळ जाऊन पोंचेपर्यंत विजय तेथें येऊन बसला होता आणि स्वामीजी त्याला म्हणत होते, " हें पहा बाळासाहेब, मीं तुमच्यासंबंधानें पुष्कळ विचार करून पाहिलें; तेव्हां मला आढळून आलें कीं, येथें

रहाण्यांत तुमचें मुळींच कल्याण नाहीं. तुम्हीं कुसुमसह पुन्हां गृहस्थाश्रम पतकरावा."

स्वामीजींच्या तोंडचे हे शब्द ऐकल्याबरोबर कुसुमनें त्यांच्या पायां-वर डोकें ठेविलें आणि नंतर ती उत्सुक मनानें एकीकडे जाऊन ऐकत बसली.

विजयानें एक वेळ कुसुमकडे न्याहाळून पाहिलें. नंतर तो स्वामी-जींना म्हणाला, " मीं असा कोणता अपराध केला म्हणून आपण मला अशी कठोर आज्ञा करीत आहां ? ससारांत मला कोठें आश्रय मिळाला नाहीं म्हणूनच मीं आपल्या चरणांचा आश्रय घेतला आणि आतां आप-णही मला दूर ढकलता ? "

हे बोलत असतांना विजयाच्या नेत्रांतून अश्रुधारा गळूं लागल्या.

स्वामीजी यानंतर कांहींच बोलले नाहींत.

थोड्या वेळानें कुसुम तेथून निघून गेली. ती गेल्यावर विजय स्वामी-जींना प्रणाम करून उठून उभा राहिला. स्वामीजी एक दीर्घ निश्वास सोडून त्याजकडे पाहून म्हणाले, " हें पहा, विजय, तुझें मन जरी वैरा-ग्यानें भरलें असलें, तरी कुसुमच्या मनाला त्याचा गंधही लागलेला नाहीं. म्हणून तुम्हां उभयतांचें येथें राहणें कल्याणप्रद होणार नाहीं असें मला वाटते. तू जर तिची अन्यत्र कोठें रहाण्याची व्यवस्था करीत असशील, तर तुला येथें राहूं द्यावयाला माझी हरकत नाहीं."

स्वामींचें हें भाषण ऐकून विजयाला कुसुमचा अगदीं राग आला. निःसंशय तिच्या हातून कांहीं तरी आश्रमाच्या नियमाविरुद्ध वर्तन घडलें असावें, म्हणूनच तिला येथे राहूं न देणें स्वामीजींना इष्ट वाटत नसावें, आणि हेंच कारण आपल्याही उच्चाटणाच्या मुळाशीं असावें अशी आतां त्याची खातरी झाली; आणि त्याच क्षणीं कुसुमकडे जाऊन तो तिला संतापानें म्हणाला, " कुसुम !"

आश्रमांत आल्यापासून विजय आजपर्यंत एकदांही कुसुमला भेटला नव्हता. किंवा बोललाही नव्हता. यामुळें आतांची त्याची हाक ऐकून तिचा आनंद

गगनांत मावेनासा झाला. स्वामीजींनीं त्याला केलेल्या आशेमुळें तो आपल्याला परत गृहस्थाश्रमांत घेऊन जाण्यासाठींच बोलावीत आहे असें तिला वाटलें आणि ती चटकन् आपल्या खोलीच्या बाहेर आली. या वेळीं तिच्या मुखावर लज्जेची आणि स्मिताची मनोहर छटा विलसत होती. तिची ती मनोहर चर्या पाहून विजयाचा सर्व संताप क्षणैक नष्ट झाला. तिच्या समागमसौख्याचें प्रलोभनही त्याच्या मनांत क्षणैक उत्पन्न झालें. पण त्याच्यानें तेथें उभें राहवलें नाहीं. तो तिला कांहीं न बोलतां तेथून जावयास निघाला. हा प्रकार पाहून कुसुम चकित झाली आणि त्याला म्हणाली, " आपण मला कशाकरितां हाक मारली होती ? "

विजयानें एक वेळ तिजकडे पाहिलें. नंतर उभा राहून तो म्हणाला, "तूं काय आश्रमाचे नियम पाळीत नाहींस ? "

त्याच्या या प्रश्नानें कुसुमला अतिशय संताप आला. स्वामीजींनीं आपणासंबधीं याला कांहीं तरी खोटेनाटे सांगितलें असावें, म्हणूनच त्यानें आपल्याला असा प्रश्न केला असावा असे तिला वाटलें. ती सतप्त स्वरानें म्हणाली, " नाहीं असें कोण म्हणतें ? "

विजयः--कोणी का म्हणेना ? पण हें खरे आहे काय ?

कुसुमः--मुळींच नाहीं !

एवढें बोलून कुसुम आपल्या खोलींत निघून गेली.

थोड्या वेळानें विजयानें पाहिलें, तों ती बिछान्यावर पडून सारखी अश्रुमोचन करीत आहे. तो देखावा पहात तो तसाच कांहीं वेळ जागच्याजागीं उभा होता. नंतर एक दीर्घ निश्वास सोडून तो तेथून निघून गेला.

# प्रकरण ४२ वें.

## अपितपोवर्धते !

विजय आपल्या खोलीकडे जावयाला निघाला, तोंच वाटेत दुष्ट ग्रहाप्रमाणे उभा असलेला तमण्णा त्याला भेटला. तो विजयाला पाहून म्हणाला, " का रंगेल संन्यासीबुवा, अपि तपो वर्धते ? का रघुवशांत म्हटल्याप्रमाणें:---कालोह्यय संक्रमितु द्वितीयं। सर्वोपकारक्षममाश्रम ते " महर्षींनीं तुम्हांला गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा केली आहे. बाकी गृहस्थाश्रमाचें सर्व साहित्य तुमच्याजवळ तयारच आहे ! "

पण या हलकटपणाच्या भाषणाकडे बिलकूल लक्ष न देतां विजय आपल्या खोलींत निघून गेला.

खोलीत गेल्यावर विजय योगवासिष्ठ वाचूं लागला. त्यांतील विचारसरणी त्याला अगदीं पटली.

विजय डोक्यावरील कडीपाटाकडे दृष्टी लावून पाहू लागला. कुसुमचें निवासस्थान त्याच ठिकाणी होतें. त्याने मनांत आणिले असते तर ती त्याला लाभली असती, अजूनही लाभणे शक्य होतें. पण त्या सुखाचा त्यानें आपण होऊनच त्याग केला होता. म्हणूनच प्रस्तुतच्या दुःखामध्येंही त्याला एक प्रकारचा अभिमान वाटत होता.

पण आज त्याच्या मनाची स्थिति अशी राहिली नव्हती. योगवासिष्ठांतल्या तत्वज्ञानाला आणि उपदेशाला न जुमानतां त्याच्या मनाची तंद्री आज कुसुमकडे लागली होती. क्षणैक त्याच्या मनांत असाही विचार येई कीं, येथें अशा स्थितींत राहण्यापेक्षां कुसुमशीं विवाह करून एखादे ठिकाणीं मजुरी करीत राहण्यांत पराकाष्ठेचें सुख होईल. खरें पाहिलें तर योगवासिष्ठांतील वैराग्याचा उपदेश ग्रहण करावयाला त्याचें मन मुळांतच थाऱ्या नव्हते.

तो आपल्या मनाशीं विचार करूं लागला, " माझ्या एका साधारण प्रश्नानें कुसुमला कां बरें रडें कोसळलें ? अजूनही माझ्यावर तिचें प्रेम असेल काय ? तिच्या मनाची ती अनुसक्ति अजून तशीच कायम असेल काय ? मीं जें तिजशीं अन्यायाचरण केलें त्याबद्दल मला ती अजूनही क्षमा करील ? माझ्या हृदयांत जसा तिच्याविषयींच्या प्रेमाचा अग्नि पेटलेला आहे, तसाच तो तिच्याही हृदयांत पेटलेला असेल ? हाय गे ! अभागिनी! तू मधुकराबरोबर विवाह लावून त्याच्यापाशीं सुखानें कां राहिली नाहींस ? तू जर त्याजबरोबर विवाह करून घेतीस, तर तुझी चिंता आजच्यासारखी माझ्या धर्मसाधनेतही आड आली नसती ! तू माझ्याजवळ राहिल्यानेच मी धर्मसाधन करूं शकेन अशी माझी आरभीं कल्पना होती. पण प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत उतरल्यावर आपली ही कल्पना निखालस चुकीची आहे असें मला आढळून आले. प्रलोभनाची असली दांडगी सामग्री जवळ ठेवून तपश्चर्या करण्याचे सामर्थ्य माझ्यांत नाही; आणि ही गोष्ट मोकळ्या मनानें कबूल करावयालाही मला बिलकूल कमीपणा वाटत नाहीं. तिनें जर मधुकराशीं विवाह केला असता, तर ती अप्राप्य वस्तु म्हणून मला तिचा विसर पडणे शक्य होतें. पण आज तिला विसरणें मला अशक्य झालें आहे. छेः, ही गोष्ट शक्यच दिसत नाहीं. बस झाला हा आतां संन्यास. मी आतांच्या आतांच गुरुजींना जाऊन सांगतो, की, " गुरुजी, मला आतां हा सन्यास नको. कुसुमच्या प्राप्तीखेरीज मला इहलोकी आणि परलोकींही सुख प्राप्त व्हावयाचें नाही. "

याप्रमाणे विचार करतां करतां त्याचें हृदय कुसुमविषयींच्या अनुरागानें भरून गेलें ! नंतर एक दीर्घ निश्वास सोडून तो गुरुजींच्या भेटीला गेला.

तो स्वामीजींच्या खोलींत गेला त्या वेळीं ते डोळे झांकून आसनावर ध्यानस्थ बसले होते. विजय तेथें जरी अगदीं पक्का निश्चयच करून आला होता, तरी स्वामीजींना पाहिल्याबरोबर त्याचा निश्चय ढासळला. आपणास संन्यास नको, असें त्या साक्षात् ब्रह्मचर्याच्या मूर्तीला कसे म्हणावें असें त्याला वाटलें; तसेंच कुसुमची आपल्याला पत्निरूपानें प्राप्ति झालीच पाहिजे ही

गोष्ट त्यांना कळवावयाची तर त्याला त्याहूनही अधिक शरम वाटूं लागली. नुसते हे विचार मनांत येतांच त्याचें तोंड लज्जेनें आरक्त झालें आणि तो त्याच पावलीं परत आपल्या खोलींत आला. तेथें आल्यावर त्यानें भगवद्गीतेचें पुस्तक काढिलें आणि त्यांतील पुढील श्लोक तो वाचूं लागला.

असंशयं महाबाहो मनोदुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येन च गृह्यते ॥
यतो यतो निश्चलति मनो निश्चलमास्थिरम् ।
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येववशंनयेत् ॥

यांत श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणतात, " हे महावीस अर्जुना, हें चंचल मन निसंशय दुर्निग्रह आहे. त्याचा निग्रह करणें हें अत्यंत कष्टाचें काम आहे. अभ्यास आणि वैराग्य यांच्या योगानेंच त्याचें दमन होते. हें अस्थिर मन जेथें जाईल त्या त्या ठिकाणाहून खेंचून आणून त्याला आत्म्याच्या ठिकाणीं रत केलें पाहिजे आणि अशा रीतीनें त्याला काबूत ठेविलें पाहिजे. "

हा उपदेश विजयाला पटला, आणि नंतर आपलें चंचल मन काबूत आणण्यासाठीं त्यानें लौकरच कोठें तरी अरण्यांत जाऊन तपश्चर्या करण्याचें ठरविलें. पण त्याकरितां त्याला दूर जाण्याची जरूरी नव्हती. स्वामीजींनीं आपल्या आश्रमाच्या आवरांतच अशा लोकांकरितां दोन चार गुहा तयार केल्या होत्या. तेथें दुसऱ्या कोणालाही जावयाची परवानगी नव्हती. त्यांपैकीं एका गुहेंत राहण्याचें त्यानें ठरविलें. तेथें राहणाऱ्या तपस्व्यास आश्रमांतीलच कोणी तरी संन्यासी अन्नपाणी पोंचते करी. विजय गुहेंत बसून तपश्चर्या करणार ही बातमी थोड्याच वेळांत आश्रमांत पसरली. ती ऐकून कुसुम अतिशयच घाबरली.

# प्रकरण ४२ वें.

## विजयाची तसबीर !

स्वामीजींचें मन आज कित्येक दिवसांपासून फार अस्वस्थ झालें आहे, हे आश्रमांतील सर्व शिष्यिशिष्यणींना कळून चुकलें होतें. ते कसल्या तरी मोठ्या चिंतेंत मग्न असून रात्रंदिवस डोळे झांकून बसत. देवघरांतही त्यांच्या येरझारा चालू असत. पहिल्यासारखें मधुर हास्यही आतां त्यांच्या मुखावर विलसत नव्हतें. शिष्यमंडळीला उपदेशामृताचे घुटकेही त्यांच्याकडून आतां फारसे मिळत नव्हते. नेहमींप्रमाणें शिष्यशिष्यणींचा मेळा सकाळ सध्याकाळ त्यांच्याभोंवताली गोळा होई. पण त्यामुळें त्यांचे मन उलट व्यग्र झालेलें दिसे. कोणी कांही प्रश्न विचारले तर त्यांचीं त्यांजकडून कशींतरी उत्तरें मिळत. पण हीं उत्तरें देतां देतांच ते मध्यंतरी थांबत आणि अन्यमनस्क होत, किंवा चंचल मन बनून दुसरीकडे कोठें निघून जात.

या कारणामुळें शिष्य आणि शिष्यिणी आतां त्यांच्याजवळ फारशीं जात नसत, भयानें दूरदूरच राहात. पण दोन चार दिवसांनतर त्यांनीं पुन्हा शास्त्रवाचनाचा क्रम सुरू केला आणि तो नियमितपणें पुढें चालू लागला. पण कुसुमला मात्र आतां ते शास्त्र ऐकावयाला बोलवीत नव्हते. कुसुमलाही तें ऐकण्याची जरूर वाटली नाहीं.

गुरुजींचें शास्त्र ऐकण्यासाठीं कुसुम त्यांच्या जवळ येत असेल अशा आशेनें विजय त्यांच्याकडे नियमानें शास्त्राच्यावेळीं येत असे. कारण तिच्या भेटीसाठीं त्याचें मन अगदीं उतावीळ झालें होतें. पण त्याची या बाबतींत दररोज निराशच होत होती.

आज माघ शु॥ १५ होती. आज तपश्चर्येसाठीं एकांत गुहेंत जाऊन राहण्याचा विजयाचा निश्चय झाला होता. यामुळें जाते वेळीं तरी तिची

भेट होईल तर बरें, या आशेनें त्याचे मन अगदीं वेडावून गेलें होतें. आणि त्यासाठीं तो सारखा इकडून तिकडे फेऱ्या घालीत होता.

कुसुमच्या दुःखाला आज सीमा राहिली नव्हती. ज्या विजयाच्या जीवावरती घरदार आणि गणगोत सोडून ती बाहेर बाहेर पडली होती तो तिची बिलकूल फिकीर न करतां तपश्चर्येला जाणार होता. तो इतका निर्दय असेल ह्याची या घटकेपर्यंत तिला कल्पना नव्हती.

तिने आपल्या खोलीचे दार लावून घेतले आणि आपल्या पेटीं-तील विजयाची तसबीर काढून ती त्याचे निरक्षण करू लागली. तिने ही तसबीर त्याच्या घरांतून चोरून आणली होती.

ती तसबीर पाहतां पाहतां तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले आणि ती त्या तसबिरीला उद्देशून म्हणाली, " प्रियकरा, आपण मजवर इतके कसे बरे निष्ठुर झालां ! माझी तुम्हांला लवमात्रही कशी कीव आली नाहीं ? "

कुसुम आपल्या दुःखमय विचारात इतकी गढून गेली होती कीं, आपल्या खोलीचे दार पश्चिमेकडील वाऱ्याच्या योगाने उघडले आहे याची तिला बिलकूल जाणिव झाली नाही.

बरोबर याच वेळेला स्वामीजी त्याच मार्गाने चालले होते. त्यांनी सहज आंत नजर फेकली, तो कुसुम कसले तरी चित्र मांडीवर घेऊन अश्रू गाळीत असल्याची त्यांना दिसली. ते एकदम थांबले. आंत जावे कीं नाहीं यासबधाने त्यांनीं थोडा वेळ आपल्या मनाशी विचार केला. नतर ते एकदम आंत घुसले आणि तिच्या मांडीवरची तसबीर आपल्या हातांत घेऊन ते तिला म्हणाले, " राधिके, ही तसबीर फार छान आहेग. "

पण त्यांच्या या कृत्यानें ती इतकी चिडली कीं, एखाद्या वाघिणी-प्रमाणें त्यांच्या अंगावर चवताळून त्यांना म्हणाली, " चल, दूर हो, चोरा ! "

कुसुमची ती त्या वेळची भयंकर मूर्ति पाहून स्वामीजींच्या तोंडचें पाणी पळाले आणि त्यांनीं त्याच क्षणीं खोलीच्या बाहेर उडी घेतली. पण

कुसुमही त्याच्या पाठोपाठ बाहेर येऊन मोठ्यानें ओरडून म्हणाली, " ह, खबरदार तें चित्र घेऊन जाशील तर."

या वेळीं कुसुमच्या नेत्रांतून सारखा अग्निवर्षाव होत होता.

त्या आरडाओरडीने आश्रमांतील सारे सन्यासी आणि सन्यासिनी तेथें गोळा झाल्या आणि त्यांच्याकडे पाहू लागल्या.

कुसुम त्या मंडळींना उद्देशून मोठ्याने ओरडून म्हणाली, " आपण या चोराला गुरू समजून याची पूजाअर्चा करीत आहां ? "

ती सर्व मडळी तिजकडे आश्चर्यचकित दृष्टीने पाहू लागली. स्वामीजींचे तोंड तर काळे ठिक्कर पडले होते. तथापि तितक्यांतल्या तितक्यांत प्रसगावधान धरून त्यांनी आपल्या हातांतील तसबीर सर्वांच्या पुढे धरली आणि म्हटले, " ही संन्यासीन ही तसबीर छातीवर ठेवून बसली होती. तेव्हां आता चोर कोण आहे हे तुम्हीच ठरवा. "

त्याच्या तोंडचें हे वाक्य ऐकतांच सर्व सन्यासी आणि सन्यासिणी तिजकडे तिरस्काराने पहात तेथून निघून गेल्या.

या वेळीं कुसुमच्या मस्तकावर वज्रच पडल्याप्रमाणे झाले. आपल्या शिष्यशिष्यणींच्या मागोमाग स्वामीजीही विजयाची तसबीर तशीच हातांत घेऊन तेथून निघून गेले.

कुसुम चोर म्हणून ओरडली त्या वेळीं विजय भगवे वस्त्र परिधान करून एका हातांत कमडलु व दुसऱ्या हातांत योगवाशिष्ठ घेऊन गुहेत तपश्चरण करण्यासाठीं जात होता. त्याच्या कानांवर ते शब्द येतांच तिजकडे धांवत जावें आणि तिला हृदयाशी धरून तिचे भय दूर करावे असा विचार त्याच्या मनांत आला. पण पुन्हां त्याच्या वैराग्याने उचल खाल्ली आणि तो आपल्या मनाशीं म्हणाला, " मोह आवराक्याची हीच वेळ आहे ! "

यापुढें तो अधिक वेळ विचारांत न घालवितां तसाच गुहेंत जावयाला निघाला.

याच वेळीं कुसुम ओरडत ओरडत तेथे आली आणि त्याच्या वाटेंत आडवी होऊन त्याला म्हणाली, " मला असहाय स्थितीत टाकून

आपण कोठें जातां ? आपण ज्याला गुरू समजतां तो एक विषयलंपट चोर आहे. "

तिचें हें भाषण ऐकून विजयाची चर्या एकदम म्लान झाली आणि तो कंपित स्वरानें म्हणाला, " काय झालें ? "

इतक्यांत स्वामीजी तेथें येऊन मध्येंच म्हणाले, " ही एका पर-पुरुषाची तसबीर छातीला लावून अश्रू गाळीत होती. इतक्यांत मीं तेथें जाऊन तें चित्र हिच्याजवळून काढून घेतलें. "

विजयाचा आत्मा केव्हांच नष्ट झाला होता. आतां त्याचें केंवळ प्रेत उरलें होतें.

कुसुम संतप्त स्वरानें त्याला म्हणाली, " कृपा करून माझें ते चित्र मला परत देण्याविषयीं आपल्या गुरुजीला सांगा. "

विजय मोठ्यानें कष्टानें म्हणाला, " कोणाची तसबीर आहे ती ? "

कुसुमची चर्या लज्जा आणि संताप यांनीं अगदीं आरक्त झाली होती. ती म्हणाली, " मला ठाऊक नाहीं कोणाची आहे ती. मला आपली ती परत द्या. "

विजय एक दीर्घ निश्वास सोडून गुहेत निघून गेला.

स्त्रीजातीच्या अपमानाची ती पराकाष्ठा होती. आपल्या जीविताचा याच वेळीं शेवट लावावा असें कुसुमला वाटलें. त्या दारुण अपमानानें तिच्या डोळ्यांतून सारख्या अश्रूधारा वाहात होत्या.

इतक्यांत मागून कोणी आपला कोमल हात तिच्या पाठीवरून फिर-वून म्हटलें, " कुसुमताई, रडू नकोस. "

ती एक त्या आश्रमांतीलच तरुण संन्यासिनी होती. कुसुमनें तिच्या खांद्यावर मान टाकली. संन्यासिनी तिला तेथून घेऊन गेली.

पौर्णिमेचा चंद्र आपल्या उज्वल किरणांनीं त्या वेळीं त्या आश्र-माला अप्रतिम शोभा अर्पण करीत होता.

---

# प्रकरण ४३ वें.

## काशीयात्रेस प्रयाण !

कुसुमचा धिक्कार करून विजय गुहेंत गेला खरा; पण आपली हृदयज्वाला तो गुहेच्या बाहेर ठेवू शकला नाहीं. गुहेंतील भेसूर अंधकार त्याच्या छातीवर एखादी जगी शिला ठेविल्याप्रमाणें त्याला भासू लागला; आणि तेथे त्याला पूर्ण एकांत मिळाल्यामुळें त्याच्या मनांत नाहीं नाहीं ते विचार उभे राहिले. कुसुम कोणाची तसबीर हृदयावर ठेवून अश्रुमोचन करीत होती ? तिच्याकरितांच आपण आपल्या बापाचा, आईचा त्याग केला ना? आपण इतक्या एकांतस्थानीं आलो तरी तिचे विचार मनांतून का जात नाहींत ? पण तिच्या मनांत कोणासंबधीं विचार घोळत आहेत ? कोणाच्या विरहाने ती दग्ध होत आहे ! आपले अश्रुजल कोणाच्या स्मृतीला ती तर्पण करीत आहे ? ती तसबीर कोणाची होती, याची आपण कां बरे चौकशी केली नाहीं ? इत्यादि अनेक विचार त्याच्या मनांत उभे राहून त्याचे हृदय दग्ध होऊं लागले. त्याच्या हृदयाला इतक्या यातना त्याच्या आयुष्यांत कधींही झाल्या नव्हत्या.

कुसुमच्या हृदयावरही विजयाच्या या वर्तणुकीनें भयंकर आघात झाला होता. तिला येथून तेथून सर्व पुरुषजात अधम आणि निर्दय वाटूं लागली. विजयाच्या स्नेह्यानें त्याला रोकून ठेविलें नाहीं. तो त्याला सक्तीनें रोकू शकता; पण त्यानें तसं केलें नाहीं म्हणून ती त्याच्यावरही पराकाष्ठेची संतापली. स्वामीजींची अवस्था तर फारच कठीण झाली. त्यांच्या स्वतःचाही त्यांना भरंवसा वाटेना. अखेर त्यांनीं तीर्थयात्रेला जाण्याचें ठरविले.

स्वामीजी तीर्थयात्रेला जाणार या बातमीनें त्यांचे सर्व शिष्य-शिष्यिणी उदास बनल्या. कुसुमला मात्र त्या बातमीनें आनंद झाला. विजय त्याच्या हिप्नॉटिझमच्या तडाख्यांतून आतां खास सुटेल असं तिला वाटलें.

दुसरे दिवशीं पहांटेसच स्वामीजी यात्रेला निघणार म्हणून सर्व शिष्यशिष्यिणींचा रात्रींच त्यांनीं निरोप घेतला. त्या रात्रीं स्वामीजींचें मन अतिशय अस्वस्थ होऊन गेलें होतें. ते आपल्या बैठकीच्या ठिकाणापासून वाचनालयापर्यंत सारख्या येरझारा घालूं लागले. फिरतां फिरतां कुसुमची खोली त्यांना उघडी दिसली. ती त्या वेळीं गाढ झोपेंत असून वाऱ्याच्या योगानें तिच्या मस्तकावरचे केस तिच्या मुखकमलावर भ्रमराप्रमाणे झेंपा घालीत होते.

स्वामीजी आंत जाऊन तिच्या मुखकमलाकडे व तिच्या अप्रतिम सौंदर्याकडे सारखे पाहात राहिले. त्या अवधींत त्यांना स्वतःचीच नव्हे, तर अखिल विश्वाचीही विस्मृति झाली ! तिच्या अधरांत विश्वसौंदर्यसार-सुधा भरलेली त्यांना दिसूं लागली. आणि ती प्राशन करण्यासाठीं त्यांचा जीव अगदीं वेडावून गेला. त्या पिपासेने आपली जन्मजन्मांतरीची तृषा नाहींशी होईल असे त्यांना वाटले. पण आपण केवढे साहस करीत आहो याचीही जाणीव त्यांना होती. यामुळे त्यांचे हृदय धडधड करूं लागलें; लोभ आणि भीति यांच्या दरम्यान त्यांचें अंतःकरण आंदोलनें घेऊं लागलें ! तथापि हळूं हळूं त्या अप्रतिम रूपराशीला आपल्या हृद-याशीं कवटाळण्याचा त्यांचा मोह अनावर होऊं लागला. इतक्यांत त्यांच्या अतृप्त दारुण वासनेचा अदृश्य आघात तिच्या हृदयावर होऊन कीं काय ती एका अंगावर झाली आणि एकदम उठून बसली. पण समोर स्वामीजी उभे राहिलेले पाहतांच ती अतिशय घाबरली आणि पलंगावरून एकदम उडी मारून एका कोंपऱ्यांत जाऊन उभी राहिली. या वेळीं जवळजवळ तिचें सर्व भान नाहींसें झालें होतें म्हटलें तरी चालेल. त्या संकटांतून आपली मुक्तता कशी होईल हाच एक विचार या वेळीं तिच्यापुढें उभा होता. पण तिच्या नेत्रांतून वर्षत असलेल्या अग्नीच्या ठिणग्या पहातांच स्वामीजी भयाभीत झाले आणि एक क्षणाचाही अवधि न लावतां त्यांनी तेथून पलायन केलें, आणि बाहेर आल्याबरोबर आपल्या तीर्थयात्रेची तयारी करण्याविषयीं त्यांनीं आपल्या शिष्यशिष्यिणींना हुकूम केला.

स्वामीजी खोलीच्या बाहेर निघून गेल्यावर अपमानदग्ध कुसुमही तेथून बाहेर पडली आणि अगदीं झपाट्याने विजयाच्या गुहेजवळ जाऊन पोंचली. पण तेथें गेल्यावर ती क्षणैक थांबली. त्याच्याजवळ तरी काय होणार, हा विचार तिच्या मनांत उभा राहिला. जो आपला इतका अपमान आणि इतकी अवहेलना करून गेला, तो आतां तरीं आपली काय दाद घेणार; आणि घेतली तरी अशा माणसाजवळ आपण आपले तोंड कां वेंगाडावें, आपला स्वाभिमान कां गमवावा, हे विचारही वरील विचाराच्या मागोमागच तिच्या मनांत उभे राहिले आणि तिला जगांत एका मुळामुठेचे उदरच काय तें तेवढे आश्रयस्थान दिसले !

हा विचार तिच्या मनांत येतांच ती आश्रमाच्या बाहेर पडली आणि हळू हळू मुळामुठेच्या मार्गाला लागली. सर्व विश्व या वेळी गाढ झोंपेत निमग्न झालेले होते. थोड्या वेळाने ती मुळामुठेच्या तीरावर येऊन पोचली; पण समोरून एक मनुष्य येत आहे असें पहातांच ती दचकली आणि तेथून पळाली ती थेट सडकेवर येऊन उभी राहिली. तो अगदी राजरस्ता; पण तेथे देखील या वेळीं चिट पाखरूसुद्धा नव्हते. पण त्या दुष्ट संन्याशाच्या आश्रमांतून आपण सुरक्षितपणे बाहेर पडलों या समाधानापुढे तिला दुसऱ्या कशाचीही भीति वाटेनाशी झाली. मुख्य रस्त्यावर आल्यावर ती तशीच हळू हळू पुढे जाऊ लागली. आश्रमांतून आपल्याला कोणी पकडावयाला येईल कीं काय अशी भीति तिला क्षणोक्षणी वाटे. तिने आतां झपाट्यानें चालावयास सुरुवात केली. जरासें खुट्ट झाल्याबरोबर आपला शोध करणारीं माणसे आपल्या अगदीं जवळ आलीं असें तिला वाटे. जन्मांत तिला कधीं चालावयाची सवय नसल्यामुळे तिचे पाय दुखूं लागले, आणि रस्त्यावरील खडे तिच्या पायाला रुतून त्यांतून रक्ताच्या धारासुद्धां निघूं लागल्या; तरी तिचें चालणें बंद पडलें नाहीं. हळूहळूं रात्रीचा अंधार नाहींसा; होऊन पूर्व दिशेचें मुख आरक्त झालें आणि पक्ष्यांचा किलाबिलाटही सुरू झाला, प्रा:तकालीन मंद वायूनें वृक्षांचीं पाने हलूं लागलीं.

आतां रस्त्याने जाणारीं येणारीं माणसे तिला अढळूं लागलीं. इतकी सुंदर बालिका इतक्या सकाळीं त्या रस्त्यानें एकटीच चाललेली

पाहून सर्व जण तिच्याकडे टकमका पाहूं लागले. कुसुम कोणाकडे न पाहत मुकाट्यानें खालीं पाहून जात होती. परतु तिचें काळीज मात्र धडधड करीत होतें. जराशीं पुढें गेल्यावर तिला रेल्वेलाईन दिसली. तिच्या कडेकडेनें तिनें स्टेशनावर जावयाचें ठरविलें. या वेळी आपणांजवळ कवडीसुद्धां नाहीं आणि आपण रेल्वेनें प्रवास करणार कसा हा विचारदेखील तिच्या मनाला शिवला नाहीं, आपण एकदां आगगाडींत बसलो म्हणजे या दुष्ट सन्याशाच्या तडाख्यांतून सुटलो एवढी एक गोष्ट तिच्या मनांत घोळत होती.

थोड्या वेळाने ती स्टेशनावर येऊन पोहोचली. पण तेथे पहाते तों शिष्यमंडळीसह स्वामीजी उभे आहेतच. त्या वेळीं ती मोठ्याने किंकाळी मारणार होती. पण तिने ती मोठ्या शर्थीनें दाबली. या वेळीं लांडग्यानें पछाडलेल्या हरणीप्रमाणे तिची स्थिति झाली. कोणीकडे पळून जावें, हें तिला सुचेना. पण तिला पहातांच स्वामीजी पुढे आले आणि तिला म्हणाले, " राधिके, मी तीर्थयात्रेला जात आहे. परत कधीं येईन हे आज सांगू शकत नाहीं. तुला कोठें जावयाचें हे सांग, म्हणजे मी माझ्या या शिष्यांपैकीं कोणाकडून तरी तुझे तिकीट आणविण्याची व्यवस्था करितों. "

आपणाजवळ पैसा नसतांही आपण रेल्वेनें जाऊं इच्छितो हा आपला केवढा मूर्खपणा आहे, याची बरोबर कल्पना आतां कुसुमला झाली. तिनें म्हटलें असतें.
तर स्वामीजींनीं तिला तिकीट काढून दिलें असते. पण त्याचा कोणत्याही प्रकारें उपकार करून घेण्याची तिची इच्छा नव्हती. ती चटकन भानावर येऊन म्हणाली, " मला रेल्वेनें जावयाचें नाहीं. गांवांत जावयाचे आहे. "

स्वामीजींनीं आपल्या शिष्यांपैकीं एकाला हाक मारून तिला एक भाड्याची व्हिक्टोरिया करून देण्यास सांगितले. तो व्हिक्टोरिया पाहण्यासाठीं निघून गेल्यावर कुसुम प्लॅटफार्मवरच्या गर्दीतून बाहेर पडून लेडीजवेटिंगरूममध्ये येऊन बसली. ती त्या गर्दीतून बाहेर पडत असतांना सर्व लोक तिजकडे टकमका पहात होते. तिच्या अनुपम सौंदर्यामुळें सर्वांचे नेत्र तिजकडे आकर्षित झाले !

थोड्याच वेळांत स्वामीजींचा शिष्य एक व्हिक्टोरिया ठरवून तिजकडे आला. कुसुम त्याच्या मागोमाग जाऊन व्हिक्टोरियाजवळ पोंचली आणि लगेंच गाडीवाल्यानें दार उघडून दिल्याबरोबर आंत जाऊन बसली. तिजबरोबर आलेला स्वामीजींचा शिष्य तिच्याजवळ भाड्याचे पैसे देण्यासाठीं व किरकोळ खर्चाला म्हणून एक पांच रुपयांची नोट देऊं लागला. पण तिनें ती घ्यावयाची नाकारिली.

व्हिक्टोरियावाल्याला कुसुमनें मधुकराच्या बिऱ्हाडाचा पत्ता कळविला आणि त्याठिकाणीं स्वतःला घेऊन जाण्यास सांगितलें. व्हिक्टोरियावाल्याने घोड्याच्या लगामाला हिसका दिला आणि थोड्याच वेळांत तिला नेमकें त्या ठिकाणीं आणून सोडिलें.

रस्त्यावर गाडीचा आवाज ऐकिल्याबरोबर मधुकर धांवत धांवत दाराशीं आला; पण गाडींत एकटी कुसुमच बसलेली पाहून तो अगदीं चकित झाला आणि तिला म्हणाला, " तू एकटीच, कुसुम ? "

कुसुम खिन्नस्वरानें म्हणाली, " हो. मी एकटीच आले. "

मकधुर—कां बरें ?

कुसुम डोळ्याला पदर लावून रडूं लागली. मधुकर आश्चर्यमूढ होऊन तिजकडे पाहूं लागला. तिला काय झालें आहे, हें कळल्याखेरीज तो तिचे सांत्वन करणार तरी कसें ?

इतक्यांत गाडीवान मोठ्यानें ओरडून म्हणाला, " अहो ! साहेब, मला काय आपण दिवसभर बसवून ठेवितां ? "

मधुकर त्याला म्हाणाला, " किती तुझें भाडें द्यावयाचे आहे ? "

गाडीवान—भाडें किती द्यावयाचें म्हणून विचारतां ? मला काय आपण दहा पांच रुपये देणार ? स्टेशनापासून येथपर्यंत एक रुपाया घेण्याचा आमचा ठराव आहे. पाहिजे तर माझ्याजवळचें सरकारी बुक पहा.

"नको, नको, तुझें तें बुक तुझ्याजवळच राहूं दे. " एवढें बोलून मधुकरानें त्याच्या हातांत एक रुपया ठेविला.

या दरम्यान कुसुम घरांत जाऊन बसली होती. ती विषादाची केवळ प्रतिमाच दिसत होती.

मधुकर आंत येतांच तिला म्हणाला, " विजयाची प्रकृति बरी आहेना ? "

कुसुमः—माझी त्यांची भेट झाली नाहीं.

या उत्तरानें मधुकर जास्तच गुढांत पडला. तो तिला म्हणाला, "तूं त्याला न विचारतां आलीस याचा अर्थ काय ? "

कुसुमः—स्वामीजींच्या नीचपणामुळें मला तेथें राहणें अगदी अशक्य झालें.

एवढें बोलून तिनें आपली सगळी हकीकत त्याला थोडक्यांत निवेदन केली.

मकधुर थोडा वेळ स्तब्ध राहून तिला म्हणाला, " मग तू हे सगळे विजयाच्या कानांवर कां घातले नाहीस ? "

कुसुमः—मी त्यांना सांगावयाचा प्रयत्न केला. पण ते मनावर घेतील तेव्हां कीं नाहीं? त्यानतर मला त्या मेल्याचा नीचपणा अगदींच असह्य झाल्यामुळे मी काल रात्रीं मुळामुठेत जीव द्यावयालाही गेले होते. पण तेथेंही माझें नशीब आडवें आलें ! नंतर मी आपणाकडे आले. आतां आपण मला काशीला माझ्या मावशीकडे नेऊन पोचतें करा.

यावर मधुकर गभीरपणानें म्हणाला, "तू पळून आलीस हे बरे केले नाहींस, कुसुम. तू पुन्हां त्या आश्रमांत गेलें पाहिजेस. मनुष्य स्वभावतः स्वाथ्यप्रिय आहे. यामुळे त्याला कष्ट करणे आवडत नाहीं. याच कारणामुळें खोट्या गोष्टीवरचाहि मनुष्याचा विश्वास सहजासहजीं नष्ट होत नाहीं. विजयाच्या ठिकाणीं तर ह्या श्रद्धेची मात्रा फारच अधिक आहे. त्याच्या ठिकाणची ही अधश्रद्धा तूं नष्ट केली पाहिजेस. त्याला त्या गुरूच्या पाशांतून सोडविणें तुझें कर्तव्य आहे. "

त्याच्या या भाषणाने कुसुम अधिकच खिन्न झाली आणि म्हणाली " आपणही मला आश्रय देत नाहींत? मग मला मरणाखेरीज दुसरी गतीच राहिली नाहीं, "

कुसुमच्या या भाषणानें मधुकराच्या हृदयांतील प्रणयाच्या कोमल तारांवर आघात झाला. पण तिकडे दुर्लक्ष करून तो तिला म्हणाला, " तूं जर विजयाचा त्याग करशील तर पुनः तुला त्याची प्राप्ति होणें मुष्कील आहे. "

कुसुम अत्यंत निराशेने म्हणाली, " ती आशा आतां मला राहिली नाहीं. मी आतां कुठे तरी एखाद्या पवित्र आणि निरुपाधिक स्थळीं आपले उरलेले आयुष्य घालवूं इच्छितें. आपण मला माझ्या मावशीकडे पोंचतें करा."

मधुकर तिच्या या वृत्तिचा जोरानें निषेध करून म्हणाला, " आशा राहिली नाहीं हें तुझे म्हणणे चुकीचे आहे. तुझी आशा कायम आहे. ती अभिमानाच्याखाली दडपली गेली आहे इतकेंच काय ते. अर्थात् तुला त्याच्या सगतींत राहिलेंच पाहिजे. त्याला सोडून तुला पळून जातां यावयाचें नाहीं, किंवा जीवितत्यागही करतां यावयाचा नाहीं. या वेळीं तुझे मुख्य कर्तव्य हे आहे कीं, सर्व प्रकारच्या अत्याचारापासून स्वतःचें सरक्षण करून त्यांच्या आघातानेंच विजयाला सावध करावयाचें. तूं मजकडे निघून आलीस हें बरे झालें नाहीं. तू इकडे न येतां त्यालाच शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करित राहतीस तर एव्हांना तो त्या मोहांतून मुक्त होता; आणि तुम्ही उभयतांही एकदमच मजकडे येऊन हंसत हंसत म्हणतां कीं, आम्ही मोठ्या तुफानांतून बचावून आज फिरून एकत्र झालों आहों. तरी पण अजूनही कांहीं बिघडलें नाहीं. तो दिवस फिरूनही उगवेल. तूं बिलकूल फिकीर करू नकोस. चल, मीच तुला आतां त्याच्याकडे नेऊन पोंचवितो. उगीच वेळ घालवू नकोस. तुझें स्नान वगैरे अद्याप झाले नाहीं वाटतें. हें सगळें लौकर आटोप आणि जेवणही उरकून घे. सैंपाकघरांत सगळें तयार आहे. मी इतक्यांत गाडी घेऊन येतो. "

# प्रकरण ४४ वें.

## पुनः आश्रमांत !

कुसुम मुळामुठेच्या तीरावरून ज्या माणसाला पाहून परत फिरली तो विजयच होता. गुहेच्या एकांतांत राहणें त्याला अगदीं असह्य झाल्यामुळें त्या रात्रीं तो बाहेर पडला होता आणि पहाटेच्या वेळीं नदींत स्नान करून परत आश्रमाकडे चालला होता. आपल्याला पाहून परत फिरलेली कुसुम आहे हे त्याने ओळखले. पण ती नदीवर कशा करितां आली होती आणि आपल्याला पाहून परत का फिरली याचें कारण मात्र त्याला समजलें नाहीं.

आश्रमांत परत आल्यावर गुरुजी तीर्थयात्रेला जाणार आहेत, हे त्याला कळलें. पण गुहेच्या बाहेर येणे म्हणजे गुरुआज्ञेचा भंग करणें होय, असे असल्यामुळें गुरूजींची भेट घेण्याचीं त्याची छाती झाली नाहीं. तो तडक तसाच आपल्या गुहेत निघून गेला.

पण दिवस उगवतो न उगवतो, तोंच एक सन्यासीण त्याजकडे धांवत आली आणि म्हणाली, " आज पाहांटेपासून राधिकेचा आश्रमांत पत्ता नाहीं. लौकर स्टेशनावर जाऊन गुरुजींना ही खबर कळवा ! "

या बातमीने विजयाच्या डोळ्यांपुढे काजवे चमकू लागले आणि त्याला सर्व विश्व शून्यवत् दिसू लागलें.

त्याला आतां स्वतःच्या वर्तनाचा अतिशय पश्चात्ताप झाला आणि स्वतःचा धिक्कार करून तो आपल्या मनाशी म्हणू लागला, " मीं त्या दिवशी तिच्या करुणवाणीकडे कां बरें लक्ष दिलें नाहीं? एवढेंच नव्हें, तर मी तिचा भयंकर अपमानच करीत गेलों. आतां तिचा कोठें आणि कसा पत्ता लागेल ? या जन्मांत तिची भेट होईल हें तरी कोण खातरीनें सांगू शकेल? ती जिवंत तरी असेल काय ? मुळामुठेचें उदर तिचा घास घेण्यासाठीं टपलेलेंच आहे. तेथें तिच्या जिवाचें रक्षण करणारें कोण भेटेल ? एका सेकंडांतच तिचा निकाल झाला असेल ! "

कुसुमची जणुं काय कित्येक वर्षे भेट झाली नाहीं इतकें दुःख आतां विजयाला वाटूं लागलें आणि जन्मजन्मांतरीच्या विरहाप्रमाणें त्याचें हृदय जळूं लागले.

आज त्याला त्याच्या बालमित्राचें स्मरण झालें. त्याचप्रमाणें स्नेह-मयी मातेच्या स्मृतीनेंही त्याचें हृदय उचंबळूं लागलें. त्या दोन स्नेहमूर्तींच्या भेटीसाठीं त्याचा जीव आज अगदीं वेडा झाला. त्याच्या ज्या वर्तनानें त्याच्या मातेच्या आणि मित्राच्या हृदयावर आघात झाला होता तें वर्तन आज त्याच्या अंतःकरणाला सुईप्रमाणें बोचूं लागलें. आपल्या हृदयाला शांति देण्याचे सामर्थ्य गुरुचरणांत नाहीं हें त्याला आज स्पष्ट दिसून आलें. दुर्बोध आणि जटिल शास्त्रांतही हें सामर्थ्य नव्हतें. हें सामर्थ्य उदार मित्रांच्या आणि स्नेहमयी मातेच्या हृदयांत मात्र असलेलें त्याला दिसले! कृत्रिम गुरुभक्तीचा त्याच्या आत्म्यावरील पडदा दूर होतांच त्याची विवेक-शक्ति त्याला टोंचूं लागली. शास्त्रवचनांचे ढीगचे ढीग त्याच्या अंतःकर-णावर आतांपर्यंत रचले होते ते आज दूर होतांच, त्याचा आत्मा चिरस्नेह-मय आश्रयाकडे धांवूं लागला. गुरूच्या रागावलेल्या, किंवा इतर आश्रम-वासी यांच्या कुतुहलपूर्ण दृष्टीचा विचार देखील त्या वेळीं त्याच्या मनांत आला नाहीं. तो दोन्ही हातांनीं आपले तोंड झांकून अश्रू गाळूं लागला.

याच वेळीं आपले मोठमोठे दांत बाहेर काढीत काढीत तमण्णा त्याजकडे आला. विजयानें त्याजकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. पण तमण्णा माघार घेणारा मनुष्य नव्हता. असल्या अवहेलनेची किंवा अपमानाची त्याला बिलकूल किंमत नव्हती.

तो पान चावीत चावीत विजयाला म्हणाला, "कारे विजय, मला असें कळलें आहे कीं, तुझ्या या वनवासाला कारण तुझे आईबापच आहेत. खरें कांरे हें? पण तुझ्या लीला एवढ्याच का? लक्ष्मणाचा त्याग पहि-ल्यानेंच होऊन चुकला होता. आतां सीताहरणही झालें वाटतें. आतां पुढें काय?"

त्याच्या तोंडचें हें शेवटचें वाक्य पूर्ण होण्याचा अवकाश, विजयानें एकदम त्याच्या अंगावर झांप टाकली आणि त्याची शेंडी पकडून म्हटलें.

" आतां फक्त शूर्पणखेचा वध राहिला आहे! नीचा! चल नीघ येथून; नाहीं. तर सगळी बत्तीशी मोकळी करीन. "

एवढें बोलून विजयानें त्याला एक जोराचा धक्का दिला. त्यासरस तमण्णा कोलमडत दाराच्याबाहेर येऊन आदळला. तमण्णाचा सर्व होशच उडून गेल्यामुळें पुनः विजयाजवळ जाण्याची त्याची छाती होईना. याच वेळीं त्याच्या हातून फरसबंदीवर एक तसबीर पडली. ही तसबीर विजयाच्या घरच्या दिवाणखान्यांत लटकावलेली होती. ती त्याच्या हातीं कशी आली याचें विजयाला आश्चर्य वाटून तो तमण्णाला म्हणाला, " ही तसबीर तुझ्या हातीं कशी काय आली, बुवा ? "

तमण्णा रुसक्या स्वरानें म्हणाला, "हेंच तर तुला सांगण्यासाठीं मी आलों होतो. गुरुजी तीर्थयात्रेला जाणार आहेत हे मला कळल्याबरोबर मी त्यांना वंदन करण्यासाठीं आलो होतों. पण मी आलो तव्हां ते निघून गेले होते, आणि त्यांच्या खोलींत ही तसबीर पडली होती. हीच तसबीर हृदयाशीं धरून कुसुम अश्रू गाळीत बसली होती असें मीं ऐकिलें आहे. याचमुळें गुरूजी तिजवर रागावले आणि त्यामुळें तीही आज पहांटेपासून कोणीकडे निघून गेली. "

त्याच्या तोंडचें हें भाषण ऐकून विजयाच्या नेत्रापुढे सर्वत्र अंधार दिसूं लागला आणि तो एखाद्या वेड्याप्रमाणें सारखा तमण्णाकडे पहात राहिला.

यानंतर थोड्या वेळानें त्यानें मधुकरकडे जावयाचें ठरविलें; आणि त्याप्रमाणें तो लागलाच आश्रमाच्या बाहेर पडला. रस्त्यांत कोठें तांगा अगर गाडी न दिसल्यामुळें तो तसाच पायानें शहराकडे जाऊं लागला. इतक्यांत स्टेशनच्या बाजूनें येणारा गुरुजींचा पट्टशिष्य योगानंद त्याला पाहून त्याच्याजवळ आला आणि त्याच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, " गुरुदेव तीर्थयात्रेला गेले आहेत. मी इतक्यांतच त्यांना रवाना करून इकडे आलों. राधादेवीचा पत्ता नाहीं. तुम्ही त्यांचा शोध करून त्यांना आश्रमांत घेऊन या. ती बहुधा गांवांत तुमच्या स्नेह्याकडे गेली असावी. "

ती मधुकराकडे गेली असावी हें त्या संन्याशाकडून कळतांच विजयानें गांवांत जाण्याचा बेत तहकूब केला आणि तो त्याजबरोबर फिरून आश्रमांत आला व आपल्या गुहेमध्यें जाऊन बसला.

थोड्या वेळाने त्याला गुहेजवळ माणसांची चाहूल ऐकावयाला आली. त्यानें मान वर करून पाहिलें, तों समोर मधुकर आणि कुसुम उभी!

विजयाचें हृदय आनंदानें उचंबळूं लागलें. कुसुम अशी अकल्पित रीतीनें आपणाजवळ येऊन उभी राहिलेली पाहून तिला आपल्या हृदयाशीं धरावे असें त्याला वाटलें. परंतु त्याचा नैसर्गिक स्वाभिमान पुन्हां आडवा आला. ती त्याला न विचारतां मधुकराकडे निघून गेली होती!

तो मधुकराशींही कांहीं बोलला नाहीं. पण मधुकर आपण होऊनच त्याला म्हणाला, "कुसुमला या आश्रमांत राहणें अशक्य झालें. म्हणून मावशीकडे नेऊन पोचते करण्याच्या बाबतींत माझें सहाय्य मागण्यासाठीं ती मजकडे आली होती. तू त्या वेळी या एकांत गुहेत बसून तपश्चर्या करीत होतास. पण तूच तिला या आश्रमांत घेऊन आला आहेस, म्हणून तुला विचारल्याखेरीज तिनें कोणीकडे जाणें बरें नाहीं, असें मला वाटल्यावरून मी पुनः तिला तुजकडे घेऊन आलों आहे. तूं आज गुहेचा त्याग केला आहेसच. आपल्या गुरुजींच्या अत्याचारांपासून तुला जर येथे हिचें सरक्षण करणें शक्य नसेल तर, तूं हिला हिच्या मावशीकडे पोहोचतें करून ये."

एवढें बोलून त्याच्या उत्तराचीही वाट न पाहतां मधुकर तेथून झटकला. कुसुम मात्र जागच्याजागींच उभी होती. तिची या वेळीं मोठी चमत्कारिक अवस्था होऊन गेली होती. तिला धड तेथें उभेही राहतां येईना आणि धड जाववेनाही.

विजय तिजकडे सारखा मुग्ध दृष्टीनें पहात होता. या वेळीं तो आपल्या मनाशीं म्हणाला, "केवळ माझ्या प्रेमाखातरच हिला गुरुजीकडून असा अपमान सहन करण्याचा प्रसंग आला!" नंतर तो सद्ग-

दित कंठानें तिला म्हणाला, “ थांब, मी कोणातरी संन्यासिनीला बोलावून आणतों. ”

इतक्यांत एक संन्यासिनी तेथें आली आणि तिचें प्रेमपूर्वक स्वागत करून तिला तेथून घेऊन गेली.

विजयाच्या प्रेमपूर्ण भाषणानें कुसुमच्या हृदयांत पुनः आनंदाचा कल्लोळ उसळला. आपण ज्याच्यासाठीं एवढें कष्ट सोशीत आहोंत तो आपणास सर्वस्वींच विसरला नाहीं अशी आतां तिची पूर्ण खातरी झाली.

स्वामीजी आतां आश्रमांत नसल्यामुळें कुसुम निर्भय चित्तानें आश्रमांतलीं सगळीं कामे करूं लागली; आणि ही कामे करतां करतां ती विजयाच्याही कामीं सहाय्य करी. तिची चपलता व कार्यनिष्ठा, तिच्या बोलण्याची एक विशिष्ट प्रकारची खुमारी, तिच्या कपाळावर उडणारी अलकराजी वगैरे वगैरेनें विजयाचे हृदय अगदीं वेडावून जात होते. पण त्यानें आपल्या हातानेंच तिच्या आणि त्याच्यामध्यें जो एक अडचणीचा डोंगर उभा केला होता, तो त्या उभयतांना एकमेकांच्याजवळ येऊं देत नव्हता ! तिला लांबूनच पाहून त्याला आपल्या मनाचें समाधान करावें लागे. दिवसांतून आणि रात्रींतून त्या उभयतांच्या कितीतरी गांठीभेटी होत. पण उभयतांचे डोळ्याला डोळे भिडले कीं, तीं परस्परांपासून दूर हटत !

आश्रमांतील निरनिराळीं कामें कुसुम पहात होती; तथापि सगळी कामें करूनही तिचा वेळ जात नसे. तेव्हां ती आपल्या मनाशीं म्हणे, “ मी या आश्रमांत रहाण्याची जरूर काय ? ”

ती ज्याची सेवा करूं इच्छित होती, तो तिच्या सेवेचा भुकेला नव्हता. मग तिनें येथें रहावयाचें कशाकरिता ? यापेक्षां आपण कोणा अनाथ आजाऱ्याची सुश्रूषा केली, तर आपल्या जीवाचें सार्थक तरी होईल असा विचार तिच्या मनांत उभा राहिला. याच वेळीं विचार करतां करतां तिच्या कल्पनाचक्षूंपुढें गृहस्थाश्रमाची एक रमणीय सृष्टि उभी राहिली. या सृष्टींत ती आपल्या पतीची—विजयाची—आणि आपल्या मुलांलेंकरांची सुश्रूषा करण्यांत गढलेली दिसली. या सुखासाठीं तिचें हृदय वेडावलें होतें. तिनें एक दीर्घनिश्वास सोडला.

# प्रकरण ४५ वें.

## प्रेमाचा विजय !

सुखदुःख आणि आशानिराशा यांच्या आंदोलनांत कुसुम आणि विजय हीं दोघेही आणखी कांहीं दिवस राहूं शकलीं असतीं, पण स्वामीजी तितक्यांतच पुन्हां परत आले. तो वसत ऋतूचा समय होता.

स्वामीजींनीं आश्रमांत वसंतोत्सवाची एक नवीन टुम काढली होती. या उत्सवाची तऱ्हा त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांतून घेतली होती. आज सगळया सन्यासिनी गुलाबी वस्त्र परिधान करून कृष्णलीला गात होत्या.

कुसुम त्या वेषांत इतकी अप्रतिम दिसत होती कीं, जणु काय ती सौंदर्यांत नहातच आहे. तिची देहलता साक्षात् कुसुमचापाप्रमाणे डोळ्यांना मोह पाडीत होती. लज्जेच्या मधून मधून तिच्या गालांवर उठणाऱ्या छटा तर तिच्या आजच्या सौंदर्याला फारच खुलवीत होत्या.

आज मात्र तिला पाहून विजयाचें हृदय वासनाकुल झाले. कुसुमचीही हीच अवस्था झाली. पण लज्जेमुळें परस्परांस परस्परांचे मनोभाव कळविण्याचे धैर्य कोणासही झाल नाहीं; अशा स्थितींत सबध दिवस निघून गेला.

रात्रीं चंद्राचे शीतल आणि श्वेत किरण ज्या वेळी वसुंधरादेवीला गाढ आलिंगन देऊं लागले आणि दक्षिण वायु आपल्या मंद स्पर्शानें तिला रिझवू लागला, त्या वेळीं स्वामीजींनी आपल्या शिष्यशिष्यणींसह वसंतगीत गावयास सुरुवात केली. उत्तरदेशीय रीतीरिवाजाप्रमाणेंच तद्देशीय वैष्णव कवीवरही स्वामीजींचें अतिशय प्रेम होतें; यामुळें प्रस्तुत प्रसंगींही त्यांनीं त्याच कवींचीं मधुर वसतगीतें पसत केली होती. आरंभीं यांनीं पुढील गीत म्हणावयास सुरुवात केलीः—

कुसुमभरे नव पल्लव डोले ।
मधु पीवे मधुकरी मधुकर बोले ॥

नव कोकिल धुनि पंचम गावे।
मलय पवन मृदु मंद सुहावे॥
जुगल दंपति अति मन भावे।
पूनो रात अमोले॥ १॥

या गीतानें गुरुजींच्या हृदयवृत्ति अगदीं तल्लीन होऊन गेल्या आणि त्यांना कृष्णलीलेचें पुढील गीत गावयास स्फूर्ति झालीः—

सखी सब लाज लई नंदलाल।
भोरहि जात रही मैं पनिघट,॥
संग नहीं कोई बाल॥ १॥
औचक आड लगाइ हिए हँसि बेदरकी गोपाल।
अंचल झटकी कंचुकी मस्तकीं ऐसी॥
निलज कुचाल॥ २॥
बडी धीठ होरीको रसिया, वैसेई सब ग्वाल।
“ रसिक किशोरी ” या होरीमे भलो॥
बन्यो घरवाल॥ ३॥

याप्रमाणें स्वामीजी गाण्यांत अगदीं तल्लीन होऊन गेले. ते थोडेसे थकल्यावर शिष्यांनीं गाणें म्हणावयास सुरुवात केली. याप्रमाणे गुरुजी थकले म्हणजे शिष्य सुरुवात करीत आणि शिष्य थकले म्हणजे गुरुजी सुरुवात करीत. पण कुसुमच्यानें तेथें अधिक वेळ बसवलें नाहीं. ती तेथून हळूंच उठून एकांतांत येऊन बसली. ती निघून गेली हें कोणासही कळलें नाहीं.

एकान्त जागीं येऊन बसल्यावर तिने एक वेळ आकाशाकडे पाहिलं. त्या वेळीं तिला तें मोत्यांच्या उघड्या पडलेल्या शिंपेप्रमाणे दिसूं लागलें.

आजची शुभ्र जोत्स्ना, आम्रवृक्षांच्या मोहरांचा सुगंध आणि उत्कंठित करणारा मंद वायु हीं तिच्या उदयांत घुसून त्यांनीं तिच्या वृत्ति अगदीं उत्तेजित करून सोडल्या होत्या. त्या रात्रीनें तिजपुढें मूर्तिमंत आनंद उभा केला होता. ती रात्र फुकट जाणें म्हणजे आपलें सगळें आयुष्य

फुकट जाण्याप्रमाणें तिला वाटूं लागलें. या रात्रीं आपण प्रेमसागरांत बुडून जाऊं असेंही तिला वाटू लागलें. दिल खुला करून प्रेम करण्याची जर कोणती रात्र तिला तिच्या सगळ्या आयुष्यांत दिसली असेल, तर ती हीच रात्र होय. इतकेंच नव्हें, तर खुद्द ती रात्रच तिला एखाद्या विरहोत्कंठ रमणीप्रमाणे दिसूं लागली ! कुसुमला आतां आपल्या चित्तवृत्ति आंवरणें अगदीं अशक्य झालें आणि ती हळूंहळू तशीच तेथून मुळामुठेच्या तीरावर जाऊन पोंचली. आज तिच्या प्रत्येक अवयवांतून तिचे सौंदर्य आणि तिचें व्यर्थ जाणारें यौवन तळपू लागलें होतें. तिच्या हृदयालाही या गोष्टीची जाणीव होऊं लागली होती. थोड्या वेळाने ती नदींत पाय सोडून बसली.

विजयाचे मनही आज असेच अस्वस्थ झाले होते. त्याच्या हृदयाचीं व्याकुलता क्षणोक्षणीं वाढत जाऊन ती अगदीं पराकाष्ठेला पोंचली. त्या वेळी तो आपल्या मनाशीं म्हणाला, " छे:, आतां आपल्याच्याने ही हृदयाची व्याकुलता सहन होत नाहीं. आपली आत्मनिग्रहाची असमर्थता आज आपण स्वामीजींना कळविणार, आणि कुसुमला पत्नी बनवून यापुढचें सगळे आयुष्य सुखासमाधानांत घालविणार. जिच्या प्रथम दर्शनाबरोबरच त्याच्या हृदयांत तिजविषयींचा प्रेमभाव उदित झाला, आणि जिला आपली अर्धांगी बनविण्यासाठीं त्याने आपले घरदारही सोडलें, तिला आज आपण आपल्या बाहुपाशांत बद्ध करणार या नुसत्या कल्पनेनेंच त्याच्या आनंदाला पारावार उरला नाहीं. ह्या आनदानें त्याच्या चित्तवृत्ति अधिकच अस्थिर झाल्या. या वेळीं गाणे बंद झालें होतें. तो कुसुमला पाहू लागला. पण ती त्याला कोठेंच दिसेना. तिच्या ऐवजीं मधुकर आणि आपला छोटा भाऊ आणि बहिण मनु हीं मात्र त्याला दिसलीं.

त्यांना पाहतांच विजय गुरुजींना, त्यांच्या आश्रमाला आणि आपल्या आश्रमधर्मालाही विसरला आणि आपल्या गोजिरवाण्या भावंडांना जवळ घेऊन त्यांचे पटापट मुके घेऊं लागला ! त्याच्या हृदयांत तुंबलेला प्रेमौघ त्यांना पाहतांच एकदम उसळला आणि त्याबरोबर त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या !

इतक्यांत मधुकर त्याच्या खांद्यावर हात ठेवून सद्गदित कंठानें म्हणाला, " तुझ्या वडिलांची प्रकृति फार बिघडली आहे. तुझी आई तुला घेऊन जाण्यासाठीं तांतडीनें इकडे आली असून तिची गाडी आमश्रमाच्या बाहेर उभी आहे."

विजय आपल्या भाऊबहिणीला हृदयाशीं धरून तसाच आईकडे धांवत धांवत गेला आणि गाडीचें दार उघडून त्याने तिच्या पायांवर डोके ठेविलें.

माईसाहेबांनीं त्याला हृदयाशीं कवटाळले आ[illegible] [illegible]ळून आपल्या अश्रूंनीं इतके दिवस केलेला त्याच्या त्यागाचा अपराध धुवून टाकिला !

थोड्या वेळाने त्या विजयाला म्हणाल्या, " बाळ, मला आतां त्यांची कांहीं बरी गत दिसत नाहीं. तुझ्या भेटीचा त्यांनीं ध्यास घेतला आहे. तू आतांच्या आतां निघावयाची तयारी कर. सूनबाईला बरोबर घे. मी तुम्हां दोघांनाही माझ्या गाडींत नेणार आहे."

विजयाच्या आनंदाला आतां पारावार राहिला नाहीं. त्याची आई कुसुमला आपली सून म्हणून म्हणावयाला तयार झाली, एवढेच नव्हे, तर त्याच्याबरोबर तिलाही घरीं घेऊन जावयाला आली ! यापेक्षां त्याला आणखी काय पाहिजे होते ! तो तत्काळ कुसुम[illegible] करण्यासाठीं आश्रमांत घुसला. पण गुरुजींच्या गाण्याच्या बैठ[illegible] अतिशय शरमला. गुरुजींना कशी आणि कोणत्या ता[illegible] आज्ञा मागावी असें त्याला झाले ! इतर संन्याशांची धिक्कारपूर्ण [illegible] करण्याचेंही बळ त्याच्या अंगीं नव्हते. पण तो तेथें जेव्हां नीट निरखून पाहूं लागला, तेव्हां त्याला तेथे स्वामीजीही दिसेनात आणि कुसुमही दिसेना. पण या योगानें त्याला एक प्रकारे समाधान वाटलें. कारण, आपण आतां एकांतांत गुरुजींची परवानगी घेऊन व कुसुमचीही एकांतांतच समजूत काढून तिला बरोबर नेऊं असे त्यानें ठराविले.

पण त्यानें सगळा आश्रम धुंडाळला, तरी त्याला गुरुजींचा किंवा कुसुमचा पत्ता लागेना ! त्यानें सगळ्या कोठड्या